म. ग्रं. सं. ठाणें
विषय
क्र.



# अगस्तीच्या अंगणांत

प्रभाकर पाध्ये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक 22809
क्रमांक 228 नों: दि: 20/9/58



# अगस्तीच्या अंगणांत

## प्रभाकर पाध्ये यांचीं पुस्तकें

आजकालचा महाराष्ट्र ( सहकार्यानें )

कलेचीं क्षितिजें

पाकिस्तान कीं पन्नास टक्के ?

तीन तपस्वी

समाजवादाचा पुनर्जन्म

Yugoslavia : Land of New Horizons


व्याधाची चांदणी

कृष्णकमळीची वेल

अर्धवर्तुळें

प्रकाशांतील व्यक्ति

नवें जग : नवीं क्षितिज



# अ स्ती
# ग
# च्या
# ग
# अं णां
# त

प्रभाकर पाध्ये

वा. क्र.

पॉप्युलर बुक डेपो मुंबई

किंमत तीन रुपये

हक्क
सर्व स्वाधीन

पहिली
आवृत्ति
सें ९
डि र १ ७
व ५



द्र
मु
क
श्री. बा. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

का
प्र क
श
ग. रा. भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड
मुंबई ७

श्री. एस्. एम्.

व

ताराबाई जोशी

ह्यांस....

# च्या
# अ स्ती
# ग

# ग
# त
# अं
# णां


१ कोलंबो

१७ - अनुराधापूर

४४ सिंगापूर

७८ सायगांव

९६ दलात

१०७ मनिला




मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रमांक 22८५७. वि.
क्रमांक .. 22८ ....... नों: दि:
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८७४५

# कोलोंबो

भारतीय मनास कुबेराच्या अलकेचें जसें आकर्षण वाटलेलें आहे तसेंच लंकेचें वाटलेलें आहे. पण भारतीय मनाला घडलेला लंकेचा परिचय अलकेप्रमाणेंच कल्पनारम्य काव्याच्या द्वारें असला तरी तो असा काल्पनिक अगर स्वप्नमय नाहीं. त्याला वास्तवाचा भरभक्कम आधार आहे आणि पर्वताप्रमाणें समुद्र हा दुस्तर नसल्यामुळें या वस्तुस्थितीचें ज्ञान मानवाला फार प्राचीन कालापासून आहे.

किंबहुना रामायणकालीन लंका तरी पूर्णतः काल्पनिक होती असें मानण्यास कांहीं आधार आहे का? रावणाच्या राजवाड्याचे अगर सीतेच्या अशोकवनाचे कांहीं अवशेष आज श्रीलंकेंत नसावेत, पण रामानें बांधलेला सेतुबंध?

हा सेतुबंध म्हणजे केवळ कविकल्पना नाहीं हें नुकताच मी मद्रासहून कोलोंबोला आलों तेव्हां माझ्या ध्यानांत आलें. आमचें विमान 'अॅडाम्स ब्रिज'च्या बाजूनें आलें. खिडकींतून खालीं पाहिलें. भारताची भूमि निमुळती होत जाऊन समुद्राच्या निळ्या विस्तारांत शिरली होती. त्या टोकाच्या दक्षिणेस कांहीं अंतरावर जमिनीचा एक लांबच लांब तुकडा पसरला होता. 'जमिनीचा तुकडा' असें म्हटलें मीं— पण तो खरोखर एकाद्या विशाल तलवारीसारखा दिसत होता. हुबेहूब तलवारीसारखा! भारताच्या बाजूचा भाग मुठीसारखा आणि उरलेला भाग पात्यासारखा! मूठ रत्न-

जडित दिसत होती आणि पातें नुकतेंच परजल्यासारखें लकलकत होतें. या भागावर सांचलेल्या समुद्राच्या काळ्या-निळ्या-पांढऱ्या पाण्याची ही किमया होती. एखाद्या निळ्या रेशमी शेल्यावर ठेवलेल्या उंची तलवारीप्रमाणें भासणारी ही तलवार येथें कशी आली ? रावणाचा वध करून परत येतांना आतां निरुपयोगी म्हणून रामानें पुष्पक विमानांतून बाहेर फेंकून दिली तीच ही असेल काय ?

आणि त्या तलवारीच्या टोकापलीकडे अंतराअंतरावर आरक्तशुभ्र भूभाग दिसतो त्याला काय म्हणणार ? सीतेचें रावणानें हरण केलें तेव्हां तिचा रत्नहार तुटून जीं रत्नें आणि माणकें खालीं पडलीं त्यांतलीं हीं कांहीं असतील काय ? पण संस्कृत कवींच्या कल्पनाविलासाचा असला उल्लास मला जमणार नाहीं आणि पेलणार नाहीं म्हणून मी तो सोडून देतों, आणि एवढेंच म्हणतों कीं भारत आणि श्रीलंका यांच्या दरम्यान समुद्रानें ठिकठिकाणीं भरपूर तोडलेली, पण दृष्टीनें जोडतां येईल अशी ही भूभागाची सांखळी म्हणजे वाल्मिकीच्या सेतुबंधाला निसर्गाचा आधार आहे.

माझी नजर त्या भूभागांच्या सांखळीचा वेध घेत होती. सारा सेतुबंध नजरेच्या एका टप्प्यांत आणण्यास मी अधीर झालों होतों. अर्थात् निसर्गतःच हें कठीण काम होतें. त्यांतून आमचें विमान पश्चिमेकडे झुकत होतें. त्यामुळें तो सेतुबंध अंतराच्या धुकट विस्तारांत अधिक अधिक गडप होत गेला. गेल्या खेपेस मी कोलोंबोहून मद्रासला आलों तेव्हां विमान सिलोनच्या पश्चिम कांठा-कांठानें आलें होतें आणि त्या बेटाला किनारीप्रमाणें शोभणाऱ्या रेलरस्त्याचें, त्यावरून धावणाऱ्या आगगाड्यांचें, त्यांना पकडण्यास धावणाऱ्या समुद्राच्या लाटांचें तरल दर्शन झालें होतें. पण आतां दृष्टि सेतुबंधाच्या धुकट चिंतनांत मुग्ध झाली होती. रेलरस्त्याची अपेक्षा बरीचशी चुरगळली होती. इतक्यांत आमचें विमान एकदम् भूभागावर शिरलें, खालीं सिलोनच्या हिरव्या निसर्गाचा देखावा उसळला आणि दृष्टि भानावर आली. आमचें विमान झपाट्यानें रत्मालाना तळाकडे निघालें होतें. कोलोंबोचें बंदर डाव्या बाजूला बरेंच दूर होतें. बंदरांत उभ्या असलेल्या बोटी, जहाजें, होड्या, नौका, एखाद्या राखी रंगाच्या सतरंजीवर नक्षीकाम दिसावें तशा दिसल्या. पण हें फिकट दृश्य दृष्टि बांधून ठेवूं शकलें नाहीं. खालच्या तळ्याचें शेवाळलेलें हिरवें पाणी आणि त्याच्या कांठावरचे मस्त माड यांनीं ती खेचून घेतली. इतक्यांत खालीं समुद्रकांठच्या रेलरुळावरून

आगगाडी जातांना दिसली ; आणि आगगाडीच्या इंजिनाचा कानठाळ्या बसविणारा खेचक आवाज ऐकूं आला — म्हणजे आल्यासारखा वाटला ! विमानांत खालच्या जमिनीवरचा आवाज ऐकू येणार तरी कसा ? पण डोळ्यांना जणूं तो जाणवला. सुप्रसिद्ध रशियन शास्त्रज्ञ पाव्हलॉव् याचा एक सिद्धान्त आहे ना ? एका अनुभवाच्या जाणीवेनें त्या अनुभवाशीं संलग्न असलेल्या अनुभवाचा बोध होतो आणि त्याचा मनावर व शरीरावर अनुरूप असा परिणामहि होतो. तसेंच कांहींसें झालें.

सिलोनच्या समुद्रकांठानें धावणाऱ्या आगगाड्यांचें दर्शन मोठें रंगदार आहे. मी गॉल रोडवर ग्रीनलँडस् हॉटेलमध्यें राहत होतों. तेथून समुद्रकिनारा आणि त्यावरून जाणारा आगगाडीचा रस्ता दोन-तीन मिनिटांच्या अंतरावर आहे. संधि-सवड सांपडेल तेव्हां मी या समुद्रकिनाऱ्यावर जाऊन समुद्राच्या निळ्या क्षितिजाकडे नजर लावून आणि आगगाडी आली म्हणजे तिच्या धडधडत्या धुडाकडे थरथरत्या नजरेनें पाहत, बसत असें. मी आलों त्या सायंकाळीं विमानाच्या प्रवासाचा सारा शीण या समुद्रकिनाऱ्यावर मीं सोडून दिला होता, आणि वाऱ्यानें तो हां हां म्हणतां नेला होता !

हा समुद्रकिनारा म्हणजे आपल्या परिचयाचा पिंगट वाळूचा पट्टा नव्हें, तर मोठमोठ्या अवाढव्य दगडांचा आणि धोंडींचा लांबच लांब बांध ! आगगाडीचा रस्ता समुद्रानें धुऊन नेऊं नये म्हणून हा बंदोबस्त करण्यांत आला असावा. तें कांहीं असलें तरी अफाट फत्तरांच्या या राशीमुळें कोलोंबोच्या समुद्रकिनाऱ्याला एक आगळेंच रूप प्राप्त झालेलें आहे. सायंकाळच्या वेळीं कोलोंबोचीं स्त्री-पुरुष-मुलें या दगडावर येऊन हवा खात बसतात. म्हणजे अर्थात् हवा खाण्याच्या निमित्तानें, त्या दगडांवर येऊन फुटणाऱ्या लाटांच्या फेसाशीं दैनंदिन व्यवहाराच्या खडकावर फुटणाऱ्या स्वप्नांची तुलना करतात, नाहीं तर समुद्राच्या विस्तारावर शिडें उभारून डुलणाऱ्या होड्यांबरोबर प्रवासाचीं मनोराज्यें बांधतात, अगर सूर्यास्ताच्या मस्त रंगांनीं मनाचे कोपरे उजळून टाकतात अथवा कल्पनाशक्तीचीं शिडें रंगवतात. प्रियसखीच्या सहवासाचें भाग्य ज्यांना लाभलेलें असेल ते प्रियेच्या कानांत सागरसंगीताच्या तालावर प्रणयगीतें गुणगुणतात. उलट अभागी जीव हा समुद्र आपल्याला पोटांत घेण्याची अगर शेजारून धडधडणारी आगगाडी आपलें धड वेगळें करण्याची कितपत शक्यता आहे याचा दुर्दैवी अंदाज घेतात ; आणि

अर्थात् बहुसंख्य लोक थकलेल्या मनानें आणि शरीरानें संध्याकाळीं एकटें अगर सहकुटुंब फिरायला जाण्याचें कर्तव्य पार पाडल्याचें समाधान साधतात! रस्त्यावरील ट्रॅमप्रमाणें पादचाऱ्याशीं घसट करून धांवणाऱ्या या आगगाडीच्या रस्त्या-वर हे लोक कसे बेफिकीरपणें चालतात आणि गाडी किंचाळत आली म्हणजे कळ दाबल्याप्रमाणें कसे बाजूला होतात हें पाहिलें म्हणजे या फिरायला जाण्याच्या दैनंदिन क्रियेंतील संवेदनाशून्य यांत्रिकता लगेच जाणवते.

चित्रकार आणि कवि यांच्या दृष्टीनें कोलोंबोचा हा आगगाडीनें किनारलेला किनारा म्हणजे एक अमोल देणगी होय. हा किनारा म्हणजे रंगमिश्रणाचे बदलते देखावे दाखविणारा एक जादूगार आहे. समुद्राचें हिरवें-निळें-नारिंगी पाणी, किनाऱ्याच्या दगडावर दुधाळ फेसाच्या चरव्या ओतणाऱ्या त्याच्या लाटा, आगगाडीचा काळा धुरकट रस्ता, त्यावर चकाकणाऱ्या रेषा आंखणारे रूळ, त्याच्यावरून हिंडणाऱ्या आणि शेजारीं दगडांवर बसणाऱ्या स्त्रियांच्या हिरव्या, निळ्या, गुलाबी साड्या आणि मुलांचे नक्षीदार फ्रॉक्स्, उजवीकडचे पिवळे बंगले आणि पाचूचें पाणी प्यालेला हिरवा निसर्ग, यांच्या येथल्या अमाप पटाचा कोणताहि तुकडा म्हणजे एकेक जिवंत चैतन्यपूर्ण कलाकृति आहे. चित्रकारानें ती तशीच रंगवावी, नाहींतर कल्पनेच्या कुंचल्यानें तिची काया बदलून टाकावी. आणि कवीला तर काव्याची यक्षभूमीच येथें उमलली आहे असें वाटेल. पलीकडच्या गॉल रस्त्यावर जीवनाचें उधाण उसळलेलें असतें. तें टाळण्यासाठीं त्यानें इकडे यावें. एकाद्या अलिप्त दगडावर बसावें. मग काव्याची स्फूर्ति दूर नाहीं. पायाशीं पाण्याच्या लाटा, फेफरें आलेल्या स्त्रियांप्रमाणें फेंसाळत असतात आणि ओरडत असतात. मधूनच एखादी आगगाडी धावत–धडाडत येते (जीवनाचा सारा भसाडा बाजार घेऊन येते). पण ती आली तशी जाते, आणि दूरच्या शुभ्र शिडावर अगर सूर्यास्तानें रंगलेल्या आकाशावर नजर खिळविली म्हणजे पायाशीं धडपडणाऱ्या लाटांचा विसर पडतो, आणि मग मन अनंतांत विहार करण्यास, समुद्राच्या विस्तारावरील यक्षभूमीचा प्रवास करण्यास, हें समुद्रावरचें जीवन आणि तें गॉल रोडवरचें जीवन यांच्या विसंवादानें व्यक्त झालेल्या सत्याचें चिंतन करण्यास, आणि हा गहन खटाटोप नको असल्यास शेजारच्या माडाच्या झावळ्या सूर्यप्रकाशांत कशा लकाकतात अगर सूर्यास्ताच्या कोवळ्या आरक्त प्रकाशांत एखाद्या

फिरावयास आलेल्या तरुणीचे नेत्र कसे प्रकाशतात याचा वेध घेण्यास कोणाहि मामुली कवीस अडचण पडूं नये !

पण मी विमानांतून उतरण्यापूर्वीच या किनाऱ्यावर भटकूं लागलों कीं! बरोबर आहे. मी विमानतळावरून निसटण्यास अधीर झालों होतों. मला आतां विमानतळाचा खरोखर द्वेष वाटूं लागला आहे. विमानतळ म्हणजे पोलीस, कस्टमचे अधिकारी आणि डॉक्टर यांच्या संयुक्त माऱ्याची जागा! विमानांतून उतरण्यापूर्वीच ती सुंदर एअर होस्टेस तुमच्या हातांत पिवळा, पांढरा, तांबडा, हिरवा असे निरनिराळ्या रंगांचे फॉर्म्स देते. ( या वेळीं ती एअर होस्टेस सुंदरहि वाटत नाहीं आणि आतिथ्यशीलहि वाटत नाहीं. ) कस्टम्सचा फॉर्म भरा, तुमच्याजवळच्या वस्तूंचा तपशील सांगा, त्या जुन्या असल्या तरी त्यांची किंमत सांगा, तुमच्यापाशीं असलेल्या रकमेचा, नोटांचा, नाण्यांचा, ट्रॅव्हलर्स चेक्सचा, बँक ड्राफ्टमूचा, सिक्युरिटीज्चा हिशेब सादर करा. तुमचें नांवगांव, निशाणी, तुमच्या वडिलांची नांव-निशाणी, तुमचें जन्मगांव, जन्मतारीख, तुमच्या देशांतला तुमचा पत्ता, तुम्ही कोठें जाणार—नक्की कोठें जाणार—तो पत्ता सांगा, पास-पोर्टचा नंबर सांगा, एक ना हजार लचांडें! या साऱ्यांची मला आतां संवय झाली आहे. सर्व तपशील पाठ झाल्यानें झरझर भरूनहि होतो. पण सिलोनी सरकारनें एक नवीनच ब्याद पाठीस लावली. विमानतळावरच्या डॉक्टरानें नुसतें 'हेल्थ सर्टिफिकेट' पाहण्यावर समाधान मानलें नाहीं, किंबहुना त्यानें तें नीटसें पाहिलेंच नाहीं, तर माझ्या हातांत दोन निरनिराळ्या रंगांचे फॉर्म्स दिले आणि ते भरून चोवीस तासांच्या आंत फोर्टमधील 'क्वारंटाईन' ऑफिसमध्यें रिपोर्ट करण्यास फर्माविलें. जें फोर्टमधल्या डॉक्टरला पाहणें शक्य होतें तें याहि डॉक्टरला पाहतां आलें असतें. मग हा नसता त्रास कां? मीं त्या क्वारंटाईन ऑफिसमधील बाईला पुनः पुनः विचारलें. त्याला तिचें एकच उत्तर होतें. "तुमच्या हिंदुस्थानांत देवी आणि कॉलरा यांचें सत्र सुरू असतें, तेव्हां आम्हांला हिंदुस्थानांतून आलेल्या प्रवाशांचे कागद नीट तपासलेच पाहिजेत." अर्थात् तपासणीस माझा विरोध नव्हता, पण हें विमानतळावरच्या डॉक्टरला करतां आलें नसतें काय, असा माझा सवाल होता, आणि त्याला उत्तर मिळूं शकत नव्हतें! मी त्यांतून निष्कर्ष एवढाच काढला कीं सिलोनी सरकारची आपल्या या क्वारन्टाईन ऑफिसवर खूप प्रीति

आहे आणि प्रवाशांनीं त्याला न चुकतां भेट द्यावी असा त्याचा आग्रह आहे! हेतु स्तुत्य आहे, पण तो साध्य होण्यासाठीं ऑफिसांतलें ' सौंदर्य ' जरा अधिक आकर्षक असतें तर बरें झालें असतें!

१९५४ सालीं मीं कोलोंबोला भेट दिली होती तेव्हां मी गॉलफेस हॉटेलमध्यें उतरलों होतों. शहरांत दीडदोन दिवस राहून आणि इकडे तिकडे भटकूनहि शहर न पाहिल्याचा अनुभव मीं त्या वेळीं घेतला होता. प्रथम म्हणजे गॉलफेस हॉटेल शहर आणि फोर्ट या दोहोंशींहि फटकून बाहेर राहिलेलें आहे. त्या पाश्चात्य हॉटेल-मध्यें कोलोंबोचें दर्शन घडत नाहीं, इंग्लंड अगर अमेरिकेचें घडतें. हॉटेल-रूमच्या खिडकींतूनहि कोलोंबोंतील घरांचें, त्यांच्या लाल कौलांचें, घरांभोंवतालच्या मस्त बागांचें दर्शन घडत नाहीं. दर्शन घडतें तें एस्प्लेनेडच्या हिरव्या मैदानाचें आणि त्याच्या कांठान जाणाऱ्या रस्त्यावरून धावणाऱ्या मोटरींचें. त्यामुळें त्या वेळीं कोलोंबो ही ' आशियाची उद्यान-नगरी ' आहे एवढें शपथपूर्वक ( पण कोर्टांत ) सांगण्यापुरतेंच शहराचें ज्ञान मला झालें होतें.

गॉलफेस हॉटेलमधून एस्प्लेनेडचें जें दर्शन झालें ( म्हणजे सतत पडणाऱ्या पावसाचा पडदा मधून मधून दूर होत असतांना जें दर्शन झालें ) तें मात्र माझ्या मनांत रेखून राहिलें आहे. एस्प्लेनेडची लांबच लांब हिरवळ आणि त्याच्या पलीकडचा आकाशाशीं एकरूप झालेला समुद्र यांची युति हें कोलोंबोचें एक वैभव आहे. येथून झालेलें सूर्यास्ताचें दर्शन हा एक सुवर्णयोग आहे, असें कोलोंबोच्या सौंदर्याचे सरकारी भाट तुम्हांला न चुकतां सांगतील. सूर्यास्त आणि सूर्योदय हे सौंदर्यसाफल्याचे क्षण अर्थात् कोठेंहि ठरतात — पण कांहीं कांहीं ठिकाणीं या सौंदर्याचें दर्शन म्हणजे अगदीं अपार्थिव अनुभव ठरतो — यांत शंका नाहीं. डोंगराआडून डोकावत येणारा सूर्य सर्वांनाच वेड लावतो आणि म्हणून प्राथमिक शाळेच्या क्रमिक पुस्तकावर अगर अभ्यासाच्या वह्यांवर रेखाटलेलीं पहिलीं-वहिलीं चित्रें याच देखाव्याचीं असतात. पण महेश्वराच्या सूर्योदयानें नर्मदेच्या अथांग जलाशयावर पसरलेली सोनसळ्यांची माया वर्णन करण्यास प्राथमिक पुस्तकांतलीं चित्रें अगर ' उमाळ्यावरि येतसे सूर्य जेव्हां ' असली कविता पुरी पडणार नाहीं. तो अकल्पनीय अनुभव रेखाटण्यास बालकवींचीच प्रतिभा हवी. महेश्वराकडून विषुववृत्ताचा पल्ला लहानसा नाहीं. त्याचप्रमाणें सूर्योदया-

पासून सूर्यास्तापर्यंतचा पल्लाहि थोडा थोडका नाहीं. पण तो अगदीं अर्थपूर्ण आहे. सूर्योदयाला उषेची पार्श्वभूमि असल्यानें त्याचें सौंदर्य इतकें जाणवत नाहीं. उलट दुपारच्या तापानंतर सूर्यास्ताचा समय, खरोखर असतो त्यापेक्षां अधिक आकर्षक भासतो. सौंदर्याच्या अनुभवाशीं आपल्या जीवनाच्या गरजा लपंडाव खेळतात तो असा. तें कांहीहि असलें तरी तुम्ही विषुववृत्ताकडे जसजसे मजल मारतां तसतसा निसर्ग अधिक अधिक मस्तमादक भासतो — आणि विशेषतः सूर्यास्ताचा उन्मादक विलास तुमचें अंतःकरण गहिऱ्या रंगानें रंगवून काढतो. विषुववृत्ताकडचा सूर्य सूर्यास्तानंतरच्या संधिप्रकाशाच्या फिकट कारभारास फारसा अवकाश अगर अवसर देतच नाहीं. रात्रीच्या छाया, सूर्याचें पाऊल क्षितिजापलिकडे केव्हां एकदा पडतें याची अधीर वाट पाहत क्षितिजाच्या कडेवर चौफेर जमा झालेल्या असतात, आणि मावळत्या सूर्याचे किरण या छायांच्या चेहऱ्यावर मिस्किल छटा पाहून सूर्यास्ताचें अलौकिक दृश्य निर्माण करीत असतात. मलाया, इण्डोनेशिआ, फिलिपाइन्सकडील सूर्यास्ताचे रसरंग वर्णन करण्यांत अनेक काव्यमय अंतःकरणाची शक्ति खर्च झाली आहे ती उगीच नाहीं ! पण मी तसें कांहीं करणार नाहीं. कारण कोलोंबोच्या एस्प्लेनेडवरून सूर्यास्ताचें जें क्षणदर्शन मला घडलें तें वेगळें होतें. अकल्पित होतें. पाऊस जरा थांबला होता. क्षितिजावरचे ढग थोडे विलग झाले होते. त्यांच्यावर काळ्या-जांभळ्या लालसोनेरी रंगांचे सतत बदलते मिश्र विलास सुरू होते आणि त्यांच्यामधलें आकाश आरस्पानी दिसत होतें. पण सूर्यास्ताचें तें अकल्पित सौंदर्यदर्शन घडलें तें पश्चिमेकडे नव्हे तर पूर्वेकडे. पावसाच्या संततधारांनीं सचैल न्हालेल्या वनश्रीवर मावळत्या किरणांची कोवळी सुवर्णकांति पसरली होती — आणि तिच्या मागें इंद्रधनुष्याची सप्तरंगी कमान उभारली होती !

बांबालापिटियामधील भर मध्यमवर्गीय वस्तींत असलेल्या ग्रीन्लंड्स् हॉटेलमधून कोलोंबोच्या जीवनाचें आणि निसर्गसौंदर्याचें अधिक चांगलें दर्शन होतें. कोलोंबोचें सौंदर्य न्याहाळण्यासाठीं सिनॅमन गार्डन्स भागांत गेलें पाहिजे अगर व्हिक्टोरिआ पार्कांतच फेरफटका केला पाहिजे असें नाहीं. या भागांत मोठमोठे वैभवशाली बंगले आहेत. त्यांच्या भोंवतीं मोठीं संस्कारित समृद्ध उद्यानें आहेत. समोर मोठमोठीं मैदानें आहेत आणि त्यांच्यावर हिरवळीचे मखमली गालिचे पसरलेले आहेत. रस्त्याकडचे

कॅशियाचे, गुलमोहराचे वृक्ष पुष्पसंभाराचें वैभव धारण करून उभे आहेत. हें सारें विदग्ध, वैभवशाली सौंदर्य तेथें आहे आणि व्हिक्टोरिया पार्कमध्यें तर त्याचा शिस्तशीर उत्कर्ष झाला आहे. पण मला तुम्हांला दाखवायचें आहे तें कोलोंबोचें मध्यमवर्गीय सौंदर्य.

प्रथम एक-दोन गोष्टींचा खुलासा करतों. सिलोन हा भारत-पाकिस्तानसारखा दरिद्री देश नाहीं. या देशाचें सरासरी वार्षिक उत्पन्न आपल्या दीड पावणेदोन पट आहे आणि आपल्याकडे उत्पन्नाची जशी विषमता आढळते तशी सिलोनमध्यें आढळत नाहीं. आणखी असें कीं, ज्या मध्यमवर्गाच्या वस्तींत मी तुम्हांला हिंडवणार आहें त्याचें मासिक उत्पन्न ५०० ते १००० आहे — म्हणजे तो उच्चीकडे झुकणारा मध्यमवर्ग आहे. आणि ज्या घराचें दर्शन मी तुम्हांला घडविणार आहें त्याचें मासिक भाडें शंभर ते दोनशें रुपये आहे.

गॉल रोडवरून बसनें फेरफटका केला कीं, या मध्यमवर्गीय घरांचें भरपूर दर्शन होतें. हा रस्ता समुद्रकांठापासून सुमारें फर्लांगाच्या समांतर अंतरानें जातो. आणि या रस्त्याला प्रमाणशीर अंतरावर समुद्राकडे जाणारे आडवे रस्ते फुटतात. या रस्त्याच्या दरम्यान असलेलीं हीं घरें म्हणजे बैठे बंगले. त्यांच्या भोंवतालच्या बागा. बसेस् थेट आपल्या मुंबईच्यासारख्या लाल दुमजली आहेत. ( कारण आपण दोघांनींहि लंडनच्या बसेस्ची उसनवारी केलेली आहे ). तेव्हां वरच्या मजल्यांवर जाऊन डावीकडची जागा पकडा म्हणजे तुम्हांला या घरांच्या मंगलोरी कौलांची लाललाल लकाकी, बागेंतील झाडाझुडपांची तजेलदार कळा, पलीकडच्या समुद्राचा निळा विस्तार आणि विशेष म्हणजे या साऱ्यावर नांदणारी स्वच्छता तुमच्या नजरेंत येईल. उजवीकडे धांदल-गडबडीच्या रस्त्यावरील मोटरींदेखील तुमचें लक्ष असेंच वेधून घेतील. ती पाहा, छोट्या छोट्या मोटरींची नुसती रांग लागून राहिली आहे. सिलोनच्या मोटर-शोकिनांना लहान-लहान मोटरींची हौस आहे. फियाट, हिल्मन वगैरे मॉडेल्स त्यांना विशेष पसंत आहेत. मौज अशी कीं या साऱ्या मोटरी नव्या कोऱ्या करकरीत दिसतात. त्या तशा असतीलच असें नाहीं. पण त्या तशा दिसतात. कारण त्या धूळ खात नाहींत. कोलोंबोंत धूळ फारशी नाहींच. नऊ महिने कोसळणारा पाऊस सारें लख्ख करून टाकतो. म्हणून कोलोंबो स्वच्छ

आहे. रस्ते स्वच्छ आहेत. झाडें स्वच्छ आहेत. घरें स्वच्छ आहेत. आतां, पावसाची संततधार भिंतीवर काळें करते, पण घरांना रंग लावून तीं आकर्षक करण्याची आस्था कोलंबोच्या घरमालकांना दिसते. घरापुढें नीटनेटकी बाग करण्याचीहि यांना हौस दिसते. म्हणून प्रत्येक बंगल्यापुढें, घरापुढें बागेचें वैभव पसरलेलें असतें. हें वैभव चांगलें बहरलेलें असतें. कारण सिलोनचा निसर्ग कृपण नाहीं. भरपूर ऊन आणि भरपूर पाणी यांमुळें त्याच्या अंगीं मस्ती आहे आणि कांति आहे. निसर्ग हाच येथला मोठा माळी आहे, पण निसर्गाशीं सहकार्य करण्याची मानवाची तयारी आहे. प्रत्येक घराच्या समोर तुम्हांला हिरवळीची मखमली चादर आढळेल. मधोमध एखादें आंब्याचें वा फणसाचें अथवा चाफ्याचें झाड दिमाखानें उभें असलेलें दिसेल. या चादरीला फुलझाडांची किनार असेल आणि आवारांत संकेश्वरी, कण्हेरी, वागेश्री ( बुगनव्हिलिया ), कर्दळ, जास्वंद, पारिजातक, केळ अगर चिवार यांचीं बेटें हालत-डुलत असतील. अर्थात् या साऱ्यावर जणूं देखभाल करीत एखादा माड उभा असणारच ! मात्र कोलंबोच्या या निसर्गप्रिय लोकांची रसिकता जरा जुनी-पुराणी दिसते. प्रत्येक बागेंत मला रंगीबेरंगी विलायती क्रोटोन्सचीच गर्दी विशेष दिसली.

घरांचे प्रकारहि जुनेच. चाळीस वर्षांपूर्वीचे, विशेषतः पोर्च्युगीज् चर्चकडचें दादर तुम्हांला आठवतें का पाहा. नाहींतर आजच्या गिरगांवांतील खोताच्या वाडींत जा. तेथें दाटीवाटीनें उभीं असलेली घरें अलग करा, त्यांच्याभोंवतीं कोलंबोसारखी रसरशीत बाग उभारा आणि मग तीं सारीं घरें बागबगीचाच्या वैभवासकट सरळ रांगेनें उभीं करा, म्हणजे तुम्हांला कोलंबोच्या गॉल रोडवर आल्यासारखें वाटेल. एकोणिसाव्या शतकांतील पाश्चात्य वसाहतवादाच्या कालांत घरबांधणीचे जे प्रकार फॅशनेबल ठरले त्यांचेंच अधिराज्य अद्याप कोलंबोंत सुरू आहे. ब्रिटिश लोकांप्रमाणेंच सिलोनी लोकसुद्धां नवें घर बांधायचें झालें तरी या पुराण्या पद्धतीनें बांधतांना आढळतील.

आणि यांत कांहीं एक अर्थ आहे. कोलंबोच्या फोर्टमध्यें गेल्यावर तो माझ्या ध्यानांत आला. मुंबईच्या फोर्टमध्यें — अस्सल फोर्टमध्यें — मेडोज् स्ट्रीटच्या बाजूला अगर हॉर्निमन सर्कलच्या बाजूला, टाऊन हॉल

अगर कामा हॉलसारख्या ज्या प्रचंड इमारती आहेत त्या नजरेपुढें आणा म्हणजे कोलोंबो-फोर्टमध्यें कसल्या इमारती असतील याची तुम्हांला कल्पना येईल. (मात्र बोरीबंदर स्टेशन, कॉर्पोरेशन, हायकोर्ट अगर एल्फिन्स्टन कॉलेज यांच्यासारख्या अस्सल लंडनछाप कोंदट इमारती विसरा, कारण तसल्या इमारती कोलोंबोंत एकदोनच असतील.) या इमारतींना कांहीं एक सौंदर्य आहे, मादक सौंदर्य आहे आणि त्याचा प्रभाव पडण्यास दुपारचा भयंकर उष्मा आणि लोकांची थाप गर्दी यांचा व्यत्यय आला नाहीं. कोलोंबो-फोर्टमध्यें आपल्या फोर्टप्रमाणेंच कचेऱ्यांतील नोकरा-चाकरांची, मोटरींची, बसेस्‌ची भीड लागलेली असूनहि त्यांत, डॉ. लोहियांच्या भाषेंत बोलायचें म्हणजे – अर्धमानव – अर्धाश्व बनलेल्या रिक्षावाल्यांची करुणास्पद भर पडलेली असूनहि, आणि शिवाय 'रत्नगिरी हॉटेल'सारखें एखादें अनपेक्षित नांव अगर केशरी वस्त्रें लपेटून घेतलेली बुद्धभिक्षूसारखी एखादी विसंगत व्यक्ति माझें चित्त खेचून घेत असूनहि, मी एखाद्या झाडाच्या छायेंत उभा राहून या प्रचंड भरभक्कम इमारतींचें पुराणें सौंदर्य दृष्टि भारल्यागत पाहत बसे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, मला या वसाहतकालीन इमारतींची रचनापद्धति मनापासून आवडत नाहीं. उलट सरल-वक्र-रेषांचा साधा लयबद्ध उपयोग केलेली आधुनिक बांधणी अधिक आवडते. पण कोलोंबो-फोर्टमधील इमारतींच्या मस्त अस्तित्वाचा माझ्यावर असा कांहीं मादक परिणाम झाला कीं पुराण्या इमारतींच्या या शिस्तवार मेळाव्यांत बँक ऑफ सिलोनची अत्याधुनिक इमारत मध्येंच उपटली आहे तीच मला केविलवाणी वाटली!

गॉल रोडवरील घरांचीं नांवेंहि लक्ष वेधून घेतात. एकाचें नांव साधुता, दुसऱ्याचें नांव लंकादीप, तिसऱ्याचें मेलरोज, आणि हें मायरसाइड. (एक 'फ्रामजी हाउस'हि आहे. सिंधी व्यापारी सर्वत्र गेले, पण पार्शी जेथें इंग्रज गेले तिकडेच गेले. इंडोनेशिआ, थायलॅंड, फिलिपीन्समध्यें पार्शी आढळत नाहींत, पण हॉंगकॉंगला आढळतात!) घरांच्या नांवांत असे देशीविदेशी प्रकार भराभर आढळतात, आणि माणसांच्या नांवांत तर देशी-विदेशीचें मोठें मनोरंजक मिश्रण मोठ्या अभिमानानें मिरवलें जातें. एकाच नांवांत डच, पोर्च्युगीज्, इंग्रज आणि सिंहली संस्कृतीचा एकसमयें साक्षात्कार सिलोनमध्यें होतो. सिलोन रेडिओचे भूतपूर्व डायरेक्टर-जनरल एम्. जे. परेरा यांनीं आपलें नांव माझ्या डायरींत Mapatunage James

Perera असें लिहिलें आणि मला मोठ्या सुसंस्कृत अभिमानानें सांगितलें कीं आपण बौद्धधर्मीय सिंहली असूनसुद्धां आपल्या नांवाला शुद्ध सिंहली स्वरूप देण्याची आपली तयारी नाहीं, कारण आपल्या सिंहली-इंग्रज-पोर्च्युगीज् नांवांत जी ऐतिहासिक परंपरा आहे ती आपण गमावण्यास तयार नाहीं! लोक माझ्या दृष्टीला तरी ख्रिश्चन दिसले. (पाकिस्तानी फरकॅप घातलेले मुसलमान आणि कपाळाला भस्माचे पट्टे ओढलेले तामीळ हिंदु अर्थात् याला अपवाद.) फोर्टमध्यें झगे घातलेल्या मुली दिसल्या. त्या ख्रिश्चन असाव्यातसें वाटलें. पण बरोबरच्या स्नेह्यानें सांगितलें कीं, तशी खात्री नाहीं, त्या बौद्धहि असूं शकतील. अलीकडे अर्थात साडी वापरण्याची पद्धति फार वाढली आहे. तरी पण येथल्या साडीधारी स्त्रिया मगलोरी अगर त्रावणकोरी ख्रिश्चन स्त्रियांप्रमाणें दिसतात. येथील स्त्रियांचा मूळ पोशाख म्हणजे पोलका आणि घट्ट लपेटून नेसलेली लुंगी. आतां हा पोशाख विशेषतः खालच्या वर्गातच आढळतो आणि असा पोशाख केलेल्या बाया गोव्याच्या किरिस्तांव मोलकरणींप्रमाणें दिसतात.

सिलोनी संस्कृतीवर दक्षिण भारतीय संस्कार फार आहेत. साहजिक आहे. सिलोनमध्यें तामीळ लोकांची वस्ती चतुर्थांशाहून अधिक आहे. तामीळ राजांनीं पूर्वी सिलोनवर राज्य केलेलें आहे. पण खरे स्वाभाविक संस्कार दक्षिण भारतांतील समुद्रकांठच्या लोकांचे आहेत. आतां नवीन लोक शर्ट-पँट पसंत करीत असले तरी सिलोनचा खास पोशाख म्हणजे लुंगी आणि बनियन. खास सिलोनी लुंगी मात्र पूर्ण सफेत नसते. तिच्यावर लाल, तपकिरी अगर तसल्याच कसल्यातरी रंगाची चौकडी असते, आणि तशाच रंगाचा एक उभा पट्टा असतो. तो नेसल्यावर डाव्या कडेला अगर मागें येतो. भारतांतून गेलेली लुंगी मलाया, इंडोनेशिया, ब्रह्मदेशमध्यें भडक रंगीत बनते त्याची ही सावधपूर्व तयारी म्हणावयाची!

पोशाख भारतीय असला तरी वातावरण पाश्चात्य. हा ख्रिश्चन आणि हा बौद्ध हें खुद्द तद्देशीयांना सांगतां येत नाहीं. हा महाराष्ट्रीय आणि हा गुजराथी असें आम्ही सहज सांगूं शकतों असें मीं एका स्नेह्याला सांगितलें तेव्हां त्याला खूप आश्चर्य वाटलें. 'तुम्ही हें कसं काय सांगतां?' असें त्यानें विचारलें तेव्हां मीं त्याला एर्नाकुलम् येथें मला आलेला एक अनुभव सांगितला. त्रावणकोर-कोचीनमध्यें

११
22807 दि. [illegible]
क्रमांक 228 नों. दि.

ख्रिश्चन लोक खूप आहेत. पण हा हिंदु आणि हा ख्रिश्चन हें कांहीं मला सांगतां येईना. 'तुम्ही कसं ओळखतां बुवा!' असें मीं एका मित्राला म्हटलें तेव्हां तो उद्गारला, "हा कावळा आणि ही कावळी असा भेद आपल्याला थोडाच करतां येतो? पण कावळ्यांना ती अडचण पडत नाहीं!" त्रावणकोर-कोचीन आणि सिलोन यांमधील फरक असा कीं, त्रावणकोर-कोचीनांत हिंदु चालीरीतींचा अधिक प्रभाव आहे तर सिलोनमध्यें पाश्चात्य चालीरीतींचा आहे. एकच उदाहरण देतों. त्रावणकोर-कोचीनमधले ख्रिश्चन संस्कृतप्रचुर मल्याळम् विशेषकरून बोलतात, तर सिलोनमध्यें – विशेषतः कोलोंबोंत – इंग्रजीचें माहात्म्य फार आहे.

कोलोंबोच्या रस्त्यावर इंग्रजी भाषा तुमच्या कानांवर अधिक पडेल आणि डोळ्यांना अधिक दिसेल. दुकानांच्या पाट्या बहुतेककरून इंग्रजींत आढळतील. कंडक्टरजवळ तुम्हीं तिकिट मागितलें कीं, तो एकदम म्हणेल, 'राइट्!' (राइट् म्हणजे अच्छा अगर ठीक! हा 'राइट्' उद्गार तुम्हांला सर्वत्र ऐकूं येईल. हॉटेलांत वेटरला चहा आणायला सांगा, तो म्हणेल 'राइट्'; टेलिफोन ऑपरेटरपाशीं नंबर मागा, तो म्हणेल, 'राइट्'; हीच ती फलाणी इमारत का, असें एखाद्या पादचाऱ्याला विचारा, तो उद्गारेल, 'राइट्'! म्हणून मी म्हणत असे, "Right is never wrong in Colombo.") सिलोनचीं वर्तमानपत्रें पाहा, तीं तुम्हांला लंडनमधील डेली मिरर न्यूज क्रॉनिकल किंवा डेली मेल यांची आठवण करून देतील – कोलोंबोमध्यें हजारोंनीं खपणाऱ्या मद्रासच्या 'हिंदू'ची करून देणार नाहींत. कोलोंबोच्या इंग्रजी पत्रांचें इंग्रजी फर्डें पण ढंग चवचाल पत्रांचा! रेस, सिनेमा, क्रिकेट, फुटबॉल, स्त्रियांच्या फॅशन्स, क्रॉसवर्ड, खून, मारामाऱ्या यांची या पत्रांत चहा आणि चलती! सासवेचा जावयानें केलेला खून आणि या कॉलेजनें त्या कॉलेजला दिलेला सात विकेट्सूचा मारा यांना पंतप्रधानांच्या मुलाखतीच्या वर स्थान (अगदीं मुखपत्रावर) मिळालें तरी आश्चर्य मानूं नये. इंग्रजी भाषा फर्डी, सजावट अगदीं अत्याधुनिक. पण या पत्रांचा आत्मा? त्याबद्दल फार न बोलणें बरें! मी निवडणुकीच्या ऐन अगोदर कोलोंबोंत होतों. निवडणुकीची धमाल रस्त्यापेक्षां वृत्तपत्रांच्या रकान्यांतच अधिक दिसली. तेथें मथळ्यांचा नुसता दंगा उसळला होता. 'मेप (बंदरनायकांचा पक्ष) म्हणजे निवळ सर्कस,' 'अरेरे, हा मंत्री म्हणजे शुद्ध पोरकें पोर!' 'अरे

याला संभाळा ! ' ' त्याचा या पक्षावर इक आहे ! ' ' शिंप्याला मुख्य प्रधान होण्यास काय हरकत आहे ? ' ' हें मीच करूं शकेन ! ' अशा अर्थाचे आणि धर्तीचे मथळे पानापानावर उसळले होते !

या साऱ्यांचा एकप्रकारचा ' कॉस्मॉपॉलिटन ' ( म्हणजे खरोखर घेडगुजरी ) संस्कार मनावर उमटणें अपरिहार्य होतें. माझें मत शक्य तितक्या चांगल्या रीतीनें व्यक्त करण्यासाठीं मी एका मित्राला म्हटलें, " अनेक आधुनिक विशेषांचा मोठा प्रभावी संकर साधला आहे तुम्हीं ! "

त्यावर तो म्हणाला, " होय, बरोबर ! आमच्या जीवनांत अनेक संस्कृतींचा संगम झालेला आहे. पण त्यामुळें आमची अशी संस्कृति कोणती याचाच बोध आम्हांला होईनासा झाला आहे ! "

या उद्गारामागचा आर्त आक्रोश हा आतां साऱ्या सिलोनी राष्ट्राचा आक्रोश बनला आहे. आपल्या सिंहली आत्म्याचा शोध घेण्याचा प्रयत्न सिलोनी जनता कसोशीनें करीत आहे. लोकांच्या दैनंदिन राहणीवर राष्ट्रीय छाप उमटविण्याचा अधिकाधिक प्रयत्न होत आहे. सर जॉन कोटेलवाल्यांचे मंत्री पाश्चात्य पोशाखांत वावरत तर बंदरनायकांचे मंत्री सरॉंग ( लुंगी ) आणि बनियनमध्यें वावरतात, याचा अभिमान लोकांना स्वातंत्र्यप्राप्तीप्रमाणें वाटतो. पण हेच बंदरनायक न्याहरीच्या वेळीं ' किरिबुथणे ' हातानें न खातां कांट्या-चमच्याच्या साहाय्यानें खातात, याबद्दल वर्तमान-पत्रांत निषेध-नापसंती व्यक्त होते. आपल्या नाहीं तरी आपल्या मुलांच्या नांवाचें सिंहलीकरण सिलोनी आईबाप करीत आहेत. रस्त्यांवरील दुकानांवरच्या पाट्यांवर वाटोळ्या ब्राह्मी लिपींतील सिंहली शब्दांचा प्रादुर्भाव झपाट्यानें होऊं लागला आहे. राहतीं घरें कशींहि असलीं तरी राष्ट्रीय स्मारकें अस्सल सिंहली धर्तीचीं असायला हवींत याबद्दल कटाक्ष वाढत आहे. कोलंबोचें स्वातंत्र्यस्मारक हा कँडियन बांधणीचा एक नमुना असल्याचा उल्लेख अभिमानानें करण्यांत येतो. ( मग तो नमुना कसाहि असो. ) रस्त्यांवर पीतवस्त्रधारी बुद्धभिक्षूंचा संचार अधिक आढळतो. विलायती झगे आणि शर्ट-पँट यांनीं नटलेले आधुनिक स्त्री-पुरुष आणि बॉबकटमुळें बाहुल्यां-सारखीं दिसणारीं मुलें यांनीं भरलेल्या रस्त्यांत, भगवीं भोंगळ चादरवजा दुवस्त्रें धारण केलेला, ब्रह्मी चपलांमुळें ओक्या पायांचा दिसणारा, आणि आपल्या तुळतुळीत

अस्तायफट डोक्यावर बोजड ताडपत्री छत्री घेऊन चाललेला कळकट चेहऱ्याचा बुद्धभिक्षु म्हणजे तऱ्हेतऱ्हेच्या दारूच्याटल्यांनीं भरलेल्या कपाटांत मध्येंच गंगाजळाचा लोटा दिसावा तसा दिसतो. पण याची कोणाला खंत वाटते असें दिसलें नाहीं. धम्मपदाचा खप वाढला आहे, विहार आणि मंदिरें यांना सरकारी मदत खूप होते आहे, भिक्षूंना भिक्षा सवंग मिळत आहे आणि अशोकरामायासारख्या मंदिरांत भक्तांची गर्दी होत आहे. इतकेंच नव्हे तर त्या देवळांतील भिकार भित्तिचित्रांचेंहि अमाप कौतुक होत आहे !

अशोकरामाया मंदिरांतील भित्तिचित्रांचा विशेष उल्लेख सरकारी परिचयपत्रकांत आढळला म्हणून तीं पाहण्यास मी मुद्दाम गेलों. तीं पाहून मला काय वाटलें म्हणून सांगूं ? बुद्धाच्या जीवनांतील आणि जातककथांतील संस्मरणीय प्रसंगांचें चित्रण करणारीं हीं चित्रें म्हणजे भडक विसंगत रंग आणि विद्रूप आकार यांच्या भयंकर युतीचे ओंगळ नमुने आहेत. अशीं हीं चित्रें रंगवितांना कला ही शुद्ध चिरंतन स्वरूपाची असते आणि तिची अशी चेष्टा करतांना त्या चिरंतन तत्त्वाचा अपमान होतो एवढें तरी त्या 'कलावंतां'नीं ध्यानांत घ्यायला हवें होतें. एवढा गहन विचार त्यांना पटलेला नसेल कदाचित् ! पण बुद्धाच्या जीवनाचें इतकें भेसूर चित्रण करण्यांत आपल्या आराध्यदैवताचाच भयंकर अपमान आहे हें तरी या बुद्धभक्तांच्या जाणीवेंत शिरायला हवें होतें !

अर्थात् जॉर्ज केटसारखे चित्रकार ज्या देशांत निर्माण झाले त्या देशाच्या कलाप्रेमाबद्दल या विशिष्ट अनुभवामुळें विपरीत कल्पना निर्माण होणें शक्यच नव्हतें. आणि माझें खास भाग्य असें कीं चित्रकलेचा हा भयंकर प्रकार पाहिल्यानंतर लगेच मिस् फ्लॉरेन्स बार्लो या चित्रकर्त्रीच्या चित्रांचें एक प्रदर्शन पाहण्याची संधि मला मिळाली. या कलावतीचीं चित्रें रंगविण्याची एक विशिष्ट पद्धति आहे आणि तिची प्रेरणा एका लांब पाकळ्यांच्या गोंडेरी फुलापासून मिळालेली असावी असें वाटलें. या पद्धतीचा अनेक पद्धतीनें केलेला उपयोग पाहून आनंद झाला.

सिलोनमध्यें गतवर्षी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकींत सिंहली आत्म्याचा पुनर्जन्म हाच मुख्य सवाल होता. या सवालाच्या सामर्थ्याचें संपूर्ण आकलन सर जॉन कोटेलवाला यांना झालें नाहीं म्हणूनच त्यांचा फज्जा उडाला. त्यांच्या हें ध्यानांत आलें

नाहीं कीं आशियाच्या आर्त राष्ट्रीय वृत्तीस, आपल्या राष्ट्राच्या तसूभर भूमीवरहि, ब्रिटिशांच्या नाविक तळासारखीं परकीयांच्या प्रभुत्वाचीं औपचारिक लक्षणेंहि सहन होणार नाहींत. पण हाहि मुख्य मुद्दा नव्हता. मुख्य प्रश्न सिंहली भाषा आणि बौद्ध धर्म यांचा होता. सर जॉन यांनीं सध्या सिंहली आणि तामीळ अशा दोन राष्ट्रभाषा आहेत त्यांऐवजीं सिंहली ही एकमेव राष्ट्रभाषा करण्याचा घाट घालून त्या जोरावर निवडणुकी जिंकण्याचा डाव मांडला! लोकांना सिंहली भाषेचेंच प्रभुत्व हवें होतें, पण मग सर जॉन यांच्या हातांत हमखास बहुमत असूनहि आणि विरोधी पक्षांचा पाठिंबा असूनहि ते सिंहली भाषा राष्ट्रीय भाषा कां करीत नाहींत असा त्यांचा सवाल होता. सर जॉनच्या डावपेचांतील पक्षीय राजकारणाचा संधिसाधुपणा सहन करण्यास सिलोनी लोकांची आर्त अधीर वृत्ति मुळींच तयार नव्हती. त्यांनीं सर जॉनना सरळ खालीं ओढलें आणि सिंहली भाषेचाच पुकारा करणाऱ्या बंदरनायकांच्या हातांत सत्तेचा दंड दिला!

धर्माच्या बाबतींत तर सर जॉन कोटेलावाल्यांचीं लक्षणें लोकांना अधिकच संशयास्पद वाटलीं. सर जॉन स्वतःला बौद्धधर्मीय म्हणवितात—आणि आपल्या बौद्धधर्मीय निष्ठेची जाहीर ग्वाही देतांना अभिमानाचे सारे रंगहि उडवितात. गतवर्षींच एक प्रकरण घडलें आणि त्यांच्या या बौद्धधर्मीय अभिमानाचीं लक्तरें लोंबलीं. सिलोनच्या कांहीं लष्करी अधिकाऱ्यांनीं एक भला मोठा बैल मारून तो सबंधच्या सबंध उकडला–आणि त्याचा समारंभपूर्वक फन्ना उडविण्याचा बूट त्यांनीं काढला. या समारंभाचें उद्घाटन करण्यासाठीं त्यांनीं सर जॉन यांना बोलावलें. सर जॉन हे मोठे रसिक, समारंभप्रिय आणि ऐषआरामी गृहस्थ आहेत. शिवाय त्यांच्या पाश्चात्य संस्कृतीला ही मोठी पर्वणी वाटली असेल. त्यांनीं निमंत्रणाचा तत्काळ स्वीकार केला आणि त्या बैलाच्या पाकसिद्ध देहावर सुरीचा पहिला वार मोठ्या समारंभानें केला. त्यांच्या या सुरीवाराचीं चविष्ट चित्रें वृत्तपत्रांत मोठ्या उत्साहानें सिद्ध झालीं. तीं पाहून भिक्षुवृंद मात्र प्रक्षुब्ध झाला. आतां बौद्धधर्मीय लोक गोमांस वगैरे भरपूर खातात. भगवान् बुद्धांनीं अहिंसेचा संदेश दिला, पण प्रत्यक्ष व्यवहारांत अशा आदेशाचे कसे धिंडवडे उडतात तें आम्हां हिंदूंना सांगण्याचें कारण नाहीं. बौद्धधर्मीय लोक मांसमच्छर खातात—फक्त मासे, पक्षी अगर गुरें यांना प्रत्यक्ष

मारणारांना हीन लेखतात! म्हणूनच कोळी आणि खाटीक हे कांहीं बौद्धधर्मीय देशांत 'अस्पृश्य' ठरतात! अशा परिस्थितींत सिलोनी पंतप्रधानाचीं बैलावर सुरी चालविणारीं चित्रें पाहून बौद्धभिक्षु खवळावेत हें स्वाभाविकच होतें. त्यांचा सर जॉनवर आणखी एक राग होता. मन्त्रिमंडळाचा कारभार आपल्या सल्ल्यानें चालावा ही त्यांची मागणी आधुनिक लोकशाहीवादी सर जॉनना मुळींच मान्य नव्हती. या मागणीची चर्चा करण्यासाठीं एकदां त्यांनीं सर जॉनकडे शिष्टमंडळ पाठविलें. पण बुद्धधर्मांचे फारसे खोल संस्कार न झालेल्या सर जॉनना या भिक्षुमंडळीच्या भावनांची धार समजली नाहीं. त्यांनीं त्या शिष्टमंडळाला चक्क हाकलून दिलें. तेव्हांच कित्येक भिक्षूंनीं सर जॉनना कायमचा लक्षांत राहील असा धडा शिकविण्याच्या शपथा घेतल्या. ग्रामीण जनतेवर त्यांचा मोठा प्रभाव होता, आणि त्यांनीं तो सपाटून वापरला.

माझ्या मित्रानें सांगितलेली ही हकीगत पुरी होते न होते तोंच हॉटेलच्या रेडिओंतून येणाऱ्या सिंहली संगीताचा आवाज एकदम वाढला. मीं म्हटलें, "तुमच्या या सिंहली संगीताची पद्धत बरीचशी उत्तर हिंदुस्थानी संगीतासारखी आहे."

त्यावर तो म्हणाला, "आहे कुठं सिंहली संगीत? आमचं खरं संगीत म्हणजे ग्रामीण संगीत. पण आम्हांला आतां सुसंस्कृत संगीताची गोडी लागली आहे. कित्येक वर्षें आमच्या संगीतज्ञांनीं पाश्चात्यांची उसनवारी केली. आतां आम्ही उत्तर हिंदुस्थानी संगीताची उसनवारी करीत आहों— खरं म्हणजे तुमच्या सिनेमा-संगीताची!"

सिंहली आत्म्याच्या होत असलेल्या पुनर्जन्माची कथा या वळणावर न जावो म्हणजे मिळविली!

# अनुराधापूर

* * * * * * * * * *

दोन दिवसांत मी अनुराधापूर, पोलान्नारुवा, सिगिरिया, डाम्बुला, कँडी, पेरादेनिया एवढीं ठिकाणें पाहिलीं. दोन दिवसांत सारनाथ, सांची, खजुराहो आणि अजंठा पाहण्याचा विक्रम केल्यानें जेवढी धन्यता वाटेल आणि जेवढा गोंधळ उडेल तेवढी धन्यता आणि गोंधळ जमा करण्यासारखा हा विक्रम होता. आतां सारनाथादि ठिकाणें प्रचंड अंतरानें दुरावलेलीं आहेत तशीं अनुराधापुरादि ठिकाणें नाहींत. किंबहुना एकाद्या प्रचंड गोष्टीचें छोटेंसें मॉडेल असावें तसेंच या बाबतींत सिलोन आहे. पण या ठिकाणांत लंकेचा पंचवीसशें वर्षांचा इतिहास, कला, वैभव, संस्कृति एकत्रित झालीं आहेत, एवढें ध्यानांत घेतलें म्हणजे हा विक्रम शहाणपणाचा भाग नसून बुद्धीवर अकारण ताण होता हें स्पष्ट होईल.

पण त्याला इलाज नव्हता. मी एका आधुनिक प्रवासयंत्राच्या चक्रांत अडकलों होतों आणि त्या चक्राच्या पट्टयावरोबर फिरणें मला भाग होतें.

त्याचें असें झालें :

कोलोंबोला श्रावस्ति या सिलोनी खासदारांच्या वसतिगृहांत मी कांहीं मित्रांबरोबर गप्पा मारीत बसलों होतों. इतक्यांत एक पाश्चात्य स्त्री शेजारच्या सार्वजनिक वाचनालयाची चौकशी करीत तेथें आली. तिला पाहिल्याबरोबर मीं म्हटलें,

" आपण इथं ? कांहीं दिवसांपूर्वीच मी तुम्हांला दिल्लीच्या ललितकला ॲकाडेमींत नॅशनल एक्झिबिशनच्या वेळीं पाहिलं होतं—"

मीं तिला इतकें अचूक ओळखलें याचा तिला अचंबा वाटला. —आणि लगेच ती तिथें बसून आमच्याशीं गप्पागोष्टी करूं लागली. त्या गप्पांत असें निघालें कीं दुसऱ्याच दिवशीं सकाळीं ती एका मित्राच्या मोटरींतून अनुराधापूर, सिगिरिआ, कॅंडी, वगैरे ठिकाणें पाहायला जाणार होती.

ही बाई पॅरिसमध्यें राहणारी एक बेल्जियन चित्रकर्त्री होती. कम्युनिस्ट सरकारच्या निमंत्रणावरून ती लाल चीनला निघाली होती, आणि एखाद्या अस्सल अमेरिकन प्रवाशाप्रमाणें वाटेंत सर्व आशियन देशांचा शीघ्र प्रवास उरकून घेणार होती.

अनुराधापूर-पोलान्नारुवाचें शिल्प आणि सिगिरिआची चित्रकला एका चित्रकर्त्रीच्या सहवासांत पाहायला मिळाली तर किती छान! मनांत विचार आला, लगेच व्यक्त केला. तिनेंहि त्याचें स्वागत केलें आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं नऊ वाजतां तिच्या मोटरींतून निघालों.

कोलोंबोबाहेर पडलों आणि नारळी-पोफळींच्या बनांतच जणुं आमचा प्रवेश झाला. रस्त्याला दुतर्फा नारळी-पोफळींच्या बागांची रांगच रांग लागलेली होती.

या नारळी-पोफळींच्या बागा कोंकणांतल्यासारख्याच होत्या—आणि तरी त्यांत फरक होता. इतक्या मस्त, अनंत बागा कोंणकांत नाहींत. या बागांत नारळी, पोफळी, फणस, आंबा, कोकम, चांदा, जास्वंद, संकेश्वरी वगैरे झाडें-फुलझाडें तींच आहेत. पण त्यांत जो रसरशीतपणा आहे, जीवनाचा जोम आहे, तो कोंकणच्या झाडांत नाहीं. आणि या बागांत जी स्वच्छता, सुबत्ता, व्यवस्था दिसली, नारळी-पोफळींच्या आडून आढळणाऱ्या घरांचा थाट, जी झिलई दिसली, ती कोंकणांत क्वचितच दिसते.

मी एका अपूर्व, अननुभूत उद्यानांतून चाललों होतों. अखंड चाललों होतों. बागबागायतीची ती संस्कारित शोभा मैलान् मैल पसरली होती.

माझे डोळे पाहून पाहून थकले आणि मिटले.

जरा वेळानें जागा झालों तेव्हां कसले तरी, कांहींसे अपरिचित मंत्र कानांवर पडले. पाहिलें तों रस्त्याच्या कडेनें एक लांबच लांब मिरवणूक जात होती—

कॅथॉलिक ख्रिस्त्यांची मिरवणूक ! अंगांत सफेत पायघोळ झगा, डोक्यावर कसलासा मुकुट आणि हातांत धर्मदंड घेतलेलीं दोन दहाबारा वर्षांचीं मुलें मिरवणुकीच्या आघाडीवर होतीं. पाद्रीबावाचा हा अवतार त्यांना फार शोभून दिसत होता. खुद्द पाद्रीबाबा मंत्र म्हणत होते आणि हीं मुलें व इतर लोक, परवचा म्हणावा तशा थाटांत, त्यांचा पुनरुच्चार करीत होते. मिरवणुकीच्या मध्येंच एकाच्या डोक्यावर व्हर्जिन मातेची मूर्ति होती. या मूर्तीची आरास आणि शोभा कॅथॉलिक धर्माच्या राजवैभवाची जाणीव करून देणारी अशीच होती. मिरवणुकींत असंख्य स्त्रिया होत्या. त्यांनीं अर्थात् या प्रसंगाचा उपयोग, इतर कोणत्याहि प्रसंगाप्रमाणें, पोशाखाचें वैभव मिरविण्यासाठीं केला होता. गुलाबी, जांभळ्या, हिरव्या, गर्भरेशमी, जरीकांठी साड्यांत या मखमली कांतीच्या सिलोनी स्त्रिया खरोखर सुंदर दिसत होत्या. सिलोनी स्त्रिया मंगलोरी ख्रिश्चन स्त्रियांप्रमाणें दिसतात आणि त्यांची फॅशनसुद्धां मंगलोरी ख्रिश्चनच आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, सिलोनचा पाश्चात्य संस्कृतीशीं संपर्क चारशें वर्षांपूर्वी आला. पाश्चात्य संस्कृतीचा अंमल सिलोनवर नांवापासून पोशाखापर्यंत आहे. सिलोनी स्त्रियांच्या पोशाखांत, दागिन्यांत, वेणीफणींत ख्रिश्चन संस्कार विशेष झळकतात. शिवाय भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील संस्कृतींत आणि सिलोन बेटांतील संस्कृतींत—दोन्हीहि नारळी-पोफळीवर वाढलेल्या संस्कृती—एक विलक्षण साम्य आहे. तेव्हां सिलोनी स्त्रिया मंगलोरी ख्रिश्चन स्त्रियांप्रमाणें दिसाव्या यांत नवल नाहीं. या मिरवणुकींतल्या स्त्रिया तर ख्रिश्चनच. आश्चर्य वाटतें तें एवढेंच कीं ख्रिश्चन संस्कार पुरुषांच्यांत अधिक दिसायचे ते इथें स्त्रियांत अधिक दिसतात !

एकसारख्या अशा मिरवणुकी दिसत होत्या. गांवोगांव नव्या मिरवणुकी. हा भाग कॅथॉलिकच आहे. प्रथम पोर्च्युगीज्, नंतर डच, त्यानंतर इंग्रज आले. त्यांनीं आपले बाहुटे प्रथम याच भागांत फडकावले. डोंगराळ भागांत आश्रय घेऊन राहिलेल्या सिंहली राजांना त्यांना अटकाव करण्याची हिंमत नव्हती—आणि मिशनऱ्यांना ‘ आकाशांतल्या बापा ’ चें राज्य प्रस्थापित करण्यास मोकळें कुरण सांपडलें.

दुतर्फा थाप लागून राहिलेल्या नारळी-पोफळींच्या बागांचें ऐश्वर्य पाहून मनांत दाटलेला विचार या मिरवणुकांतलें ऐश्वर्य पाहून वर उसळला : सिलोन श्रीमंत आहे. सिलोन मागासलेलें म्हणतात. उद्योगधंद्याच्या दृष्टीनें—म्हणजे आधुनिक

औद्योगिक दृष्टीनें—सिलोन मागासलेलें असेल. पण सिलोनचा निसर्ग समृद्ध आहे. अन्नपाण्याच्या, धनधान्याच्या फळाफुलांच्या दृष्टीनें भारत सिलोनशीं तुलना करूं शकत नाहीं. आग्नेय आशियांतील कोणत्याच देशाशीं करूं शकत नाहीं. भारताची हद्द ओलांडून पूर्वेकडे अगर दक्षिणेकडे गेलें कीं हें ताबडतोब ध्यानांत येतें. भारताचें दर्शन म्हणजे उघडे ओके करपट माळ आणि खडकाळ डोंगर ! उलट आग्नेय आशिया म्हणजे हिरव्या गवतानें लुसलुशीत दिसणारी जमीन, फळाफुलांनीं भारावलेले वृक्ष आणि मुक्त, मस्त अरण्यांनीं डंवरलेले डोंगर ! त्यांत सिलोन तर चहा, नारळ, रबर असल्या जागतिक बाजारपेठांत भारी ठरलेल्या मालाचें नैसर्गिक आगर ! भारत आणि आग्नेय आशियांतल्या या फरकानें माझी आंतल्या आंत कालवाकालव होत होती.

पोट्टुलमूला येईपयत बागांची आरास संपली होती. उजाड मुलूख अंगावर येऊं लागला होता. तरी पण त्याचें दर्शन हिरवेंच होतें. पोट्टुलमूला रस्त्यानें उजवें वळण घेतलें आणि देखावा एकदम बदलला. समुद्रकांठचा संस्कारित भाग संपला आणि डोंगराळ जंगल सुरू झालें. बॅटरीचा झोत काळोख कापीत जावा तसा रस्ता जंगल कापीत जात होता. जंगल दाट होतें तरी भरगच्च नव्हतें. झाडें होतीं, झुडपें होतीं, वेली होत्या. त्या साऱ्यांनीं एकमेकांना पूर्ण वेढलेंहि होतें पण त्यांत मिलाफ नव्हता. पानगळीचा हंगाम. झाडें ओकींबोकीं झालेलीं. अनेकांचे खराटे झाले होते आणि कित्येक तर झिंज्या पिंजारलेल्या वेड्या स्त्रीप्रमाणें दिसत होतीं ! पिळवटलेल्या पारंबीसारखें खोड असलेल्या झाडांचाच भरणा या जंगलांत होता. म्हणून त्याचे सुकट, करपट, पिळकट स्वरूप अधिकच जाणवत होतें. तरीहि तें जंगल सुंदरच. राजस्थानच्या ओसाड माळरानालाहि त्याचें असें कांहीं सौंदर्य असतेंच ना, तसेंच हें सौंदर्य. डंवरलेल्या वृक्षांचें सौंदर्य नव्हे, पर्णहीन फांद्यांचें सौंदर्य ! लेपावर लेप चढवून रंगविलेल्या चित्राचें सौंदर्य नव्हे, तर सुकट कुंचल्याच्या फराट्यानें रेखलेलें सौंदर्य !

या जंगलांत शिरल्यापासून एक प्रकारचा मोहरट सुगंध नाकाभोंवतीं दरवळत होता. साकटलेल्या पाल्याच्या वासासारखा ओला सुगंध. कांहींसा सब्जासारखा. पण त्या जंगलांत त्या सुगंधाचे विचित्रच संस्कार झाले. त्या जंगलांतून एकाकी पळत सुटलेल्या मोटरींतलें आमचें अस्तित्त्व विचित्र वाटूं लागलें. एके ठिकाणीं आमच्या मोटरीच्या आवाजानें भेदरलेला एक लांडगा ओढ्याच्या पात्रांतून मागेंपुढें पाहत पळत

सुटलेला दिसला. दुसऱ्या एका ठिकाणीं जंगलाच्या वळचणीस असलेल्या रानकोंबड्यानें चमकून पक्ष्यासारखी भरारी मारली. एकदां एक काळा कृष्णसर्प रस्त्यांतून आडवा गेला आणि आमच्या मोटरीचा निसटता स्पर्श झाल्यामुळें त्यानें चवताळून आपलें अंग दुमडलें ! या प्राण्यांच्या जगांत आमचा प्रवेश अगदीं आगंतुक भासला.

आमची मोटर अनुराधापूरच्या दिशेनें भरधांव पळत होती. चोवीसशें वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या त्या प्राचीन नगरीच्या नष्ट ऐश्वर्याचे विचार माझ्या डोक्यांत घोळत होते, आणि त्यांत या प्रेतभक्षणाचीं दृश्यें विचित्रपणें मिसळत होतीं. भोंवतालीं अद्याप जंगलाचाच अंमल होता. शहर जवळ येऊं लागल्याच्या खुणा दिसत नव्हत्या. मध्यंतरीं आमचा रस्ता एका तळ्याच्या मधून गेला. पण त्याचेंहि दर्शन आश्वासक नव्हतें. अद्यापपर्यंत स्तब्ध असलेला आमचा शोफर आतां बोलका बनूं पाहत होता. अनुराधापूरच्या आठवणींनीं तो चाळवला असावा. तो म्हणाला, एका काळीं इकडे सर्वत्र शेतें होतीं. गेल्या सातआठशें वर्षांत मात्र सारी भूमि जंगलानें काबीज केली. माझें मन पुनः हिंदुस्थानांत गेलें. पुनः सिलोनशीं तुलना करूं लागलें. हिंदुस्थानांतली स्थिति उलट आहे. आज जेथें उजाड अगर शेतें आहेत. तेथें पूर्वी घनदाट अरण्यें असल्याच्या कथा ऐकूं येतात — आणि अरण्यें तुटून देश उजाड झाला, रुक्ष झाला, त्यामुळें पाऊस पाणी कमी झालें, अशी खंत वाटते. उलट येथें जंगल माजल्याबद्दल खेद व्यक्त होतो. खरेंच, आमचे प्रश्नच उलट आहेत. तामीळनाडचा रुक्ष, उजाड मुलूख पार करून गेलें कीं सिलोनचा उत्फुल्ल निसर्ग दृष्टीस पडतो, आणि सुंदरबनाच्या ( नांवाचें सुंदरवन ! ) पलीकडे गेलें कीं अरण्यांच्या गालिच्यांनीं झांकलेले आराकानचे पर्वत दिसतात. असा हा फरक. या फरकानें आमच्या जीवनाचे प्रश्न, आमची जीवनदृष्टीच निराळी बनली आहे. आग्नेय आशियांतील लोक आनंदी आहेत. खेळकर आहेत. जीवनास्वादांत रमून गेलेले आहेत. उलट, आम्ही म्हणजे चिंतातुर जंतु ! जगाचें सारें दैन्य आणि दुःख जणुं आमच्या मानगुटीस बसलें आहे ! आग्नेय आशियांतील मानव अरण्यावर विजय संपादण्यांत अयशस्वी ठरला. भारतीय मानवानें जंगलावर मात केली — पण ती करतां करतां जीवनकलहाचा भयंकर राक्षस उरावर घेतला ! निसर्गानें आग्नेय आशियांतील मानवाला जिंकलें नाहीं; आम्हांला जिंकलें !

आमच्या शोफरच्या जिभेवर महावंशांतले श्लोक नाचूं लागले होते. महावंशांत अनुराधापूरचें भरगच्च वर्णन आहे आणि त्याचे फुटकळ तुकडे आमच्या कानांवर पडत होते—अनेक शतकांच्या प्रहारांनीं आणि व्यवहारांनीं जायबंदी झालेले तुकडे! शोफरकडून शुद्ध संस्कारयुक्त पाठांची अपेक्षा करण्याचें कारण नव्हतें. पण अनुराधापूरच्या एश्वर्याची थोडीबहुत कल्पना तो आणून देत होता. ख्रिस्तशतकापूर्वी ४३७ व्या वर्षीं राजा पण्डुकभय यानें ही राजधानी वसविली. तिची योजनाबद्ध उभारणी केली. देवानाम्प्रिय तिस्सा आणि दत्तागामिनी यांनीं तिचा वैभवशाली विकास केला. चारी दिशांना तिची कीर्ति पसरली. तें एक विख्यात सांस्कृतिक केंद्र बनलें. शिल्प आणि वास्तुशिल्प यांचें प्रदर्शन ठरलें. आणि विद्वानांचें व प्रवाशांचें आकर्षण झालें. पण आम्हांला त्याचें दर्शन कसें झालें? एका पडक्या गांवांतल्या प्रवेशानें! धुळीनें भरलेलीं घरें आणि सरकारी बंगले नजरेंत आले. चिखलानें बरवटलेलीं डुकरें आणि लूत लागलेलीं कुत्रीं आडवीं आलीं. उडालेल्या धुळींतला कचरा मोटरींत घुसूं लागला—आणि अनुराधापूरच्या वैभवशाली भूतकालाशीं कसलाहि संपर्क नसलेलीं माणसें निस्तेज नजरेनें आमच्याकडे पाहूं लागलीं. प्राचीन प्रतिष्ठेचें हें चालतेंबोलतें विडंबन. पण आम्हांला तरी वेगळें दर्शन कां घडावें? त्या काळचे लोक नगरांत कसे प्रवेश करीत, तेथें कसे वागत याचें महावंशांत वर्णन आहे. तिस्सावेवावर (तिस्सानें बांधलेल्या तलावावर) स्नान करायचें, चदनचर्चित उटीनें शरीर सुगंधित करायचें, उत्पलकुसुमांचे गुच्छ धारण करायचे, महाबोधी वृक्षाची सालंकृत पूजा करायची, थूपाराम दागाबाला (स्तूपाला) भेट देऊन तेथें भक्तिभावानें लीन व्हायचें आणि नंतर नगरांत संचार करायचा, अशी त्या वेळची रीत असे. आणि आम्ही—धुळीनें माखलेले, शरीरानें थकलेले, भोजनासाठीं हपापलेले—अनुराधापूरच्या स्तूपांचा, मंदिरांचा, पूजास्थानांचा विचारहि न करतां हॉटेलाची चौकशी करीत होतों. आणि आंत अंतरंगांत असलीच तर जिज्ञासा होती (अनुराधा-पूरचें कीर्तिशाली शिल्प आणि वास्तुशिल्प पाहण्यास आम्ही आलों होतों ना?) भक्ति नव्हती. अंतरंगांतले अज्ञात भाव कदाचित् सौंदर्यास्वादाचे असतील; आत्मसमर्पणाचे नक्की नव्हते. मग त्या पुण्यनगरीनें आम्हांला आपलें अभिजात दर्शन कां द्यावें?

अर्थात् अनुराधापूरचें अनुरूप दर्शन घेण्यास मी अपात्र ठरलों; पण या बाईच्या गडबडींत आणि वडवडींत अडकल्याचा एक फायदा झाला. एकाद्या प्राचीन स्थळीं जायचें, सारें कांहीं पाहायचा आग्रह धरायचा, दमून जायचें, कंटाळायचें, आणि झालेले संस्कार कुरतडायचे, एकमेकांत गुरफटवायचे, आणि मनाची कचरापेटी करून परत यायचें, असें झालें नाहीं. कांहीं ठराविक ठिकाणेंच पाहिलीं आणि त्याच्या संस्कारांनीं मन रेखून परत आलों. उदाहरणार्थ, अनुराधापुरांत अनेक स्तूप आहेत. त्यांतले कांहीं अतिप्राचीन आहेत. (सिलोनमध्यें त्यांना दागाबे म्हणतात.) त्यांना प्रत्येकाला त्यांचा कल्पनारम्य इतिहास आहे. मीं फक्त रुआनवेलिसेया स्तूप पाहिला. ईजिप्तच्या पिरॅमिड्सशीं सहज स्पर्धा करील असा तो आहे. (ईजिप्तच्या सौंदर्य-स्थळांत पिरॅमिड्सना जें स्थान आहे तें सिलोनमध्यें या स्तूपांना आहे.) त्याला महास्तूप म्हणतात. सिलोनच्या प्राचीन पराक्रमी राजांचाहि राजा शोभेल अशा दत्त-गामिनीनें तो बांधला. दत्तगामिनी हा मोठा विलक्षण राजा होऊन गेला. बापानें तामीळ आक्रमकांशीं लढण्याची परवानगी दिली नाहीं म्हणून त्यानें त्याला बांगड्यांचा अहेर पाठविला. पण तोच पुढें अशोकाप्रमाणें आपल्या लढ्यांतील प्राणहानीमुळें पश्चात्ताप पावला आणि त्यानें पुण्यसंचयासाठीं स्तूप, विहार वगैरे बांधण्यास सुरुवात केली. रुआनवेलिसोया (मूळ नांव: रुअनवेलिमहाशय) स्तूप हा सिलोनमधील स्तूपांचा राजा शोभेल. सिलोनी जनतेनें त्याला अतिपवित्र मानलेलें आहे. त्याच्यावर प्रेमाचा, भक्तीचा, अभिमानबुद्धीचा सतत वर्षाव केलेला आहे. त्याचें वास्तुशिल्प खरोखरच दर्शनीय आहे. शुभ्र स्तनाकृति अर्धगोलाकार चौरस चौकोनी रचना आहे आणि तिच्यावर नीलाकाशाला भेदूं पाहणारा मुद्गलाकृति कळस आहे. मला ती मधली चतुष्कोनी रचना आवडली नाहीं आणि या वास्तुशिल्पाच्या उगमाविषयीं जी दंतकथा आमच्या शोफरनें सांगितली तिच्याशीं ती जुळतहि नाहीं.

हा स्तूप बांधायचें दत्तगामिनीनें ठरविलें तेव्हां त्यानें आपल्या वास्तुशिल्पकाराला बोलावलें आणि विचारलें,

"कोणता आकार देणार तुम्ही याला?"

"महाराज, मला एकादा तांब्या मिळेल का?"

त्याच्यापुढें एक सोन्याचा तांब्या ठेवण्यांत आला.

" मला थोडं पाणी मिळेल ? "

त्याच्यापुढें एक सोन्याचा पाणी भरलेला लोटा ठेवण्यांत आला.

त्या कलावंतानें लोट्यांतलें थोडेंसें पाणी घेतलें आणि त्या तांब्याच्या चकचकीत बाजूवर ओतलें. पाणी वाहून गेलें, पण शेवटीं एक ओघळलेला थेंब राहिला. सुवर्णाच्या पार्श्वभूमीवर तो तेजस्वी दिसत होता. दत्तगामिनीचें लक्ष त्याच्याकडे वेधून वास्तुशिल्पकार म्हणाला,

" या आकाराचा स्तूप मी बांधीन. "

राजा खूष झाला आणि त्यानें तीं सोन्याचीं पात्रें तेथच्या तेथें त्याला बक्षीस दिलीं.

ती चतुष्कोनी रचना मला आवडली नाहीं, तरी त्या स्तूपाच्या नुसत्या भव्यतेनें मी मुग्ध झालों. त्या मानानें स्तूपाच्या आवारांतील देवालयांतल्या मूर्ती अगदीं बेढब, भडक आणि भिकार वाटल्या! त्या भिकारपणांतहि वैशिष्ट्य नव्हतें. नुसता सांचेबंद भिकारपणा!

त्या मूर्ती पाहण्याची अवदसा आम्हांला कां आठवली न कळे. त्यापेक्षां स्तूपा-भोंवतालच्या उद्यानांतून (आज त्याला उद्यान म्हणणें कठीण आहे; एकाद्या मस्त गांवठाणाचें रूप त्याला आलें आहे.) फेरफटका करतांना त्याचें दर्शन घेत राहिलों असतों तर त्या सौंदर्यदर्शनांत त्या मूर्तींचें ओंढकें आडवें आलें नसतें! त्या गांवठणांतला फेरफटका हाच एक अनुभव होता. अनुराधापुरांत त्या काळीं आठ-आठ दहा-दहा योजनें लांबीरुंदीचीं उद्यानें होतीं आणि 'महामेघवन' असलीं काव्यपूर्ण नांवें त्यांना होतीं. त्यांत झाडांची, फुलझाडांची कल्पनाशाली लागवड करण्यांत आली होती. एका उद्यानांत राजा भक्तिकायानें नुसती मोगऱ्याच्या नाना प्रकारांची लागवड केली होती. आज त्या उद्यानांत म्हणजे गांवठाणांत नुसते प्रचंड वृक्ष आपल्या वळकट खोडांवरचा विस्तार पसरून उभे होते—शेकडों वृक्ष! ते महान् वृक्ष मोठे वैभवशाली, राजवैभवशाली दिसत होते. तें वैभव त्यांच्या शक्तीचें, विस्ताराचें आणि सौंदर्याचें होतें, त्याचप्रमाणें त्यांच्या ऐतिहासिक प्रतिष्ठेचें होतें. अनुराधापूरच्या प्राचीन ऐश्वर्यशाली इतिहासाचे ते साक्षीदार होते. त्या प्राचीन स्मृतीचे ते संरक्षक होते. त्यांच्या मानधन अस्तित्वांत या जाणिवेचा अभिमान होता, आणि त्या गांवठाणांत

असें ऐतिहासिक महत्त्व नसलेल्या झुडपा-वेलींना त्यांनीं बिलकुल थारा दिला नव्हता, त्यावरून तो अभिमान व्यक्तहि होत होता. आणि म्हणूनच या उद्यानांत हिंडणें हा एक स्थलकालाचीं बंधनें तोडणारा अनुभव होता.

पण ह्या अनुभवाचा आस्वाद घेत अनंत काल थांबणें शक्य नव्हतें. प्राचीन पौर्वात्य इतिहासाचें अति आकर्षण पाश्चात्यांना काय होय? त्या उद्यानांत रेंगाळणाऱ्या माझ्या जिवाला त्या चित्रकर्त्रीनें 'उशीर होत आहे' याची जाणीव दिली. खरेंच, पोलान्नुरावाला आम्हांला सायंकाळच्या आंत पोंचायचें होतें! कांहीं लोक प्रवासाला निघाले म्हणजे जिथें पोंचायचें त्याचाच विचार करीत राहतात. आम्ही महाबोधि वृक्षाकडे निघालों. पवित्र वृक्ष हा बुद्ध वृक्ष असतो. बुद्ध वृक्ष फारच बद्ध असतो. भक्तगणांनीं आपल्या पूजेनें त्याला फारच वेढून टाकलेलें असतें. तो वृक्ष मुद्दाम जाऊन पाहण्याची माझी फारशी इच्छा नव्हती. पण आम्हीं त्याचें दर्शन घ्यावें अशी आमच्या बुद्धिस्ट ड्रायव्हरची फारच इच्छा दिसली. आम्ही निघालों. जरासे आलों. तों नाक्यावर कोपऱ्यांत उभ्या दगडी खांबांचें एक जंगल आढळलें. शेंकडों दगडी खांब आपलें ओबडधोबड पण भरभक्कम रूप दाखवीत उन्हांत तळपत उभे होते. सूर्यकिरणांशीं त्यांचा झगडा सुरू होता. दगडांच्या त्या जंगलांत एक अबोध आकर्षण होतें. आणि तें नजर बांधून ठेवीत होतें. आम्हीं मोटरींतून उतरलों आणि निश्चल नजरेनें पाहत राहिलों. शेजारींच रस्त्यावर एक मस्त बैल डोळे मिटून रवंथ करीत आणि धुळीनें भरलेल्या अंगावरच्या माशा शेपटीनें हांकलण्याचा प्रयत्न करीत स्वस्थ उभा होता. त्या खांबांतली शक्ति या बलिवर्दाच्या शक्तीसारखीच मूढ होती. पण नाहीं—इतिहासाच्या साक्षात्कारानें ती शक्ति लगेच चैतन्यमय बनली. ड्रायव्हर इतिहासाचे पाठ देत होता. प्रसिद्ध महालोहप्रासादाचे हे खांब. दत्तगामिनीनेंच हा प्रासाद बांधला. नांवावर जाऊं नका. या प्रासादांत राजा राहत नव्हता. बौद्ध भिक्षूंसाठीं तो खास बांधला होता. त्या वाड्याचें वैभव मात्र राजविलासी होतें. महावंशांत त्याचें वर्णन आहे. सोळाशें खांबांचा आणि नऊ मजल्यांचा हा वाडा पूर्णतः रत्नजडित होता. दरवाजांवर सुवर्णाचीं तोरणें लोंबत. खिडक्या मणिमाणकांच्या शोभेनें उजळत. अंगणांत प्रकाशपुष्पांच्या माळा दिसत. या वाड्याच्या शृंगारलेल्या खोल्यांत, पीतवस्त्रांत गुंडाळलेले क्षौरमुंडन भिक्षु मंत्रजागरण करीत!

आज या वाड्याचें अस्तित्व या ओक्याबोक्या खांबांच्या रूपानें शिल्लक आहे. प्रवाशांसाठीं आकर्षण एवढेंच या रुक्ष, बोजड दगडांचें कार्य असें वाटेल. पण तसें नाहीं. या खांबांनीं सिलोनी वास्तुशिल्पाला स्फूर्ति दिलेली दिसते. उघड्यानागड्या खांबांच्या सांगाड्यावर इमारती उभारण्याचें वेड आजच्या सिलोनमध्यें दिसतें. हें मोठें पुराणोक्त वेड आहे. त्याला प्राचीन संस्कृतीचें पुनरुज्जीवन असें म्हणतात.

सरकारी प्रवासखात्याच्या पुस्तिकेंत महाबोधिवृक्षाच्या आवाराच्या प्रवेशद्वाराचें मोठें सुदर छायाचित्र छापलेलें आहे. प्रत्यक्षांत मात्र तें द्वार अगदीं सामान्य वाटलें. त्याच्यावरचें सारें शिल्प वार्षिक चुनेफांशीनें पार घुसमटून गेलें आहे. बोधिवृक्षाच्या दर्शनाचा उत्साह या द्वारदर्शनानें थंड व्हायला हरकत नव्हती. पण या वृक्षाचा इतिहास थोर, महिमा थोर. अशोक राजाची कन्या संघमित्रा हिनें गयेच्या बोधिवृक्षाची शाखा भारतांतून आणून स्वहस्तानें इथें लावली. इतिहासांतलें सर्वांत जुनें झाड असेंहि त्याचें वैशिष्टय आहे. ( शिवाय ड्रायव्हरचा आग्रह होताच. ) तेव्हां आंत डोकावलों. झाडाचें खोड दिसलेंच नाहीं. जमिनींतून शाखाच उगवल्या-सारखें वाटलें. वस्तुस्थिति अशी आहे कीं भक्तांनीं माती टाकून पार बांधून खोड पुण्यकर्मांत बुडवून टाकलें आहे. मात्र शाखेंतून निर्माण झालेल्या वृक्षाच्या नुसत्या शाखाच दिसाव्यात हें अगदीं उचित होय. तें दृश्य अगदीं प्रतीकात्मक आहे. बुद्धधर्माच्या शाखा जगभर फोफावल्या, पण मूळ भारताचा त्याचा वृक्ष वाढला नाहीं. त्याचप्रमाणें मूळ बोधिवृक्षहि उरला नाहीं—आणि त्याची इथें शाखा आली तिचेंहि केवळ शाखादर्शन होतें !

इसुरुमुनियाकडे जाण्याची मला घाई लागली होती. त्या स्थळाचें वर्णन वाचलें होतें. तेथील शिल्पबद्ध प्रेमिकांचें छायाचित्र पाहिलें होतें.

या स्थानाचें माहात्म्य निसर्ग आणि मानव यांच्या कल्पनारम्य सहयोगांत आहे. ज्या कारणासाठीं मला काव्य, कथा अगर चित्रशिल्पादि कलाकृति आवडतात त्याचा कारणासाठीं मला इसुरुमुनिया आवडलें. ती एक चित्राकृति आहे. निसर्ग आणि मानव यांच्या सहकार्यांतून निर्माण झालेला तो एक सर्जनशील पट आहे. निसर्गानें सरोवर, खडक आणि तळें दिलें. मानवानें त्यांत शिल्प आणि वास्तुशिल्प यांची भर टाकली. निसर्गानें सरोवराच्या कांठीं खडक निर्मिला. मानवानें खडकावर घंटाघर

बांधलें, खडकाशेजारीं स्तूप आणि मंदिर उभारलें, आणि खडकाच्या पायथ्याशीं तळें होतें त्याच्या सान्निध्यानें खडकावर हत्तींच्या मूर्ति कोरल्या—अशा कीं ते हत्ती तळ्याच्या पाण्यांत विहार करीत आहेत असें वाटावें! ज्याचा कल्पनाविलास इतका स्वैर त्यानें तिथें कोरलेल्या इतर मूर्तींतहि सांकेतिकापलीकडच कांहीं तरी असणारच. द्वारपालदेवतांसारख्या सांकेतिक मूर्ति येथें असल्या तरीहि त्यांत कांहीं वैशिष्ट्य आहे. तेथल्या प्रत्येक मूर्तीला तिचें स्वतःचें असें व्यक्तित्व आहे. इथलें शिल्पबद्ध प्रेमी युगुल म्हणजे तर एक काव्यच—आणि या काव्यानें इतर अनेक काव्यांना जन्म दिलेला आहे. दिव्यानें दिवा लागतो व तितकाच उजळतो. या कवितांबद्दल असेंच म्हणतां येईल असें मात्र नाहीं.

या प्रेमी युगुलाप्रमाणें मी सिलोनी शिल्पांतल्या चंद्रशिलांची कीर्ति ऐकली होती. चंद्रशिला हें सिलोनचें एक वैशिष्ट्यच आहे. चंद्रशिला म्हणजे देवालयाच्या अगर प्रासादाच्या प्रवेशद्वारापाशीं बाहेर मधोमध असणारा लादीसारखा अर्धवर्तुळाकार दगड. हा अतिशय नक्षीदार असतो. या नक्षीचा एक सांचाच बनून गेला आहे. एका मोठ्या वर्तुळाची कल्पना करा. या वर्तुळांत मध्यबिंदुपासून आणखी वर्तुळें काढून वाटोळे पट्टे करा. मधल्या वर्तुळांत उत्फुल्ल कमळ, नंतरच्या पट्ट्यांवर कोरीव नक्षी, त्यानंतरच्या पट्ट्यांत राजहंसाची मालिका, नंतर पुनः कोरीव नक्षी नतर हत्ती, सिंह, बैल, घोडा यांची एक मालिका, मग पुनः एक नक्षीदार पट्टा— असें सबंध वर्तुळ नक्षीनें भरून त्याचे मधोमध दोन भाग केले कीं झाल्या चंद्रशिला. निरनिराळ्या चंद्रशिलांत अल्पस्वल्प फरक असतो, पण एकंदर साचा असा. ही चंद्रशिला सुंदर दिसते यांत शंकाच नाहीं. पण ती कारागिरी, प्रेमी युगुलासारखी कलानिर्मिति नव्हे.

अनुराधापूरला राणीच्या राजवाड्याच्या प्रवेशद्वाराशीं एक प्रख्यात चंद्रशिला आहे. ती पाहण्याची माझी फार इच्छा होती. पण आमच्या चित्रकर्त्रीला पोलान्नारुवाला पोंचण्याची घाई लागली होती. म्हणून चंद्रशिलेचें दर्शन मला पोलान्नारुवालाच झालें. आणि अनुराधापूरचा निरोप घेण्याचा आधुनिक विधीहि आम्हांला करतां आला नाहीं. हा विधि म्हणजे ह्या भागांतून जाण्यापूर्वी, अलीकडेच जवाहरलाल नेहरूंनीं ज्या नव्या अनुराधापूर शहराचें उद्घाटन केलें त्याचे दर्शन घेणें. प्राचीन अनुराधा-

पुरांत आधुनिक जीवनाचीं दृश्यें देवळाच्या पटांगणांत मासळीबाजार उघडल्यागत हिडीस दिसतात, म्हणून सरकारनें दूर दोन मैलांवर हें नवीन शहर वसविलें आहे. तिकडे जावें अशी आमच्या ड्रायव्हरची फार इच्छा दिसली—पण ती फुकट गेली, आणि आम्हांला अनुराधापुरांत शिरण्याचा प्राचीन विधी जसा करतां आला नाहीं त्याचप्रमाणें त्याचा निरोप घेण्याचा आधुनिक विधीहि उरकतां आला नाहीं !

पोलान्नारुवाला सुखसोयींनीं 'संपूर्ण' असें एक विश्रांतिगृह (rest house) आहे. आणि एलिझाबेथनें सिलोनला भेट दिली तेव्हां तिचा मुक्काम याच विश्रांतिगृहांत होता, एवढें सांगितलें म्हणजे त्याचें अधिक गुणवर्णन करण्याचें कारण नाहीं. तरी पण एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. तें एका कृत्रिम सरोवराच्या कांठावर आहे, आणि त्याला पाठीमागच्या उद्यानाप्रमाणेंच समोरचा जलविस्तार आणि विस्तारापलीकडच्या वनश्रीनें आकाशावर रेखलेल्या आकृति यांमुळें कमालीचें रमणीयत्व प्राप्त झालें आहे. हें कृत्रिम सरोवर म्हणजे एक लहानसा समुद्रच वाटतो. आमचा ड्रायव्हर म्हणाला, 'मिन्नेरी वेवा पाहा म्हणजे साक्षात् समुद्राचेंच दर्शन होईल.' मिन्नेरी वेवानें चार हजार पांचशें आठ एकरांचा मुलुख व्यापला आहे आणि त्याचा परीघ वीस मैल लांबीचा आहे. म्हणजे समुद्रानें वेढलेल्या सिंहलीद्वीपाच्या पोटांत हा दुसरा समुद्र ! पण असे अनेक समुद्र सिलोनच्या प्राचीन राजांनीं निर्माण केले. त्याचें त्यांना वेडच होतें. मध्ययुगीन भारतीय राजांना किल्ले बांधण्याचा नाद होता, तसा यांना तळीं-सरोवरें बांधण्याचा. आपल्या राजवटीचें ऐतिहासिक कार्य तें हें, असें त्यांना वाटे. त्यांचा त्यांना विलक्षण अभिमान. पांचव्या शतकांतील धातुसेन राजाला त्याच्या मुलानें कैद केलें आणि आपली गुप्त संपत्ति त्यानें दाखवावी म्हणून छळ सुरू केला, तेव्हां धातुसेनानें त्या पुत्रश्रेष्ठाला आपण बांधलेल्या कालावेवाकडे नेलें आणि त्या महासरोवराकडे बोट करून म्हटलें, 'ही पाहा माझी संपत्ति ! ' ( मुलाला वाटलें, बाप आपली चेष्टा करतो आहे, म्हणून चिडून त्यानें बापाला भिंतींत चिणून ठार केलें ! ) या भागांत हिंडतांना अशा सरोवरांचीं दर्शनें सारखीं होतात. अनेक सरोवरें कालव्यांनीं एकमेकांना जोडलेलीं आहेत. शेतीचीं साधनें म्हणून त्यांची इतकी साधना झाली, पण जेथें आठदहा महिने भरपूर पाऊस पडतो तेथें त्यांची गरज काय हें नीटसें ध्यानांत नाहीं आलें.

पोलान्नारुवाला ' रेस्ट हाऊस 'मध्यें जागा मिळण्याइतकें आमचें भाग्य थोर नव्हतें. राणी एलिझाबेथच्या लव्याजम्याची सोय करण्यासाठीं जें दुसरें एक विश्रांतिगृह बांधण्यांत आलें होतें त्यांत आमची सोय झाली. पण पिसवा, डांस, उंदीर, भांडणारीं मांजरें आणि कोल्हेकुई यांनीं आमच्या विश्रांतीचें व्यवस्थित विडंबन केलें आणि सकाळीं आम्ही थकलेल्या शरीरानें आणि मरगळलेल्या मनानें पोलान्नारुवाचे कलावशेष पाहाण्यास सज्ज झालों. सुदैवानें आम्ही तडक वाटादागे-हाटादागेला गेलों आणि त्याच्या दर्शनानें आमच्या मनावर मंतरलेल्या पाण्याचा वर्षाव झाला. ज्युलिया सुद्धां थोडी शांत झाली. तिथलीं देवालयें उध्वस्त झालेलीं आहेत. सभागृहाचे कमलिनीच्या आकाराचे स्तंभ तेवढेच उभे आहेत. निस्संगमल्लाचा पाषाणग्रंथ अभंग आहे, पण त्याच्यावरचीं अक्षरें क्षर ठरत आहेत. सारें कांहीं भग्नावशेषांच्या स्वरूपांत आहे. पण तिथलें वातावरणच विद्युन्मय ! तें तुमची दृष्टीच दिव्य बनवितें. प्रत्येक वस्तूंत कसलें तरी विलक्षण चैतन्य ओततें. आणि मग वाटादागेच्या पडक्या भिंती पवित्र भासूं लागतात. त्यांच्या आडव्या बौद्धमूर्तींच्या नजरेंत ज्ञानज्योत दिसूं लागते. चंद्र-शिलेचें तेज फांकतें. द्वारपालांच्या मुद्रेवरचें हास्य मिस्किल बनतें. लतामंडपांतले वादविवाद ऐकूं येऊं लागतात आणि पाषाणग्रंथावरचीं अक्षरें कालाचा भेद करून निःसंगमल्लाच्या अंतःकरणाला वाचा फोडूं लागतात ! आणि या साऱ्यांच्या भोंवतीं प्राचीन पुराणोक्त आणि ऐतिहासिक प्रसंगांनीं भारलेलें उदात्त–विषण्ण वातावरण निर्माण करणारे ते प्रचंड, प्राचीन ऋषिमुनींप्रमाणें भासणारे वृक्ष कालाचा पडदा फाडून तुमच्यापुढें उभे राहतात ! खोड स्तब्ध आहे, विस्तार हलतो आहे. अंग अभंग आहे, पानें तेवढींच झडताहेत अगर नवीन फुटताहेत. म्हणजे काल अचल आहे, ऐतिहासिक प्रसंग तेवढे परिवर्तनशील आहेत.

अस्फुट अंतःकरणानें मी त्या भग्नावशेषांनीं चितारलेल्या भागांत, सकाळचें कोवळें ऊन अंगावर घेत हिंडत होतों, पाहत होतों, कॅमेरा चालवीत होतों, इतक्यांत माझें लक्ष वृक्षावरच्या एका पक्ष्याकडे गेलें. काळी चोंच, लाल तुरा, पिवळ्या-काळ्या-निळ्या पंखांचा पिसारा ! तो आमच्याकडे, या भग्नावशेषांच्या सृष्टीकडे पाहत होता—निश्चल-पणें पाहत होता. पुराणांतील अमर पक्षी तोच का हा ? त्याच्या नजरेंत मी या प्रश्नाचें उत्तर शोधूं लागलों. पाहतां पाहतां माझ्या आंत, अंतरगांत कांहीं तरी होतेंसें वाटलें.

माझें मन हललें. मनाचा अणुरेणु हलला, भारला, भडकला, गडबडला, गोंधळला, विषण्ण झाला—मग शांत झाला, स्थिर झाला ! मंथनांतून अमृतसिंचन झालें !

एवढें पाहिल्यावर अधिक कांहीं पाहण्याची इच्छा उरली नव्हती. पण आमच्या चित्रकर्त्रीच्या एका जर्मन मित्रानें तिवंखा मूर्तिमंदिर पाहण्याची शिफारस केली होती. तिथें म्हणे सुंदर भित्तिचित्रें आहेत. आम्ही तिवंखाकडे भरधाव निघालों. पण वाटेंत गालविहार होता. आणि त्याची शिफारस अधिक जोरानें झाली होती. मी गालविहाराबद्दल फारसा उत्सुक नव्हतों. गालविहारांत बुद्धांच्या तीन मूर्ति आहेत. आसनस्थ बुद्ध, उत्थित बुद्ध आणि शयनस्थ बुद्ध. आग्नेय आशियांत बुद्धाच्या मूर्ति पाहून पाहून कंटाळा आला होता. आतां मूर्तिमूर्तींत फरक असतो, तज्ज्ञाला त्यांत रसहि आढळतो ; पण साधारणपणें बुद्धाच्या मूर्तींचे कांहीं ठराविक प्रकार असतात, आणि बँकॉकच्या देवळांत आणि म्युझियममध्यें मी अनेक प्रकार पाहिले होते. शयनस्थ बुद्ध तर अनेकदां पाहिला होता. बँकॉकच्या वाट पोमधली शयनस्थ बुद्धाची सुवर्णचर्चित मूर्ति नजरेजमोर होतीच. म्हणून मला गालविहाराची फारशी ओढ नव्हती. पण भाविकांनीं या मूर्तींत भाव ओतण्याचा प्रयत्न केला आहे. बुद्धराज मृत्युशय्येवर आहेत, आणि शिष्यवर आनंद शेजारीं शोकविव्हल मुद्रेनें उभे आहेत. असा अर्थ त्यांनीं लावला आहे. ( कदाचित् बुद्धाच्या मूर्ति पाहून थकलेल्या बुद्धीचा त्यांत नावीन्य ओतण्याचा हा प्रयत्न असेल. ) अनेक प्राचीन मूर्तींत शांति, करुणा, निमग्नता, कोणताहि भाव दिसूं शकतो—तो पाहण्याचा निश्चय मात्र पाहिजे ! पाहूं या आपल्याला दिसतो का तसा भाव, अशा विचारानें मी स्वतांत उत्साह भरण्याचा प्रयत्न केला. मी गेलों. पाहिलें. कोणता निश्चित भाव दिसला हें मी सांगूं शकत नाहीं. पण गालविहारांतल्या एकंदर दृश्यानें माझें मन विहरलें एवढें कबूल केलें पाहिजे. तें दृश्यच तसें होतें. उजवीकडे, डावीकडे, मागें—सर्वत्र अरण्य पसरलें आहे. सकाळच्या वातावरणांत अरण्यांतले वृक्ष ताजे प्रसन्न दिसत आहेत. सूर्यकिरणानें त्यांचा पर्णसंभार उजळून निघाला आहे. मंद वाऱ्यावर ते हलत डोलत आहेत. समोरून सूर्याचे किरण त्या मूर्तींत तेज ओतीत आहेत. आणि समोरच्या खडकावर उभें राहून हें सारें दृश्य एका दृष्टिक्षेपांत पिऊन टाकतां येत आहे. खरोखर ज्या मूर्ति देवळांत अगर वस्तुसंग्रहालयांत सामान्य वाटल्या असत्या त्या या पार्श्वभूमीवर

अप्रतिम वाटल्या. मूर्तीइतकेंच मखराचें महत्त्व हेंच खरें. आणि निसर्गाच्या मखराइतकें सुंदर मखर दुसरें कोणतें ? जुन्या मूर्तिकारांनीं आपली कला केवळ दगडांत ओतली नाहीं. त्यांच्या कलेनें पार्श्वभूमीचा आणि वातावरणाचाहि वेध घेतला.

तिवंखानें माझी निराशाच केली. ज्युलिया भिंतींवरचीं पुसट चित्रें ओढाळ नजरेनें खरवडत बसली होती. मधूनच साखरलिंबाचा ठसका लागावा तसे आनंदाचे चीत्कार काढीत होती. मी मूर्तीकडेच वळलों. मूर्ति म्हणजे अर्ध-मूर्ति ! कमरेपासून खालची ! वरचा भाग उडाला आहे ! त्या मूर्तीच्या प्रचंड आकारानेंच माझें लक्ष वेधून घेतलें— एकात्मतेनें नव्हे ! घारापुरीच्या लेण्यांतल्या मोडक्यातोडक्या मूर्तीहि मूळच्या अखंड कलाकृतीच्या चैतन्यानें सळसळलेल्या वाटतात. या चैतन्याचा अनुभव येथें आला नाहीं.

पुनः आम्ही पळत सुटलों. सिगिरिआ, डाम्बुला आटपून आम्हांला सायंकाळच्या आंत कॅण्डीला पोंचायचें होतें. पण या घाईंत एक उत्कृष्ट मूर्ति पाहायची राहिली. या मूर्तीचें माहात्म्य फार आहे. महापराक्रमबाहूची ही मूर्ति. देवानाम्प्रिय आणि दत्त-गामिनी यांनीं अनुराधापूरच्या वैभवाचा पाया घातला, तसा महापराक्रमबाहू आणि निस्संगमल्ल यांनीं पोलान्नारुवाच्या ( पुलस्तिपूरच्या ) वैभवाचा घातला. महापराक्रम-बाहूच्या कर्तृत्वाचा आविष्कार पोलान्नुरावाच्या आजच्या भग्नावस्थेंतहि दिसतो. पण त्याची मूर्ति पाहण्याचा आनंद कांहीं निराळाच. शिवाय ही मूर्ति आगळी आहे. प्राचीन ग्रीक अगर भारतीय मूर्तीप्रमाणें संकेतात्मक सौंदर्यानें नटलेली नाहीं. एका अजस्र पण ओबडधोबड देहाच्या पुरुषाची ती मूर्ति आहे. तिच्या अंगावर राजचिन्हें नाहींत; उलट हातांत तालपत्रांची पोथी आहे. म्हणून कित्येकांना वाटतें कीं, ती महापराक्रमबाहूची मूर्ति नसून ऋषी अगस्त्याची मूर्ति आहे. तसें असेल तर तिचें माहात्म्य अधिकच म्हटलें पाहिजे. लंकेवर राज्य गाजविणाऱ्यापेक्षां अखिल आग्नेय आशियांत भारतीय संस्कृतीचें अधिराज्य गाजविणाऱ्यांची थोरवी किती अधिक ? एका अर्थीं लंकेंत हें शिल्प आणि वास्तुशिल्प दिसतें तो अगस्त्याचाच महिमा नव्हे काय ? आणि इतकें उदात्त शिल्प उभारणाऱ्या पराक्रमबाहूनें स्वतःऐवजीं अगस्त्याचा पुतळा उभारण्यांत अधिक औचित्य — आणि त्याचा स्वतःचा अधिक गौरव होय, असें मी मानतों. पण हाय, ती मूर्ति पाहायची राहिलीच !

सिलोन-सरकारनें प्रवाशांसाठीं ज्या स्थलवर्णनिका प्रसिद्ध केल्या आहेत त्यांत सिलोनमधील सौंदर्यस्थळांचीं छायाचित्रें आणि कल्पनारम्य वर्णनें यांचा मनोहर संगम आहे. प्रत्यक्षांत हीं स्थळें या वर्णनाच्या कसोटीस उतरत नाहींत. निदान भारतीय प्रवाशाला तसें वाटणें शक्य नाहीं. तें प्रेमी युगुल, ते द्वारपाल, त्या चंद्र-शिला, तो लतामंडप — सुंदर आहे तें सारें, पण मदुरा, कोनारक, खजुराहो यांच्याशीं त्यांची तुलना होऊं शकेल का? सिलोनचे प्रतिभाशाली चित्रकार जॉर्ज केट एकदां उद्गारले, "Khajuraho is an avalanche of sculpture." शिल्पांच्या त्या धबधब्याशीं या परचुटण शिल्पाचा काय पाड लागणार? मी आतां अनुराधापूर आणि पोलान्नारुवा येथील शिल्पाकडे मागें वळून पाहूं लागलों, तेव्हां तेथल्या गांवठाणांतले ते राजशाही वृक्षच माझ्या डोळ्यांसमोर उभे राहूं लागले. काय असेल तें असो, सिलोनच्या या प्रवासांत सिलोनच्या वृक्षांनींच माझें लक्ष फार वेधून घेतलें. मी दगडी शिल्प पाहायला आलों होतों, पण पोट्टुलमूनंतरच्या त्या जंगलांत शिरल्यापासून या निसर्गाच्या शिल्पानें माझ्या मनावर खोल संस्कार करण्यास सुरुवात केली. खरोखर, झाड ही एक शिल्पकृतीच नव्हे काय? प्रत्येक झाड हें एक शिल्प असतें, आणि त्याला त्याचें स्वतःचें असें एक व्यक्तित्व असतें. खरोखर सिलोनच्या या प्रवासांत तऱ्हेतऱ्हेचीं झाडें दिसलीं आणि मनावर कोरून राहिलीं. वडाच्या पिळवटलेल्या पारंब्यांसारख्या खोडांचीं झाडें, हातावर डोकें ठेवून पहुडलेलीं झाडें, कमरेंत वाकलेलीं झाडें, योगासनाचे प्रयोग करणारीं झाडें, नृत्यांतलीं पावलें टाकणारीं झाडें, मुद्राभिनय करणारीं झाडें, खोखो–आट्यापाट्या–हुतूतूमधले अंगविक्षेप करणारीं झाडें, निरनिराळ्या पशूंच्या आकारांचीं झाडें, कमरेपर्यंत पाण्यांत बुडून प्रार्थनेंत निमग्न झालेलीं झाडें, खराट्यासारखीं झाडें, सांगाड्यासारखीं झाडें—एक ना, नाना प्रकार! झाडांच्या शिल्पाचे इतके प्रकार मीं पूर्वी कधीं पाहिले नव्हते, आणि त्यांचें इतकें वैभवहि पूर्वी कधीं अनुभवलें नव्हतें.

झाडें पाहतां पाहतां एकदम सिगिरिआचा डोंगर दिसूं लागला. डोंगर म्हणजे डोंगराच्या आकाराचा अखंड अजस्र खडक! आपल्या केवळ आकारानेंच तो त्रिखंडकीर्ति झाला असता. मुंग्यांना हत्ती वाटत असेल ना, तसा तो आपणां मानवांना वाटतो. पण हीच मुंगी हत्तीच्या कानांत शिरली म्हणजे त्याला शरण आणते. या अजस्र खडकाला

मानवानें तसेंच शरण आणलें. हत्तीच्या पाठीवर अंबारी चढवितात तसा त्याच्या माथ्यावर राजवाडा बांधला. हत्तीच्या अंगावर रंगरंगोटी करतात तशीं त्याच्या बाजूवर चित्रें रंगविलीं. आज तरी या चित्रांमुळेंच तो जगप्रसिद्ध आहे. हा खडक म्हणजे निसर्गचमत्कार; आणि त्याच्यावरचे मानवी संस्कार म्हणजे ऐतिहासिक चमत्कार ! त्याची कहाणी थेट कहाणीच्या थाटांत सांगण्यासारखी आहे आणि सरकारी वर्णनिकेच्या कल्पनाशाली लेखकानें ती तशीच सांगितली आहे.

आटपाट नगर होतें. तेथें एक राजा होता. राजाला दोन राण्या होत्या. एक आवडती नि एक नावडती. आवडती होती सुंदर पण दुष्ट. नावडती होती कुरूप पण सालस. आवडतीचा मुलगा होता दुष्ट. नावडतीचा होता पराक्रमी. आवडतीच्या मुलावर होता बापाचा लोभ. पण तो मोठा झाला नि त्याला राज्याचा लोभ सुटला. त्यानें बापाचा खून केला. सावत्र भाऊ दूर देशीं पळून गेला. नवा राजा निर्वैर झाला. पण त्याला शांति मिळेना. चैन पडेना. प्रजाजनांची भीति वाटूं लागली. सावत्र भावाच्या स्वारीचीं स्वप्नें पडूं लागलीं. एक दिवस तो शिकारीला गेला होता. शिकार करतां करतां त्याची दृष्टि एका खडकावर पडली. खडक प्रचंड होता. राजाला वाटलें, आपण खडकावर राहिलों तर निर्धास्त होऊं. मनांत विचार आला नि लगेच अंमलांत आला. खडकावर राजधानी नेली. मोठमोठे वाडे उभारले. बागा लावल्या. दरबारांत गवई आले. कलावंत आले. सुस्वरूप स्त्रिया आल्या. राजा त्यांच्या संगतींत रमून गेला. पण सावत्र भाऊ स्वस्थ नव्हता. त्यानें परदेशांत मोठें सैन्य उभारलें. स्वारी केली, राजाचा पराभव केला. राज्य गेलें. पण त्यानें आणलेली कला राहिली. तिचा तुम्हीं आम्हीं आस्वाद घेऊं आणि आनंदी होऊं.

हा राजा म्हणजेच कालवेवा बांधणाऱ्या धातुसेनाचा पुत्र काश्यप. काश्यप क्रूर होता, लोभी होता, पण कलासक्त होता. त्याच्या दरबारांत कलावंतांना मुक्तद्वार असे. त्याच्या कलासक्तीच्या आज शिल्लक असलेल्या खुणाहि चकित करतात. या खडकाच्या माथ्यावर जाण्याची कल्पनाच अचाट होती. पण काश्यपानें खडकाची बाजू कापून रस्ता पाडला आणि टोकाचा भाग फारच बिकट होता तो पायऱ्यांनीं बांधून काढला. या पायऱ्यांच्या पायथ्याशीं दोनहि बाजूंस सिंहाच्या पायाचे शिल्पाकृति पंजे उभारले. म्हणजे हा खडक एकादा



को. ३

22697

सिंहच ! म्हणून त्याला सिंहगिरी ( सिगिरिया ) म्हणतात. पण काश्यपाशीं कलासक्ति केवळ अशी स्थूल नव्हती. सूक्ष्महि होती. त्या खडकाच्या एका बाजूवर जीं भित्तिचित्रें आहेत तीं याची साक्ष आहेत. तीं चित्रें उघड उघड अजंठ्याच्या चित्रकलेनें स्फुरलेलीं आहेत. तीच पद्धत. पण तिचें एक वैशिष्ट्य आहे. २१ कलाकृतींपैकीं एकहि धार्मिक बुद्धीनें भारलेली दिसत नाहीं. या २१ कन्यका कोण आहेत ? याचा निश्चित पत्ता अद्याप कोणाला लागलेला नाहीं. अनेकांनीं त्यावर कल्पनाविलास लढविला आहे. अनेकांनीं काव्यें लिहिलीं आहेत. शेजारच्याच भिंतीवर त्यांतलीं कांहीं आढळतात. मूळ चित्रांबरोबरच या काव्यांचाहि अर्थ लावण्यांत मानवाची बुद्धि गढून गेली आहे. कित्येकांना वाटतें, कीं काश्यपाच्या दरबारांतील रूपवती स्त्रियांची ही मालिका आहे. कित्येकांचा असा अंदाज आहे कीं जोडीनें आढळणाऱ्या या चित्रांतली एक राजकन्या आहे व दुसरी दासी आहे. कित्येकांनीं असा कल्पनाविलास केला आहे, कीं त्या पर्जन्य आणि विद्युत् यांच्या देवता आहेत. कित्येकांना त्या पृथ्वीवर पुष्पाभिषेक करणाऱ्या अप्सरा वाटतात, तर इतर कांहींना त्या जलदेवता वाटतात. त्या कोणीहि असोत, त्या चित्रसृष्टींतल्या वंदनीय कृति ठरल्या आहेत एवढें खरें.

त्या अजस्र खडकाच्या असाध्य बाजूवर रेखलेलीं तीं चित्रें म्हणजे एक चमत्कार आहे, पण मला तरी तो खडक हाच खरा चमत्कार वाटतो. त्या खडकावरून सभोंवार निसर्गाचा जो विस्तार दिसतो तो या नैसर्गिक चमत्काराचाच एक भाग. समुद्राच्या विस्तारावर फेसानें फुललेल्या लाटा एकामागून एक दिसाव्या तशा वनश्रीनें शृंगारलेल्या पर्वतांच्या रांगा येथून दिसतात. वातावरणाच्या निळ्या झिरझिरीत पडद्याआड क्षितिजावर पर्वताच्या या रांगा आणि आकाश यांचें स्वप्नमय मीलन होतें. आणि जवळ सरोवराच्या शांत जलाशयांत या अजस्र खडकाचेंच तळाचा ठाव घेणारें प्रतिबिंब दिसतें. निसर्गाच्या या चमत्कारापुढें मानवी कलाकृतीचा चमत्कार काय होय ? पण निसर्गाच्या या चमत्कारालाच काश्यपानें, सिंहाच्या दंतपंक्तीला हात घालणाऱ्या दुष्यंतपुत्राप्रमाणें, हात घातला !

सिगिरिआच्या साऱ्या रहस्यांचा भेद करण्याचा नाद न धरतां आम्हीं कॅण्डीकडे निघालों. वाटेंत डांबुलाच्या गुहा लागल्या. नेहमींप्रमाणें गुहेंतल्या मूर्तीपेक्षां स्थळाचें माहात्म्य अधिक वाटलें. डांबुलाच्या त्या डोंगरावरून सभोवतालच्या विस्ताराचें दर्शन

जसें सुंदर वाटतें तसेंच गुहेसमोरच्या खोऱ्याचेंहि दर्शन सुंदर वाटतें. चांदण्या रात्रीं आकाशांतून पृथ्वीवर उतरणाऱ्या चंदेरी धारांचा वर्षाव जसा मनोज्ञ वाटतो तसा आतां सायंकाळीं त्या खोऱ्यांतला किरमिजी छायांचा वर्षाव मनोज्ञ वाटत होता.

सूर्य पश्चिमेकडे झुकला होता. उन्हाची तलखली कमी झाली होती. मोटर समुद्रसपाटीपासून वर वर जात होती. हवेंत गारठा दाटत होता. जंगलचा प्रदेश संपून बागबागायतींचे बिछाने पुनः सुरू झाले होते. म्हशी-रेड्यांप्रमाणेंच पाळलेल्या हत्तींना कसें वागवतात आणि तेहि पाण्यांत डुंबतांना अगर शेतकऱ्याच्या पोराला पाठीवरून वाहून नेतांना रेड्याप्रमाणेंच कसे खुशालतात याचीं दृश्यें मधूनमधून दिसत होतीं. मधूनच एकादा चहाचा मळा दिसे, आणि ज्युलिया आनंदानें किंचाळे. रबराचा मळा दिसला म्हणजे असेच चीत्कार उफाळत ! कॉफीचे मळे फारसे दिसले नाहींत, आणि मग आठवलें कीं, डॉ. श्वेद्स नांवाच्या एका वनस्पतिशास्त्रज्ञानें सिलोनांत कॉफीला भवितव्य नाहीं असें सांगितलें होतें. कॉफीचे राजे या ' शापवाणी ' ला प्रथम हसले, पण अखेरीस धंदा बुडाला म्हणून त्यांना रडावें लागलें होतें !

आम्हीं कॅण्डीला पोंचलों तेव्हां सांज झाली होती. दोन दिवसांच्या ओढगस्त प्रवासामुळें शरीर व मन थकलें होतें. क्वीन्स हॉटेलमध्यें गरम गरम पाण्यानें स्नान करायचें, दोन घांस खायचे, आणि तडक बिछान्यांत शिरायचें असें मीं ठरविलें होतें. पण ज्युलियाला एक मैत्रीण भेटली. ती दन्तदेवालयांत निघाली होती, आणि तिच्या ओढीनें आम्हींहि निघालों. देऊळ बंद व्हायला आलें होतें. दरवाजापासचे भिकारी गेले होते. पीतवस्त्रधारी भिक्कूहि दिसत नव्हते. तरी आम्ही आंत शिरलों. फुलें माळणारांनीं आपापल्या टोपल्या आवरल्या होत्या, आणि हवेंतला फुलांचा सुगंध विरत चालला होता. देवालयाच्या घंटांचें संगीत संपलें होतें. या नेहमींच्या गोष्टींऐवजीं देवालयाच्या आवारांत चुना, विटा, माती, सिमिट, लाकडें इकडेतिकडे पसरलेलीं दिसलीं. कामगार लोक त्यांत जागा हुडकून पडले होते. देवळाचा जीर्णोद्धार सुरू होता. या उद्धाराचें सामान तुडवीत आम्हीं डावीकडच्या पायऱ्यांनीं वर चढलों. देवळाचें द्वार बंद होतें. सुदैवानें कांहीं दिवे मात्र उजळत होते. दरवाजापासचीं भित्तिचित्रें पाहण्याखेरीज अधिक कांहीं करणें शक्य नव्हतें. भडक रंगांनीं उफाडलेलीं तीं चित्रें ज्युलियानें रेखून पाहण्यास सुरुवात केली. मी एका निराळ्याच कारणानें

त्यांच्याकडे ओढला गेलों. तीं नर्कचित्रें होतीं. मृत्यूनंतर पाप्यांना कोणतीं प्रायश्चित्तें मिळतात यांचीं तीं प्रात्यक्षिकें होतीं. सिंगापूरच्या टायगर बाम गार्डनमध्यें नरकपुरीच्या चिनी कल्पना साकार केलेल्या मीं पाहिल्या होत्या. उकळत्या तेलाच्या कढईंत लोटणें, करवतीनें जिवंत चिरणें, घाण्यांत घालून कुटणें हे चिनी प्रकार भारतीय कल्पनांशीं तंतोतंत जुळतात. पण सिलोनी कल्पना थोड्या वेगळ्या होत्या. पापी स्त्री-पुरुषांना पक्षी, कुत्रे आणि अस्वलें यांच्याकडून खावविणें, त्यांना खिळ्यांनीं खांबांना ठोकणें, त्यांच्या अंगांत सुऱ्या खुपसणें, कुऱ्हाडीनें त्यांचीं खांडोळीं करणें, अगर त्यांना आगींत फेकणें असल्या कल्पना या चित्रांत साकार केलेल्या आढळल्या.

अधिक कांहीं करण्यासारखें नव्हतेंच. तेव्हां आम्हीं परत फिरलों. परत येतांना मीं ती पाश्चात्य संगत सोडली आणि एकटाच तळ्याकडे झुकलों. तळ्याच्या कांठाशीं येऊन उभा राहिलों. दुपारीं तापलेल्या पाण्याचे गरम उच्छ्वास अंगावर येतातसें वाटलें. ऐहेलापोलाच्या पत्नीचे तर ते संतप्त निःश्वास नसतील? कॅण्डीचा शेवटचा राजा श्री विक्रम राजसिंह याचा ऐहेलापोला हा पतप्रधान. तो विश्वासघातानें इंग्रजांना मिळाला म्हणून राजानें त्याच्या ओलीस असलेल्या मुलांचा शिरच्छेद केला आणि ऐहेलापोलाच्या पत्नीस आपल्या पोरांचीं मुंडकीं मुसळानें कुटण्याचा हुकूम केला. दुःखानें आणि संतापानें वेड्या झालेल्या त्या स्त्रीनें आपल्या भोंवतालचें संरक्षकांचें कडें तोडलें आणि धावत जाऊन तळ्यांत उडी घेतली—आणि परोपकारी तळ्यानें तिला लगेच पोटांत घेतलें. मला हा प्रसंग आठवला आणि कॅण्डीच्या राज्याचा कारुण्यपूर्ण शेवट माझ्या डोळ्यांपुढें उभा राहिला. विश्वासघात, कारस्थानें, दुही, बंड, चुडीनें वाघ घरांत घेण्याचे प्रकार, क्रूर, सूडबुद्धि, स्वार्थ, राजाविरुद्ध सरदार, सरदारांविरुद्ध सरदार, साऱ्यांविरुद्ध पोर्च्युगीझ, पोर्च्युगीझां-विरुद्ध इंग्रज—आणि शेवट स्वातंत्र्याच्या अपहारांत!—हा मराठ्यांचा इतिहास कॅण्डीच्या इतिहासाशीं तंतोतत जुळतो. कॅण्डीचें राज्य गेलें १८१५ सालीं; मराठ्यांचें १८१८ सालीं—दोनहि पदरांत पडलीं एकाच इंग्रजाच्या. आज इतिहासाकडे वळून पाहिलें म्हणजे कोळ्याच्या एकाच जाळ्याच्या कोपऱ्यांत निरनिराळ्या माशा अडकलेल्या दिसतात.

आज कॅण्डी इतिहासासाठीं प्रसिद्ध नाहीं. सौंदर्यस्थळ आणि धर्मक्षेत्र म्हणून त्याची महति आहे. एखाद्या झाडावर फांद्यांच्या गेचकांत सुंदर घरटें असावें तसें डोंगरमाथ्या-

वर टेकड्यांच्या खोऱ्यांत कॅण्डी वसविलेलें आहे. पण कॅण्डीचें खरें आकर्षण त्याच्या तळ्यांत आहे. या तळ्यांत कॅण्डी आपलें रूप पहात असते. कॅण्डीचें रूप म्हणजे तळ्याभोंवतालच्या टेकड्यांवर शोभणाऱ्या वनश्रीचें रूप, त्यांतून डोकावणाऱ्या ऐषा-आरामी बंगल्यांचें रूप, दन्तदेवालयाच्या अष्टकोनी आकाराचें रूप, क्वीन्स हॉटेलच्या पाश्चात्य वास्तुशिल्पाचें रूप, तळ्याभोंवतीं फिरणाऱ्या शांत, नीरव रस्त्याचें रूप, त्याच्या कांठच्या वैभवशाली वृक्षांचें रूप, त्या रस्त्यावरून फिरणाऱ्या मुग्ध रमणींचें रूप, तळ्याकांठच्या उद्यानांत मनोविहारासाठीं येणाऱ्या आनंदी स्त्री-पुरुषांचें रूप. कॅण्डीनें आपल्या रूपाचें जितकें कौतुक केलें आहे तितकेंच या तळ्याचें केलें आहे. मला ऱ्होन सरोवराच्या जिनीवानें केलेल्या कौतुकाची आठवण झाली. पण त्यांत एक मोठा फरक आहे. ऱ्होन सरोवर हें जिनीवाच्या लोकांचें क्रीडास्थान आहे. तर हें तळें कांहींसें पूजास्थानासारखें आहे. कॅण्डियन जनता त्याच्याकडे एक प्रकारच्या सुप्त आदरानें पाहते. साहजिक आहे. कॅण्डीच्या तळ्याच्या पोटांत ऐतिहासिक रहस्यें आहेत. धार्मिक रहस्येंहि आहेत. त्या अष्टकोनी देवाल्यांतील दांतांचेंहि रहस्य असेल.

बरेच लोक कॅण्डीला येतात ते तिचें रूप निरखण्यासाठीं नाहीं, तर बुद्धाच्या त्या पवित्र दांतांच्या दर्शनासाठीं. गौतम बुद्धाच्या अतिपवित्र अवशेषांत तो प्रमुख मानला जातो. सन ३४० सालीं, श्री मेघवन राजाच्या कालांत, तो भारतांतून लंकेंत आला. तेव्हांपासून त्याची कीर्ति अफाट आहे. अनेक चमत्कारांचें जाळें त्याच्याभोंवतीं विणलें गेलें आहे. आश्चर्यकारक शक्तीचा आरोप त्याच्यावर करण्यांत आला आहे. तो अक्षय आहे, अविनाशी आहे, याबद्दल भक्तांची खात्री आहे. आकाशांतून उडण्याची त्याची शक्ति भक्तांना निर्विवाद मान्य आहे. लोकांच्या या नितांत निष्ठेमुळें सिलोनच्या इतिहासांतील अनेक पेंचप्रसंग सुटले. ज्याच्या हातीं दांत तो राजा, असें लोकांनीं बिनतक्रार मानलें. त्याच्या संरक्षणासाठीं भक्तांनीं नाना दिव्यें केलीं. राष्ट्रीय अरिष्टाच्या वेळीं त्याला गुप्तस्थळीं नेऊन ठेवलें.

यामुळेंच अनेक दंतकथा निर्माण झाल्या. पोर्च्युगीझांनीं तो काबीज केला आणि गोव्यांत नेऊन जाळला, ही त्यांतलीच एक दंतकथा. पण लोकांचा तिच्यावर विश्वास बसणें शक्य नाहीं. कारण तो दांत अक्षय आहे. " नैनं छिंदन्ति शस्त्राणि नैनं दहति

पावकः ” अशी त्याची शक्ति आहे. विमलधर्मसूर्यानें त्याला कॅण्डीला आणलें आणि अष्टकोनी देवालयांत त्यांची प्रस्थापना केली. तेव्हांपासून तो तेथेंच आहे. तो क्वचितच बाहेर पडतो. त्याचें दर्शनसुद्धां क्वचितच घडतें. वर्षांतून एकदां, ऑगस्ट महिन्यांतील पूर्णिमेला, पेराहेरा यात्रा भरते, तेव्हां त्याची हत्तीवरून मिरवणूक निघते. ही पेराहेरा यात्रा म्हणजे कॅण्डीची भक्ति आणि कला यांचें एक विविध, विशाल प्रदर्शनच असतें !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं दन्तदेवालयामागच्या म्युझियममध्यें सिगिरियाच्या चित्रांच्या भिकार प्रतिकृती पाहिल्या आणि आम्हीं लंकातिलक देवालय पाहायला निघालों. आधींच निघायला उशीर झाला होता. त्यांत लंकातिलक येतां येईना. तें जवळच आहे अशी आमची समजूत होती ती सारखी उध्वस्त होत चालली, आणि त्यासरशीं ती चित्रकर्त्री अधिक अधिक चरफडूं लागली. आम्हीं एका रमणीय खोऱ्यांतून दुसऱ्या रमणीय खोऱ्यांत प्रवेश करीत होतों. डोंगरांना वळसे घालीत, वांकणें नि वळणें घेत, टेकडीवरून खांचरांत, खांचरांतून टेकडीवर चढत चाललों होतों. नद्या-ओढ्यांचे पुलांवर पूल पार करीत होतों. सभोंवारचीं दृश्यें नितांत सुंदर होतीं. नारळी-पोफळींच्या बागांचा गारवा, या बागांतील पाण्याच्या पाटावरची हिरवळीची नक्षी, एकाच नारळीच्या झाडावरचे राकट नारळ आणि लुसलुशीत मोहर, सूर्याच्या प्रकाशांत खुलणारे खांचरांतले हिरवे गालिचे, ओढ्यांतून वाहणाऱ्या स्वच्छ नितळ पाण्याचें झुळझुळ संगीत, टेकड्यांच्या बाजूवरील आंबे, फणस, साग, इत्यादि झाडांच्या डंवरलेल्या राया, यांतून जाणाऱ्या वळक्यातिळक्या पाऊलवाटा, आणि या साऱ्यांवर उंचावरून दृष्टिक्षेप करणारे डोंगरांचे काळेकभिन्न सुळके – लहानपणींच्या स्मृतींना जाग आली नि मी मुग्ध झालों. आम्हीं एकसारखीं चढउतार करीत आणि वळणें घेत जात असल्यामुळें हे निसर्गाचे सारखे बदलते पट वाकडेतिकडे आडवे उभे होत – आणि आपण एकादें निसर्गचित्रांचें आधुनिक प्रदर्शनच पाहात आहोंत कीं काय असें वाटे. सौंदर्याची इतकी बरसात सुरू होती, पण ज्युलिया सारखी घड्याळा-कडे पाहात चरफडत होती. त्यांतच मीं तिला चिडविलें. कलेच्या स्वरूपासंबंधीं तिचीं मतें शुद्ध होतीं. सकाळींच एका चित्रकाराशीं बोलतांना जें अंतःकरणांत उमटलें तें रंगवावें असें ती म्हणाली होती. पण तिच्या डोक्यांतली राजकीय गुंतवळ विलक्षण

होती. ती लाल चीनला चालली होती ना ? मीं उगीच विषय उकरून काढला नि म्हटलें, " तुझीं राजकीय मतें आणि कलाविषयक भूमिका यांची जरा सांगड घालून दाखवशील काय ? " ती चिडली. म्हणाली, " या विषयावर तुझ्याशीं बोलण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं." देऊळ आलें तेव्हां ती मोटारींतच वसून राहिली. अखेर शाळेंतून परतणारीं मुलें मोटारींभोंवती जमलीं. त्या सान प्रसन्न बालकांना बघून तिचें हृदयपरिवर्तन झालें असावें. ती उतरली. पण देवळाच्या दर्शनासाठीं एक उंच खडक चढून जायला हवें होतें. त्याला पायऱ्या होत्या तरी ती संतापली. तिच्या दुर्दैवानें देऊळ बंद होतें. बुद्धाच्या मूर्तीपासचीं चित्रें पाहणें अशक्य झालें. त्यामुळें ती अधिकच संतापली. पण मला देवळाचें वास्तुशिल्प दिसलें तेवढें पुरे होतें. इतकें सुंदर वास्तुशिल्प सिलोनांत इतरत्र पाहिलें नव्हतें. या वास्तुशिल्पांत कल्पना आणि कारागिरी, रेखीव आणि सूक्ष्म दृष्टि, प्रमाणबद्धता आणि आकारबद्धता, संयम आणि सुस्पष्टता यांचा मोठा आकर्षक संगम होता. कॅण्डियन वास्तुशिल्पाचा हा नमुना मला फार आवडला. कोलोंबोला स्वातंत्र्य मंदिराच्या रूपानें कॅण्डियन वास्तुशिल्पाचें जें दर्शन झालें होतें त्यानंतर हें लंकातिलकाचें दर्शन मला फारच उत्तेजक वाटलें. कॅण्डियन वास्तुशिल्प म्हणजे नक्षीदार चौकोनी खांबांची लांबच लांब रांग आणि छपराच्या आढ्याला एक अगर दोन कळस, अशी कांहींची समजूत दिसते. पण या वास्तुशिल्पांत खांबावरील, भिंतीवरील, प्रवेशद्वारावरील स्पष्ट पण शालीन शिल्पाला, साध्या सरळ रेषांबरोबर अलंकारिक दर्शनाला, आणि विशेष म्हणजे सर्व अंगांचें समुचित प्रमाण साधण्याला फार महत्त्व आहे, याची लंकातिलक पाहून खात्री पटली.

लंकातिलक पाहिल्यानतर मीं ज्युलियाचा निरोप घेतला. ती नुवेरेलियाला गेली आणि मी पेरादेनियाच्या बॉटनिकल गार्डनमध्यें गेलों. कॅण्डीच्या तळ्याइतकीच या बागेची ओढ मला होती. सिंगापूरच्या बॉटनिकल गार्डनची मीं स्तुति केली तेव्हा उंगकू अब्दुल अझीज मला म्हणाले होते, " तुम्ही पेरादेनियाची गार्डन पाहा आणि मग बोला. " पण माझी थोडीशी निराशाच झाली – कांहीं गोष्टींनीं विशेष समाधान होऊनहि माझी निराशा झाली. या प्रवासांत मी झाडांचें शिल्प पाहात होतों. त्या दृष्टीनें कांहीं झाडें आकर्षक वाटलीं. घायपातीच्या पात्यांप्रमाणें पानें असणारें एक झाड विशेष लक्षांत राहिलें आहे. तें खरोखर एकाद्या नर्तकीसारखें दिसत होतें. मुद्राभिनय करणाऱ्या

हातांप्रमाणें तिच्या शाखा भासल्या. पोफळ, देवदार, चिवार यांचे असंख्य प्रकार या बागेंत होते. तसेच तालवृक्षांचे कांहीं भव्य प्रकार. तालीकोट आणि पामीर तालांच्या रांगांनीं शृंगारलेले रस्ते तर केवळ राजेशाही दिसत होते–किंवा अधिक अचूक बोलायचें म्हणजे एकाद्याच्या महालाच्या स्तंभांसारखेच ते दिसत होते. हेंच या बागेचें वैशिष्ट्य दिसलें आणि तेंच मला तितकेसें आवडलें नाहीं. ही बाग फार कृत्रिम वाटली. तिचे कांहीं भाग रंगभूमीवरील देखाव्यासारखे वाटले. गवताचे निरनिराळे प्रकार दाखविण्यासाठीं तर जपानी पंख्याच्या आणि चंद्रकोरीच्या आकाराचे वाफे करण्यांत आले होते! कांहींना त्या बागेचा हाच विशेष पसंत पडेल. पण मला तरी सिंगापूरच्या बागेंत निसर्गाचा थोडाबहुत मुक्त विलास आढळला तोच अधिक आवडला होता.

तें कांहींहि असलें तरी त्या भव्य तालवृक्षांचें राजेशाही वैभव नेत्रदीपक होतें यांत शंकाच नाहीं. त्यांतले दोन मोहरले होते. काय त्यांचा तो मोहर! सबंध शाखाच्या शाखा मोहरानें डंवरलेल्या. पानांच्या झांवळ्यांऐवजीं फुलांच्या झांवळ्या! ते ताल पाहून मला कहाणींतल्या अपमृत्यूचा शाप मिळालेल्या राजपुत्राची आठवण झाली. तो नटूनथटून विवाहमंडपाकडे चाललेला असतो, पण वस्तुतः तो मृत्यूचा मार्गच चालत असतो. तसेंच या मोहरलेल्या तालांचें होतें. त्यांचा मोहर हा त्यांच्या अपमृत्यूचाच इशारा होता. जणुं मृत्यूचा शिणगार! हा ताल पन्नास वर्षांनीं मोहरतो आणि मरतो. ज्या साहेबानें हा ताल लावला त्याला त्याचें आयुष्य पन्नास वर्षांचेंच हें माहीत होतें. पण या पन्नास वर्षांपूर्वींच ब्रिटिशांचें राज्य खतम होईल याची त्याला कल्पना होती का?

या बागेंतलें एक कमल लक्षांत राहिलें आहे. तें फुलतें तेव्हां पांढरेंशुभ्र असतें आणि नंतर हळूहळू लाल होत जातें. त्या कमळाचें पान म्हणजे तर एकादें छोटेंसें आश्चर्यच होय. एकाद्या मोठ्या सुपाएवढ्या त्या पानाची कडा थाळीच्या कडेप्रमाणें वर वळलेली असते. तें पान म्हणजे बदामी आकाराची एकादी थाळीच वाटते. त्या पानाची दुसरी, पाण्याकडची बाजू तर याहूनहि आश्चर्यकारक. छोटेछोटे असंख्य चौकोनी कोनाडे एकमेकांना जोडून ठेवले आहेत असें वाटतें. वनस्पतीचें शिल्प मी पाहतच होतों, पण इतकें आश्चर्यकारक शिल्प पाहण्याची अपेक्षा मीं केलेली नव्हती!

बॉटनिकल गार्डन हें पेरादेनियाचें आजवर मोठें वैभव गणलें जात आहे. पण सिलोन विद्यापीठाची नवीन वसाहत हें त्याचें याहूनहि थोर वैभव गणलें जाईल असें वाटतें. या वसाहतीसाठीं निवडलेली जागा, तेथल्या इमारती, त्यांचें वास्तुशिल्प आणि या विद्यापीठ-नगराची एकंदर रचना, विद्यापीठाला एक नवीनच कीर्ति मिळवून देईल यांत शंका नाहीं. बृहन्लंडनची आयोजना करणारे सर पॅट्रिक ॲबरक्रॉबी यांनीं या नगराची रचना आंखली, आणि त्यांच्या प्रतिभेच्या खुणा विद्यापीठनगराच्या वेशींत पाऊल टाकल्यापासूनच दिसूं लागतात. प्रथम म्हणजे त्यांनीं एकादी सपाट जागा निवडलेली नाहीं. लहानलहान टेकड्यांच्या अनुषंगानें त्यांनीं आपली रचना आंखल्यानें कोणत्याहि वसाहतींत एकसुरीपणा येण्याची जी धास्ती असते ती त्यांनीं किती तरी कमी केली आहे. विद्यापीठाकडे जातांना वाटेंत जें कारंजें दिसतें तें पाहिलें कीं या नगराची रचना करतांना कल्पनारम्य शिल्पाचा उपयोग केलेला आहे याचा विसारच मिळतो. त्या कारंजाच्या चवुतऱ्यावर घटाची स्थापना करण्याची कल्पनाच गोड आहे. तिच्यांत आधुनिक साधेपणा आणि पौर्वात्य संस्कृति यांचा सुमेळ आहे. नंतर एक लहानसा पूल लागतो. त्या पुलाच्या कठड्यांच्या टोकांना हत्तीच्या मुखाचा आकार दिलेला पाहून अधिकच आनंद होतो. जरा पुढें गेल्यावर उजवीकडे आर्ट्स् फॅकल्टीची इमारत दिसते. आणि तिच्या दर्शनानें अपेक्षांची पूर्तीच होते. या इमारतीची दर्शनीय भाग इतका सुंदर वाटतो ! आधुनिक वास्तुशिल्पाचा साधेपणा आणि कॅण्डियन वास्तुशिल्पाचा अलंकारिकपणा यांचा समन्वय साधतांना कॅण्डियन स्तंभांचा किती कलापूर्ण उपयोग करतां येतो तें येथें दिसेल. ( त्याचा हिडीस उपयोग कसा करावा हें जाणून घ्यायचें असेल तर आर्ट फॅकल्टीमागची विद्यापीठाच्या कचेरीची इमारत पाहावी. उघड्यानागड्या खांबांची एक लांबच लांब रांग उभी करून त्याच्यावर सैन्याची दुमजली बराक ठेवून दिली कीं, कॅण्डियन वास्तुशिल्पाचा हा तथाकथित नमुना निर्माण होतो ! ) नंतर, उजवीकडेच विद्यार्थिनींचें वसतिगृह लागतें. त्याचें प्रवेशद्वार असेंच सुंदर आहे. प्रवेशद्वाराचा आधुनिक पोर्टिकोसारखा भाग पूर्ण पौर्वात्य थाटांत उभा करण्यासाठीं बाहेर दोन बाजूंना चवुतऱ्यावर प्रतीकात्मक कलश, पौर्वात्य प्रतीकांचें नक्षीकाम कोरलेले उंच चौकोनी स्तंभ आणि वर कॅण्डियन पद्धतीचे पसरट पण वर केंद्राकडे एकदम उंचावणारें छपर या सर्वांचा अतिशय प्रमाणबद्ध उपयोग केलेला

आहे. त्या मानानें विद्यार्थ्यांच्या वसतिगृहावर आधुनिक चाळींची दुष्ट छाया पडलेली दिसते. त्याच्या गॅलरीचे बोजड कठडे तर मला मुळींच आवडले नाहींत. टेकड्यांच्या उंचसखल भागावर ही सारी वसाहत उभारली असल्यानें कॅण्डियन वास्तुशिल्पांतलें लाल छपराचें वैशिष्ट्य मनावर चांगलें ठसतें. कचेरीच्या इमारतीसारखा एकाद्‌दुसरा हिडीस प्रकार असूनसुद्धां या एकंदर नगराचें वास्तुशिल्प मला फारच यशस्वी वाटलें. आज अनेक पौर्वात्य देशांत आधुनिक पाश्चात्य आणि पारंपरिक पौर्वात्य वास्तुशिल्पांचा संगम साधण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न होत आहे. जाकार्तोला इंडस्ट्रियल बँकेच्या नव्या इमारतींत डच आणि इंडोनेशिअन वास्तुशिल्पांचा समन्वय आढळला. बँकॉकला नॅशनल असेंब्लीच्या समोरच्या रस्त्यावर बांधलेल्या नव्या सार्वजनिक इमारतींत अशा प्रयत्नांचा उत्कर्ष झालेला आढळेल. आमच्या दिल्लींत आधुनिक इमारतींच्या डोक्यांवर घुमट ठेवण्याचा ( कांहींसा हास्यास्पद ) प्रकार याच प्रयत्नांचा परिणाम आहे. पेरादेनियाच्या विद्यापीठांत आधुनिक वास्तुशिल्पांचा साधेपणा आणि कॅण्डियन शिल्पाचा कलात्मक थाट आणि उठाव यांचा मेळ घालण्याचा मोठा यशस्वी प्रयत्न दिसतो. मीं एका मित्राला म्हटलें, " तुमच्या या इमारती किती सुंदर आहेत ! " तो उत्तरला, "होय, फक्त इमारतीच ! " शरीर आहे, आत्मा नाहीं असें त्याला म्हणायचें होतें. तें खरें असेल. मला माहीत नाहीं. पण पुष्कळदां आत्मा सुंदर शरीराच्या शोधांत असतो. केव्हां तरी त्याची नजर इकडे जाईल !

पेरादेनियाहून कोलोंबोला मी आगगाडीनें आलों. अजूनपर्यंत मी ऐतिहासिक वातावरणांत होतों. आतां आधुनिक वातावरणांत उतरलों. अर्थात् पेरादेनियाच्या बॉटनिकल गार्डनमध्येंच तें सुरू झालें, पण आतां आगगाडींत तें पूर्ण झालें. नाहीं म्हणायला बालाने खिंडीचें दर्शन झालें, तेव्हां कॅण्डीच्या राजाला भेटायला साहेबाचा वकील या खिंडींतून कसा गेला असेल यांत कल्पना रमली; आलगलाचा खडक पाहिला, तेव्हां पूर्वीचे राजे येथून कडेलोट करीत असतील असें वाटलें; आणि कादुगानावा येथून ' बायबल ' रॉकचें दर्शन झालें, तेव्हां ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या उद्योगाची आठवण झाली. पण एका दृष्टीनें हा सारा आधुनिक इतिहासच. सिलोनमध्यें पाश्चात्यांचा संपर्क सोळाव्या शतकांत सुरू झाला आणि तेव्हांपासूनच आधुनिक इतिहास सुरू झाला असें म्हणायला हरकत नाहीं. मी ज्या

आगगाडींतून चाललों होतों त्या आगगाडीचा इतिहास हा त्याचाच एक भाग. तोहि कांहीं कमी मनोरंजक नाहीं. कोलोंबो–कॅण्डी रस्त्यावर धंदा करणारी घोडागाडी कंपनी आणि रेल्वे कंपनी यांच्या खूप लढाया झाल्या. अखेरीस आगगाडी सुरू झाली. त्या दिवसाच्या समारंभाचा इतिहास तर विनोदी आहे. फोटोग्राफीचा जमाना नुकताच सुरू झाला होता, आणि त्या दिवशींचें जें छायाचित्र आलें त्यांत फक्त एका लठ्ठ बाईची पाठ आली! हा सारा इतिहास मनोरंजक खराच, पण कादुगानावा येथून दिसणारें निसर्गाचें दर्शन इतकें भव्य, इतकें उदात्त होतें कीं त्याच्या चिंतनांत इतर सारे विचार पळून गेले. निसर्गाच्या प्रकृतीपुढें मानवाचा इतिहास क्षुद्र ठरला आणि सिलोनचा निसर्गच अधिक श्रेष्ठ आहे हा विचार मनांत घोळत असतांनाच, निसर्गाचा फारसा आदर न करणाऱ्या एका आधुनिक शहरांत फिरून येऊन दाखल झालों.

# सिंगापूर ....१

* * * * * * * * * *

"Singapore is a contingent city," मीं म्हटलें.

प्रसिद्ध अमेरिकन कादंबरीकार जेम्स टी. फॅरेल यांच्याशीं मी बोलत होतों. नुकतेच ते ऑस्ट्रेलियाहून जाकार्ता–सिंगापूरमार्गें आले होते. हाँगकाँग–सिंगापूर हीं शहरें अशीं आहेत कीं त्यांना भेट देऊन आलेल्या व्यक्तींत एक प्रकारचा सहभाव निर्माण होतोच. फॅरेलच्या अगोदर कांहीं दिवस मी सिंगापूरला भेट देऊन आलों होतों अर्थात् आमची भेट झाल्यावर सिंगापूरबद्दल गोष्टी न निघणें अशक्य होतें.

" काय म्हणालांत – काय ? " हा प्रश्न विचारतांनाच त्यांच्या डोक्यांत त्याविषयीं विचार चाललेला स्पष्ट दिसत होता.

" A contingent city. "

" फार छान वर्णन – अगदीं अचूक. "

सिंगापूरला जाऊन आलेल्या प्रत्येक चौकस व्यक्तीस सिंगापूरचें हें वैशिष्टय जाणवलेंच पाहिजे.

लोकसभेंत, संयुक्त महाराष्ट्रविषयींच्या वादांत बोलतांना, चिंतामणराव देशमुख यांनीं शहरांच्या स्वाभाविक स्वरूपाचें फार फक्कड वर्णन केलें होतें. पृथ्वीकडून जलपान करून तेंच जल, मेघ पृथ्वीला समर्पण करतात तसें शहरांचें काय असतें अशा अर्थाचें तें वर्णन होतें. सभोंवतालच्या खेड्यांतून श्रम आणि संपत्ति घेऊन

शहरें त्यांची अनेकपट करतात आणि त्याच खेड्यांना ती अनेकपट संपत्ति वांटून टाकतात. सिंगापूरच्या बाबतींत मात्र असें म्हणतां येणार नाहीं. नकाशा पाहा. भौगोलिक दृष्ट्या सिंगापूर हें मलायाचा अगदीं स्वाभाविक भाग आहे. मलायाच्या उघडलेल्या जबड्यांत सिंगापूर आणि सभोंवतालचीं बेटें दांत-दाढांप्रमाणें दिसतात. पण आज सिंगापूरचें राजकीय, आर्थिक अगर लष्करी स्थान मात्र असें स्वाभाविक नाहीं. तें अगदीं कृत्रिम आहे. सिंगापुरांत जीवनावश्यक वस्तु अतिशय महाग आहेत. (केळीं-माडांच्या या मुलखांत एका केळ्याला दीड ते अडीच आणे पडतात आणि नारळाला रुपयाभर पडतो.) आणि चैनीच्या वस्तु स्वस्त आहेत. (मी ज्या पेननें लिहीत आहें तें येथल्या निम्म्या किंमतीस मिळालें.) ही साधी वस्तुस्थितीच या कृत्रिमतेचा आलेख व्यवस्थित लिहील. म्हणूनच मीं फॅरेलना म्हटलें, " सिंगापूर इज् ए कॉन्टिनूजेंट सिटी. "

सिंगापुरला येणारा प्रत्येक इसम तेथून परतण्यासाठींच येतो. इंग्लंडला जाऊन आलेल्या एका मित्राला मागें मीं विचारलें होतें, " तुम्हीं इंग्लंडला कशाला गेलां होतां ? " तो हंसत हंसत उत्तरला, " परत येण्यासाठीं. " हें उत्तर मार्मिक होतें; कारण तेव्हां London-Returned (लंडन-वापस) याला फार भाव होता. तसा सिंगापूरला नाहीं – म्हणजे सिंगापूर-निवृत्त लोकांबाहेर नाहीं; आणि तरी माझें म्हणणें खरें आहे. सिंगापूरला जाणारे लोक तेथून परतण्यासाठींच जातात.

१९२४ सालीं जोहोरच्या सुलतानाशीं तह करून सर स्टॅम्फर्ड रॅफल्सनें हें बेट कंपनीच्या अमलाखालीं आणलें तेव्हांपासून हें खरें आहे. त्या वेळीं ब्रिटिश साम्राज्याची परिस्थिति " ज्यावर सूर्य कधींच मावळत नाहीं " अशीच केवळ नव्हती, तर हें साम्राज्य यावच्चंद्रदिवाकरौ टिकणार अशी त्याच्या केवळ सूत्रधारांचीच नव्हे तर या सूत्रांनीं जखडलेल्यांचीहि भावना होती. (भारतांत तर मोठे–मोठे शहाणेसुर्ते हें साम्राज्य ईश्वरी संकेतानें निर्माण झालें असें म्हणूं लागले होते.) पण त्याहि वेळीं सिंगापूर हा विशाल अर्थानें नुसता ' तळ ' च होता. रॅफल्स आला. रॅफल्स-नंतर मोठ-मोठे साहेब आले. त्यांनीं ब्रिटिशांच्या अधिकाराचा आणि वैभवाचा भरभक्कम पाया घातला. व्हिक्टोरिआ मेमोरिअल हॉल, सुप्रीम कोर्ट यांच्या इमारतीसारख्या टोलेजंग इमारती उठवल्या. शेतकरी जसा नातवासाठीं अक्रोडाचें झाड

लावतो त्याच दृष्टीनें, एका अर्थानें, या इमारती बांधण्यांत आल्या; पण या इमारती बांधणारा साहेब मात्र पेन्शन घेऊन परत जाण्याच्या दिवसाचीच वाट पाहत होता. इंग्रज व्यापारी आणि मळेवाला अर्थात् आपलें उखळ पांढरें करण्याचीं आणि मिळालेली संपत्ति मायदेशीं नेण्याचीं सोनेरी स्वप्नें पाहतच येत असे. इंग्रजाचें हें वैशिष्ट्यच आहे. तो जगभर आपलें निशाण घेऊन जातो, संधि सापडेल तेथें तें फडकावतो, नंतर वखार घालतो; पण आपल्या अंतःकरणाचा एक अतिशय कोमल तुकडा इंग्लंडमध्यें ठेवूनच तो जात असतो. मात्र सिंगापूरची मौज अशी कीं येथें येणारा चिनी, भारतीय व्यापारीसुद्धां आयुष्यांत अर्थसंचयानें कृतार्थ होऊन परत जाण्यासाठीं धडपडत असे. त्या वेळीं अर्थात् जग स्थिर होतें, सुस्थित होतें, म्हणून जन्मभर वाट पाहण्याची त्याची तयारी होती. आज तितकी सहनशीलता उरलेली नाहीं. शक्य तितक्या लवकर खिसे गरम करून परतायचें हीच प्रत्येकाची अंतरीची इच्छा !

राज्यकर्त्या वर्गातील व्यक्तींची ही दृष्टि असली तरी राजवटीची दृष्टि तशी होती असें मानण्याचें कारण नाहीं. The most impregnable fort of the Empire in the East असेंच सिंगापूरचें अभिमानी वर्णन तज्ज्ञ-अतज्ज्ञ करीत असत. ज्या दिवशीं भारतीय नागरिक स्वराज्याची मागणी करतील तो आमच्या इतिहासांतला सुवर्णदिन ठरेल या उदार दृष्टीनें सिंगापूरविषयक विचारांना कधीं स्पर्श केला नव्हता – आणि करण्याचें कारण नव्हतें; कारण मले लोक कधींकाळीं स्वराज्य मागतील अगर स्वराज्यास पात्र होतील असें मोठमोठ्या उदारधी इंग्रजांसहि वाटलें नव्हतें. सिंगापूरवर लष्करी टांच कायमची रोवून पूर्वेकडील साम्राज्याचें सरक्षण करण्याची ब्रिटिशांची ठाम दृष्टि होती. गेल्या महायुद्धांत जपाननें या गर्वाचा नक्षा उतरविला आणि the most impregnable fort proved to be the most vulnerable अशी विदारक चेष्टा करण्यास वल्लभभाई पटेलांना संधि दिली. जपान्यांनीं ब्रिटिशांचा हा किल्ला एकदा नुसता हादरून टाकला एवढेंच नव्हे तर, सिंगापुराबाबतची त्यांची लष्करी आणि राजनैतिक दृष्टीच बदलून टाकली. आज यावच्चंद्रदिवाकरौ बुद्धीनें सिंगापुरावर बाहुटा उभारण्याची भाषा वेड्याच्या इस्पितळांतला इंग्रजहि करणार नाहीं; आणि सिंगापूर हेंच ब्रिटिशांचें सर्वांत बलिष्ठ ठाणें आजहि

असलें तरी सिंगापूरची संरक्षणयोजना नाविक तज्ज्ञांनीं पार बदलून टाकली आहे. युद्धापूर्वी सिंगापूरच्या किनाऱ्यावर ठिकठिकाणीं लष्करी बुरूज बांधण्यांत आले होते आणि सिंगापूरच्या आसपासच्या बेटांचें जणूं तरंगत्या युद्धनौकांत रूपांतर करण्यांत आलें होतें. आज या बुरुजांचें केविलवाणें उध्वस्त स्वरूप पाहून 'कालाय तस्मै नमः' असे उद्‌गार सहजगत्या तोंडांतून निघतात. या बुरुजांतून ब्रिटिशांच्या तोफा सोडाच, पण माकडें सुद्धां डोकावून पाहत नाहींत ! त्यांची माणसांनीं केलेली उपेक्षा तर विदारकच वाटते. मी एका रविवारीं सिंगापूरच्या किनाऱ्यावरून फेरफटका करून आलों. ठिकठिकाणीं किनारा, पोहायला आलेल्या स्त्रीपुरुषांनीं – विशेषतः चिनी आणि मले मुलांमुलींनीं – फुलून गेला होता. या आनंदी दृश्यांच्या पार्श्वभूमीवर या पडक्या बुरुजांचें उदास दर्शन हा केवढा विपरीत देखावा होता ! ब्रिटिश साम्राज्याच्या या शक्तिस्थानांवर आरूढ होऊन समुद्राकडे अहंकारानें पाहणारी ती दृष्टि कोणीकडे आणि समुद्राच्या लाटांकडे क्रीडेच्या भावनांनीं पाहाणारी ही स्वैर दृष्टि कुणीकडे !

सिंगापूरचें लष्करी अगर नाविक महत्त्व कमी मानण्यांत येत असतें असा गैरसमज मात्र कोणी करून घेऊं नये. गतवर्षी डेव्हिड मार्शल यांच्या नेतृत्वाखालीं चाललेल्या सिंगापूरच्या स्वातंत्र्याच्या वाटाघाटी संरक्षणाच्या मुद्द्यावर मोडल्या हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. स्वतः मार्शल यांना सिंगापूरचें हें महत्त्व मान्य आहे. ते वाटाघाटीसाठीं विलायतला जाण्याच्या आदल्या दिवशीं मीं त्यांना भेटलों होतों. त्यांनीं मला स्वच्छच सांगितलें कीं, सिंगापूरचें बहिर्गत संरक्षण ब्रिटिशांकडे राहूं देण्याची आपली तयारी आहे. त्यांनीं अर्थात् या व्यवहारी दृष्टीवर विशाल युक्तिवादाचें आवरण चढविण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, "You see, Singapore is a fortress – a fortress of democracy. Its defence is vital to the future of freedom. Therefore we are prepared to make sacrifices." सिंगापूरप्रमाणें लोकशाहीच्या संरक्षणाचीं सूत्रें ब्रिटिशांकडे सुपूर्त करण्याची दृष्टि या उद्गागारांत अनुस्यूत आहे. आतां ब्रिटनमधली लोकशाही हेवा करण्यासारखी आहे, पण तिचें विडंबन होण्यासाठीं तिला आशियांत अगर आफ्रिकेपर्यंतहि मजल मारावी लागत नाहीं – सायप्रसपर्यंत आलें तरी भागतें ! तें कांहीं असलें तरी, सिंगापूरचें लष्करी महत्त्व अद्याप जागृत आहे. फक्त नौयुद्धाचें तंत्र बदललें एवढेंच.

अर्थात् या लष्करी तयारींत आतां पूर्वीचें सामर्थ्य अगर आत्मविश्वास नाहीं. ही अखेरची धडपड आहे हें ब्रिटिश साम्राज्याचे वीर आणि बारगीर ओळखून आहेत. म्हणूनच सिंगापुरांत येणाऱ्या ब्रिटिशांच्या दृष्टींत फार मोठा फरक पडला आहे. पूर्वीं सुद्धां ती दृष्टि कांहींशी त्रयस्थाची होती; पण आजच्यासारखी अगदीं तात्पुरती नव्हती. त्या वेळच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या व व्यापाऱ्यांच्या वृत्तीचें उत्कृष्ट दर्शन होण्यासाटीं सॉमरसेट मॉमच्या कथा वाचाव्या. एखाद्या मले स्त्रीशीं संबंध जोडून, तिच्याशीं कायमचा संसार करण्याची अभिवचनें देऊन आणि अखेर तिचा विश्वासघात करून मायदेशीं परत जाणारा व तेथें एखाद्या गौरवर्णीय युवतीशीं विवाहबद्ध होणारा इंग्रज युद्धापूर्वीच्या वाङ्मयांत जसा वारंवार भेटे तसा भेटण्याचा आतां क्वचितच संभव आहे. म्हणजे ब्रिटिश पुरुषांचे मले स्त्रियांशीं संबंध जडत नाहींत असें नव्हे, पण त्यांच्याशीं कायमचा संसार करण्याच्या थापा देण्यास जो आत्मविश्वास लागतो तो निर्माण करणारी परिस्थितीच उरलेली नाहीं, आणि यदाकदाचित् अशा थापा मारण्याचें धैर्य एखाद्यानें केलेंच, तरी त्यावर विश्वास ठेवून निर्धास्त राहणारी मले तरुणी भेटण्याचा संभव कमी. कारण ब्रिटिशाप्रमाणेंच मले लोकांच्या वृत्तींतही आतां बदल झाला आहे. हा देश आपला आहे आणि आपण तो परत मिळविणारच या आत्मविश्वासाचे अंकुर त्यांच्या अंतःकरणांत जोमानें उत्पन्न होऊं लागले आहेत, आणि यामुळें ब्रिटिशांची दृष्टीहि अधिक तात्पुरती झाली आहे. सिंगापूरला येणारा इंग्रज (कांहीं भाग्यवान् सनदी नोकरांचा निवडक गट सोडल्यास) आपल्या 'करीअर'चा कायमचा पाया घालण्यास क्वचितच येतो. आपल्या आयुष्याचे कांही सुटलेले धागेदोरे गांठविण्याची दृष्टीच अधिक जणांची असते आणि म्हणून घटकाभर जिवाची चैन करण्याची वृत्ति – म्हणजे 'जिवाचें सिंगापूर' करण्याची वृत्ति – सिंगापूरमधील गोऱ्यांत अधिक आढळते. आणि म्हणून त्यांच्या आयुष्यक्रमाला सिंगापुरांत एखाद्या 'नाईट-क्लब'चें स्वरूप सहजगत्या येतें. सिंगापूरचें पूर्वीचं एक जबरदस्त आकर्षण अर्थात् अद्यापहि आहे. तें म्हणजे आपला नको झालेला जीव झोकून देण्याची जागा! अनेक विटलेले, वैतागलेले, आणि प्रेमभंगादि गोष्टींनीं भग्नाश झालेले जीव सिंगापुरांत येतात आणि येथें या नव्या जगांत त्यांचें जीवन असें कांहीं कोलांटउड्या घेतें कीं त्यांच्या कहाण्यांनीं सिंगापूरच्या क्लबांतील सायंगोष्टी बारा महिने रंगत असतात!

पण या गोऱ्यांच्या घोळक्यांत कर्नल ब्लिम्पचा अवतार कोणी भेटत नसेल, अशी समजूत मात्र करून घेऊं नये. जग कितीहि बदललें आणि वाहुटे कितीहि उलटे-सुलटे झाले तरी जेथें जेथें युनियन जॅकची फडफड सुरू असेल तेथें तेथें एकादा तरी कर्नल ब्लिम्प (निदान त्याचा एखादा हडकुळा अवतार) उपटणारच ! मला असा एक कर्नल ब्लिम्प (म्हणजे त्याचा हडकुळा अवतार) १९५४ सालीं भेटला होता. माझे मित्र ('ब्रेन वॉशिंग'चे लेखक) एडवर्ड हंटर आणि त्या वेळच्या सिंगापूर कौन्सिलच्या सदस्य मिसेस् एलिझाबेथ चौ यांच्यासह मी एका रेस्टोरॉंमध्यें चिनी भोजन घेत होतों. आमच्या सुंदर गप्पा सुरू होत्या. एकमेकांच्या पूर्वजीवनांतील अनुभवाच्या मसाल्यामुळें त्या गप्पांना एक आगळीच लज्जत आली होती. इतक्यांत एलिझाबेथ चौला कसली अवदसा आठवली न कळे. तिनें एका कर्नल ब्लिम्पला टेलिफोन करून सपत्निक बोलावलें. जरा वेळानें तो आला आणि मला एका इरसाल, मूर्ख, हेकट आणि बथ्थड साम्राज्यवाद्याचें दर्शन घडलें. गप्पांच्या ओघांत मी कोणतेंहि साम्राज्यवादी राष्ट्र, ज्याला स्वतःची थोर संस्कृति आणि परंपरा आहे अशा जित राष्ट्राला जीवनाचें समग्र तत्त्वज्ञान देऊं शकत नाहीं असें एक विधान केलें. या विधानाची चिकित्सा करण्यासारखें फार आहे. पण 'व्हाइट मॅन्स बर्डन'च्या ओझ्यानें या गृहस्थाचें डोकें इतकें हलकें बनलें होतें, कीं त्या विधानानें तो अगदीं विथरला आणि अद्वातद्वा बोलायला लागला — इतका कीं अखेरीस त्याच्या पत्नीला माझ्या बाजूनें जवळ जवळ दिलगिरीपूर्वक बोलावें लागलें. या गृहस्थाचें नांव मला आठवत नाहीं. एका अतिशय लोकप्रिय पुस्तकाचा लेखक म्हणून त्याची ओळख करून देण्यांत आली होती. कसल्या तरी डोंगराच्या खरेदीशीं त्या पुस्तकाच्या नांवाचा संबंध होता असें आठवतें. पण त्या डोंगरांतले इतके दगडगोटे त्या पुस्तकाच्या खटाटोपांत त्याच्या डोक्यांत जाऊन बसले असतील असें त्याच्या कांहींशा आकर्षक तजेलदार चेहऱ्यावरून वाटलें नव्हतें !

सिंगापूर हें आजवर नाविक मार्गावरचें एक ठाणें होतें. आतां तें आग्नेय आशियांतल्या हवाई मार्गावरचेंहि एक ठाणें — फार महत्त्वाचें ठाणें झालें आहे, आणि त्यामुळें त्याचें प्रवासी महत्त्व किती तरी वाढलें आहे. यामुळें देखील सिंगापूरच्या 'क्षणिक' दृष्टींत भर पडली आहे. नोकरी, व्यापार वगैरे निमित्तानें सिंगापूरला येऊन

राहणारा गृहस्थ त्याच्याकडे 'धर्मशाळा' म्हणून पाहत असला तरी तें कांहीं प्रमाणांत जीवनाला धर्मशाळा. गणण्याच्या तात्त्विक दृष्टीनेंच. पण प्रवासी जनता सिंगापूरला खरोखरच धर्मशाळा समजून वागणार (म्हणूनच सिंगापूरच्या हॉटेलांचें महत्त्व आणि महागाई बेसुमार आहे). सिंगापूर हें असें महत्त्वाचें हवाई केंद्र झाल्यामुळें मित्रांना उतरून घेण्यासाठीं आणि निरोप देण्यासाठीं विमानतळावर जाणें हा सिंगापूरच्या सामाजिक जीवनांतला फार महत्त्वाचा कार्यक्रम झाला आहे. 'माझा अमका अमका व्यापारी मित्र जाकार्तोला चालला आहे, सिंगापूरला उतरून तंबाखूच्या बाजारपेठेची पाहणी करण्याचा त्याचा इरादा आहे, तेव्हां त्याला शक्य ती मदत करावी' अशी विनंती करणारें पत्र अगर तार आठवड्यांतून एकदां तरी कचेरीवर अगर बिऱ्हाडावर घेऊन धडकतेच! आणि म्हणून कलकत्त्याच्या डमडम विमानतळावर जसा मासळीबाजार उसळतो तसाच कांहींसा सिंगापूरच्या विमानतळावरहि उसळतो!

सिंगापूरची आजची कृत्रिम अवस्था सारीच कांहीं ब्रिटिशांनीं निर्माण केली आहे असें समजण्याचें कारण नाहीं. (अर्थात् त्यांनींच हें बेट वसविलेलें असल्यानें प्रत्येक गोष्टीचें अखेरचें श्रेय अगर अपश्रेय त्यांच्याकडे जातें तो भाग सोडा!) सिंगापूर वस्तुतः मलायाची राजधानी व्हायला हवी. राजधानीचें वैभव सिंगापूरपाशीं आजहि आहे. म्हणजे सिंगापूर एक प्रचंड बंदर आहे, त्याच्या बाजारपेठांत व्यापार-उदीम उसळलेला असतो, वैभवशाली राजरस्त्यावर मानवांची आणि वाहनांची खेंचाखेंच सुरू असते, दरिद्री वस्तीचीं लक्तरें शहरावर ठिकठिकाणीं पसरलेलीं असलीं तरी वैभवशाली बंगले आणि बागबगीचे यांचाहि थाट अनेक ठिकाणीं आहे. जगांतली एक अतिसमृद्ध वनस्पतिशास्त्रीय बाग सिंगापुरांत आहे, एक मोठें नामवंत विद्यापीठ आहे, (आणि त्याचें भाग्य असें कीं, युद्धकालांत जपान्यांनीं रंगूनच्या विद्यापीठांत दारू-गोळा भरला आणि भडकविला पण या विद्यापीठांत एक आदर्श ग्रंथालय निर्माण केलें), प्रचंड इमारती आहेत, त्यांच्यांत ब्रिटिशांच्या 'कलोनिअल आर्किटेक्चर'चे कांहीं आदर्श नमुने आहेत. राजधानीचे असे अनेक गुणविशेष सिंगापूरपाशीं आहेत; पण राजधानीचा मुख्य गुण तेवढाच नाहीं. म्हणजे ज्या भूमींत तें आहे त्या भूमीची सार्वत्रिक निष्ठा संपादित करण्याचें आणि त्या भूमींतील जीवनाला आश्रयस्थान देण्याचें सामर्थ्य आज सिंगापूरपाशीं नाहीं.

## अरब आणि त्याचा उंट!

तुम्हीं नकाशाकडे पाहा – सिलोन जसें भारतापासून वेगळें पडतें तसें सिंगापूर मलायापासून पडत नाहीं. मुंबई जसा महाराष्ट्राचा भाग आहे, तसा सिंगापूर मलायाचा आहे. महाराष्ट्र मुंबईसाठीं जिवाचें रान करण्यासाठीं उठला, पण मौज अशी, कीं हें वैभवशाली सिंगापूर खुद्द मलयालाच नको आहे. मलायाचे मुख्य मंत्री टेंगकू अब्दुर्रहमान यांनी सिंगापूरचें दुखणें मलायाच्या गळ्यांत बांधून घेण्यास सक्त नकार दिला आहे. सिंगापूरचें स्वाभाविक स्थान ते काय ओळखून नसतील? वस्तुतः मलायामध्यें सामील होण्यास कुणाचा विरोध समजण्यासारखा असेल तर तो सिंगापूरच्या नेत्यांचा; कारण त्यामुळें त्यांचें महत्त्व कमी होण्याचा संभव आहे. पण खुद्द डेव्हिड मार्शल मला म्हणाले, "The ultimate destiny of Singapore is with the Malayan mainland." मग टेंगकू अब्दुर्रहमानांचा विरोध कां? तर सिंगापूरच्या बारा लाख वस्तींतले ८५ टक्के चायनीज आहेत म्हणून! आजच मले लोक आपल्याच मायभूमींत अल्पसंख्याक बनलेले आहेत. मलयांत ते चाळीस, भारतीय वीस व चिनी चाळीस अशी टक्केवारी आहे. त्यांत सिंगापूरच्या ८५ टक्के चिन्यांची भर टाकून मलायाच्या राजकारणांत चिन्यांना डोईजड होऊं देण्याची मले लोकांची तयारी नाहीं.

नदीच्या पुराचें पाणी आजूबाजूच्या प्रदेशांत पसरतें तसें चिनी आग्नेय आशियांत पसरले आहेत. ब्रह्मदेश, थायलंड, इंडो-चीन, फिलिपिन्स, इंडोनेशिआ, सर्व ठिकाणीं ते गेले आहेत आणि तेथें जाऊन त्यांनीं आर्थिक, राजकीय प्रश्न निर्माण केलेले आहेत. पण मलयांत चिन्यांचा जो पूर लोटला आहे त्याला खरोखरच तुलना नाहीं. इतर देशांत ते अल्पसंख्याक आहेत, पण मलयांत घरच्यांना अल्पसंख्याक बनवून ते अक्षरशः डोक्यावर बसले आहेत. या विपरीत परिस्थितीला अर्थात् ब्रिटिशच कारण आहेत. त्यांना रबराच्या मळ्यावर आणि कथलाच्या खाणींत काम करण्यास लोक हवे होते. चिनी लोक जितके उद्योगी तितकेच मले लोक आळशी. तेव्हां भुकेकंगाल चीनमधून हजारों चिन्यांची पद्धतशीर आयात करण्याचें धोरण त्यांनीं स्वीकारलें. पण चिनी आले म्हणजे ते केवळ मजुरीवरच संतुष्ट राहात नाहींत. ते भांडवलीहि करूं लागतात. परिणामीं आज मलयांत, विशेषतः सिंगापुरांत, चिनी नवकोटनारायणांची संख्या शेंकड्यांच्या घरांत आहे!

राहणारा गृहस्थ त्याच्याकडे 'धर्मशाळा' म्हणून पाहत असला तरी तें कांहीं प्रमाणांत जीवनाला धर्मशाळा गणणाऱ्या तात्त्विक दृष्टीनेंच. पण प्रवासी जनता सिंगापूरला खरोखरच धर्मशाळा समजून वागणार (म्हणूनच सिंगापूरच्या हॉटेलांचें महत्त्व आणि महागाई बेसुमार आहे). सिंगापूर हें असें महत्त्वाचें हवाई केंद्र झाल्यामुळें मित्रांना उतरून घेण्यासाठीं आणि निरोप देण्यासाठीं विमानतळावर जाणें हा सिंगापूरच्या सामाजिक जीवनांतला फार महत्त्वाचा कार्यक्रम झाला आहे. 'माझा अमका अमका व्यापारी मित्र जाकार्ताला चालला आहे, सिंगापूरला उतरून तंबाखूच्या बाजारपेठेची पाहणी करण्याचा त्याचा इरादा आहे, तेव्हां त्याला शक्य ती मदत करावी' अशी विनंती करणारें पत्र अगर तार आठवड्यांतून एकदां तरी कचेरीवर अगर बिऱ्हाडावर घेऊन धडकतेच! आणि म्हणून कलकत्त्याच्या डमडम विमानतळावर जसा मासळीबाजार उसळतो तसाच कांहींसा सिंगापूरच्या विमानतळावरहि उसळतो!

सिंगापूरची आजची कृत्रिम अवस्था सारीच कांहीं ब्रिटिशांनीं निर्माण केली आहे असें समजण्याचें कारण नाहीं. (अर्थात् त्यांनींच हें बेट वसविलेलें असल्यानें प्रत्येक गोष्टीचें अखेरचें श्रेय अगर अपश्रेय त्यांच्याकडे जातें तो भाग सोडा!) सिंगापूर वस्तुतः मलायाची राजधानी व्हायला हवी. राजधानीचें वैभव सिंगापूरपाशीं आजहि आहे. म्हणजे सिंगापूर एक प्रचंड बंदर आहे, त्याच्या बाजारपेठांत व्यापार-उदीम उसळलेला असतो, वैभवशाली राजरस्त्यावर मानवांची आणि वाहनांची खेंचाखेंच सुरू असते, दरिद्री वस्तीचीं लक्तरें शहरावर ठिकठिकाणीं पसरलेलीं असलीं तरी वैभवशाली बंगले आणि बागबगीचे यांचाहि थाट अनेक ठिकाणीं आहे. जगांतली एक अतिसमृद्ध वनस्पतिशास्त्रीय बाग सिंगापुरांत आहे, एक मोठें नामवंत विद्यापीठ आहे, (आणि त्याचें भाग्य असें कीं, युद्धकालांत जपान्यांनीं रंगूनच्या विद्यापीठांत दारू-गोळा भरला आणि भडकविला पण या विद्यापीठांत एक आदर्श ग्रंथालय निर्माण केलें), प्रचंड इमारती आहेत, त्यांच्यांत ब्रिटिशांच्या 'कलोनिअल आर्किटेक्चर'चे कांहीं आदर्श नमुने आहेत. राजधानीचे असे अनेक गुणविशेष सिंगापूरपाशीं आहेत; पण राजधानीचा मुख्य गुण तेवढाच नाहीं. म्हणजे ज्या भूमींत तें आहे त्या भूमीची सार्वत्रिक निष्ठा संपादित करण्याचें आणि त्या भूमींतील जीवनाला आश्रयस्थान देण्याचें सामर्थ्य आज सिंगापूरपाशीं नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# अरब आणि त्यांचे उंट!

तुम्हीं नकाशाकडे पाहा – सिलोन जसें भारतापासून वेगळें पडतें तसें सिंगापूर मलायापासून पडत नाहीं. मुंबई जसा महाराष्ट्राचा भाग आहे, तसा सिंगापूर मलायाचा आहे. महाराष्ट्र मुंबईसाठीं जिवाचें रान करण्यासाठीं उठला, पण मौज अशी, कीं हें वैभवशाली सिंगापूर खुद्द मलायालाच नको आहे. मलायाचे मुख्य मंत्री टेंगकू अब्दुर्रहमान यांनी सिंगापूरचें दुखणें मलायाच्या गळ्यांत बांधून घेण्यास सक्त नकार दिला आहे. सिंगापूरचें स्वाभाविक स्थान ते काय ओळखून नसतील? वस्तुतः मलायामध्यें सामील होण्यास कुणाचा विरोध समजण्यासारखा असेल तर तो सिंगापूरच्या नेत्यांचा; कारण त्यामुळें त्यांचें महत्त्व कमी होण्याचा संभव आहे. पण खुद्द डेव्हिड मार्शल मला म्हणाले, "The ultimate destiny of Singapore is with the Malayan mainland." मग टेंगकू अब्दुर्रहमानांचा विरोध कां? तर सिंगापूरच्या बारा लाख वस्तींतले ८५ टक्के चायनीज आहेत म्हणून! आजच मले लोक आपल्याच मायभूमींत अल्पसंख्याक बनलेले आहेत. मलयांत ते चाळीस, भारतीय वीस व चिनी चाळीस अशी टक्केवारी आहे. त्यांत सिंगापूरच्या ८५ टक्के चिन्यांची भर टाकून मलायाच्या राजकारणांत चिन्यांना डोईजड होऊं देण्याची मले लोकांची तयारी नाहीं.

नदीच्या पुराचें पाणी आजूबाजूच्या प्रदेशांत पसरतें तसें चिनी आग्नेय आशियांत पसरले आहेत. ब्रह्मदेश, थायलंड, इंडो-चीन, फिलिपिन्स, इंडोनेशिआ, सर्व ठिकाणीं ते गेले आहेत आणि तेथें जाऊन त्यांनीं आर्थिक, राजकीय प्रश्न निर्माण केलेले आहेत. पण मलयांत चिन्यांचा जो पूर लोटला आहे त्याला खरोखरच तुलना नाहीं. इतर देशांत ते अल्पसंख्याक आहेत, पण मलयांत घरच्यांना अल्पसंख्याक बनवून ते अक्षरशः डोक्यावर बसले आहेत. या विपरीत परिस्थितीला अर्थात् ब्रिटिशच कारण आहेत. त्यांना रबराच्या मळ्यावर आणि कथलाच्या खाणींत काम करण्यास लोक हवे होते. चिनी लोक जितके उद्योगी तितकेच मले लोक आळशी. तेव्हां भुकेकंगाल चीनमधून हजारों चिन्यांची पद्धतशीर आयात करण्याचें धोरण त्यांनीं स्वीकारलें. पण चिनी आले म्हणजे ते केवळ मजुरीवरच संतुष्ट राहात नाहींत. ते भांडवलीहि करूं लागतात. परिणामीं आज मलयांत, विशेषतः सिंगापुरांत, चिनी नवकोटनारायणांची संख्या शेंकड्यांच्या घरांत आहे!

चीनमध्यें लाल राजवट प्रस्थापित झाल्यापासून आणि पंचशीलोक्त राजकारणामुळें जगांत लाल चीनचा दरारा, दबदबा वाढल्यापासून मलायांतील, विशेषतः सिंगापुरांतील चिनी जनतेची अस्मिता खडबडून जागी झाली आहे. याचा अर्थ या सर्व लोकांनीं लाल धर्माची दीक्षा घेतली आहे असा नव्हे, पण आपलें राष्ट्र आणि आपले लोक यांबद्दलचा त्यांचा अभिमान (पुष्कळदां अगदीं आंधळा अभिमान) उसळ्या मारूं लागला आहे एवढंच. जें राष्ट्र जगाच्या चेष्टेचा एक विषय होऊन बसलें होतें त्याला एकाएकी आशियांतील सर्वांत प्रबल राष्ट्र बनविणाऱ्या लाल राजवटीबद्दल त्यांना धन्यता वाटूं लागली आहे. अर्थात् चिनी मजूर आणि विद्यार्थी यांच्या नजरेवर कम्युनिझमची झांपड आली असेलच, पण सिंगापूरच्या एकंदर चिनी जनतेबद्दल असें विधान करणें कठीण आहे. मलायन चायनीज् अॅसोसिएशनच्या सिंगापूर-शाखेचे सरचिटणीस मि. ली यांना मीं याविषयीं विचारलें, तेव्हां ते म्हणाले,

"या सिंगापुरांत किती मोटारी आहेत तुम्हांला माहीत आहे ?"

"नाहीं – किती ?"

"किती का असेनात ! पण या हजारों मोटरी बहुतेक सर्व चिनी लोकांच्या मालकीच्या आहेत. हे लोक कम्युनिस्ट होतील असे तुम्हांला वाटतं काय ?"

"पण ताक् सान लाय् व ली कॉंग चिअँगसारखे नवकोटनारायण कम्युनिस्ट चीनचे पक्षपाती आहेत असें ऐकतों तें कसें ?"

"तें मी सांगूं शकत नाहीं; पण यांतही त्यांची धंदेवाईक दृष्टि असूं शकेल हें ध्यानांत घ्या."

"ती कशी काय ?"

"या आमच्या सिंगापुरांत चिनी मजूर आणि विद्यार्थी वारंवार सप करतात हें तुम्हांला माहीत असेल. पण ली कॉंग चिअँगच्या कारखान्यांत सप झालेला तुम्हीं कधीं ऐकला आहे ?"

या प्रश्नावर हा खरोखर नवा प्रकाश होता. माझ्या चेहऱ्यावर उमटलेले आश्चर्याचे भाव वाढविण्यासाठी की काय, ली पुढे म्हणाले, —

"ली कॉंग चिअँग कम्युनिस्टांनाच काय, प्रत्येक राजकीय पक्षाला मदत करतात; सर्वांच्याच सद्बुद्धीची आराधना ते करीत असतात."

भांडवलवाल्यांच्या अनेक कंपन्यांत विमे उतरवून ठेवण्याच्या या युक्त्या अर्थात् आपणांस नवीन नाहींत. पण चिनी भांडवलवाल्यांची गोष्ट निराळी असूं शकेल. चिनी जनतेची निष्ठा नेहमीं चीनला वाहिलेली असते आणि भांडवलवाले झाले तरी याला संपूर्ण अपवाद असतील असें समजण्याचें कारण नाहीं. ताक् सान् लायूचे श्वशुर हे एक प्रचंड भांडवलवाले होते. एका सुप्रभातीं त्यांनी आपल्या इस्टेटीचा निरोप घेतला आणि ते मायदेशीं परतले. आज ते लाल सरकारांत मंत्री आहेत.

तेव्हां चिनी लोकांची याही दृष्टीनें टेंगकू अब्दुर्रहमान धास्ती यांना वाटली तर नवल नाहीं. अनेकांना ती वाटते आणि म्हणून 'आम्हांला मर्डेका (स्वातंत्र्य) नको, ब्रिटिशांचें राज्य आहे तेंच ठीक' असें सरळ सरळ सांगणारीं शहाजोग पत्रें सिंगापूरच्या वर्तमानपत्रांत निःसंकोचपणें प्रसिद्ध होत असतात. मीं यावद्दल मार्शलना विचारलें तेव्हां ते म्हणाले, "आम्हीं त्यांना प्रतिबंध करीत नाहीं." हा औदार्याचा आव होता, पण मला वाटलें, मार्शलनांसुद्धां या स्वतंत्र्यविरोधकांच्या भूमिकेबद्दल थोडीशी सहानुभूति असावी. मार्शल हे कट्टर कम्युनिस्टविरोधक आहेत.

सिंगापूरची अशी मोठी कुंठित अवस्था आहे. तेथें भांडवलवाले कम्युनिस्टांचे साहाय्यक बनूं शकतात तर कट्टर स्वातंत्र्यवादी स्वातंत्र्यविरोधकांशीं सहमत होऊं शकतात! आणि मलायाचे राष्ट्रवादी सिंगापूरसारख्या माणिकमोत्याला मोठ्या आनंदानें फेंकून देण्यास तयार होतात! माझ्या दृष्टीन यांतून एक बिनतोड मार्ग आहे. तो भव्य आहे आणि भाग्यशाली आहे. तो मार्ग म्हणजे समग्र मले मुलखाचें आणि जनतेचें ऐक्य स्थापणें. म्हणजेच मलाया आणि इंडोनेशिया यांचा मिळून एक विशाल इंडोनेशिया – एक एकसंघ राष्ट्र निर्माण करणें. ते सारे एका वंशाचे, एका भाषेचे आणि एका धर्माचे लोक आहेत. त्यांचें एक राष्ट्र होणें ही अगदी स्वाभाविक गोष्ट आहे. या सबंध प्रदेशाला सतावणारे अनेक प्रश्न (त्यांतच चिनी अल्पसंख्याकांचा प्रश्न आला) या एकीकरणानें आपोआप सुटून जातील. पण विशाल मले राष्ट्राचा मार्ग इतका भव्य आहे आणि इतका भाग्यशाली आहे कीं अनेकांना ती कविकल्पनाच वाटते – धाडशी कविकल्पना! इतकी कीं पुष्कळजण तिचा विचार करण्यासच धजत नाहींत. त्यापेक्षां इरिअनसारख्या प्रश्नावर झुंजणें आणि चिनी-मले लोकांच्या समतोलाच्या अस्थिर योजना आंखणें हेंच पुष्कळांना व्यवहारी राजकारण वाटतें! व्यवहारानें सत्यावर मात केल्याचें हें एक बिनतोड उदाहरण आहे!

# सिंगापूर ....२

* * * * ** * * * *

आपापलीं धोतरें व पातळें वाळत घालून त्या प्रवाश्यांनीं पी. ॲन्ड. ओ. बोटीचें मुंबईच्या एखाद्या चाळींत रूपांतर केलें अशा अर्थाचें वर्णन काणेकरांनीं केलेलें आठवतें. चिन्यांनीं सिंगापूरची थेट अशीच अवस्था केली आहे. बाकी जेथें चिन्यांची संख्या ८५ टक्के आहे आणि चिनी धनिकांची संख्या शेकडोंनीं मोजावी लागते तेथें असा कायाकल्प नसता झाला तरच नवल! सिंगापूरचा हा सांख्यिक आणि आत्मिक कायाकल्प या पीतवर्णीयांनीं केवळ एका गुणाच्या जोरावर घडवून आणला आहे. हा गुण म्हणजे तितिक्षा – म्हणजेच सहनशीलता आणि चिकाटी. मले बहुधा स्वतःसाठीं जगतो, भारतीय फार तर आपल्या मुलांबाळांसाठीं जगत असेल, पण चिनी मात्र नातवंडांपणतवंडांसाठींच जगत असतो. त्याची नजर, निश्चल नजर, भविष्यकालावर रोखलेली असते. भूतकालच्या स्मृतींनी तो विचलित होत नाहीं. वर्तमानकालांतील आघातांनीं तो हादरत नाहीं आणि स्वतःच्या मरणाचा विचार त्याची भविष्यकालीन स्वप्नें उधळूं शकत नाहीं. केव्हां तरी भविष्यांत आकारास येणाऱ्या अगर सफल होणाऱ्या अशा आकांक्षांच्या विश्वांत तो अमरत्व पावलेला असतो.

सिंगापूरचा चिनी अवतार तुमच्या नजरेंत सगळीकडेच भरतो. तुम्ही रस्त्यानें जाऊं लागलांत कीं दुकानावरचे चिनी अक्षरांतले आडवेउभे, भडक, बटबटीत फलक

तुमच्या नजरेंत भरणारच. त्याचप्रमाणें एकाच घाटाच्या आणि एकाच तोंडवळ्याच्या ‘ घर-दुकान ’ चाळी रस्त्याच्या कडेनें सिंगापुरांत सर्वत्र दिसतात. या चाळी एकदां पाहिल्या कीं विसरणें शक्यच नाहीं. त्या कशा दिसतात सांगूं ? तुम्हीं माधवजी धरमसी मिलकडून फोरस रोडनें जाऊं लागलां म्हणजे डाव्या बाजूला खालीं मारवाडी सावकार आणि वर नायकिणी राहात असलेल्या चाळी दिसतात ना ? तशाच ! पण एक फरक आहे. वरच्या मजल्याचा पुढचा भाग पोर्चप्रमाणें पुढें आलेला असतो आणि खालीं दुकानांसमोरून आच्छादलेला रस्ता गेलेला असतो. ( या रस्त्यानें जातांना लहान लहान नागडींउघडीं चिनी मुलें तुमच्या पायांत केव्हां लडबडतील याचा नेम नसतो ! ) खालीं दुकानांत एक अगर दोन व्यक्ति काम करतात आणि वरच्या गाळ्यांत त्यांच्या कुटुंबांतलीं कित्येक मुलें माणसें दाटीवाटीनें राहत असतात. फोरस रोडवरील वरच्या मजल्यावरच्या नायकिणींनीं सुद्धा दुमजली ट्रॅमना आक्षेप घेतला होता म्हणतात. मग या सभ्य कुटुंबीयांनीं तसाच आक्षेप घ्यावा यांत काय आश्चर्य ? सिंगापुरांत दुमजली बसेस् नाहींत याचें कारण हें आहे.

सिंगापूरचीं चिनी लक्षणें एकसारखीं नजरेसमोर येतात. डब्याच्या दुधाची कॉफी विकणारा अगर अननसाचीं कापें लोकांना खाऊं घालणारा फेरीवाला चिनीच असतो. त्याचप्रमाणें बादशाही इमारतींतला लाखों स्ट्रेट्स् डॉलर्सचा आपल्या अबाकसच्या लाकडी मोजयंत्राच्या साहाय्यानें हिशेब करणारा कारकूनहि चिनीच असतो. बिगारीच्या वर्गात मुलांना अंक मोजायला शिकविण्याची गोट्यांची फ्रेम असते तशा प्रकारचें हें छोटें यंत्र जपान्यांनीं चिनी संस्कृतीबरोबर आयात केलें आणि आजच्या आधुनिक कालांतहि टोकियोच्या इंपीरिअल हॉटेलसारख्या जगप्रसिद्ध हॉटेलचे हिशेब करण्यास तें मदत करीत असतें ! सिंगापूरांत साहेबानें उभारलेल्या वैभवशाली इमारती आहेत, पण परवापरवापर्यंत सर्वांत उंच इमारत ‘ बँक ऑफ चायना ’च्या मालकीची होती, आणि आतां ‘ एशियन बिल्डिंग ’ नें तिचा नक्षा उतरविला असला तरी ‘ एशियन ’मध्यें चिन्यांची मालकी भरपूर असेलच. ( मौज अशी कीं हँगकॉंगमध्यें सुद्धां सर्वांत उंच इमारत ‘ बँक ऑफ-चायना ’-च्या म्हणजे लाल चीनच्या मालकीची आहे ! ) सिंगापूरचीं हॉटेलें म्हणजे रॅफल्स, ॲडेल्फी असें एका काळीं ठरून गेलें होतें. पण आतां चिनी मालकीच्या कॅथे

अनुक्रमांक 22607 दि.
क्रमांक 221 ...... नों. दि. 20/7/

हॉटेलनें या मातबर ब्रिटिश हॉटेलांची मिजास उतरविली आहे. माझ्यासारखे परकीय प्रवासी कॅथेकडे धाव घेतात, कारण त्याची वृद्ध मालकीण कारभार चोख चालावा म्हणून बारा बारा तास हंसतमुखानें राबत असते (आणि माझ्यासारख्याची ' Are you a Rotary man? — You look like a Rotary Governor!' अशी नर्मचेष्टा करण्यास ती विसरत नाहीं ). पण चिनी लोक या हॉटेलकडे निराळ्याच आपुलकीनें पाहात असावेत. दोन वर्षांपूर्वी मी तेथें होतों तेव्हां चीनची एक विख्यात गायिका तेथें उतरली होती. या खेपेस हॉंगकॉंगचा प्रख्यात नट आणि सर्वोत्कृष्ट नटी उतरली होती – आणि त्यांचें दर्शन घेण्यासाठीं कित्येक चिनी स्त्री-पुरुष कॅथे हॉटेलची यात्रा करीत होते. कॅथे हॉटेल निदान आधुनिक बांधणीचें तरी आहे पण चायनीज चेंबर ऑफ कॉमर्सच्या इमारतीचें दर्शन तंतोतंत चिनी आहे. मधूनमधून दिसणारी चिनी देवळें कशीं असतील तें सांगण्याचें कारणच नाहीं. सिनेमाच्या जाहिरातींत चिनी अक्षरें आणि चिनी चेहरे यांचीच चलती! चिनी कंदीलसुद्धां सिंगापूरांत फार फडकतो आणि चंद्रोत्सवांत (Moon Festival) विविध रंगांच्या, आकारांच्या आणि रूपांच्या कंदिलांचा आकाशसंचार म्हणजे दीपसौंदर्याची गगनगामी स्पर्धाच असते!

पण चिनी चेहऱ्यामोहऱ्याचा प्रभाव शहरांतच असतो असें नव्हें. सिंगापूरपासच्या एका खेड्यांत, शेतांत खुरपणी करणाऱ्या बाया दिसल्या त्या चिनीच होत्या आणि कोंबड्यांची मशागत करणारे पुरुष दिसले तेहि चिनीच!

चिन्यांच्या या तितिक्षेची जणुं मूर्ति शोभणारी एक स्त्री मला भेटली. एडवर्ड हटर यांनीं तिची ओळख करून दिली. तिचें दर्शन झालें आणि मी थक्क झालों. तिच्या पायांना पावलें नव्हतीं आणि हातांना पंजे नव्हते! पण निसर्गावर मात करणारी प्रबल इच्छाशक्ति तिच्यापाशीं होती आणि या इच्छाशक्तीच्या जोरावर तिनें आपलें आयुष्य चमत्कारपूर्ण पराक्रमानें भरून टाकलें होतें. मेरी लियूची जीवनकथा म्हणजे तितिक्षेची, त्यागाची, धीराची, कर्तव्यपरायणतेची आणि लोकसेवेची स्फूर्तिदायक कहाणी आहे. लाल राजवट येण्यापूर्वी ती चीनमध्यें लेखन-वाचन-शिक्षण करून पोट भरीत असे. तिच्या धर्मपरायण वृत्तीला कम्युनिस्टांची नास्तिक, धर्मविरोधी राजवट मानवणारी नव्हती. ती अमेरिकेला गेली. तिथें तिचें बस्तान छान बसलें.

एका नियतकालिकाचें संपादन तिच्याकडे आलें. त्यांत आनंद होता, द्रव्यलाभ होता. कार्यपूर्तीचें समाधानहि होतें. पण मेरी लियूची वृत्ति आणि दृष्टि निराळी होती, विशाल होती. कसली तरी असमाधानाची जाणीव तिचें अंतःकरण कुरतडूं लागली. आपल्या जीवनांत कांहीं तरी कमी आहे, चुकतें आहे असें तिला वाटूं लागलें. आपलें कार्यक्षेत्र इथें नाहीं, तें आशियांत आपल्या लोकांत आहे, तिकडे आपण गेलें पाहिजे, असें तीव्रतेनें टोंचूं लागलें. अमेरिकन जीवनाचा त्याग करून ती सिंगापूरला आली.

पण सिंगापूरचें दर्शन तिला कांहीं वेगळेंच झालें. येथील चिन्यांचें जीवन, वर्तन, भाषा, सारें कांहीं निराळेंच होतें. खुद्द चीनमध्यें एका प्रांताची भाषा दुसऱ्या प्रांतांत समजत नाहीं. पेकिंगची व्यक्ति कँटनमध्यें भाषेच्या दृष्टीनें परकी ठरते. इकडे सिंगा-पुरांत तर आगखीच एक भाषा निर्माण झाली होती. सिंगापुरी चिनी. मेरी लियूला ती भाषाहि समजेना आणि सिंगापुरी चिन्यांचें जीवनहि समजेना. चिनी जनतेच्या जीवनांत जी एक परायणता असते, अस्मिता असते तिचा प्रत्यय तिला येईना ! ती मला म्हणाली,

"या लोकांच्या जीवनांत सारं महत्त्व पैशाला आहे. संपत्तीला आहे. डॉलर हा त्यांचा देव आहे. आईवापांनीं रानांत रखडावं आणि मुलांनीं चैन करावी ही यांची संस्कृति !"

पण जिनें निसर्गाच्या क्रूर चेष्टेला दाद दिली नाहीं ती असल्या मानवी अडचणींना काय दाद देणार ? सिंगापूरच्या मेथॉडिस्ट चर्चच्या साह्यानें तिची समाजसेवा अविरत चालू आहे.

मी सिंगापूरच्या चिनी लोकांत कोणी मोठे लेखक अगर कलाकार आहेत का, यांची चौकशी करूं लागलों, तेव्हां मला मेरी लियूचे उद्गार आठवले. चीनची संस्कृति इतकी भव्य, तिचा आविष्कार इतका ऐतिहासिक, चिनी वाङ्मयाची परंपरा इतकी थोर, प्रेरणा इतकी उदात्त – एकंदर चिनी संस्कृतीचा प्रभाव आणि प्रसारच इतका थोर आणि व्यापक, पण तिची अस्सल उपासना करणारी कोणी व्यक्ति मला येथें भेटली नाहीं. कोणी नाहींच असें मला सांगण्यांत आलें. मीं विचारलें कां, आणि माझ्या प्रश्नाला जें उत्तर मिळालें त्यांत परागंदा चिन्यांच्या प्रवृत्तीचें मोठें अर्थपूर्ण दर्शन झालें.

चिन्यांबरोबर त्यांच्या जन्मजात संवयीं आल्या, त्याप्रमाणें त्यांच्या संस्कृतीचे अनेक प्रवाहहि आले. पण या प्रवाहांना उच्च उदात्त स्वरूप ज्यांनीं द्यायचें, संस्कृति म्हणजे नुसती खाण्यापिण्याराहाण्याची पद्धति नव्हे तर एकंदर जीवनपद्धतीवरचे आकर्षक रंग आणि सुगंध हें ज्यांनीं सिद्ध करावयाचें, या रंग-सुगंधांची जाणीवपूर्वक जोपासना ज्यांनीं करावयाची — थोडक्यांत म्हणजे संस्कृतीच्या आत्मिक अंगाचें आराधन ज्यांनीं करावयाचें — त्या धनिकांची एक विशिष्ट वृत्ति आहे. सिंगापुरांत ते व्यापार-उदीम करतात, पैसा मिळवितात, पण इतर असंख्य चिन्यांप्रमाणेंच त्यांची दृष्टि मागें म्हणजे मायभूमीकडे वळलेली असते. ते आपलीं मुलें शिक्षणासाठीं चीनला पाठवितात. त्यांतली सांस्कृतिक दृष्टीचीं अगर वृत्तीचीं असतात तीं तिकडेच राहणें पसंत करतात. म्हणजे संस्कृतीचा प्रवाह मागें मायभूमीकडेच वळला. अशा प्रकारें चिन्यांची चीननिष्ठाच चिनी संस्कृतीच्या प्रसारास मारक ठरली आहे.

हा उच्च आशय सोडला तर चिनी संस्कृतीचा आविष्कार सिंगापूरमध्यें पुष्कळ आढळतो. प्रथम म्हणजे भोजन — आणि एकदां भोजनाच्या टेबलाशीं गेल्यानंतर त्याला चार चार तास चिकटून बसण्याची चिन्यांची प्रवृत्ति ध्यानांत घेतां त्याचा परामर्श प्रथम घेतलाच पाहिजे. पाकपद्धति ही कलाहि आहे आणि शास्त्रहि आहे. संगीतादि कलांच्या जोडीला तिला बसविण्याची शिष्टसंमत प्रथा नसली तरी, प्रत्येक कलेचा कोणतें तरी ज्ञानेंद्रिय हा आधार असतो हा आधुनिक विचार ध्यानांत घेतला तर जिव्हेवर आधारलेल्या पाककलेचें महत्त्व सहज सिद्ध होईल. कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी चिनी संस्कृतींत भोजनाला फार महत्त्व आहे. खरें म्हणजे चिनी भोजन हा एक मोठा विधि आहे — आणि या विधीच्या सांगतेंत तोंडाचा उपयोग खाण्या-इतकाच गप्पांकडेहि होत असतो.

या विधीची साधनसामग्री मोठी प्रेक्षणीय असते. चिनी भोजनाचें अवाढव्य टेबल वाटोळ्या आकाराचें असतें. त्याच्या मधोमध बॉलबेअरिंगवर बसविलेलें आणि टेबलापेक्षां उंच असें एक वाटोळें मेज असतें. त्याच्यावर पेल्यासारख्या दिसणाऱ्या चिनी मातीच्या भांड्यांतून खाद्यपदार्थ आणून ठेवतात. एखादा पदार्थ लागला म्हणजे दुसऱ्यास त्रास न देण्याच्या सुबुद्धीनें हात लांब करून स्वतःच तो घेण्याचा विचित्र विक्षेप करण्याची अगर दुसऱ्याला त्याचें खाणें बाजूला ठेवून आपल्याकडे

आधीं लक्ष देण्यास लावण्याची गरज नाहीं. त्या चक्राकार मेजाला थोडासा धक्का दिला कीं तें फिरतें आणि आपल्याला हव्या असलेल्या पदार्थांचें भांडें समोर येतें. चिनी भोजनांत वेटरनें दरेकाला पदार्थ वाढण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. तो बरेचसे पदार्थ त्या मधल्या फिरत्या मेजावर मांडून ठेवतो, आणि प्रत्येकानें ते जसजसे लगतील तसे घ्यायचे. हे पदार्थ किती असतात याची गणनाच कठीण. आणि प्रथम आणून ठेवतात तेवढ्यानें थोडेंच भागतें! मधल्या मेजावर जसजशी जागा होईल तसतसे नवे पदार्थ येतच असतात. चिनी भोजनांत एकंदर एकवीस 'कोर्सेस' असतात असें एकानें सांगितलें. चिनी जेवणाइतकें सरस, समृद्ध जेवण इतरत्र क्वचितच असेल. मासे, मटण, कोंबडी, डुक्कर, बदक, प्रॉन, भात, शाक, शार्कफिन (आणि पक्ष्याचें घरटें सुद्धां!)—नाना प्रकारचे पदार्थ वेगवेगळे आणि एकत्र मिसळून तुमच्या पोटांत ढकलण्यासाठीं चिनी यजमान धडपडत असतो. पाश्चात्य भोजनांत प्रथम सूप येतें, पण चिनी भोजनांत सूप ही समाप्तीची सूचना. सूपनंतर शेवटीं कसला तरी गोड पदार्थ येतो, पण तें पाश्चात्यांचें अनुकरण आहे असें समजलें. जेवण झाल्यावर कॉफी पिण्याची पद्धतहि अशीच अनुकरणात्मक दिसते.

चिन्यांची खरी भक्ति चहावर. जेवतांना प्रथमपासून अखेरपर्यंत ते पाण्याऐवजीं चहा पीत असतात. मौलाना अबुल कलम आझादांच्या भाषेंत बोलायचें म्हणजे चहांत साखरदूध घालून त्याचें इंग्रजी सायरप बनविणें चिन्यांना पसंत नाहीं. बिनसाखरेचा-बिनदुधाचा पण उत्कृष्ट चवीचा व त्याहूनहि उत्कृष्ट स्वादाचा शुद्ध चहा ते पितात. आपल्याकडे गुलाबी सुवासाचा चहा घेण्याची पद्धत आहे. चिनी लोक मोगऱ्याच्या वासाचा 'व्हाईट जस्मीन' पसंत करतात. चहांत मोगऱ्याचीं फुलें मिसळून हा तयार करतात आणि याची आवड इतकी जबरदस्त आहे कीं पौंडाला वीसवीस रुपये आकारण्याची त्यामुळें सोय झाली आहे. या स्वादिष्ट चहाऐवजीं विचित्र वासाची आणि चवीची बीअर कित्येक जण पसंत करतात ही आधुनिकतेची किमया!

चिनी भोजनालयांत टेबलापाशीं जाऊन बसल्याबरोबर वेटर एक गरम पाण्यांत भिजवून पिळलेला पांढरा स्वच्छ रुमाल तुमच्या हातांत देतो आणि चहाचे ग्लास किंवा पेला तुमच्यासमोर ठेवतो. हात आणि चेहरा पुसण्यासाठीं ओला रुमाल

देण्याची पद्धति ही चीनची मानवी संस्कृतीला खरोखर अमोल देणगी आहे, पण जपानखेरीज दुसऱ्या कोणत्या राष्ट्रानें ती स्वीकारल्याचें आढळत नाहीं. समोरचा समृद्ध पदार्थांचा समाचार घेण्यास जी प्रसन्न वृत्ति लागते ती निर्माण करण्यास या स्वच्छताप्रवर्तक रुमालाची मोठी मदत होते. त्यावर लव्हेंडरचे अगर यू डी कोलनचे थेंब टाकलेले असले तर मग विचारायलाच नको !

इतकें संस्कारित भोजन असल्यानंतर तें चारचार तास चालावें यांत नवल तें काय ? युनियन प्रेसच्या मरिया येन यांनीं मला हॉंककॉंगला पेकिनीज् जेवण दिलें आणि सिंगापूरला कँटनीज जेवण दिलें. हीं दोन जेवणें अगदीं निरनिराळ्या प्रकारचीं. पदार्थ निराळे, पद्धतीहि निराळी. पण दोनहि सारखींच समृद्ध. दोनंहि चारचार तास चाललीं, आणि दोनहि वेळां उत्कृष्ट जेवणाबरोबर उत्कृष्ट गप्पांचा लाभ झाला.

सिंगापूरमध्यें चिनी संस्कृतीचा उच्च विलास नाहीं याचा अर्थ तेथें नाटकें वगैरे पाहायला मिळत नाहींत असें नाहीं. मिळतात, रोज मिळतात – न्यू वर्ल्ड, हॅपी वर्ल्ड आणि लकी वर्ल्ड नांवांचीं तीन क्रीडाकेंद्रें ( ॲम्यूजमेंट पार्क्स ) आहेत, तेथें तीं नित्यनियमानें सुरूं असतात.

हीं क्रीडाकेंद्रें म्हणजे एक प्रकारचीं डिपार्टमेंट स्टोअर्सच – करमणुकीचीं स्टोअर्स ! यांतला एकेक पार्क म्हणजे एकेक विश्व आहे ! तेथें नाट्यगृहें आहेत, नृत्यगृहें आहेत, द्यूतगृहें आहेत, विश्रांतिगृहें आहेत – आणि साधीं दुकानेंहि आहेत. तेथें जाऊन तुम्हीं नृत्य करूं शकतां, नाटक पाहूं शकतां, द्यूत खेळूं शकतां – आणि कांहींच कर्तव्य नसेल तर एखाद्या विश्रांतिगृहांत आसन मांडून कॉफीपानासारख्या मामुली गोष्टींत निमग्न होऊ शकतां. तेथले कांही प्रकार पाहिल्यानतर मुलें घेऊन तेथें जावें असें मी म्हणणार नाहीं, पण एखादें मूल हट्ट करून आलेंच तर त्याचेंहि मन रिझविण्यासाठीं निरनिराळ्या खेळांचे प्रकार – मुलांच्या पार्कमध्यें असतात तसे – तेथें आहेत.

दि युनायटेड कमर्शिअल बँकेचे मॅनेजर श्री. सोनावळकर यांच्याबरोबर मी एका पार्कमध्ये गेलों आणि या विश्वाचें थोडेसें दर्शन घेतलें. आम्हीं बुद्धाला नमन करूनच आंत गेलों ! प्रवेशद्वारापाशींच आंत बुद्धाचें मंदीर आहे. मेणबत्त्या, उदबत्त्या वगैरेंची आरास मांडून आणि आमच्याकडे विशिष्ट अपेक्षेनें पाहून तेथली एक

अबोल सेवक स्त्री आम्हांला बुद्धासमोर प्रार्थना करण्यास निमंत्रण करीत होती. पण चीनमध्यें मध्यंतरीं मातलेल्या एखाद्या सैनिकी टोळीच्या प्रमुखासारख्या दिसणाऱ्या त्या बुद्धानें आम्हांला तशी प्रेरणा दिली नाहीं. हिज मास्टर्स व्हॉईस कंपनीच्या हास्याच्या रेकॉर्डची मला हटकून आठवण करून देणाऱ्या ' हश्या ' बुद्धाच्या मूर्तीनें आमचें अधिक लक्ष वेधून घेतलें. जीवन म्हणजे दुःख हा बुद्धाचा संदेश पहिली मूर्ति अचूक व्यक्त करीत होती, पण अति झालें नि हसू आलें याखेरीज दुसरीचा इतर कांहीं अर्थ मी लावूं शकत नव्हतों. कांहीं कां असेना, त्या पार्कच्या प्रवेशद्वारापाशींच हें बुद्धाचें मंदिर उभारण्यांतली दृष्टि आम्हांला कौतुकास्पद वाटली. आंतला आस्वाद घेण्यापूर्वी तुमच्यावर शक्य तितके सात्त्विक संस्कार केले तर कांही वाईट नाहीं असें चालकांना वाटलें असावें. आंतल्या विलासभूमींत पदार्पण करण्यापूर्वी सर्व विलासांचा त्याग करून सत्यसंशोधनास निघालेल्या बुद्धाचें स्मरण करून देणारी मिस्किल बुद्धीहि या मंदिराच्या स्थापनेंत असावी !

करमणुकीचे चिनी प्रकार पाहण्यास आम्हीं निघालों होतों, पण प्रथमच आम्हांला मले लोकांच्या ' योगेत ' नृत्याचें दर्शन झालें आणि अगदीं समाधान लाभलें. हें नृत्य खरोखर कलात्मक आहे. एक स्त्री आणि एक पुरुष वृंदवादनाच्या तालावर, एकमेकांना किंचितहि स्पर्श न करतां, एकमेकांच्या पावलावर पावलें टाकून एकमेकांच्या अंगविक्षेपांना साथ देत नाचत असतात. दोन व्यक्तींचें हें नृत्य परस्परानुगामी, परस्परानुभावी किंबहुना परस्परानुरक्त असतें, तरीसुद्धां परस्परस्पर्श त्यांत अजिबात नसतो. खरें म्हणजे शरीरस्पर्शाचा अभाव हें त्याचें वैशिष्ट्य असतें. स्त्री आणि पुरुष एक प्रकारच्या तरल लयीनें आंदोलित होतात. एका आंतरिक आकर्षणानें ओढले जातात, अदृश्य धाग्यानें गुंफले जातात तरीहि अलग राहतात. हें नृत्य अतिशय गतिशील, अतिशय आवेगशील, अतिशय चैतन्यपूर्ण आहे. एकमेकांना आव्हान देणारें, एकमेकांच्या कौशल्याची परीक्षा पाहाणारें, एकमेकांच्या वृत्ति चेतविणारें आणि या साऱ्यांतून विमुक्तीचा आनंद प्राप्त करून देणारें असें हें नृत्य आहे. या विमुक्तींतूनच कलात्मकतेचा विशुद्ध साक्षात्कार होतो.

प्रवाही घोळदार पोषाखांतील युवक-युवतींच्या नृत्याचे हे हावभाव पाहिले तेव्हां आपल्याला नृत्य येत नाहीं याची खरोखर खंत वाटली – पूर्वी कधींहि वाटली नव्हती अशी खंत वाटली. पण माझें या नृत्यानें जेवढें चित्त चोरलें तेवढें इतरांचें चोरल्याचें

आढळलें नाहीं. बहुतेक गर्दी आढळली ती कॅबारे-हॉलमधल्या बॉल डान्सिंगकडे. या नृत्यांत स्त्री-पुरुषांच्या आलिंगनाचे सभ्य प्रकारच अधिक. तेच अधिक ओढ लावीत असावेत. किंवा सोनाळकर म्हणाले त्याप्रमाणें, मले लोक गरीब, दरिद्री म्हणून त्यांच्या नृत्याचें महत्त्वहि कमी. कांहीहि असो, मला तरी योगेतच्या मानानें तें बॉल डान्सिंग केंविलवाणें वाटलें – आणि त्या हॉलमध्यें दोन मुलीच एकमेकींना कवटाळून नाचतांना पाहिल्या तेव्हा तर हसूंच लोटलें !

खरी गर्दी लोटलेली दिसली ती चिनी कार्यक्रमांना. चीनचीं वैभवशाली वेषभूषेचीं पौराणिक, ऐतिहासिक नाटकें आणि वास्तवतेचें दर्शन घडविणारीं आधुनिक सामाजिक नाटकें – दोनहि प्रकारचीं नाटकें – रात्रीं ८ ते १२-१२॥ पर्यंत सारखीं सुरू असतात आणि चिनी प्रेक्षक तीं रसिक वृत्तीनें पाहत असतात. ही अर्थात् थोड्या वरच्या वर्गाची करमणूक. गांवरान अगर गल्लीबाज लोकांना ओढ लावणारे प्रकारहि एका थिएटरांत सुरू होते. ( आणि तेथें अर्थात् वरच्या वर्गांचे सभ्य पुरुष – क्वचित् स्त्रिया – पुढचें तिकीट काढून हजर होत्या ! ) अंगावरच्या वस्त्राची ( किंवा वस्त्राभावाची ) कायद्या-प्रमाणेंच शक्य तितकी ओढाताण करून शरीराचें अधिकाधिक प्रदर्शन करणारे विल-क्षण नाच आणि वाग्विलासाचें ओंगळ प्रदर्शन करणारे तमाशे तेथें सुरू होते. ( त्या वाग्विलासांत एकमेकांवर अक्षरशः थुंकण्याचा समावेश होता. ) याहि घाणींत एक रत्न आढळलें. शरीराच्या लय-वलयांचें वेधक दर्शन घडविणारा चॉंगसान ( चिनी झगा ) घालून एक गोरीपान मुलगी स्टेजवर आली आणि सौंदर्याचें अप्रतिम दर्शन घडलें. काळेशार बदामी डोळे, फडफडणाऱ्या चंचल पापण्या, रसरशीत जिवणी, तरतरीत नाक, अतिशय प्रमाणबद्ध चेहरा आणि चवळीच्या शेंगेप्रमाणें भासणारी देह-यष्टि – चैतन्याचें तें समूर्त दर्शन होतें ! बदामी डोळे आणि मुलायम रेशमी अंगकांति यामुळें कमालीच्या आकर्षक भासणाऱ्या चिनी स्त्रिया मीं पाहिलेल्या होत्या. युरोपिअनांचे आर्य देह परिचयाचे होतेच. या दोघांच्या मीलनांतून कसला चमत्कार निर्माण होऊं शकेल याची साक्ष आतां समोर होती. ती मुलगी फक्त गायली, अंगावरचे कपडे फेकून देऊन कधीं नाचावयाला आली नाहीं–आणि तिनें संपादिलेला आमचा आदर कायम राखला.

सिंगापुरांतलें चिनी सांस्कृतिक दारिद्र्य चिनी जनतेला बोचूं लागलेलें दिसतें. या दारिद्र्याचें मूळ उपटून टाकण्यासाठीं सिंगापूरस्थ चिन्यांनीं नांगयांग युनिव्हर्सिटी सुरू

केली आहे. ‘नांगयांग युनिव्हर्सिटी’ म्हणजे दक्षिणेकडचें विद्यापीठ. पण एवढ्या परिमित दृष्टीनें पाहण्याची त्यांची तयारी दिसत नाहीं. एक राष्ट्रीय विद्यापीठ म्हणून त्याच्याकडे सिंगापूरचे चिनी लोक पाहतात. म्हणजे त्यांची दृष्टि शुद्ध सांस्कृतिक दिसत नाहीं, तर राष्ट्रीय दिसते. हें विद्यापीठ सुरू झालें त्याच दिवशीं हंगामी चॅन्सेलर डॉ. चॅंग यांना भेटायला मी गेलों होतों. विद्यापीठाच्या कचेरींत व आसपास शेंकडों विद्यार्थी आणि विद्यार्थिनी जमल्या होत्या. त्यांचे डोळे या जाणीवेनें प्रकाशलेले दिसले. त्यांचा उत्साह नुसता विद्यार्जनाचा उत्साह वाटला नाहीं, तर एक प्रकारच्या आंतरिक सफलतेचा उत्साह वाटला. या विद्यापीठाची प्रस्थापनाच या जाणीवेनें तेजाळलेली होती. हें स्थापन करण्यासाठीं उभारलेल्या लाखों डॉलर्सचा मोठा हिस्सा धनिकांकडून आला हें खरें, पण त्याच्या निधीस रस्त्यांतल्या फेरीवाल्यांनींहि मोठ्या उत्साहानें मदत केली. या विद्यापीठाच्या कल्पनेनें ब्रिटिश अधिकाऱ्यांना फार आनंद झाला असें दिसलें नाहीं. त्यांच्या ‘युनिव्हर्सिटी ऑफ् मलाया’ला ही नसती स्पर्धा असेंच त्यांना वाटलें. (अर्थात् राजकीय धूर्तपणानें त्यांनींहि अखेरीस आशीर्वाद दिलाच.) आणि मले लोकांनी तर आपल्या राष्ट्रीय विद्यापीठाची घोषणा केली. त्यामुळें नांगयांग विद्यापीठ हा एक आव्हानाचा विषय झाला आणि त्याच्या यशस्वितेसाठीं सारी चिनी जमात सज्ज झाली. विश्वविख्यात साहित्यिक डॉ. लिन युटांग यांना विद्यापीठाचें नेतृत्व करण्यासाठीं पाचारण करण्यांत आलें. दुर्दैवानें डॉ. लिन युटांगची वृत्ति आणि प्रकृति या कार्यास योग्य नव्हती. १९५४ सालीं मी त्यांना भेटलों तेव्हा ‘इथलं एकंदर वातावरण फार वादग्रस्त आहे’ असे उद्गार त्यांनीं काढले. त्यांच्या त्रस्त अंतःकरणांतील खंत या उद्गारांत व्यक्त झाली होती. माझ्याशीं बोलतांना त्यांचें चित्त थाऱ्यावर नाहीं असें सारखें वाटत होतें. ते कसल्या तरी काळजीनें व्यग्र दिसले.

डॉ. लिन हे कट्टर कम्युनिस्टविरोधक. लाल चीनकडे राष्ट्रीय अभिमानानें पाहणाऱ्या सिंगापूरनिवासी चिन्यांच्या विद्यापीठाचें नेतृत्व ते कसें करणार याची अनेकांना शंका होतीच. सिंगापूरच्या विद्यार्थ्यांनीं आपली दंगेखोरी अनेकदां भररस्त्यावर पटवून दिलेली होती. लिन युटांग आल्यावर लवकरच ‘ते चिनीपेक्षां अमेरिकनच अधिक आहेत’ असा दुष्ट प्रचार सुरू झाला. पण डॉ. लिनच्या कम्युनिस्टविरोधापेक्षां त्यांचा स्वभावच अधिक नडला असें एका माहितगारानें मला सांगितलें.

विद्यापीठाच्या चालकांशीं अधिकारक्षेत्राच्या व्याप्तीबद्दल त्यांचा मतभेद झाला आणि ते गेले असें समजलें.

नवे (हंगामी) चॅन्सेलर डॉ. चांग यांनीं मला सांगितलें कीं, विद्यार्थ्यांना जगांतलीं आपलीं कर्तव्यें पार पाडण्यास समर्थ करणें एवढाच या विद्यापीठाचा हेतु आहे; पण कर्तव्य म्हणजे काय यावर वाद होऊं शकतोच. विद्यार्थी बाहेर कांहींहि करोत; विद्यापीठांत राजकारण आणण्यास आपण परवानगी देणार नाहीं, असेंहि ते म्हणाले. राजकारणांत अशा सीमारेषा फार काळ टिकत नाहींत.

मलाया विद्यापीठांतील चिनी विभागाचें संवर्धन हें सिंगापूरस्थ चिन्यांचें आणखी एक सांस्कृतिक कार्य. हें नेत्रदीपक ठरलें आहे. या विभागाच्या ग्रंथालयांत अवघ्या दोन वर्षांत १,३०,००० चिनी ग्रंथांची आयात झाली व त्यांत शेंकडों दुर्मिळ आहेत. याचें श्रेय प्रा. के. सी. हो यांना दिलें पाहिजे. त्यांनीं हॅांगकॅांग, फोर्मोसा, जपान वगैरे ठिकाणीं जाऊन हा अफाट ग्रंथसंभार गोळा तर केलाच, पण या ग्रंथालयाच्या इमारतीसाठीं पैसाहि गोळा केला. थोड्याच वर्षांपूर्वी या विद्यापीठांत चिनी विभागच नव्हता – पण आज त्याला एवढें समृद्ध स्वरूप आलें आहे.

के. सी. हो हे अगदीं मितभाषी आहेत, पण ते आपलें ग्रंथालय दाखविण्यास तुम्हांला घेऊन गेले कीं, त्यांची निष्ठा आणि जिव्हाळा तत्काळ प्रतीत होईल. ते प्रत्येक ग्रंथाचा इतिहास सांगत बसणार नाहींत, पण एखादा निवडक ग्रंथ काढतील, त्यांतलें नेमकें पान उघडतील, त्यांतलें चित्र तुम्हांला दाखवतील आणि मृदु स्वरांत सांगतील, " नैसर्गिक देखावे चित्रित करण्याची कला चीनमध्यें दहाव्या शतकाच्या अगोदर नव्हती असें सांगितलं जातं, पण हें चित्र पाहा, आठव्या शतकांतलं आहे." प्रो. हो हे एखादे आदर्श मँडरीन विद्वान् दिसतात. अभिजात चिनी पद्धतीचा पायघोळ झगा ते पेहनतात. त्यांच्याइतका देखणा चिनी मीं अद्याप पाहिलेला नाहीं. यांत अर्थात् आश्चर्य नाहीं. त्यांची आई बेल्जियन होती. पण मिश्र वंशाच्या या पुरुषाचा चीनविषयक अभिमान मात्र आश्चर्यकारक आहे. ते कट्टर कम्युनिस्टविरोधक आहेत. चिअँग कै-शेकच्या सरकारांत संरक्षण मंत्रिमंडळाचे ते सांस्कृतिक सल्लागार होते. पण चीनवर लाल अंमल सुरू होऊनदेखील त्यांचें देशप्रेम यत्किंचितहि खचलेलें नाहीं. ते फार बोलत नाहींत, पण त्यांचे

निळसर घारे डोळे त्यांच्या सखोल वृत्तीची ग्वाही देतात. त्यांचें शिक्षण युरोपांत झालें. तेथें त्यांनी Natural Sciences चा अभ्यास केला. १९४९-५२ च्या कालांत ते हॅांगकॅांग युनिव्हर्सिटीच्या चिनी विभागाचे प्रमुख होते. नंतर चिअँगशीं निकट संबंध आलेल्यांना हॅांगकॅांगमध्यें राहणें कठीण झाल्यामुळें ते ऑस्ट्रेलियाला गेले व १९५३ पासून ते मलाया युनिव्हर्सिटीच्या चिनी विभागाचे प्रमुख आहेत. ते आजवर बुद्धधर्माचे अभिमानी होते. पण आतां त्यांचा कल कन्फ्यूशसच्या मतांकडे वळत आहे. ते मला म्हणाले, "प्राचीन विद्वानांनीं प्रतिपादिलें कीं, बुद्धाचीं तत्त्वें हीं सुंदर पुष्पें आहेत. खरं आहे, पण आज आपल्याला फळभाज्यांची गरज आहे. व्यक्तीचे प्रश्न सोडविण्यास बौद्ध धर्म फार उपयुक्त आहे; पण समाजाचे प्रश्न सोडविण्यास तो कितपत उपयुक्त ठरेल हा प्रश्न आहे."

के. सी. होंच्या पत्नी या त्यांच्या ग्रंथालयाच्या पालिका आहेत. होंच्या उंच प्रमाणबद्ध मूर्तीला शोभेल अशी ही पत्नी आहे. पण त्यांचें सौंदर्य वेगळें आहे. उभट चेहरा, वर वळलेल्या कमानदार भिंवया आणि बदामी डोळे यांमुळें प्राचीन चिनी चित्रांतल्या सौंदर्यवतीप्रमाणें त्या दिसतात. त्यांची अंगकांति मात्र चिनी स्त्रियांच्या कांतीप्रमाणें मुलायम नाहीं आणि त्यांच्या त्वचेचा भरभरीतपणा वारंवार थापल्या जाणाऱ्या पावडरमुळें लोपतहि नाहीं! त्यांच्या या आगळ्या अंगकांतीचा त्यांच्या धर्माशीं कांहीं संबंध असेल का? त्या मुस्लिम धर्माच्या आहेत. बुद्धधर्मीय होंशीं विवाह करण्याची परवानगी देतांना त्यांच्या वडिलांनी 'घरांत डुकराचं मांस शिजवणार नाहीं, असें वचन घेतलें. त्यांनींच मला हें सांगितलें. पतिराज अगदीं मुखबंद, पण या खूप बोलक्या आहेत. होंना इंग्रजी फारसें येत नाहीं (फ्रेंच येतें) आणि यांना तें फक्कड येतें, यामुळें हा फरक विशेषच जाणवला.

नांगयांग विद्यापीठ, के. सी. होंचा ग्रंथालयीन खटाटोप वगैरेंतून चिनी संस्कृतीचा दूधसागर पुढें कसा वाहील तो वाहो, पण आज मात्र बराचसा खडखडाटच आहे. आतां चिन्यांची अस्मिता जागृत झाली आहे, पण अद्याप तिचें स्वरूप राजकीय आहे. सिंगापुरांत ८५ टक्के संख्यावल असूनहि हें बेट मूठभर मलेंचें ही जाणीव याच्या मुळाशीं असेल. शिवाय भारतीयहि आहेत. सिंगापूरचें भविष्य चिनी, मले आणि

भारतीय यांच्या त्रिकोणांत फिरत राहणार, हें सारे जाणते जाणून आहेत. या तिघांतला फरक, मलायाचे एक स्वातंत्र्यवादी नागरिक आणि अर्थशास्त्रज्ञ प्रो. अब्दुल अझीझ यांनीं मोठ्या विनोदी पद्धतीनें मला सांगितला. "चिनी माणूस पैशासाठीं खून करील; मले माणूस तो धर्मासाठीं करील आणि भारतीय प्रेमासाठीं करील." (भारतांत प्रचलित असलेल्या समजुतीची यांत थोडीशी उलटापालट आहे.) पण हा फरक आजमितीस कितीसा वस्तुस्थितिनिदर्शक आहे हें सांगणें कठीण ठरेल. आज सिंगापूरच्या जीवनांत मले लोकांचें स्थान महत्त्वाचें नसेल. मले तरुणाची महत्त्वाकांक्षा अद्याप मोटरच्या (दुसऱ्याच्या) चाकाभोवतींच फिरत असेल. पण मलेच्या धर्मप्रेमाप्रमाणें देशप्रेमहि जागृत होत आहे. आणि भारतीय? वस्तुतः त्यांचें महत्त्व वाढत आहे. हमाली, रखवालदारी आणि दूधधंदा यांच्या पलीकडे त्यांची आतां मजल जात आहे. एका काळीं पायमोजे, पेन्सिली, खेळणीं, औषधें इत्यादींचें हातभर 'डिपार्ट स्टोअर्स' चालविणारा मापक तामीळ अगर मल्याळी आतां 'फर्म' काढण्याची भाषा सहज करतो. पण एकंदरींत भारतीयांची दृष्टि भारताकडे. मायदेशाचींच स्वप्नें त्यांच्या पोटांत. भारत स्वतंत्र झाल्यामुळें आणि सुभाषबाबूंचें वास्तव्य आणि आंदोलन सिंगापुरांत विशेष फिरल्यामुळें असें असेल. कॅथे हॉटेलमध्यें लिफ्टमनचें काम करणाऱ्या एका उत्तर भारतीयानें मला विचारलें,

"साहेब, सुभाषबाबू जिवंत असतील का?"

"मला नाहीं वाटत." मीं म्हटलें.

"पण परवां मद्रासच्या एका पुढाऱ्यानं अगदीं पैजेवर सांगितलं. –"

"अशा पैजा अनेकांनीं मारल्या आहेत –"

"छे छे साहेब, असं म्हणूं नका. सुभाषबाबू खात्रीनं जिवंत आहेत. ते मरतील हें संभवतच नाहीं. मला माहीत आहे. अनेकदां ते जिवावरच्या संकटांत सांपडले, पण प्रत्येक वेळीं कांहीतरी चमत्कार व्हावा तसे वांचले. असा इसम मरणेंच शक्य नाहीं."

* * *

# गा ....३
# सिं पू र

* * * * * * * * * * *

प्रो. अब्दुल अझीझ यांनीं एका सायकाळीं मला जोहोरबारूला नेलें. जोहोरबारू म्हणजे मोठें जोहोर. हें मलायांतलें एक संस्थान आहे; आणि सिंगापूर बेट जोहोरबारूपासून समुद्राच्या एका चिंचोळ्या पट्टीनें विभागलेलें आहे. दोघांची गाठ एका पुलानें घातली आहे. जोहोरबारूला जातांना शहराबाहेरच्या निसर्गाचें दर्शन होतें. दोनहि बाजूंना लहानमोठ्या टेकड्या आहेत आणि मलायाच्या मस्त निसर्गाची शोभा त्यांच्यावर उसळलेली आहे. अर्थात् मानवानें या शोभेवर आपल्या उद्योगाचे घाव घातलेच आहेत. सिंगापूर हें व्यापाराचें ठाणें, पण व्यापाराचें उदिमाशीं निकटचें नातें असल्यानें लहानमोठे कारखाने आजूबाजूला उगवत आहेत, आणि मुंबईबाहेर उपनगरांतून गाडीनें जातांना जसें वाटतें तसेंच कांहीसें – पण किती अधिक स्वच्छ आणि प्रसन्न – सिंगापुराहून जोहोरबारूला जातांना वाटतें. दुतर्फा तऱ्हेतऱ्हेच्या कारखान्यांचें दर्शन होतें. हे कारखाने मुंबईच्या उपनगरांतील कारखान्यांसारखे अवजड अगर दाटीवाटीचे वाटत नाहींत. पण ती उणीव रस्त्यावरच्या गर्दीनें भरून काढलेली असते. ही गर्दी माल खेचून भरलेल्या लॉऱ्यांची आणि ट्रक्सची असते. साहजिकच आहे; मलायांत आयात होणारा आणि मलायांतून निर्यात होणारा बराचसा माल सिंगापूरमार्गें जातो.

जातांना डाव्या बाजूच्या बुकित तिम्हा टेकडीवर एक सपाट भाग दिसतो. प्रो. अझीझ यांनीं कांहींशा तीव्र स्वरांत सांगितलें कीं, येथें पूर्वा जपान्यांनीं एक

युद्धस्मारक उभारलें होतें, आणि युद्ध जिंकल्यावर ब्रिटिशांनीं तें सुरुंग लावून उद्ध्वस्त करून टाकलें. आज तेथें फक्त वर जाणारा रस्ता दिसतो, आणि त्या स्मारकाच्या स्मृतीचा उपमर्द करण्यासाठीं कीं काय, सिंगापूर मोटर-क्लबच्या ऐषआरामी शर्यतीसाठीं त्याचा उपयोग करण्यांत येतो. प्रो. अझीझ यांच्या आवाजांतली चीड बरोबर होती. साम्राज्यवादी ब्रिटिशांकडूनहि सभ्यतेच्या कांहीं संकेतांची अपेक्षा जग करीत असतें. आपल्या विजयाबरोबर पराभवाच्या स्मारकांची कदर करण्याचें औदार्य ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं दाखविलें आहे. लॉर्ड कर्झनला गोऱ्या अवरंगजेबाची अचूक उपमा लोकमान्यांनीं दिली, पण भारतांतील कलावशेषांची जपणूक करणारें खातें त्यानेंच सुरू केलें. मात्र ब्रिटिशांच्या या सहृदय औदार्याची शुभ्र शोभा विजयाच्या लाटेवरची होती असें दिसतें. पराभवाच्या कालांत ही सहृदयता आणि ही उदार बुद्धि ओसरून गेलेली दिसते. जपान्यांनीं सिंगापुरांत ब्रिटिशांचा जो नक्षा उतरविला तो त्यांच्या अंतःकरणाला इतका झोंबलेला दिसतो कीं, जपानवर अखेरीस विजय मिळविलेला असूनहि जपानी पराक्रमाचें दूरान्वयानेंहि स्मरण करून देणारी वस्तु ऐतिहासिक चिन्ह म्हणूनहि शिल्लक राहूं देण्याची त्यांची तयारी दिसत नाहीं. 'एलिझाबेथ वॉक' नामक उद्यानांत सुभाषबाबूंनीं आझाद हिंदी फौजेचें एक स्मारक उभारलें होतें. ब्रिटिशांनी तें उखडून काढलें आणि त्याच्या ठिकाणीं कर्नल लिम बो सेंग नांवाच्या, जपानविरुद्ध गनिमी काव्यानें लढलेल्या एका चिनी सैनिकाचें स्मारक उभारलें.

सिंगापूराहून जोहोरला जातांना पासपोर्ट बरोबर न्यावा लागतो हें मला माहीत नव्हतें. मी पासपोर्ट हॉटेलांत विसरलों होतों. आतां, जोहोरमध्यें प्रवेश करतांना पासपोर्ट दाखवावाच लागतो असें नव्हे, पण एखाद्या पोलीस अधिकाऱ्याची पासपोर्ट पाहण्याची लहर लागलीच तर काय करायचें? अब्दुल अझीझनीं मला पासपोर्ट खिशांत असल्याच्या रुबाबांत वागायची सूचना देऊन ठेवली. असला आव आणून वागण्याचें एरवीं मला जमलें नसतें. पण अझीझ हे जोहोरच्या सुलतानाचे नातेवाईक आणि संस्थानचे पूर्वीचे एक वडे अंमलदार असल्यानें मी निश्चिन्त होतों. पण पोलिसांनीं पासपोर्टची चौकशी केलीच नाहीं. मात्र ती उणीव कस्टम्स-अधिकाऱ्यांनीं पुरेपूर भरून काढली. त्यांनीं आम्हांला चांगलेंच छेडलें. अझीझची मोटर तपास-

ण्याच्या आड त्यांचा रुवाब अगर अधिकार आला नाहीं. मला असें समजलें कीं, सिंगापूरांतून मलायांत येणाऱ्या पेन्सिली–उदवत्त्यासारख्या किरकोळ मालावरहि जकात आकारली जाते, आणि ती वसूल करण्यांत कसलीही दयामाया दाखविली जात नाहीं.

कस्टम्सची ही कडक रीत आम्हां सिंगापूराहून येणाऱ्यांना विचित्र वाटावी हें साहजिकच होतें. सिंगापूर हें 'फ्री पोर्ट' (मुक्त बंदर) आहे; म्हणजे सिंगापूरांत माल आयात करण्यास करपट्टी पडत नाहीं. अर्थात् कांहीं वस्तूंचा याला सन्मान्य (किंवा अधिक अचूक बोलायचें म्हणजे असामान्य) अपवाद आहे. पण सिंगापूरांत येतांना मला कधीं कस्टम्सचा त्रास झाला नाहीं. तो कधींच कोणाला होत नाहीं असें मात्र समजूं नये. सोनाळकरांनीं मला एक मजेदार उदाहरण सांगितलें. त्यांच्या बँकेचा एक अधिकारी एकदां कलकत्त्याहून आला. कस्टम्सच्या कौंटरवर तो आला आणि त्यानें आपला पासपोर्ट दाखविला मात्र, तेथील अधिकाऱ्यांच्या मुद्रेवर गंभीर भाव पसरला. त्यांनीं आपसांत कांहीं नेत्रसंकेत केला, आणि त्यांच्या सामानाची अगदीं उलटसुलट तपासणी सुरू झाली. बिचारा सज्जन होता. त्याचें सामान अगदीं निरपवाद निघालें. पण कस्टम्सचे अधिकारी असा सहजासहजीं पराभव थोडेच पत्करणार? आतां त्याची स्वतःची झडती सुरूं झाली. त्याचे कोटाचे खिसे आंतले बाहेर आले आणि अधिकाऱ्यांच्या हाताची बोटें त्यांचे कोनेकोपरे तपासूं लागलीं. कोटाच्या अस्तरावरूनसुद्धां अधिकाऱ्याचे चौकस हात फिरूं लागले; पण कांहीं सांपडेना. तेव्हां 'तुमचं पैशांचं पाकीट दाखवा' असा हुकूम सुटला. पण सोनाळकरांच्या मित्राचें दुर्दैव त्या दिवशीं जणूं उब्या मारीत होतें! त्याचें पाकीट कलकत्त्याला हरवलें होतें. त्यानें तसें सांगितलें. पण विश्वास कोण ठेवतो? उलट तो पक्का बिलंदर असल्याचा तो पुरावाच ठरला. त्याची, त्याच्या सामानाची पुन्हां अथपासून इतिपर्यंत झडती झाली, तरी कांहीं सांपडलें नाहीं. तेव्हां त्या संत्रस्त गृहस्थानें धापा टाकीत, 'तुम्हीं अशी माझी झडती घेतां आहांत तरी कां? असें विचारलें आणि कारण निघालें तें असें कीं, या सद्गृहस्थाचें आणि सिंगापूरांतल्या एका कुप्रसिद्ध जकातबुडव्या हिरेविक्याचें नांव एकच होतें! हा तो हिरेविक्याच अशा खात्रीनेंच अधिकाऱ्यानीं त्या गृहस्थाची संभावना केली होती!

कस्टम्सची कटकट पार करून आम्हीं समुद्राच्या बाजूनें जाणाऱ्या गर्द वृक्षाच्छादित रस्त्यानें निघालों आणि आमच्या मनावर एकदम निर्मळ शांतीचा वर्षाव झाला. सायंकाळची वाऱ्याची वेळ होती, पण समुद्र डोंगरांनीं वेढलेला होता, आणि त्यांना ओलांडून येणारा चुकार वारा समुद्राच्या शांत स्तब्ध पाण्यावरच्या एखाद्या आळशी लाटेशीं शिवाशिवीचा चुटपुटता खेळ खेळत होता. त्या शांत समुद्रावरचीं जहाजें समाधि लागल्यागत दिसत आणि त्यांच्या शुभ्र शिडांवरचे सोनेरी किरण वातावरणाला फुटलेल्या कोवळ्या धुमाऱ्याप्रमाणें वाटत. डोंगरावरचा भरगच्च निसर्ग स्वतःला विसरून गेलेल्या तत्त्वज्ञान्यासारखा भासत होता, आणि समुद्रकांठच्या हिरवळीवर बागडणारीं मले मुलें प्रसन्नतेचे बोबडे बोल बोलत होतीं ! या वातावरणांत एखादी संतप्त त्राटिकाहि गोगलगाय बनली असती ! आम्ही तर सिंगापूरांतली आणि वाटेंतली धांदल-गडबड मागें टाकून आलों होतों आणि शांततेच्या आधीन होण्यास उत्सुकच होतों.

जोहोरबारू हें शानदार टुमदार शहर मलायाच्या अगदीं टोंकाला एका टेकडीवर वसलेलें आहे. निसर्गाच्या लतापल्लवांनीं तें शृंगारलेलें आहे आणि मले लोकांच्या हास्यानें तें लडिवाळलेलें आहे. पण आम्हांला नीटसें पाहण्यास वेळ नव्हता. आम्हीं त्याला एक वळसा घातला आणि परतलों. जातांना जोहोरच्या स्टेट–ऑफिसचें दर्शन झालें आणि त्याचें असाधारण वास्तुशिल्प नजरेंत भरलें. पाश्चात्य आणि पौर्वात्य वास्तुपद्धतीचें तें एक मनोहर मिश्रण आहे. एका युरोपियन लेखकाला त्यांत भारताचा ताजमहाल आणि लंडनची शेल-मॅक्स इमारत यांचा मनोज्ञ संगम झालेला आढळला आहे. त्या इमारतीच्या नुसत्या दूरदर्शनावर समाधान मानून आम्हीं टेकडीच्या माथ्यावर गेलों. पलीकडच्या झाडीकडे अझीझनीं माझें लक्ष वेधलें आणि त्या झाडींत कम्युनिस्ट क्रांतिकारकांची वस्ती असल्याचें सांगितलें. या घातपाती लोकांच्या इतक्या जवळ आल्याची जाणीव शरीरांतून शहारली. या क्रांतिकारकांची भेट करून देण्याची तयारी अझीझनीं दर्शविली पण तितका वेळ नव्हता. अझीझ कम्युनिस्ट नव्हत; पण ते प्रामाणिक राष्ट्रवादी आहेत आणि त्या निष्ठेसाठीं त्यांनीं आपली बड्या पगाराची आणि बड्या अधिकाराची नोकरीहि टाकल्यामुळें कम्युनिस्टांनाहि त्यांचें कौतुक वाटतें. मलायन कम्युनिस्टांनीं

आपल्या कल्पनाशून्य घातपातीपणामुळें लोकांची सहानुभूति गमावली असें अझीझ मला म्हणाले. कम्युनिस्ट क्रांतिकारक प्रथम प्रथम आगगाड्यांवर हल्ले करीत, त्यामुळें सामान्य जनतेलाच अधिक उपद्रव झाला. त्यांनीं रबराचीं झाडें तोडण्याचा सपाटा चालविला. पण मलायांत गरीब शेतकऱ्यांच्या वैयक्तिक मालकीचीं रबराचीं झाडें खूप आहेत, त्यामुळें हे शेतकरीच कम्युनिस्ट दहशतीला वैतागून गेले. अझीझला कम्युनिस्टांच्या विचारप्रणालीचा इतका संताप येत नाहीं. त्यांच्या बेअक्कलीपणाची कींव त्यांना अधिक येते. कम्युनिस्टांच्या कटवादी हालचालींनी अर्थपूर्ण बनलेल्या त्या झाडीचें गूढ दर्शन घेऊन आम्हीं परत फिरलों. परततांना जोहोरच्या बाजारांतून आलों. तेथें उघड्यावर बसून फराळ करण्याची सोय असलेल्या उपहारगृहांची रांगच रांग दिसली. अझीझ म्हणाले, ‘ हीं उपहारगृहें इतकीं उच्च आणि स्वच्छ आहेत कीं मोठमोठे सधन आणि चोखंदळ गृहस्थसुद्धां येथें येऊन भर चवाठ्यावर येथल्या चमचमीत पदार्थांवर हात मारण्यांत धन्यता मानतात आणि सौभाग्यवतीपाशीं त्यांची तारीफ बिनधोक करतात ! बिनधोक, कारण सौभाग्यवतींनासुद्धां ती मान्य आहे ! ’

मला सिंगापूरच्या ‘ चायना टाऊन ’ची आठवण झाली. १९५४ सालीं एडवर्ड हंटरनी मला तेथें नेलें होतें. रात्रीं दहाचा सुमार. चिनी फेरीवाले आपलीं फिरतीं उपहारगृहें घेऊन उभे होते. चौकोनी गाडयांवर काठ्या उभारून त्यांना आडव्या दोऱ्यांवर बेडूक, बदकें, कोंबडया वगैरे प्राणी प्रथम कढईत व नंतर गिऱ्हाइकाच्या पोटांत जाण्यासाठीं टांगलेले होते. गाडयांच्या भोंवतालच्या बाकडयांवर बसून लोक खात होते. पलीकडे कांहीं मुलें मोठ्यांत सामील होऊन कसला तरी फाशासारखा खेळ खेळत होतीं. हा जुगाराचाच एक प्रकार आहे आणि चिन्यांना त्याचा विलक्षण नाद आहे, मला जपान्यांच्या पाचिंको–वेडाची आठवण झाली. एकीकडे डोळे तेथली असामान्य स्वच्छता न्याहाळीत होते आणि थक्क होत होते. दिवसा हेच रस्ते गर्दीनें, गडबडीनें आणि कचऱ्यानें भरलेले असतात; पण आतां रात्रीं त्याच ठिकाणीं व्यवस्था आणि स्वच्छता यांचा गाढा अमल दिसला. सिंगापूरला समुद्रकांठीं बेडॉक नांवाचें एक खेडें आहे. आम्हीं तें दुपारीं पाहिलें तेव्हां तेथें शुकशुकाट होता. पण सोनाळकर म्हणाले, ‘ सायंकाळीं लोक फिरायला येतात तेव्हां खाद्यपदार्थांच्या चिनी फेरीवाल्यांची आणि त्यांचे चविष्ट पदार्थ फस्त करणारांची नुसती थाप लागते. ’

एका रविवारीं सकाळीं मी सोनाळकरांबरोबर समुद्रकांठीं हिंडायला गेलों होतों. तेव्हां समुद्रकांठ समुद्रस्नानासाठीं लोटलेल्या स्त्री–पुरुषांनी, तरुण–तरुणींनीं आणि मुलांमुलींनीं नुसता भरून गेलेला दिसला, त्यांत कांहीं गोरे होते, पण वहुसंख्य मले अगर चायनीज–बहुतेक चायनीज! (मी हॉंगकॉंगला 'रिपल्स बे' वर असें दृश्य पाहिलें होतें, पण तेथें गोऱ्यांची विशेष गर्दी.) मी विचार करूं लागलों : आमच्या मुंबईत समुद्रस्नानासाठीं अगर वनविहारासाठीं अशा साप्ताहिक 'ट्रिप्स' काढणारे खरोखर किती भेटतील ? त्यांतली वस्तुस्थिति अशी आहे कीं, आपण भारतीय लोक फार गंभीर आहोंत. सतरा पिढ्यांच्या दुःखांचें आणि अठरा तत्त्वज्ञानांच्या सिद्धान्तांचें ओझें शिरावर घेऊन आपण वावरत असतों. हिंदुस्थान ते जपान असा फेरफटका केल्याबरोबर माझ्या प्रथम ध्यानांत आली ती गोष्ट अशी कीं, इकडे भारतीय आणि तिकडे जपानी हे दोन गंभीर, दुःखमग्न लोक आहेत. यांच्या दरम्यानचे ब्रह्मी, थाय, चिनी, इंडोनेशियन वगैरे लोक आनंदी आहेत. जीवनाचा मुक्त आस्वाद घेण्याची त्यांची तयारी आहे. हास्यरसावर त्यांची भक्ति आहे. मनमुराद खिदळण्याची त्यांना संवय आहे. त्यांची वृत्ति अधिक दिलखुलास असते आणि त्यांचें वर्तन अधिक स्वैर, आनंदी असतें. हा असा फरक कां ? एक कारण असें सांगतां येईल कीं, जपान आणि भारत यांतलें जीवन कष्टाचें असतें. आग्नेय आशियावर निसर्गाची जितकी कृपा आहे तितकी या दोन देशांवर नाहीं. मधले देश अनेक दृष्टींनीं मागासलेले असतील, पण अन्नाविणा उपाशी असा तेथें सहसा कोणी सांपडणार नाहीं. दुसरें कारण असें सांगतां येईल कीं, मायावादानें भारताला आणि आत्महत्त्यावादानें जपानला जसें ग्रासलें आहे तसें या देशांना ग्रासलेलें नाहीं. बुद्धाचें तत्त्वज्ञानहि या लोकांच्या जीवनासक्त प्रकृतीवर मात करूं शकलेलें नाही. सिंगापूरची गोष्ट तर अधिक निराळी आहे. सिंगापूरचें जीवनमानच उच्च आहे. लोकांचें उत्पन्न वरच्या दर्जाचें आहे. सोनाळकर आपल्या मोलकरणीला महिना सुमारें दोनशें रुपये देत होते. शिवाय या लोकांच्या संपत्तीला शोकरसांत आनंद शोधणाऱ्या तत्त्वज्ञानानें पछाडलेलें नाहीं. उलट जिवाचें सिंगापूर करण्याची वृत्तीच प्रभावी आहे!

शहरांत – विशेषतः – व्यापारी विभागांत चिन्यांची गजबज फार. चिनी लोक तर सारखे कष्ट करण्यांत रमलेले! या भागांत गुदामें आणि वखारी यांचा भरपूर पसरा प्रसारा आहे – आणि सिंगापूरचीं गुदामें आणि वखारी यांचें वर्णन न केल्यासच बरें.

गंजलेलें लोखंड आणि बुरसटलेले पेटारे यांचा एकमेकांच्या उरावर चाललेला कारभार म्हणजे या वखारी. त्यांतूनच घाण पाण्याचा नाला वाहतो ! पण या वकाली भागावर रात्रीं निऑन लाइटसची माया पसरली म्हणजे एखादा पुराणोक्त चमत्कार झाल्यासारखें वाटतें ! दिवसा कष्टाळू दिसणारे चिनी रात्रीं 'हॅपी वर्ल्ड' सारख्या करमणूक केंद्रावर जाऊन बेहोश होतात याचें कारण ही निऑन लाइट्स्ची किमया तर नसेल ?

सिंगापूरचा हा भाग जितका वकाल – क्वचित् कंगाल – वाटतो तितकाच युनिव्ह-र्सिटी-बॉटनिकल गार्डनचा सुंदर समृद्ध वाटतो. लहानमोठ्या टेकड्यांवर वसविलेला हा भाग मलायाच्या निसर्गानें मनापासून सजविलेला आहे. तेथल्या कोवळ्या तृणांकुरांच्या गालिचांवर उभीं असलेलीं मस्त डेरेदार झाडें, लग्नमंडपांतील गालिचांवर ठसक्यानें उभ्या असलेल्या विहीणबाईप्रमाणें किंवा चिमखोर करवल्याप्रमाणें दिसतात ! मलायांत वनमहोत्सवाचा खटाटोप करावा लागत नाहीं. उलट जंगल तोडून मनुष्य-वस्तीसाठीं जागा मोकळी कशी करावी हा तेथें प्रश्न असतो. मलायांतलें जंगल हें मानवाला सतत सतावणारें आव्हान आहे. सिंगापूरांत साहेबानें या आव्हानाचा जोरदार स्वीकार केला. पण जरा शहराबाहेर गेलें, कीं दूरच्या डोंगरावर जंगल माजलेलें दिसतें – आणि या जंगलाचा पट्टा थेट बँकॉकपर्यंत पोंचलेला आहे या भौगोलिक सत्याची आठवण होते.

सिंगापूरहून विमानानें उड्डाण करतांना खालीं पाहिलें, कीं या जंगलाच्या अवताराची कल्पना येते. सिंगापूरच्या आसपास बरींच बेटें आहेत, आणि तीं सारीं जंगलानें यथेच्छ व्यापलेलीं आहेत. जणूं वनश्रीचे ताटवेच समुद्रांतून वर आले आहेत ! सिंगापूर भोंवतालचीं बेटें पाहतांना मला जाकार्तापासचीं बेटें आठवत होतीं. दोघांच्या दर्शनांत कोण फरक ! सिंगापूरपासचीं बेटें डोंगराळ, तर जाकार्ताजवळचीं सपाट – त्यांना वाळूचें सफेत वलय. मध्यें घरेंदारें, शेती, माडझाड यांचा सुसंस्कृत उल्हास. वाळूच्या किनाऱ्यावर समुद्राच्या लाटांच्या पांढऱ्या-शुभ्र फेसाचा सारखा खेळ. वाटायचें कीं हीं षोडश उपचारांचीं तबकेंच पृथ्वीनें आदिशक्तीच्या पूजेसाठीं तयार केलीं आहेत ! उलट सिंगापूरचीं बेटें म्हणजे प्रलयंकारानें इकडे तिकडे फेकलेले जंगलाचे तुकडे ! त्यांच्याकडे पाहिलें म्हणजे निबिड, घनदाट काळ्या भीतीचाच साक्षात्कार होतो. मनांत येतें, येथें विमान कोसळलें तर !

मलायांतलें जंगल डोंगरावर उसळावें हें ठीकच, पण बॉटनिकल गार्डनमध्येंहि त्याचा संचार आढळला तेव्हां चकित झालों. त्याचें असें झालें कीं, गार्डनच्या आवारांत माणसाचा हात जेथें रोजच्या रोज फिरणें अशक्य झालें तेथें जंगल फोफावलेंच. फक्त त्याला कुंपण घालण्यांत आलें आहे. सिंगापूरची बॉटनिकल गार्डन ही कँडी अगर कलकत्ता येथील बॉटनिकल गार्डन्सप्रमाणें आशियांत विख्यात आहे. विषुववृत्तावरच्या निसर्गानें तिच्यांत विशेष मस्ती ओतली आहे. पण तिचें एवढेंच वैशिष्ट्य नाहीं. जगांतले सारे ताल वृक्ष आणि जगांतलीं सारीं निवडुंगें यांचे नमुने येथें आढळतात. तालवृक्षाचे अनेक चमत्कार येथें आहेत. आडवे, उभे, एकमेकांत भिनून वाढणारे, एकाचें खोड आणि दुसऱ्याच पर्णसंभार अशी अलौकिक युति साधणारे-एक ना अनेक प्रकार येथें आहेत. तशींच निवडुंगें ! रानोमाळ माजणाऱ्या या क्षुद्र वनस्पतींचें युरोपियनांना कोण वेड ! त्यांनीं त्यांचे शेकडों नमुने जमविले आहेत आणि शेकडों कलमें बांधलीं आहेत. सारे प्रकार येथें आहेत. कित्येकांचे कांटे रेशमासारखे मृदु आहेत तर कित्येकांचीं क्वचित् केव्हां फुलणारीं नाजुक फुलें सुरंगीच्या कळ्याप्रमाणें फांद्यावर अंगावरच्या शहाऱ्याप्रमाणें शोभत आहेत ! ऑर्किड्स हा युरोपियनांच्या आवडीचा आणखी एक खास विषय. सौ. अझीझनांहि त्यांची फार आवड. त्यांनीं मला मोठ्या अगत्यानें ऑर्किड्सच्या विभागांत नेलें. प्रत्येक ऑर्किडकडे त्या किती नाजुक, प्रेमळ, अधीर दृष्टीनें पाहात होत्या ! त्यांनीं एका निळ्या फुलांच्या रोपट्याकडे माझें लक्ष वेधलें नि सांगितलें कीं, त्याला तीन चार हजार मलयन डॉलर्स पडतात ! माझ्या साशंक चर्येकडे पाहून त्या म्हणाल्या, “ अहो, खरंच ! त्यांचीं फुलं वर्ष वर्ष टिकतात. ” ऑर्किड म्हणजे मुळांत बांडगूळ; पण युरोपिअनांनीं त्यांच्यावर प्रयोग करून त्यांचें श्रीफुलांत रूपांतर करून टाकलें. या फुलांच्या वेडानें अनेकांच्या चेकबुकांतले चेक वाऱ्यावर फडफडले आहेत ! त्यांच्या कथा ऐकल्या कीं, मला आइन्स्टाइनची एक कथा आठवते. ते अमेरिकेंत राहावयास आले तेव्हां त्यांच्या एका सधन भक्तानें त्यांना मेजवानी दिली. मेजवानीच्या टेबलावर शोभेसाठीं ऑर्किड्स् ठेवलीं होतीं, आइन्स्टाईनना वाटलें ही खाण्याचीच वस्तु–त्यांनीं तीं फुलें चक्क तोंडांत घातलीं ! सापेक्षतावादाचा हा एक झकास प्रयोगच !

सिंगापूरच्या बोटॅनिकल गार्डनमध्यें मुलांना एक खास आकर्षण आहे. तें म्हणजे वानर. यांचे कळपच्या कळप आहेत. मुलांच्या हातांतले चणेफुटाणे सलगीनें उचलून

खातात – आणि हा आनंद लुटण्यासाठीं मुलें या बागेकडे धांव घेतात. वानरांना खाऊ घालण्यासाठीं मुलांना बोटॅनिकल गार्डनमध्यें नेणें हा सिंगापूरच्या अनेक आईबापांचा साप्ताहिक कार्यक्रम होऊन बसला आहे. अर्थात् तरुणतरुणी इकडे निराळ्याच कारणानें आकर्षित होत असतील. प्रेमळ वार्तालापांना योग्य असे अनेक ' स्पॉट्स् ' येथें आहेत. वृद्ध लोक इकडे फिरण्यासाठीं झुकत असतील; पण बागेचें छापील आकर्षण अभ्यासूंसाठीं आहे – कारण या बागेंत मोटमोठे दुर्मिळ वृक्ष आहेत. मला या बागेंत माझे कोंकणांतले विसरलेले अनेक मित्र भेटले – आणि पांच वर्षांपूर्वी युरोपहून येतांना अलेक्झांड्रियामध्यें वटवृक्ष पाहून जें वाटलें तसें कांहींसें वाटलें. तो वटवृक्ष पाहून मला पूर्वेची पूर्वसूचना मिळाली होती. आतां सिंगारपूरांतील बागेंत कोंकणांतले अंजन-कांचनासारखे वृक्ष पाहून आशियाच्या ऐक्याचा एक विलक्षण साक्षात्कार झाला !

बोटॅनिकल गार्डनमधलें तळें म्हणजे एक ' विश्रब्ध ' ठिकाण आहे. तेथली शांति सात्त्विक वाटते आणि नीरवता शालीन वाटते. त्या मानानें पीअर्स जलाशयाचा थाट म्हणजे प्रमत्त प्रमदेचा तोरा वाटतो. हा जलाशय म्हणजे सिंगापूरचें एक सौंदर्यभूषण गणलें जातें आणि त्याचें कोडकौतुक देखील तसेंच केलें जातें. शौकीन् फॅशनेबलांचें तें फिरायला जायचें ठिकाण आहे – आणि म्हणून कीं काय, त्याच्या प्रवेशद्वारापाशींच मानवंदना देण्याच्या थाटांत तालवृक्ष उभे केलेले आहेत. किंबहुना तालवृक्षांच्या रांगांचा सौंदर्यसाधनासाठीं या जलाशयाकांठच्या उद्यानांत जितका उपयोग करून घेतलेला दिसला तितका मीं इतरत्र कोठेंहि पाहिलेला नाहीं. हा जलाशय पाहिल्या-बरोबर विहार तलावाची आठवण होणें अपरिहार्य आहे. पण या जलाशयाच्या चारी बाजूंस टेकड्या आणि मलायाचा निसर्ग आणि हौशी मानव यांच्यामधील सहकार्यानें त्याची अप्रतिम सजावटहि झाली आहे. पलीकडच्या टेकड्यांवरील मोकाट झाडीकडे पाहतांना मला एक अनपेक्षित अनुभव आला. या झाडीवर युरोपमधील पानगळीच्या ऋतूंतला सोनेरी पिवळा रंग प्रमदेच्या गर्भरेशमी वस्त्रांतील नाजूक जरतारीप्रमाणें सळसळला. विषुववृत्ताकडील निसर्गावर ही सळसळ पाहण्याची अपेक्षा मीं कधीं बाळगली नव्हती. निसर्गाच्या चमत्कारांत निसर्गाच्या लहरीचाहि समावेश केला पाहिजे हेंच खरें !

सिंगापूरच्या हॉ पार व्हिलांत मी गेलों तेव्हां सुसंस्कृत माणसाचा जीव कासावीस व्हावा असेंच हें प्रकरण आहे असें मला आढळून आलें. सौंदर्यावर एवढा विलक्षण

अत्याचार आजवर कोणी बुद्धिपुरस्सर – म्हणजे नशापाणी न करतां – केला नसेल. चिनी इतिहास, पुराणें, दंतकथा इत्यादींच वेड लागलेल्या एखाद्या माणसाला खूप दारू पाजावी, मग त्याला विंचू डसवावा आणि नतर त्याच्यावर कल्पनाविलासाचे हिप्नॉटिक प्रयोग सुरू करावे म्हणजे तो जें जें बडबडेल त्याला सिमिटांत साकार करून ठेवलें तर असलें प्रदर्शन तयार होईल! चीनच्या इतिहासांत, पुराणांत, लोककथांत ज्या ज्या चित्रविचित्र गोष्टी आढळतात त्यांची अतिशय बेढव, भडक, बीभत्स आवृत्ति काढून तीं सिमिटानें बांधून येथें ठेवलेली आहे. या प्रदर्शनांत अत्याचारांचीं आगरें आहेत, विलासदृश्यांचीं दालनें आहेत, ओंगळ कल्पनांचीं प्रात्यक्षिकें आहेत. माणसाच्या डोक्याचे सर्प, बदकाच्या डोक्याचे मानव, बेडकाच्या पोटाचे सर्पराक्षस, मगरीच्या तोंडांत लांडगा, लांडग्याच्या जबड्यांत कोकरूं, माणसांसारखे व्यवहार करणारे पशु, पशूसारखे वागणारे मानव, बुद्धासारखा दिसणारा वानर, मर्कटासारख्या चेष्टा करणारे देव – झपाटलेल्या बुद्धीनें पिरगळलेल्या कल्पनेचीं अशीं मुलखावेगळीं चेष्टितें म्हणजे ही 'टायगर बाम' बाग! हें सारें पाहतांना डोळे फिरले आणि डोकें दुखायला लागलें. बामचीच गरज भासायला लागली! आपल्याकडे 'अमृतांजन बाम' जसा प्रसिद्ध आहे तसा आग्नेय आशियांत 'टायगर बाम' आहे. हा बाम विकून गडगंज बनलेल्या एका चिनी नवकोटनारायणानें, पैशाचें काय करावें हें न समजल्यामुळें, हा उद्योग करून ठेवलेला आहे. मला वाटतें, जी डोकेंदुखी त्यानें आपल्या बामनें बरी केली (हीहि त्याची एक झपाटलेली कल्पनाच!) ती कोणत्या तरी स्वरूपांत परत करण्याचा निश्चय येथें प्रकट झाला आहे. कदाचित् डोकेंदुखी चालू राहावी आणि आपलें गिऱ्हाईक अतूट राहावें म्हणून ही युक्ति असेल. (म्हणजे हा खर्च जाहिरातखातीं!)

सिमिटाच्या या अमानुष जंगलांत एकाच ठिकाणीं माझी दृष्टि जरा स्थिरावली आणि डोक्यांत कांहीं प्रकाश पडतो आहे असें वाटलें. तो भाग म्हणजे नरकलोकाचीं प्रात्यक्षिकें. म्हणजे पापी, लोभी, कपटी, खुनी, छिनाल लोकांना परमेश्वराच्या दरबारीं कोणता न्याय मिळतो – त्यांना उकळत्या कढईत कसें लोटतात, मगरींनीं भरलेल्या समुद्रांत कसें फेकतात, करवतीनें त्यांचें शरीर कसें छिनतात, त्यांना घाण्यांत घालून कसें कुटतात वगैरेचीं प्रात्यक्षिकें. अर्थात् हें पाहतांना माझं डोकें ताळ्यावर राहिलें याचें कारण नरकपुरीच्या चिनी कल्पना थेट आपल्यासारख्याच आहेत.

## बांधाबांधीची शोकांतिका ! . . .

या ‘टायगर बाम’ बागेबद्दल मीं एक दंतकथा ऐकली ती तिच्याइतकीच विचित्र आहे. असें म्हणतात कीं, एका ज्योतिष्यानें तिच्या निर्मात्याला सांगितलें, कीं ज्याला सुखी, समृद्ध जीवन चिरकाल जगायचें असेल तर त्यानें एक अट पुरी केली पाहिजे. त्यानें एकसारखें कांहीं तरी बांधीत राहिलें पाहिजे. सतत बांधीत राहिलें पाहिजे. त्यांत तिळमात्र खंड पडतां कामा नये. त्यानें अनेक बंगले बांधले. इमारती बांधल्या. अखेर ही बाग उभारण्याची कल्पना त्याला सुचली. या उद्योगांत तो असतांना एक दिवस दुर्दैव घडलें. बांधकामाची पाहणी करतां करतां त्याचा पाय घसरला नि तो पडला. बेशुद्ध झाला. त्या दिवशीं त्याचा मुकादमहि आजारी होता. त्याचा फायदा घेऊन कामगारांनीं कामचुकारपणा केला नि बांधकामांत खंड पडला ! झालें ! अट मोडली आणि त्याच्या इतिश्रीची सुरवात झाली. त्या दुखण्यांतून तो उठलाच नाहीं. त्याचा धंदाहि बुडाला. शिल्लक राहिली ती ही बाग ! – हें विद्रूप स्मारक !

हॉंगकॉंगला रिपल्स बेवर किल्ल्यासारखी दिसणारी एक इमारत आहे. तिच्याबद्दलहि थेट अशीच दंतकथा ऐकली.

× × ×


ठाणे.
अनुक्रम 22609 दि.
क्रमांक 221 नों: दि:

# य
# सा गां
# व....

* * * * * * * * * *

गतवर्षी मीं सायगांवच्या विमानतळावर एक तास घालविला होता. सायगांवला भेट देणें म्हणजे पैसे खर्च करून संकटाला निमत्रण देणें होय, एवढी खात्री पटविण्यास हा एक तास पुरेसा होता. त्यावेळीं तेथल्या संडासाचें दार उघडल्याबरोबर घाणीचा जो भपकारा नाकांत शिरला होता त्याची आठवण अद्याप अस्वस्थ करते. विमानतळावरच्या लाउंजमधल्या, उतारूंना बसण्यासाठीं ठेवलेल्या मूळच्या किंमती आणि ऐषआरामी कोच-सोफ्यांची अवस्था ओसाडगांवच्या इनामदारासारखी झाली होती आणि रेस्टोरों-मधल्या वेटर्सच्या 'युनिफार्म' ची अवकळा पाहणाराच्याहि नजरा शरमेनें दुसरीकडे वळवीत होती. आजकाल विमानतळ म्हणजे शहराच्या वैभवाचे दर्शनी नमुने बनले आहेत – कारण विमानें आणि विमानतळ हे आपल्या इभ्रतीचेच साक्षीदार अशी प्रत्येक राष्ट्राची खात्री झालेली आहे ! अशा परिस्थितींत सायगांवच्या विमानतळाची ही अवस्था, तर खुद्द शहराची काय असेल ?

मी अर्थात् सहानभूतीनें विचार करण्यास तयार होतों. सात वर्षांच्या यादवी युद्धाचें सांवट या विमानतळावर पडलेलें आहे हें लगेंच लक्षांत आलें. १९५४ सालीं मी प्रथम रंगूनला गेलों तेव्हां मोठमोठ्या इमारतींत बॉंबनें पाडलेलीं भगदाडें आणि त्यांत सांचलेली घाण पाहून मी एकदम शांततावादी बनलों होतों. बॉंबनें जायबंदी झालेलीं शहरें मी १९५१ सालींच पाहिलीं होतीं. पण बेलग्रेडमधल्या

उध्वस्त इमारती साफ पाडून तेथली जागा साफ केलेली दिसली आणि लंडनमधल्या पडक्या इमारतींतले उकिरडे साफ करून तेथें छोट्या बागा करण्याची व्यवस्था केलेली दिसली. पण युद्ध म्हणजे गरीब राष्ट्राचें युगायुगीचें पाप अशी रंगूननें खात्री केली, आणि त्या अनुभवाची पुनरावृत्ति गतवर्षी सायगांवच्या विमानतळानें केली !

पण यंदा पाहतों तों त्या विमानतळाचा कायापालट झालेला ! रंगूनच्या नव्या मिंगाला डॉन ( मंगलधाम ? ) विमानतळाप्रमाणें तो वैभवशाली नाहीं, पण जुन्याच्या तुलनेनें तो राजेशाहीच म्हटला पाहिजे आणि सायगांवच्या दर्शनानें तर मी प्रसन्नच झालों. प्रेसिडेंट झिएमचे एक सल्लागार वूल्फ लेजेन्स्की यांजपाशीं बोलतांना, सायगांव हें साऱ्या आग्नेय आशियांतलें स्वच्छ सुंदर शहर आहे असे मीं उद्गार काढले, तेव्हां ते म्हणाले, “Isn't it? But you see, they have cleaned up the city during the last year.” ( खरंच ! पण ही साफसफाई गेल्या एका वर्षांतली आहे, बरं का ! ) म्हणजे विमानतळाचें नवदर्शन हें शहरांतल्या परिवर्तनाचें प्रतीकच होतें !

सायगांवच्या या नव्या स्वच्छतेची आंतरराष्ट्रीय प्रसिद्धि सिनेमा-सृष्टींतील एका घटनेनें अगोदरच केलेली होती. ( सिनेमाइतकें प्रसिद्धीचें दुसरें साधन कोणतें ? ) त्यांचें असें झालें. ग्रॅहम ग्रीनच्या ‘ क्वाएट अमेरिकन ’ या, व्हिएतनामच्या यादवी युद्धकालीन जीवनावर आधारलेल्या कादंबरीचें फिल्मीकरण करण्यासाठीं हॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक जो मॅकीविश् सायगांवला आले. त्या कादंबरींत वर्णिलेलें घाणेरडें सायगांव आपल्या दृष्टीस पडेल अशी त्यांची अपेक्षा होती; नव्हे, खातेऱ्यानें भरलेल्या सायगांवचें दर्शन घेण्यासच ते उत्सुक होते. पण त्यांची फार निराशा झाली. नदीच्या कांठावर माजलेल्या लक्तरांच्या झोंपड्या त्यांना कुठें दिसेनात. रस्त्यावरचे उकिरडे त्यांना आढळेनात. त्यांना या झोंपड्या बांधाव्या लागल्या आणि कृत्रिम उकिरडे माजवावे लागले !

अर्थात् रंगून – मनिलाच्या मानानें सायगांव भाग्यवान्. त्याच्यावर दुसऱ्या महायुद्धांत बॉबवर्षाव झालाच नाहीं. जपानचें आक्रमण आलें तेव्हां सायगांवच्या साम्राज्यवादी प्रभूंच्या देशांत हिटलरला वश झालेलें व्हिशी सरकार अधिकारावर होतें. त्यानें मित्रत्वाच्या नात्यानें ( म्हणजे निमूटपणें ) सायगांव जपान्यांच्या स्वाधीन केलें — आणि जपान्यांनीं चंबूगवाळें आवरण्यापूर्वींच फ्रेंच सरकार दोस्तानुकूल

झालेलें असल्यानें (आणि जपान्यांनीं मनिला लढविलें तसें सायगांव लढविण्याचें ठरविलें नसल्यानें) दोस्तांनाहि सायगांववर हवाई हल्ला चढविण्याचें कारण पडलें नाहीं. पॅरिसचें सौंदर्य पाहात असतांना व्हिशी सरकारची शरणागति एक प्रकारें उपकारकच ठरली असा विचार मनांत आला होता. या पूर्वेकडच्या पॅरिसचें सौंदर्य न्याहाळतांना तोच विचार पुनः मनांत आला. सायगांववर मध्यंतरीं आलेली अवकळा फ्रेंच साम्राज्यवादाच्या बेअक्कली धोरणामुळें आली. घ्यायची तेथें माघार घेऊन फ्रेंचांनीं व्हिएतनामी स्वातंत्र्यवाद्यांशीं वेळींच समेट केला असता तर इंडोचीनवर सात वर्षांच्या यादवी युद्धाचें जें अकारण संकट ओढवलें तें ओढवलें नसतें, आणि सायगांवची दुर्दशा (भौतिक आणि नैतिकहि) उडाली नसती. ही दुर्दशा दूर करायला झिएमच्या सरकारला अडीच-तीन वर्षें लागलीं, आणि अद्याप तरी ती दुर्दशा पूर्णपणें दूर झाली असें थोडेंच आहे ?

पण अभिजात सौंदर्यशालिनीचें सौंदर्य लहानसहान आजारानें नष्ट होत नाहीं, तसेंच सायगांवचेंहि नष्ट झालेलें नाहीं. खरोखर सायगांवचें सौंदर्य एका अर्थानें अभिजातच आहे. तें फ्रेंचांच्या अभिजात सौंदर्यबुद्धींतून निर्माण झालेलें आहे. ब्रिटिशांची सज्जनता सुएझचा कालवा ओलांडून इकडे आल्यावर मंदावते, तशी फ्रेंच साम्राज्य-वाद्यांची सौंदर्यबुद्धिहि मंदावत असेल, पण ती साफ नष्ट मात्र कधींच झालेली नाहीं. ब्रिटिशांना आपल्या राजकीय तत्त्वज्ञानाचा आणि राज्यपद्धतीचा जसा अभिमान वाटतो, स्पॅनिश पोर्च्युगीझांना आपल्या धार्मिक निष्ठेचा जसा अभिमान वाटतो तसा फ्रेंचांना आपल्या संस्कृतीचा आणि सौंदर्यदृष्टीचा वाटतो. हा अभिमान घेऊनच फ्रेंच आपल्या वसाहतींत गेले. साम्राज्य गेलें तरी हरकत नाहीं, पण शेक्स्पीअर गमावणार नाहीं असे कार्लाईलनें उद्गार काढले. पण ते एका लेखकाचे उद्गार; राजकारण्याचे नव्हत. ब्रिटिशांनीं आपल्या साम्राज्यांत इंग्रजी भाषेचा प्रसार केला तो मुख्यतः राज्यव्यवस्थेचें साधन म्हणून. पण फ्रेंचांनी फ्रेंच भाषेचा केलेला प्रसार अधिक निरपेक्ष होता. आपापल्या साम्राज्यांत ब्रिटिशांनीं शहरें वसविलीं आणि फ्रेंचांनींहि वसविलीं. या दोघांच्या शह-रांतील फरक त्यांच्या साम्राज्यवादाच्या दृष्टिकोनांतील फरकाचा द्योतक ठरेल. ब्रिटि-शांनीं शहरें वसविलीं म्हणजे काय केलें ? तर शहराच्या एका भागांत लंडनची प्रति-कृति निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि इतर भागांत कोंदट, कचरट, रोगट चाळी

खचून भरल्या ! लंडनमधील कोंदटपणाचा सूड घेण्याचा हा विकृत प्रकार तर नव्हें असें अनेकदां वाटतें. उलट फ्रेंचांनीं आपल्या वसाहतींत सुदर शहरें वसविलीं. निदान सायगांवचें सौंदर्य फ्रेंचांना धन्यवाद देण्यालायक आहे. उत्तरेचें 'हनोई' तर सायगांवहून सुंदर आहे असें तेथून निर्वासित झालेल्या एका मित्रानें सांगितलें. यांत अर्थात् आपल्या शहराविषयींच्या आतुर ओढीचा भाग असेल ; पण हनोई सायगांव-इतकें सुदर असलें तरी मला पुरे !

सायगांवच्या सौंदर्याचा आत्मा फ्रेंच आहे. पॅरीसच्या बुलेव्हार्डसारखे मस्त बुलेव्हार्ड सायगांवला आहेत. बुलेव्हाड हा खास फ्रेंच शब्द आहे आणि तो ऐकल्या-बरोबर आपल्या नजरेसमोर डौलदार वृक्षांच्या रांगांनीं दुतर्फा डोलणारा चांगला ऐसपैस रस्ता येतो. पॅरीसच्या अनेक रस्त्यांना मधोमध फूटपाथ असतो आणि त्यावरहि वृक्षांच्या रांगा असतात. असे चौपदरी रस्ते सायगांवला अनेक आहेत. सुदैवानें सायगांवला फ्रेंचांनीं केवळ मस्त बुलेव्हार्डच बांधले नाहींत, त्यांच्या कांठानें नुसत्या डौलदार इमारती उभारल्या नाहींत, तर त्या इमारतींत दुकानें थाटणाऱ्या दुकानदारांना सौंदर्यदृष्टि दिली आणि ती त्यांच्या मालाच्या कलात्मक मांडणींत दिसते.

पण सायगांवच्या रस्त्यांचें खरें आकर्षण म्हणजे 'काफेजू'— चहाकॉफीचीं दुकानें. १९५१ सालीं लंडनहून परीसला आलों, फूटपाथवर छोटीं छोटीं कलदार टेबलें आणि खुर्च्या मांडून गिऱ्हाइकांना पेयांबरोबर मोकळी हवा पुरविणारीं हीं विश्रांतिगृहें पाहिलीं, आणि इंग्रजांच्या व फ्रेंचांच्या जीवनदृष्टींतला फरक लक्षांत आला. फूटपाथवरील टेवलें–खुर्च्यांची मजा सायगांवच्या हवेंत अर्थात् किती तरी अधिक. पॅरीस, जिनीवा, मिलान, रोम येथील रेस्टोरॅंसमोरील फूटपाथवरील खुर्चीटेबलाशीं बसून, रस्त्यावरच्या जीवनाचे प्रवाही रंग-ढंग न्याहाळतांना आस्वादिलेला पेयपानाचा आणि अन्नग्रहणाचा आनंद मीं स्मृतींत जतन करून ठेवला आहे. सायगांवच्या अनुभवानें या आनंदाच्या रंगरेषा खुलविल्या.

एका काळीं, म्हणजे अलीकडेच दोनतीन वर्षांमागें, सायगांवची प्रसिद्धि, 'आशियाचें वेश्यागृह' अशीच जवळजवळ झाली होती. रात्र पडली, दिवसाचे कर्तव्यबंध सैल झाले, आदल्या रात्रीच्या स्मृतींनीं मनाचे रखवालदार बेसावध बनले

म्हणजे शिष्टा-संभवितांच्यासुद्धां मोटारी वेश्यावस्तीच्या दिशेनें धांवूं लागत. रमण-रमणींचा विलास ( म्हणजे कुविलास ) त्या काळीं भर रस्त्यावर उसळे किंवा उधळे ! सोजिरांच्या सोयीसाठीं सरकारनेंच वेश्यागृहें उघडलीं होतीं, आणि व्हिएतनामच्या कारभारांत माजलेली लांचलुचपत इतकी शिरजोर आणि बेशरम कीं मोठमोठे पोलिस अधिकारी अशा वेश्यागृहांचे चालक म्हणून खुशाल वावरत !

पण दक्षिण व्हिएतनाममध्यें प्रेसिडेंट झिएमची राजवट सुरू झाली आणि वेश्या-व्यवसायाच्या उच्चाटनास सक्त सुरवात झाली. झिएम हे निष्ठावंत कॅथॉलिक आहेत. नैष्ठिक ब्रह्मचारी आहेत. अध्यक्षीय प्रासादांत त्यांच्या खाजगी वास्तव्याच्या विभागावर 'स्त्रियांना प्रवेश नाहीं' अशी पाटी असल्याचें एका माहीतगारानें सांगितलें ! अधिकारावर आल्याबरोबर त्यांनीं सायगांवच्या जीवनाची सफाई सुरू केली, आणि त्यांत स्त्रीपुरुषसंबंधांच्या सफाईला प्राधान्य दिलें.

सायगांवचें फ्रेंच वैशिष्टय बुलेव्हार्ड आणि काफे एवढ्यापुरतेंच मर्यादित नाहीं. तुमच्या हॉटेलच्या खिडकींतून जरा बाहेर नजर टाका — हो, पण आधीं ही खिडकीच मुळीं फ्रेंच पद्धतीची आहे. तिचे घडया पडणारे शटर्स फ्रेंच पद्धतीचेच आहेत. खोलीचा अर्धा अधिक भाग व्यापणाऱ्या ज्या ऐसपैस पलंगावरील मुलायम गादीवर लोळत तुम्ही खिडकीबाहेर बघण्याचा प्रयत्न करीत आहांत तो पलंग फ्रेंचांच्या रंगेल रसिकतेचा साक्षीदार आहे. येथें सारें कांहीं फ्रेंचच. फर्निचर, टेलिफोन, टेबल लॅम्प फ्रेंच ! न्याहारी फ्रेंच ! जेवण फ्रेंच ! (म्हणून दहीं मिळतें !) तेव्हां तुमची नजर खिडकीबाहेर जाण्यापूर्वीच ती फ्रेंचमय झालेली असेल. तिला समोरच्या बिल्डिंगचे सज्जे आणि त्यांच्या कठड्यांना दिलेला तपकिरी रंग फ्रेंच पद्धतीचाच दिसेल आणि पॅरीसमध्यें चेस्टनटच्या फांद्यांची पालवी इमारतींच्या खिडक्यांतून आंत डोकावतांना दिसते तशी तेथें रस्त्याकांठच्या चिंचेच्या झाडाची पालवी डोकावतांना दिसेल. बाहेर रस्त्यांत जा अन् दुकानांच्या खिडक्यांतून आंत नजर टाका. तेथल्या जिनसांची झिलई फ्रेंच स्त्रियांच्या सौंदर्यप्रमाणेंच आसवणारी आहे असें आढळून येईल. फ्रेंच स्त्रियांच्या सौंदर्यप्रमाणेंच व्हिएतनामी स्त्रियांचें सौंदर्य विख्यात आहे. फ्रेंचांनीं त्यांना प्रसाधनाची गोडी लावली आहे. म्हणून सायगांवच्या तुदो रोडसारख्या रस्त्यांतून जातांना सौंदर्याच्या किनारीवरून

चालल्यासारखच वाटतें. इतके सौंदर्यासक्त लोक त्या बेढब स्वरूपाच्या काळ्या मोटरी कां पसंत करतात नकळे! फताडच्या शिंगांच्या एखाद्या बसक्या म्हशीप्रमाणें दिसणाऱ्या मोटरी मिरविणाऱ्या या लोकांच्या सौंदर्यासक्तींत अनुकरणाचीच ओढ जबरदस्त दिसते. (कारण या मोटरी फ्रेंच बनावटीच्या आहेत.) या मोटरी वापरायला फार चांगल्या म्हणे! कुरूप स्त्रिया लग्नाच्या बायका म्हणून फार चांगल्या असा अभिप्राय एच. जी. वेल्सनें व्यक्त केला होता त्याचाच हा संचार म्हणायचा!

एका ब्रिटिश लेखकाचा सायगांवला 'पूर्वेचें पॅरीस' म्हणण्यास सक्त विरोध आहे. हें कसलें पॅरीस? याला फार तर फ्रांसमधील एकाद्या गांवठी शहरांच्या रांगेंत बसवावें असें त्यांचें म्हणणें आहे. अगदीं बरोबर. सायगांवांत रु कातिनात, अगर बुलेव्हार्ड बोनार्ड असे पांचसहाच रस्ते आहेत, कीं जे पॅरीसच्या 'रु द ला पे' अगर 'शांसे लेज' ची आठवण करून देतील. पॅरीसच्या नोत्रदामची तुलना सायगांवच्या कॅथेड्रलशीं वेडेपणाच्या झटक्यांतहि होणार नाहीं. पॅरीसच्या इमारतीं-इमारतींवर इतिहासाचा शिक्का उमटलेला असतो, तसा फ्रेंचांनीं अगदीं अलीकडे वसविलेल्या सायगांवच्या इमारतींवर नाहीं. पण पूर्वेकडचें पॅरीस अगर व्हेनिस या तुलना लक्षणेनेंच घ्यायच्या. मनिला हें अमेरिकन शहर आहे असें मीं म्हटलें तेव्हां होनोलुलूची प्रवासांत भुरलेली एक स्त्री मला म्हणाली, Manila is no more New York than Bombay is London! खरेंच आहे. न्यूयॉर्कच्या आकाशभेदी इमारती मनिलाला मुळींच नाहींत. आणि पॅरीसच्या मॉपार्नासच्या कलाविश्वाला सायगांवमध्यें स्थान नाहीं. पण रु कातिनात, बुलेव्हार्ड बोनार्ड अगर पार्लमेंट हाऊस किंवा अध्यक्षीय प्रासाद यांसमोरचा विस्तार यांत पॅरीसची मिजास आहे. त्याचप्रमाणें एकाच विस्तृत बुलेव्हार्डच्या एका टोंकाला म्युनिसिपल हॉल आणि दुसऱ्या टोंकाला म्युनिसिपल थिएटर (आजचें पार्लमेंट हाऊस) बांधण्यांत पॅरीसची योजनाबुद्धि आहे. (नव्या राज्यकर्त्यांनीं थिएटरचें पार्लमेंटगृह केलें यांत कसली योजना नाहीं, आणि कांहीं विनोदबुद्धीहि नाहीं – तो केवळ जागेच्या तुटवड्याचा सवाल!)

मुख्य म्हणजे वातावरण आणि तें वर्णून सांगणें कठीण आहे. पण एवढें खरें कीं सायगांवांत पॅरीसचें रूप पाहण्याचा प्रयत्न फ्रेंचांनीं केला. हा प्रयत्न अर्थात् सर्वांगीण नव्हता – आणि नव्हता तेंच बरें झालें. नाहींतर त्यांनीं सायगांवांत 'प्लास द

कॉनको ' सारखं वर्तुलाकार केंद्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला असता, आणि मग दिल्लीच्या कनॉट सर्कसनें कॉनकोचा जसा यथास्थित सूड उगविलेला आहे तसा सूड सायगांवांत उगवला गेला असता ! कॉनकोसारख्या स्थळांची प्रतिकृति करतां येत नाहीं. पण फ्रेंचांनीं सेन नदीप्रमाणें सायगांव नदीचा उपयोग कां करून घेतला नाहीं ? पॅरीस सेन नदीच्या दोनहि तीरांवर दिमाखानें उभें आहे तसें सायगांव कां उभें नाहीं ? सायगांव नदीची एक बाजू गांवाला माळ असावा तशी अगदीं ओकीबोकी कां ? या प्रश्नाचें उत्तर उघड आहे. येथें व्यापारी दृष्टीनें सौंदर्यदृष्टीवर मात केली आहे. सायगांव बंदर म्हणून वसविण्यांत आलें आहे. बंदरांत मोठमोठ्या बोटी येणार. शहराच्या मधून वाहणाऱ्या नदीवरील पुलांचा अडथळा त्यांना कसा सहन होणार ? म्हणूनच सायगांव नदीच्या एका बाजूला नागर वैभव आणि दुसऱ्या बाजूला भाताचीं खांचरें आणि त्यांच्यामध्यें चर्चचा माथा उंचावून पाहणारें एकादें बापुडें खेडें अशी सोयीस्कर विभागणी झाली !

सायगांव नदीला शहराच्या बाजूला धक्का आहे, आणि सायंकाळीं लोक या धक्क्यावर फिरायलाहि येतात. धक्क्यावरून पूर्वीं ट्रॅम धांवत असे. यावरून तो बांधण्याशीं सौंदर्यदृष्टीचा फारसा संबंध नसावा एवढें स्पष्ट होईल. आज ट्रॅम नाहीं, पण धूळ आहे आणि या धुळींतच लोक फिरतात. धक्क्याचा उपयोग लहानलहान बोटी, पडाव, मचवे लागण्यासाठीं होतो. सायगांवच्या सौंदर्यांत भर टाकण्यासाठीं या धक्क्याचाच किती तरी उपयोग करतां येईल. या धक्क्यावरची धूळ झाडली आणि तेथें लादी बसवली, मधून-मधून फुलझाडांनीं शृंगारलेलीं उपहारगृहें उघडलीं, विविध आकारांचे आणि विविध प्रकारचे फुलझाडांचे ताटवे तयार केले, एकाददुसरा पोहण्याचा आखाडा बांधला, सायंकाळीं नदींत फिरून येण्यासाठीं लॅंचेस ठेवल्या आणि नदीच्या मधोमध पाण्याचें एखादें कारंजें सुरू केलें तर जिनीवाची आठवण होण्यास हरकत नाहीं. जिनीवाच्या का दु मॉं ब्लॉं-प्रमाणेंच येथें धक्क्याला समांतर जाणारा एक रस्ता आहे. वृक्षांच्या रांगांनीं आणि छायांनीं तो शोभिवंत बनलेला आहे. त्याच्या एका टोंकाला एक उद्यानांकित स्मारक आहे. अर्थात् ऱ्होन नदीप्रमाणें येथें सायगांव नदीचें सरोवर बनलेलें नाहीं. पण सायगांव नदीचें पात्र विशाल आहे आणि तिच्या प्रवाहाला वेधक वळणें आहेत. समोर आल्पसच्या आकर्षक रांगा नाहींत आणि मॉं ब्लॉंचें जादूमय शिखर नाहीं.

पण निळ्या क्षितिजाशीं हिरवें मीलन करणारा भातशेतीचा वाऱ्यावर डोलणारा विस्तार कांहीं कमी सुंदर नाहीं. निसर्गाकडून कांहीं उणीव नाहीं, पण व्हिएतनामच्या मागस अर्थशास्त्राला स्वित्झर्लंडचे अथयावत् विभ्रम पेलतील का एवढाच प्रश्न आहे.

मॅजेस्टिक हॉटेलच्या भोजनगृहांतून दृष्टि नागमोडी प्रवाहावर आणि तिच्या विशाल वांकणांत सामावलेल्या हिरव्या संसारावर फिरते. तुम्हांला नदीवरील वाहातुकीची आवड आहे का? मग तुमची नजर, होड्या, गलबतें, लॉंचेस्, बोटी, पायलट-नौका यांचा एकमेकांशीं चाललेला काटकोनी लपंडाव आणि या साऱ्यांतून अंग चोरून जाणाऱ्या हौशी नावा यांच्यावर खिळेल. तुम्हांला राखी रंगाच्या नौदलाचें आकर्षण आहे का? मग तुमचें लक्ष नदीच्या पात्रांत उभ्या असलेल्या तजेलदार आणि ताकदवान युद्धनौकावर फिरेल आणि या इवलाल्या राष्ट्रापाशीं एवढी नाविक संपत्ति असावी याचा तुम्हांला अचंबा वाटेल — आणि मग लगेच अमेरिकन साहाय्याची आठवण होऊन तो अचंबा विरून जाईल! तुम्हीं कवि असाल तर तुमची नजर नदीच्या संथ पाण्यांत पडलेल्या आकाशांतील आणि कांठावरील दृश्यांच्या प्रतिबिंबाचा वेध घेईल आणि त्यांच्या नाजूक चिंतनांत निमग्न होईल. तुम्हीं रसिक असाल तर सायगांव बंदरांत उभ्या असलेल्या बोटींच्या हिरव्या, निळ्या, नारिंगी वसनांचें सौंदर्य तुमच्या नजरेंत भरेल — आणि एखादी नव्यानें आलेली बोट धक्क्याला लागण्यापूर्वी वर्तुळाकार वळतांना आपल्या चारी अंगांचें दर्शन घडविते तेव्हां तुम्हांला सौंदर्यस्पर्धेत भाग घेणाऱ्या युवतीच्या लावण्यप्रदर्शनाचें स्मरण होईल. माझी नजर मात्र नदीच्या नागमोडी वळणाचा वेध घेई आणि येणाऱ्या अगर जाणाऱ्या बोटीबरोबर प्रवास करूं लागे. सुएझ कालव्यांत ज्याप्रमाणें अनेक बोटींना एकामागें एक प्रमाणशीर अंतरावर राखून त्यांचा काफिला बनवावा लागतो तसाच येथें बनवावा लागतो.

हॉटेल मॅजेस्टिकच्या बाहेर पडून तुदो रोडनें सरळ गेलें, कीं कॅथेड्रालच्या आवारांत प्रवेश होतो. मी गेलों तेव्हां हें सारें आवार राष्ट्रध्वजांनीं भरून गेलें होतें. चार-सहा दिवसांपूर्वीच राष्ट्राध्यक्ष झिएम् यांच्या प्राणांवर घाला घालण्यांत आला होता, त्यांतून ते सुखरूप बचावल्याबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठीं ध्वजांची ही उभारणी करण्यांत आली होती. झिएमनीं देशांतली अशांतता दूर करून सुरक्षितता प्रस्थापित केली असली तरी त्यांच्या गुप्त शत्रूंचा संचार अद्याप व्हिएतनामांत सुरूंच आहे याचा

यावरून मला बोध झाला. २० जुलै १९५४ च्या जिनीवा-कराराप्रमाणें व्हिएतनामचे उत्तर आणि दक्षिण असे भाग पाडण्यांत आले. उत्तर भाग कम्युनिस्टांच्या स्वाधीन करण्यांत आला होता आणि दक्षिण भाग त्यांच्या ताब्यांत जाण्यास फक्त दोन वर्षांचा अवधि आहे अशी प्रत्येकाची खात्री झाली होती. दोन वर्षांनीं उभय विभागांत सार्वत्रिक निवडणूक होऊन आपल्याला कोणतें सरकार हवें ( कम्युनिस्ट कीं राष्ट्रवादी ) हें ठरविण्याचा जनतेला अधिकार देण्यांत आला होता, आणि या निवडणुकींत कम्युनिस्टांचाच विजय होणार याविषयीं कोणांसहि – जिनीवा-करारावर सह्या करणारांनांहि शंका नव्हती. कम्युनिस्टांचा दरारा आणि दंडेलीच तशी होती आणि त्यांचा दबदबाहि ! फ्रेंचांना पाणी पाजणारे म्हणून त्यांचा भाव फार वाढला होता. फ्रेंचांचा द्वेष इतका सार्वत्रिक होता, कीं साधा रिक्शावाला फ्रेंच गिऱ्हाइकाला रिक्शांत घ्यायचें नाकारी ! कम्युनिस्टांची हेरगिरी करण्यास अनेक लोक राजी असत. सर्वसामान्य लोक तर त्यांना भयंकर घाबरून होते. अमेरिकनांच्या ग्रंथालयांत जाऊन पुस्तकें वाचायलाहि ते डरत. न जाणों, आपलें नांव कम्युनिस्टांच्या काळ्या यादींत जाईल आणि उद्यां ते आले कीं आपली कंबक्ति भरेल ही भीति ! आणि कम्युनिस्ट येणार यावद्दल खात्रीच ! फ्रेंचांनीं इतकी घाण करून ठेवली होती, व्यभिचार आणि लांचलुचपत यांचा इतका बुजबुजाट झाला होता, कीं तो निपटून काढणें फक्त कम्युनिस्ट दंडेलीलाच आहे असें सारेच मानीत ! वरोबरच आहे. उत्तरेकडून आलेल्या निर्वासिताला रोज वांटावयाच्या बारा पिआस्त्रेपैकीं पांच मंत्र्याच्या खिशांत गेल्यानंतर लोकांनीं पाहावें तरी कोणाच्या तोंडाकडे ? वेश्यागृहाचें उद्घाटनच पोलीसप्रमुखानें केल्यावर आयाबहिणींच्या अब्रूच्या संरक्षणासाठीं जावें तरी कोणाकडे ? व्हिएतनाममध्यें माजलेली घाण दूर करणारा एक महाभाग दक्षिणेंत उमटेल आणि तो, फ्रेंच, कम्युनिस्ट आणि तटस्थ तज्ज्ञांच्या मतावर मात करून एक स्वतंत्र आणि स्वच्छ व्हिएतनाम निर्माण करील असें भविष्य कोणीं वर्तविलें असतें तर त्याला कोठें पोंचवायचें हें लोकांनीं अचूक सांगितलें असतें ! असा कोणी पुरुषच तेव्हां आढळांत नव्हता. झिएमचें नांवहि तेव्हां फारसें कोणाच्या ऐकिवांत नव्हतें. जिनीवा-करारानंतर कांहीं कालांत लिहिलेल्या तीन पुस्तकांत मला झिएमच्या नांवाचा नुसता निर्देशहि आढळला नाहीं. पण ध्येयनिष्ठा, प्रामाणिकपणा, तळमळ, कळकळ, त्याग, धैर्य यांची जणूं मूर्त असलेला

हा इवलासा पुरुष पुढें आला आणि त्यानें अल्पावधींतच दक्षिण व्हिएतनामाचा अक्षरशः कायापालट केला. प्रथम त्यानें फ्रेंचांचा कांटा काढला, नंतर बाओदाईचा समाचार घेतला, मग फ्रेंचांच्य मर्जीनें मातलेले धर्मपंथ फोडून काढले, लगोलग कम्युनिस्टांचा पंचस्तंभ उखडला-आणि हें सारें करीत असतांनाच सरकारी कारभाराची, यंत्रणेची आणि सार्वत्रिक जीवनाची शुद्धि आरंभिली.

सायगांवला जाणाऱ्यानें सायगांवचा दुसरा चेहरा ( त्याला म्होरा म्हणणेंच अधिक योग्य ) पाहिलाच पाहिजे. हा चेहरा अधिक व्यग्र, अधिक मग्न, अधिक आक्रान्त आणि अधिक मुक्त सुद्धां आहे. हा चेहरा दिवसा आक्रसतो तर रात्रीं खुलतो. या चेहऱ्याच्या भालप्रदेशावर काळजीच्या रेषा कोरलेल्या असतात, तर त्याचे नेत्र प्रकाशतात आणि मुख हास्यानें उमलतें. संध्याकाळीं तुम्हांला थोडा वेळ असेल तर एक टॅक्सी ठरवा आणि जरूर या चेहऱ्याच्या दर्शनासाठीं जा. टॅक्सी ठरवा, कारण सायगांवात टॅक्सी स्वस्त मिळते — आणि अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती सोडून देतां येते. ह्या चेहऱ्याच्या दर्शनासाठीं, किंवा अधिक अचूक बोलायचें म्हणजे परिचयासाठीं, जातांना कसलेहि पाश असतां कामा नयेत. टॅक्सी सोडून देतां येते, मालकीची मोटर जवळ बाळगावी लागते. येथें जातांना आपल्या मालकीचें कांहींहि ( लाजलज्जा सुद्धां ) शाबूत राहील अशी खात्री बाळगूं नये. सायगांवचा हा दुसरा चेहरा म्हणजे चोलोन — सायगांवचें जुळें भावंड. वडील भावंड म्हणणें अधिक योग्य. कारण फ्रेंचांनीं सायगांवची उभारणी करण्यापूर्वीच व्हिएतनामांत आलेल्या चिन्यांनीं चोलोनचा चौथरा बांधला होता. चोलोन तुमचें स्वागत करीत नाहीं, तुम्हांला सर करतें; तुम्हांला आलिंगन देत नाहीं, मगरमिठींत घेतें. आपली सारी लौकिक-अलौकिक शक्ति एकवटून तें तुम्हांला बोलावीत असतें. तुमच्या पंचेंद्रियांना तें चेतवीत असतें. बुलेव्हार्ड गॅलिएनीनें तुमची टॅक्सी, मोटारी, मोटर-सायकली, बसेस् इत्यादि वाहनांशीं शिवाशिवी खेळत निघाली, कीं अल्पावधींतच चोलोनचे रंग, ढंग आणि तरंग तुमचें लक्ष प्रथम वेधूं आणि नंतर बेसावध करूं लागतात. इमारतीवरचे निऑन-लाइट्स नजरेला भुरळ घालतात. कुठून कुठून येणारे वास आणि स्वाद ( आणि घाणसुद्धां ) नाकाभोंवतीं रिंगण धरतात. नानाविध आवाज कानांत गर्दी करतात. खाद्यपदार्थांच्या दर्शनानें जिभेला पाणी सुटतें — आणि स्पर्श ? चोलोनच्या

रस्त्यावर केव्हां कोणाचा स्पर्श होईल, कांहीं सांगतां येणार नाहीं. कधीं तो गोड असेल, कधीं अभद्र असेल, बहुतेक वेळां तो इतका बेपर्वा असेल, कीं त्याला धक्काच म्हणावें लागेल !

चोलोन म्हणजे विरुद्ध गोष्टींचें संमेलन ! कारण चोलोन सर्वांना साद घालीत असतें, सर्वांना भुरळ पाडण्याची ईर्षा धरून असतें. येथें रावाचा वडेजाव आहे, रंकाला आराम आहे. येथें पिकल्या पानाला रस येतो आणि हिरव्या पानाच्या रेषा खुलूं लागतात ! येथें नर करणी करूं शकतो आणि नारीला राणी बनतां येतें ! येथें सर्वांची कदर आहे आणि सर्वांची सोय आहे. आणि म्हणूनच येथें विरुद्ध दृश्यांची गर्दी आहे. एकाद्या प्रासादतुल्य उपाहारगृहांत तुम्हांला चिनी पाकशास्त्राचे राजेशाही चमत्कार आढळतील तर पलीकडेच फूटपाथवर चिनी फेरीवाला आपल्या चालत्या गाडीवरील उकळत्या कढईतून बेडूक, मासा आणि खेंकडा यांचा चविष्ट चमत्कार तुमच्या डोळ्यांदेखत काढून दाखवील. एकीकडे एकाद्या पेयगृहांतील झुंबरांचा झगमगाट डोळे दिपवीत असेल तर दुसरीकडे एकाद्या कोंदट खोलींत तेलवत्तीच्या मिणमिणत्या उजेडांत धार काढणाऱ्या चिन्याच्या किडकिडीत हातांत सुरीचें पातें क्षीणपणें लकलकत असेल. कधीं एकदम शेजारून गेलेल्या युवतीच्या अत्तराचा सुवास दरवळेल तर कधीं पिकलेलें दुरियन, कुजलेला मासा आणि फुटलेला घाम यांचा दर्प त्यांत मिसळेल ! तुम्हीं असे एखाद्या रेस्टोरॉंच्या लिफ्टपाशीं उभे असतांना लिफ्टमधून बाहेर पडणारी नाइट क्लबची नृत्यांगना तुम्हांला ऐटींत धक्का मारते, आणि तुम्हीं तिच्याकडे पाहिल्याबरोबर तिच्या सौंदर्याच्या दिमाखांत तुमचा संताप विरघळून जातो. उलट रस्त्यावर वजनदार कावडीबरोबर हिंदकळत जाणारा चिनी हमाल तुमच्या अंगावर कोलमडतो आणि तुमच्याकडे पाहून शरमेनें असा कांहीं हसतो, कीं त्याच्या चेहऱ्यावरच्या त्या फुललेल्या सुरकुत्यांत तुमचा राग कोठें नाहींसा झाला याचा तुम्हांला पत्ताच लागत नाहीं ! एकीकडे काळ्या चोळणा–बंडींतल्या चिनी बायका आपले काळे दांत विचकून घोगरें–गोलमाल चिनी बोलत असतात तर दुसरीकडे एकाद्या ऐटबाज कॅफेच्या स्टॅंडवरून एखादी गायिका आपले शुभ्र दांत आणि लाल ओंठ यांनीं उजळलेला चेहरा उमलवीत एखादें चिनी भावगीत कोमलपणें खेंचीत असते ! इतक्यांत आपले विशाल खांदे उघडे टाकलेली एखादी अमेरिकन स्त्री

पायघोळ पायजमा आणि पायघोळ झगा यांनीं संपूर्ण झांकलेल्या व्हिएतनामी तन्वांगीशीं वातचीत करीत असलेली दिसते. एकीकडे सोडतीच्या दुकानांत आपला पैसा आणि प्राण पणाला लावण्यासाठीं तरूण-तरुणी आतुर झालेल्या असतात तर दुसरीकडे डोळ्यांवर कारकुनी चष्मा चढविलेला एकादा चिनी चौ आपल्या उजाड खोलींतल्या एकुलत्या एका वाटोळ्या टेबलापाशीं बसून व्याजबट्टयाचा हिशेब करीत असतो. असें हें विरुद्ध दृश्यांनीं रंगलेलें आणि विरुद्ध प्रकृतींनीं रांधलेलें जग आहे. या जगांत तुम्हीं या; काय करा तें मी सांगत नाहीं, पण परत जातांना तुम्हीं भरलेल्या मनानें आणि रिकाम्या खिशानें जाल एवढें मी नक्की सांगतों!

या साऱ्या विरुद्ध दृश्यांच्या गजबजींतून एकच सत्य बाहेर पडतें, एकच संस्कार उमटतो, एकच संवेदना प्रभावी ठरते. पैसा! येथला सारा उद्योग, सारा गडबडाट, सारी धांवपळ पैशाच्या मागें असते आणि याचें कारण एकच. या जगाचीं सूत्रें चिन्यांच्या हातीं आहेत. चोलोन हें पूर्णतः चिनी आहे. व्हितनाममध्यें दहा लाख चिनी आहेत, त्यांतले पांच लाख चोलोनमध्यें राहातात. हे चिनी म्हणजे आग्नेय आशियांत पसरलेल्या चिन्यांचाच एक लोंढा. त्यांची प्रकृति तीच. उद्योग तोच. ध्येयहि तेंच. इतर चिन्यांप्रमाणेंच हेहि एकाच गोष्टीचा विचार करतात: पैशाचा! एकाच गोष्टीचा अभिमान बाळगतांत: चिनी वंशाचा. एकाच राष्ट्राचा ध्वज मानतात: चीनचा. आग्नेय आशियांतला चिनी तुम्हांला कधीं एकटा आढळणार नाहीं. (एकटा असला तर लग्न करील. शक्य तर चिनी स्त्रीशीं, नाहींतर मिळेल तिच्याशीं. मग भाराभर मुलें निर्मील आणि सारीं मुलें चिनी भाषा, चिनी वंश, चिनी राष्ट्र यांचा अभिमान बाळगतील आणि अंतिम ध्येय पैशाचें मानतील!) चिनी हा कळप करून राहणारा प्राणी आहे—स्वजातीयांचा कळप! या कळपांत तो जगेल, या कळपांत तो जेवेल, या कळपांत तो अफू झोंकेल, या कळपांत तो सट्टा खेळेल, या कळपांत तो सल्लामसलत करील, या कळपांत इतर जमातींवर मात करण्याचे मनसुबे रचील, स्वजातीयांच्या संरक्षणाच्या योजना आंखील, या कळपांतले क्लब, या कळपांतल्या शाळा, या कळपांतल्या संघटना — काय तें या कळपांत करील. या कळपाचा अविभाज्य भाग म्हणूनच तो जगेल आणि मरेल! एकाच गोष्टीसाठीं तो बाहेर जाईल: पैसा. चिनी जाईल तेथें तो चिनीस्थान स्थापील. या

चिनीस्थानवर हव्या त्या यशस्वी सत्तेचा ध्वज फडकविण्याची त्याची तयारी असते (आज तर त्याच्या खिशांत दोनतीन राष्ट्रध्वज असतात : माओचा, चिअँगचा आणि ज्या राष्ट्रांत हें चिनीस्थान असेल त्या राष्ट्राचा !) पण या चिनीस्थानवर अंमल चिन्यांचा आणि या चिनीस्थानांत अभिमान चीनचा. चोलोन हें आग्नेय आशियांतल्या अशा अनेक चिनीस्थानांतलें एक चिनीस्थान आहे -- एक अतिशय जुनें आणि अतिशय महत्त्वाचें !

चोलोन याचा अर्थ 'बडा बाजार'. या बाजारावर सत्ता चालते चिन्यांची. त्यांच्याच हातांत व्हिएतनामच्या अर्थव्यवस्थेची बरीचशीं सूत्रें आहेत. व्हिएतनामच्या दहा लाख चिन्यांच्या हातांत देशाचा दोन तृतीयांश व्यापार-उदीम आहे- यांतल्या बहुतेकांनीं व्हिएतनामचें नागरिकत्व स्वीकारलेलें नाहीं. आग्नेय आशियांतील चिन्यांचें नागरिकत्व हा आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचा एक यक्षप्रश्न बनून राहिला आहे. एकवार चिनी तो कायमचा चिनी असा चीनचा पुरातन दंडक आहे. तो माओचा आहे, तसाच चिअँगचा आहे आणि त्याला प्रत्येक चिन्याचा हार्दिक पाठिंबा आहे. प्रत्येक चिनी कोठेंहि असला तरी स्वतःला चीनचा नागरिक समजतो. तो दुसऱ्या देशांत जातो, तेथें गबर बनतो, पण त्या देशाला आपली निष्ठा कधींच अर्पण करीत नाहीं. पूर्वी हे देश स्वतंत्र नव्हते तेव्हां या निष्ठेचा प्रश्न महत्त्वाचा ठरला नाहीं. तेव्हां चीनहि कमकुवत होता, त्याला स्वतःच्या शक्तीची, श्रेष्ठत्वाची जाणीव नव्हती आणि म्हणून चिन्यांच्या चीननिष्ठेंत फारस धोका नव्हता. पण आतां चीन प्रबल बनला आहे. नुसता प्रबल नव्हे, तर कम्युनिस्ट आणि कम्युनिस्टांच्या आक्रमक विचारप्रणालीनें भारलेला ! आग्नेय आशियांतल्या नवस्वतंत्र राष्ट्रांना हा मोठाच धोका निर्माण झाला आहे. त्यांतच माओ-चिअँगच्या लढ्याची आग पडली आहे. या परिस्थितींतला एकेक घटक हवी तितकी स्फोटक समस्या निर्माण करण्यास पुरेसा होता. हे सर्वच घटक एकवटल्यावर काय झालें असेल याची कल्पनाच करावी.

चिन्यांनीं त्या त्या देशाचें नागरिकत्व स्वीकारावें असा यावर उपाय सुचविण्यांत आला आहे. अर्थात् तेवढ्यानें प्रश्न सुटतो असें नव्हे. नागरिकपत्र स्वीकारण्याचा तांत्रिक विधि मोठ्या समारंभानें स्वीकारून अंतःकरणांत राष्ट्रद्रोहाची गुप्त कट्यार

लपविणें मुळींच कठीण नाहीं. चिन्यांनीं नागरिकत्व स्वीकारून शिवाय व्हिएतनामी नांवें धारण केलीं पाहिजेत असा हुकुम झिएमनीं काढला आहे. चोलोनचा कारभार पांच स्वायत्त चिनी संस्था चालवीत, त्या संस्थाहि त्यांनीं रद्द ठरविल्या आहेत. आपल्या जमातीचा आणि हक्कांचा तीव्र अभिमान असलेले चिनी हे हुकूम निमूटपणें मान्य करतील असा संभव नव्हताच. अनेक पिढ्यांच्या व्यवहारांत अंगीं बाणविलेले सारे डावपेंच त्यांनीं उपयोगांत आणले. सायगांवमध्यें एका बंडाव्याचाहि उठाव केला. पण झिएम माघार घ्यायला तयार नाहीं. ' माझ्या हयातींत मी चोलोनचें व्हितनामी-करण करीन ' अशी त्यांनीं प्रतिज्ञाच केली आहे. झिएमनीं गेल्या दोन वर्षांच्या अल्पावधींत अनेक चमत्कार करून दाखविले. पण चिन्यांना व्हिएतनामी बनविण्याचा चमत्कार करण्यांत ते कितपत यशस्वी ठरतील याबद्दल शंका घेणें साहजिकच ठरेल. येथें एखाद्या पिढीशीं टक्कर देण्याचा सवाल नाहीं. अनेक पिढ्यांच्या संकुलित अभिमानाशीं त्यांना सामना द्यायचा आहे.

कदाचित् अपेक्षित अवधीच्या आंत त्यांना यश मिळेल. कारण चिन्यांचा स्वाभिमान जसा चिवट आहे तसा व्हिएतनामी लोकांचा चिनी-विरोधहि चिवट ! चीनचा द्वेष त्यांच्या रोमारोमांत भिनलेला आहे. मला एकदां याचा मजेदार प्रत्यय आला. दलातच्या औद्योगिक प्रदर्शनांत तेथें विद्यार्थिनींनीं चालविलेल्या पेयगृहांत आम्हीं चहा प्यायला गेलों. तेथें एका परिचारिकेला मीं, ' मला चांगला चविष्ट चिनी चहा दे ' असें म्हटलें. तेव्हां तिनें माझ्याकडे अशा कांहीं क्रुद्ध तुच्छतादर्शक दृष्टीनें पाहिलें कीं, त्या दृष्टीनें आपल्या अस्तित्वाचे बंधच तोडले जात आहेत असें मला वाटलें ! व्हिएतनामी लोक चिनी चहाच पितात आणि चिनी पद्धतीनेंच पितात, पण त्याला ते व्हिएतनामी चहाच म्हणतील. त्यांच्या चीनविद्वेषाला ऐतिहासिक कारणें आहेत. महाराष्ट्राचा अगर राजस्थानचा इतिहास मोंगलविरोधी लढायांनीं जसा रंगला-रांधला आहे तसा व्हिएतनामचा चीनविरोधी लढ्यांनीं रंगला-रांधलेला आहे. चीननें व्हिएत-नामवर अनेक स्वाऱ्या केल्या आणि शेकडों वर्षें क्रूर राज्य केलें. म्हणून मराठ्यांच्या मुस्लिमविरोधाप्रमाणें व्हिएतनामींना चीनविरोधाचें बाळकडू मिळालेलें आहे. ( कम्यु-निस्ट चीनशीं साख्यालोख्यानें बांधलेल्या उत्तर-व्हिएतनामविरुद्ध झगडण्यास याचा उपयोग होतो हा आणखी एक फायदा. उलट उत्तरेच्या व्हिएत-मिन्हला या पारंपारिक चीन-विरोधाचा उपद्रवच होत असेल. )

व्हिएतनामचे अनेक राष्ट्रीय सण म्हणजे चीनविरोधी लढायांचे स्मृतिदिन आहेत. आज त्यांच्या समारंभांना एक धार प्राप्त झाली आहे. मला असा एक सण पाहायला मिळाला. स्टुंग-भगिनींचा स्मृतिदिन. भारताच्या इतिहासांत राणी लक्ष्मीबाईला जें स्थान आहे तें व्हिएतनामच्या इतिहासांत टुंग-भगिनींना आहे. फ्रेंच इतिहासाचे संस्कार झालेले व्हिएतनामी त्यांची तुलना 'जोन ऑफ आर्क'शीं करीत असतात. साम्राज्यवादी चीनचा सरदार तो दिन्ह याचा पराभव करून व्हिएतनामच्या या दोन वीरांगनांनीं व्हिएतनामच्या इतिहासांत आपलें नांव कायमचें लिहून ठेवलें आहे. पुढें मा व्हिएनच्या तार्तर सैनिकांनीं त्यांचा पराभव केला व त्यांनीं तळ्यांत उडी घेऊन आत्महत्याहि केली. पण त्यांच्या ऐतिहासिक कीर्तीला धक्का लागलेला नाहीं.

ता. ७ मार्च रोजीं मला टुंग–भगिनीदिनाचा सोहळा पाहायला मिळाला. दिनाचें ऐश्वर्य आणि उत्साह पाहून दिल्लीच्या प्रजासत्ताक दिनाची आठवण झाली. आपल्या प्रजासत्ताकदिनासाठीं जशीं भव्य प्रतीक-दृश्यें (टॅब्लो) तयार करतात तशीं प्रतीक-दृश्यें तयार करण्यांत आलीं होतीं. एका दृश्यांत हत्तीच्या पाठीवरील हौद्यांतून लढणाऱ्या टुंग-भगिनी दिसत होत्या. दुसऱ्यांत एका किल्ल्याच्या बुरुजावरून टुंग-भगिनी लढत असल्याचा देखावा होता. तिसऱ्यांत एका प्रचंड पात्रासमोर (त्याला वेदि म्हणावें ?) चाललेल्या प्रार्थनांचें दृश्य होतें. हीं दृश्यें निर्जीव नव्हतीं. त्यांतल्या टुंग भगिनी मातीच्या पुतळ्या नव्हत्या. हाडामांसाच्या, प्राणचैतन्याच्या सजीव युवतींना राज्यश्रीनिदर्शक नारिंगी रंगाचा उज्जवल युद्धवेष घालून तेथें प्रस्थापित करण्यांत आलें होतें. व्हिएतनामी स्त्रियांचें राजस सौंदर्य आणि व्हिएतनामी इतिहासाचा ऊर्जस्वल पराक्रम यांचा त्यांच्या ठिकाणीं संयोग झाल्यासारखेंच दिसत होतें. पूर्वजांच्या प्रतिष्ठेच्या आदराचा निदर्शक असा शुभ्र पोशाख घालून उपस्थित झालेल्या हजारों व्हिएतनामी युवतींच्या नजरेंत त्या 'भगिनीं'च्या दर्शनानें इतिहासाचें तेज फांकत होतें आणि तरुणांच्या रक्तवाहिन्या पराक्रमानें भरून जात होत्या! या राष्ट्रीय सणाला सध्यां सरकारी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. आजच्या या समारंभाला साऱ्या राष्ट्रांचें प्रतिनिधि उपस्थित होते. समारंभाचें नेतृत्व मात्र पुरुषांकडे नसून स्त्रियांकडे होतें. सैनिकांचें संचलन, स्वयंसेवकांची कवायत वगैरे प्रकारांना अर्थात् या समारंभांत विशेषच महत्व. पण स्त्रियांच्या वक्तृत्वानें या साऱ्यावर मात केली. वक्तृत्वाच्या शस्त्रानें

कर्तृत्वाचा उठाव आणण्याची अहमहमिका सुरू होती! हा वक्तृत्व समारंभ संपल्या-नंतर त्या प्रतीक–दृश्यांसह शहरभर मिरवणूक निघाली.

हा दिनपरत्वें होणारा सोहाळा. पण व्हिएतनामींच्या चीनविरोधी इतिहास भक्तीचें एक कायमचें दृश्य एका राष्ट्रवीराच्या समाधीच्या आणि मंदिराच्या रूपानें सायगांवांत आढळलें. मार्शल ले व्हॅन ड्युएत हें या राष्ट्रवीराचें नांव. मार्शलच्या राष्ट्रभक्तीचा सत्कार नुसती समाधि बांधूनच नव्हें, तर शेजारीं एक सुंदर देऊळ उभारून करण्यांत आला आहे. बुद्धाच्या देवळांत जाऊन भक्तमंडळी उदबत्त्या जाळतात, फुलांचे गुच्छ अर्पण करतात, गुडघे टेकून प्रार्थना करतात, ते सारे प्रकार येथें मीं पाहिले. या युद्धवीराच्या मंदिरांत सारा थाट बुद्धमंदिराचाच होता. बुद्धा-प्रमाणेंच ले व्हॅन ड्युएतची तेथें मूर्ति होती. मूर्तीसमोर तऱ्हेतऱ्हेच्या मूर्तींची, पुष्पपात्रांची, ऊदपात्रांची, जलपात्रांची, समयांची, घाटांची आरास मांडलेली होती आणि ही आरास वाढवून पुण्यसंचय करण्याची इच्छा अनेकांना होत असावी. बुद्धमंदिरापेक्षां याचा वेगळेपणा इतकाच कीं, त्याला धार्मिक अर्थ नसल्यानें तेथें पादत्राणासह जाण्यास परवानगी होती. तरीपण एखाद्या धर्ममंदिराचा थाट आणि व्यवहार असलेलें असें दुसरें धर्मातीत स्मृतिमंदिर मीं इतरत्र पाहिलेलें नाहीं.

मौज अशी कीं या राष्ट्रवीराची समाधि, त्याचें स्मृतिमंदिर, त्या मंदिराचें प्रवेशद्वार या साऱ्याचें शिल्प आणि सौंदर्य चिनी पद्धतीचेंच आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, व्हिएतनामी संस्कृतीवर चिनी संस्कृतीचे रंग आणि तरंग यांची लहर फार आहे. आधीं व्हिएतनामी लोक दिसतातच बरेचसे चिन्यांसारखे. संबंध आग्नेय आशियांत चिन्यांशीं चेहऱ्याचें आणि कांतींचें इतकें साधर्म्य असणारे लोक मीं दुसरे पाहि-लेले नाहींत. सतेज शुभ्र अंगकांतींत व्हिएतनामी स्त्रिया चिनी स्त्रियांशीं प्रसन्न स्पर्धा करूं शकतात. ब्रह्मी स्त्रियांची अंगकांतिहि तशीच मखमली आहे, पण ती अधिक लालट आहे आणि त्यांचा तोंडवळा वेगळा आहे. व्हिएत लोक हे मूळचे चिनीच. त्यांच्यावर भारतीय संस्कृतीचा फार परिणाम झाला आहे, किंब-हुना व्हिएतनामच्या भूमीवर चिनी आणि भारतीय संस्कृतींचा संग्राम झाला आणि त्यांत भारताचा विजय झाला अशीं रोचक वर्णनें आपण वाचतों. कंबोडिआंत हें खरें असेल, पण व्हिएतनाममध्यें चिनी संस्कृतीचा वरचष्मा अगदीं स्पष्ट

दिसतो. उथळ दृष्टीला व्हिएतनामच्या भूमीवर चिनी संस्कृति आणि भारतीय संस्कृति यांच्या प्रीतिसंगमाचीं कांहीं दृश्यें दिसतील. व्हिएतनामी स्त्रियांच्या पोशाखावर या प्रीतिसंगमाची थोडीशी नक्षी आढळेल. व्हिएतनामी स्त्रियांच्या पायघोळ पायजम्यांत पंजाबी सलवारींचें दर्शन होईल आणि झग्यांत चिनी स्त्रियांच्या चॅंगसानची झळक आढळेल. बिएन-हुआ येथील चिनीमातीच्या संग्रहालयांत चिनी शिल्पाच्या आणि भारतीय शिल्पाच्या – दोनही पद्धतीच्या बुद्धमूर्ती दिसल्या. (अर्थात् हा संगम नव्हे, सहवास!) पण व्हिएतनामी संस्कृतीचा आत्मा चिनी संस्कारांनींच विशेष रंगलेला आहे. व्हितनामी भाषाच पाहा. ती चिनी भाषेप्रमाणें उच्चारानुगामी आहे. म्हणजे एकाच शब्दाचे उच्चारानुसार अनेक अर्थ होतात. उदाहरणार्थ THANH या शब्दाचे, तुमची जीभ वळेल त्याप्रमाणें, नाजूक, भिंत आणि प्रतिभाशाली असे तीन अर्थ होतात. (यामुळें उठल्यासुटल्या कोट्या करणारांची चंगळ होत असेल!) व्हिएतनामी संगीत चिनी संगीतासारखेंच आहे. (मला तें अधिक कोमल वाटलें एवढेंच. माझ्या या अभिप्रायावर 'आम्हीं अधिक सुसंस्कृत आहोंत' असे उद्गार एक व्हिएतनामी मित्रानें काढले हा या संकरांतला बेसूर!) चिनी ड्रॅगनचा (सर्पराक्षसाचा) संचार व्हिएतनाममध्यें शिल्पांत, वास्तुशिल्पांत, फलकांत, जहिरातपत्रिकांत, सर्वत्र आढळतो. व्हिएतनामी वास्तुशिल्प चिनीच आहे (असें अनेक इमारतींच्या छपरावरून ओरडून सांगतां येतें!) सायगांवच्या आसपास आणि दलातमध्यें अनेक आवारांचीं प्रवेशद्वारें चिनी पद्धतीचीं दिसलीं. चिनी संस्कृतींत भिनलेल्या पूर्वजपूजेचा संचार मला व्हिएतनाममध्यें फार आढळला. (अर्थात् श्राद्धविधीनें पूर्वजांना संतुष्ट करूं पाहणाऱ्या भारतीयांना यांत खास चिनी असें काय वाटणार म्हणा?) पांढराशुभ्र पोशाख हा मातृपितृभक्तीचा द्योतक आहे. एकाद्या राष्ट्रीय सणाच्या दिवशीं शुभ्र श्वेतवसनांचा आढळ सर्वत्र होतो. (व्हिएतनाम मध्यें पोशाखाच्या रंगाला फार महत्त्व. नारिंगी रंग राज्यश्रीचा द्योतक. व्हिएतनामी राष्ट्रध्वज म्हणजे पीतवर्णीय वस्त्रावर व्हिएतनामच्या तीन प्रांतांचे निदर्शक असे तीन लाल पट्टे.) व्हिएतनामी अन्न आणि भोजनपद्धति पुष्कळशी चिनीच आहे. (भाताची शितें काड्यांनीं टिपून पटापट तोंडांत टाकणारे चिनी आणि व्हिएतनामी लोक कोणत्याहि किचकट कष्टाला मागें येणार नाहींत याचा वेगळा पुरावा नको.) पाहुण्याची चहाच्या कपानें स्वागत करण्याची पद्धति चीनकडून जपानप्रमाणेंच व्हिएतनामनेंहि स्वीकारलेली आहे. एकंदरींत व्हिएतनामची संस्कृति

चिनी आहे. तिच्यांत चीनविद्वेषाचा अंतर्विरोध शिरल्यानें तिला अर्थात् बरीच नागमोडी वळणें प्राप्त झालीं असतील, पण ती मूळ आत्म्याची अलंकारिक ओढाताण, एवढेंच !

अर्थात् व्हिएतनामांत या सत्याचा उच्चार जरा काळजीपूर्वक केला पाहिजे. एक मित्र मला पावलोंपावलीं बजावीत होता, "We are very proud of our Vietnamese culture!" (आम्हांला आमच्या व्हिएतनामी संस्कृतीचा फार अभिमान आहे!) पण तोच एकदां म्हणाला, "The real problem before us is the problem of combining the culture of the North with the economy of the South." (उत्तरेची संस्कृति आणि दक्षिणेची अर्थव्यवस्था यांचा सुमेळ साधणें हा आमच्या पुढचा खरा प्रश्न आहे.) हा उद्गार फार अर्थपूर्ण आहे. उत्तर व्हिएतनाममध्यें औद्योगिक विकास अधिक आहे; दक्षिणेंत शेतीचा जोर अधिक आहे. उत्तरेकडील संस्कृतीवर औद्योगीकरणाचे अधिक संस्कार असतील, आणि दक्षिणेचें औद्योगीकरण करण्याचे सध्यां जोरांत प्रयत्न सुरू आहेत. पण उत्तरेच्या संस्कृतीचें आंतरिक स्वरूप अधिक चिनी असेल अशी मी कल्पना करतों. तिचा प्रसार चीनविरोधी दक्षिण व्हिएतनामांत करणें हा एक अंतर्विरोधच आहे. पण व्हिएतनामचें जीवन आज अशा अनेक अंतर्विरोधांनीं भरलेलें आढळतें.

# ला
# द्
# त....

* * * * * * * * * *

सुदैवानें एका मित्रावरोबर, दोनशें मैल दूर असलेल्या दलातला जाण्याची संधि मिळाली आणि सायगांवबाहेरचा प्रदेश आणि परिस्थिति थोडीबहुत डोळ्यांखालून घालतां आली. दोन वर्षांमागें या रस्त्यानें जाणें म्हणजे जिवावरचें धाडस होतें. याबाबत लुई नॉर्मननें नमूद केलेला एक मजेदार अनुभव सांगण्यासारखा आहे. तो दलातला सार्वजनिक बसनें गेला. बसचें तिकिट काढायला गेला तेव्हां सर्व चांगल्या जागा भरल्या आहेत असें त्याला सांगण्यांत आलें. दुय्यम तर दुय्यम असें म्हणून मिळालें तें तिकिट त्यानें खरेदी केलें. पण प्रत्यक्षांत त्याला आढळलें, कीं ही दुय्यम दर्जाची जागा म्हणजे खिडकीजवळची हवाशीर सीट ! त्यावेळीं खिडकीपासची जागा घेणें म्हणजे रस्त्याकडेच्या जंगलांतून अवचित होणाऱ्या गोळीबाराची शिकार होण्याची तयारी ठेवणें. ही बस एकटी दुकटी जाऊं शकत नव्हती. पुढेंमागें लष्करी गाड्यांचें चिलखत घातलेल्या काफिल्याचा एक प्रागतिक भाग म्हणून तिला प्रवास करावा लागे आणि तो सुद्धां दिवसासकाळ ! रात्रीं सारे रस्ते थंड ! आम्हीं खुशाल रात्रीं प्रवास केला. दलातला पोचलों तेव्हां आठ वाजले होते आणि दुसऱ्या दिवशीं सायगांवला परत आलों तेव्हां दहा वाजले होते. लुई नॉमर्नच्या त्या बसच्या जातीची एखादी बस दिसेल म्हणून पाहात होतों, पण ती दिसलीच नाहीं. ती बस म्हणजे काय ? आंत चौपट माणसें आणि बाहेर छपरावर बसच्या उंचीइतका सामानाच्या रगाड्यांत जिवंत

कोंबड्याडुकरांबरोबर एखादा उतारूहि नसेलच अशी खात्री नाहीं ! एवढ्यानें बसची पुरेशी शोभा होत नाहीं म्हणून कीं काय, बसच्या बाजूला बांबू खुपसून त्यांना टोपल्या-बोचकीं अडकवून देण्याची व्यवस्था होत असे ! पण मला ही मालगुदाम बस भेटलीच नाहीं. दलात-सायगांव रस्त्यावर ज्या बसेस धावत होत्या त्या स्टेशन-वॅगन्सच्या आकाराच्या आणि सोयीच्या दिसल्या. व्हिएतनामच्या भूमीवर राक्षसाप्रमाणें उभ्या असलेल्या वॉच टॉवर्स ( टेहळणी-बुरुज )चेंहि वर्णन लुई नॉर्मननें केलेलें आहे ते बुरुजदेखील मला दिसले नाहींत. ( मीं पाहिले ते सायगांव नदीच्या पलीकडे माळरानावर तेलाच्या प्रचंड टाक्या आहेत त्यांच्या आसपास. एखाद्या पडक्या वाड्यांच्या भगदाडांतून भीतीचा धसका बाहेर पडतो तसा या बुरुजांतून बाहेर पडतांना मला जाणवला ! ) दलातच्या त्या दोनशें मैलांच्या मार्गावर पोलिसांनीं अगर लष्करी शिपायांनीं कोठेंहि आमची एकदांसुद्धां चवकशी केली नाहीं. दोनच वर्षांपूर्वी जो रस्ता दरोडेखोर आणि मारेकरी यांच्या शस्त्रास्त्रांचा आखाडा बनला होता त्याचें आजचें स्वरूप म्हणजे एखाद्या वाटमाऱ्यानें माणसांत येऊन पोराबाळांच्या संसारांत रमून जावें तसें झालें होतें !

खरोखर या रस्त्याचा पुनर्जन्म झाला होता. नवजीवनाचे संस्कार त्याच्यावर झाले होते. नव्या वसाहतींनीं तो गजबजला होता. सायगांव सोडल्यावर लवकरच या वसाहतींचें दर्शन होऊं लागलें. रस्त्याकांठीं अंतराअंतरावर नवीं खेडीं उभारलेलीं, उभारलीं जात असलेलीं दिसलीं. हीं खेडीं म्हणजे जंगल तोडून केलेली नवी वसाहत. नवी म्हणजे कोरी करकरीत. जंगलावरचे आघात अद्याप ताजे होते. साफ केलेली जमीन अद्याप कुंवार होती. झोपड्यांच्या छपरांनीं अद्याप पावसाळे पाहिले-न-पाहिलेले. वईदांड्याला लावलेलीं झाडें अजून भुईशींच गोष्टीं करीत होतीं. आवारें उजाड होतीं. आणि या साऱ्यांकडे पाहण्याची माणसाची दृष्टि अद्याप नवखीच भासली. हीं खेडीं म्हणजे अशा वीस, पंचवीस, तीस, चाळीस झोपड्या आणि त्यांच्या मधोमध अभिमानानें उभें असलेलें चर्च. या खेड्यांतल्या लोकांनीं आपला सारा पैसा, श्रम, आणि कलात्मक बुद्धि या चर्चला रंगरूप आणण्यासाठीं खर्च केलेली स्पष्ट दिसे. त्यांचीं घरें म्हणजे लांकडें, फळ्या, बांबू कसेबसे एकत्र आणून भल्याबुऱ्या आकारलेल्या आणि शाकारलेल्या झोपड्या. उलट त्यांचें चर्च म्हणजे लहानसाच पण शानदार

मनोरा असलेली इमारत! एखादें खेडें अगदींच गरीब असलें आणि त्याचें चर्च केवळ कामव्यांनीं उभारलेलें असलें तरी आपल्या पारंपारिक कलेचा थोडा तरी वर्षाव भाविक खेडवळांनीं त्याच्यावर केलेला आढळे. मीं कांहीं चर्चेचें काम चालू असलेलें पाहिलें. त्या कामांतच त्यांची भक्ति दिसली. परत येतांना रात्रीं एका चर्चच्या आवारांत व्हर्जिन मेरीच्या मूर्तीची शृंगारलेली मिरवणूक दिसली. सारें खेडेंच ती पाहण्यास लोटलें होतें. शुभ्र पोषाखांतील स्त्रीपुरुषांच्या हातांत मिणमिणणाऱ्या त्या शांत सोज्वळ मेणबत्त्या आणि त्यांच्या गळ्यांतल्या भक्तिगीतांचे ते कोमल सूर— अनंत हालअपेष्टा भोगण्यास सिद्ध असलेल्या साध्याभोळ्या निष्ठेचें श्राव्य आणि दृश्य स्वरूप मला अनुभवण्यास मिळालें!

दिवसा काय अगर रात्रीं काय, या खेड्यांचें दर्शन म्हणजे एक अकल्पित अनुभव होता. दोन दोन मैल, चार चार मैल दोनहि बाजूंना नुसतें जंगल पसरलेलें असावें, त्याची एक प्रकारची अबोध भीति अंतःकरणांत अधिक दाटत चाललेली असावी, आणि मग एकदम अवचित एखादें असें जगल थोडें मोकळें करणारें खेडें आढळावें – एखाद्या अवाढव्य वाळवंटांत एकाएकी माणसाचीं पावलें आढळावीं आणि अंतःकरणांत कसला तरी अबोध आधार वाटावा तसें होई! रात्रीचा अनुभव अधिकच अकल्पित. मागें, पुढें, बाजूला सर्वत्र काळोख दाटलेला. आजूबाजूचें अरण्य त्यांत बुडलेलें— नव्हें हिरव्या अरण्यांत काळा काळोख मिसळल्यानें तो घट्ट कभिन्न बनलेला. मोटारच्या दिव्यांचा त्याला फाडण्याचा प्रयत्न, केंविलवाणा, हास्यास्पद वाटत असलेला. इतक्यांत दहा, वीस, शंभर दिव्यांचा विस्तार दिसला म्हणजे आंतल्या आंत हायसें वाटे आणि मग मनांत येई कीं या, खेड्यांत राहणाऱ्या लोकांच्या दृष्टीनें या दिव्यांचे अस्तित्व कितीतरी अधिक अर्थपूर्ण नाहीं का? कारण हीं खेडीं म्हणजे उत्तर व्हिएतनाममधून परागंदा झालेल्या निर्वासितांच्या वसाहती? व्हिएतनामचे उत्तर आणि दक्षिण असे भाग पाडणाऱ्या जिनीवा कराराप्रमाणें कांहीं ठराविक मुदतीपर्यंत एका भागांतील लोकांना दुसऱ्या भागांत जाऊन स्थायिक होण्याची मुभा देण्यांत आली होती, त्याप्रमाणें उत्तर (कम्युनिस्ट) व्हिएतनाममधून सुमारें दहा लाख निर्वासित दक्षिणेंत आले. या लोकांचें स्थलांतर हा कम्युनिस्ट लोकप्रियतेवर काळाकुट्ट डाग होता आणि म्हणून तें थांबविण्यासाठीं उत्तर व्हिएतनामनें अनेक भलेबुरे प्रकार केले. हे उपद्रवी अडथळे

अनुक्रम 22409 दि.



नों. दि.

निर्माण झाले नसते तर आणखी असंख्य आले असते. कारण आले त्यांतले सुमारें ऐंशी टक्के रोमन कॅथॉलिक होते, आणि कॅथॉलिकविरोधी कम्युनिस्ट राजवटींतून सुटण्यास ते उत्सुक होते. पण ते आले तेव्हां दक्षिणेंत काळोखच होता. या खेड्यांतले हे दिवे म्हणजे हा काळोख दूर करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग !

हे निर्वासित म्हणजे झिएम-राजवटीपुढचें एक भलें-थोरलें प्रश्नचिन्ह आहे यांत शंकाच नाहीं. पण ती एक प्रचंड शक्तीहि आहे. मी हीं खेडीं पाहात होतों तसें त्यांना वेढणारें जंगल पाहात होतों. दक्षिण व्हिएतनामाचा केवढा तरी अवाढव्य भाग म्हणजे नुसतें जंगल — मानवानें स्पर्श न केलेलें, मानवाचा स्पर्श होऊं न शकणारें जंगल आहे. हें जंगल तोडून जमीन लागवडीस आणण्याची बिकट समस्या आज झिएमपुढें उभी आहे. जी गोष्ट बुलडोझरनें करायची ती आज माणसाच्या हातांतल्या कोयत्या-कुऱ्हाडींनीं करावी लागत आहे; आणि जेथें ट्रॅक्टर फिरवायचा तेथें खुरपणें फिरवायची पाळी आली आहे ! झिएमचे आर्थिक सल्लागार प्रो० थुक मला म्हणाले, अमेरिकेहून बुलडोझर अगर ट्रॅक्टर आणायला जितका खर्च येतो तितका खर्च तो सायगांवहून जंगलांत नेण्यास येतो. अशा परिस्थितींत हे निर्वासित येऊन जंगलाशीं झगडत आहेत, जमीन मोकळी करीत आहेत, तिच्यावर दाणा पेरीत आहेत, वाघ-डुकरांच्या वस्तींत शिरून मनुष्यवस्तीचा धारण रोवीत आहेत, हें केवढें भाग्य !

दलातला जातांयेतांना या जंगलाचे रंग, ढंग आणि तरंग परिचयाचे झाले. हें जंगल कधीं अंगावर येतें तर कधीं नुसतीच ओढ लावतें. कधीं दृष्टि बांधून ठेवतें तर कधीं ती फिरवून टाकतें. कधीं अंतःकरणाचा थरकांप उडवितें तर कधीं सारी जाणीव गोठवून टाकतें. व्हिएतनामला जाण्यापूर्वी महिनाभरच अगोदर मी सिलो-नच्या जंगलांतून गेलों होतों. सिलोनचें जंगल म्हणजे प्रचंड वृक्षांनीं एकमेकांच्या फांद्यांत फांद्या अडकवून केलेली मस्त सर्कसच. पानगळींमुळें या झाडांचे ओकेबोके सांगाडे झाले होते आणि त्यामुळें ही सर्कस भयंकर वाटत होती. आतां महिन्यानंतर आग्नेय आशियांतला ऋतु पुनः पर्णराजीनें शृंगारला होता. झाडांवर नव्या पालवीची कोवळी माया पसरली होती आणि पानांच्या रेषान्रेषा रसानें मुसमुसल्या होत्या आणि तरीहि व्हिएतनामच्या जंगलाचा अवतार अजस्र भासत होता. मुख्य म्हणजे हें जंगल जराहि माणसाळलेलें वाटत नव्हतें. सिलोनचें जंगल मस्त होतें तरीहि त्याला

माणसांनीं छेडलेलें होतें. कुठें त्याच्यावर कुऱ्हाडीचे घाव पडत होते, कुठें त्याला चूड लागत होती, कुठें त्याला पाऊलवाटांनीं भेदलें होतें — आणि मुख्य म्हणजे त्याच्या आगेंमागें, पलीकडे कुठें तरी नांगराचा फाळ त्याच्या मिजासीचें मूळच उखडीत होता ! व्हिएतनाममध्येंसुद्धां कुऱ्हाडीचे हात, आगीचे लोळ, पावलांचा प्रहार अगर नांगरांचे फाळ धडपडत असलेले दिसले. पण ही धडपड उगाच आहे, अगतिक आहे हें लगेच लक्षांत येत होतें. या जंगलाचा भेद शक्य नाहीं, अंत लागणार नाहीं आणि अंतरंग दिसणार नाहीं अशीच खात्री मनांत दाटत होती.

सायगांव सोडल्याबरोबर हें जंगल अंगावर आलें असें मात्र नाहीं. सायगांवसभोंवतालचा मुलूख सपाट आहे, भातशेतीनें रांधलेला आहे. आंबरायांनीं डोललेला आहे. छोट्याछोट्या खेड्यांनीं गर्भारलेला आहे. सायगांवहून वीसपचवीस मैलांवर बिएन-होआ गांवीं दोन प्रचंड नद्यांचा विशाल संगम होतो तेव्हां तर मानवी संस्कृतींचा पिसारा फुलल्यासारखें वाटतें. नदी म्हणजे खरोखर जंगलाची कन्या. ती डोंगरांत उगम पावते, खडकांत वाढते आणि कड्याकपारांत दुथडी धांवते. थोडी रूपरंगास येते तोंच जंगल तिच्यावर झडप घालतें. पण मानवी इतिहासांत संस्कृतीची वाहिनी अशीच कीर्ति तिनें संपादिलेली आहे आणि नद्यांचा संगम म्हणजे तर संस्कृतीचा विस्तारच. निदान बिएन-होआ येथें या विस्ताराची साक्षात् प्रतीति येते. आपल्या प्रयागचा संगम आहे, पण त्याचा विस्तार पात्राच्या प्रचंडपणानें खाऊन टाकला आहे. उलट गंगा-यमुनांच्या मानानें या नद्या लहान, पण बिएन-होआ येथें त्याच्या संगमानें एक विशाल सरोवरच निर्माण झालें आहे. या सरोवराच्या दर्शनानें आपण उत्तर इटलींतील एखाद्या सरोवराच्या कांठींच आलों कीं काय, असें क्षणभर वाटलें. इटलींतील सरोवरांचा संस्कारित किनारा इटलीच्या प्राचीन संस्कृतीच्या संस्मरणांनीं रंगलेला वाटतो तसाच या सरोवराचाहि वाटला. त्याचा प्रभाव पडला, पण ओळख पटली नाहीं; ती गांवांतल्या वस्तुसंग्रहालयांत चिनीमातीच्या मूर्ती आणि पात्रें पाहिलीं तेव्हां पटली, आणि गांवाबाहेर कोणा बड्या माणसाची समृद्ध प्रतीकांनीं शृंगारलेली समाधि पाहिली तेव्हां चित्तानें एकदम चीनच्या सांस्कृतिक सागरांत उडी घेतली आणि व्हिएतनामच्या संस्कृतीचे शिंपले आणि मोतीं शोधण्यास सुरुवात केली !

बिएन – होआनंतर हळुहळू जंगल झिंज्या पिंजारून अंगावर येऊं लागलें. एखादें गांव, एखादें शेत, एखादा चहाचा मळा मधूनच काय चमकारा कोठेतरी असेल तेवढाच—बाकी सारा जंगलचा पसारा. रबराच्या लावगडीचा आणखी एक अपवाद. रबराचा मळा हा एक विलक्षण अनुभव असतो. रबराच्या उंच उंच उभ्या झाडांचा विस्तार एकमेकांत मिळून जातो आणि एक विशाल मंडप निर्माण होतो – हजार खांबांचा मंडप ! या स्वच्छ नितळ मंडपांत उभें राहिलें म्हणजे क्षणभर रानांतून माणसांत आल्यासारखें वाटतें. पण क्षणभरच ! लवकरच त्या मंडपाची विशाल शून्यता, फुप्फुसांत गॅस भरावा तशी अंतःकरणांत दाटते आणि आणि शरीराचे व मनाचे सारे कोनेकोपरे भीतीनें भरून जातात. रात्रीं हा मंडप काळोखानें भरून गेला, त्या झाडांच्या खोडांना अंधारांत लपून बसलेल्या मारेकऱ्यांचें स्वरूप प्राप्त झालें, वरचें विस्ताराचें छत एखादा डोंगर डोक्यांवर उतरावा तसें उतरत आहेसें वाटूं लागलें म्हणजे तर जिवाचा थरकांपच उडतो. रात्रीं आमची मोटर एका रबराच्या मळ्यांत शिरली, तिचे भेदक दिवे मळ्यांतल्या काळोखाला फाडीत फाडीत पुढें पळूं लागले आणि आपण एखाद्या भयाण बोगद्यांत शिरलों आहोंत असें वाटूं लागलें !

राक्षस झाला तरी त्याच्या बऱ्यावाईट लहरी असतातच. व्हिएतनामच्या राक्षसी जंगलानें अशा अनेक लहरी दाखविल्या. कांहीं कांहीं ठिकाणीं या जगलांत गवत इतकें उंच वाढलें होतें आणि या गवताच्या पात्यांनीं जंगलाचा भरड पसारा इतका झांकून गेला होता, कीं एखाद्या निग्रो हिडिंबेनें हा मिंकचा फरकोटच चढविला आहे असें वाटलें ! कांहीं ठिकाणीं जंगल म्हणजे नुसत्या बांबूच्या बेटांचा गर्द विस्तार. पोपटी पानांच्या कोवळ्या पालवीनें शृंगारलेले छोटे छोटे बांबू. व्हिएतनामांत बांबू हें विनम्रतेचें प्रतीक मानलें जातें. बांबू एकांगानें नव्हे तर अष्टांगानें विनम्र असतो. त्याची शिरन् शीर आणि पानन् पान नम्रतेनें लवलेलें असतें. व्हिएतनामचें जंगल विनम्र होऊन आम्हांला सामोरें आलें आहे असें येथें मला वाटलें. खरी नम्रता कमकुवतपणाची नव्हे तर शक्तीची द्योतक असते. या बांबूच्या रानानें जंगलाची शक्तीच व्यक्त झाली. बांबूनंतर केळी ! मलोन् मलीं नुसता केळीच्या रोप्यांचा पसारा – पालवलेल्या केळी, पसवलेल्या केळी, उफाडलेल्या केळी ! केळीचे मळे आजवर असंख्य पाहिले होते, पण केळीचें बन अक्षरशः म्हणतां येईल असें येथें

प्रथमच पाहिलें. या वनाचें रूप न्याहाळण्यासाठीं मोटर थांबवली, उतरलों, रस्त्याच्या कडेवर उभा राहिलों आणि खालीं दरींत नजर टाकली. सारी दरी पोपटी, लिंबी, राखी छटांच्या हिरव्या केळपानांनीं भरून गेली होती. मधूनच एक नदी वाहात होती, त्यांत अक्राळविक्राळ दरडी पसरल्या होत्या, त्यांच्यामधून वाहणारें पाणी मगरीच्या डोळ्यांप्रमाणें चमकत होतें आणि पलीकडच्या कड्यासारख्या उंचावलेल्या डोंगरावर जंगली झाडांचा राकट रानटी अवतार पिस्कारला होता! जणू एखाद्या दैत्याच्या क्रोधाचा आविष्कार! मला कळेना, या दैत्यानें मध्येंच केळीच्या वनाचें हे राजस स्वरूप कां धारण केलें आहे? एखाद्या महाकाव्याच्या मूकनाट्याची निसर्गानें चालविलेली ही पूर्वतयारी नव्हे ना?

एके ठिकाणीं डोंगराच्या कडेकपारांत एका महाभयंकर वळणावर ड्रायव्हरनें मोटर थांबविली आणि कांहीं तरी काम योजून तो खालीं उतरला. आम्हींहि उतरलों. पाहिलें तों ड्रायव्हर रस्त्याकांठच्या, लहानसर देव्हाऱ्याप्रमाणें दिसणाऱ्या रंगीबेरंगी पत्र्याच्या देवळांसमोर उभा आहे, हात जोडलेले आहेत, डोळे मिटलेले आहेत आणि तोंडानें कांहींतरी पुटपुटत आहे! बरोबरच्या एका मित्रानें खिशांतून काड्याची पेटी काढली आणि देवळासमोरच्या चबुतऱ्यावर अर्धवट पेटून विझलेल्या उदबत्त्यांचा आणि मेणबत्त्यांचा ढीग होता त्यांतल्या चार दोन उचलून तो पेटवूं लागला. या देवळांत अगर देव्हाऱ्यांत माणसाच्या घोड्याच्या आणि तशाच कसल्या तरी दिसणाऱ्या प्राण्यांच्या कागदी, लाकडी मूर्ती होत्या. एका देवळांत बैलगाडीचा एक छोटासा सांगाडा दिसला. हें काय प्रकरण आहे म्हणून मी थँगना विचारलें. थँग म्हणाले, हीं पिशाच्चगृहें. या येथें फार अपघात होतात. अपघातांत मेलेल्या एखाद्या तळमळणाऱ्या आत्म्यानें पिशाच्च बनून वाटसरूंना छळूं नये म्हणून ही गृहें उभारण्यांत येतात – आणि आपण अपघाताच्या कचाट्यांत सांपडूं नये म्हणून ड्रायव्हर आणि उतारू पिशाच्चांची प्रार्थना करतात. त्या पिशाच्चगृहासमोरचा रस्त्या-बरोबर उभा असलेला काळा कडा, मागची भयानक दरी, पलीकडचें काळेंकुट्ट कातळ आणि त्या देव्हाऱ्यापुढचा जळक्या मेणबत्त्यांचा ढीग! माझें नास्तिक मन-सुद्धां थरकलें, कसल्या तरी अबोध भीतीनें भरून गेलें आणि त्या निःशब्द भयाण वातावरणांत घुमणाऱ्या रानकिड्यांच्या अखंड किरकिरींत मला स्मशानांतील भुतांच्या

रडण्याचे सूर ऐकूं आले ! मी बधीर दृष्टीनें खालीं दरींतल्या रानाकडे पाहू लागलों. त्या रानांत अजगर, वाघ, डुक्कर दबा धरून बसले आहेत असा भास झाला. इतक्यांत दरींतून एक प्रचंड पक्षी उडाला. त्याच्या पंखांचा झप असा आवाज झाला. त्याचे ते करडे, तपकिरी ओबडधोबड पंख विचित्र वाटले. वाटलें, या पिशाचगृहांत वस्ती करणारें एखादें पिशाच्चच पिसाळून उठलें नाहीं ना ! माझे पाय आपोआप मोटारीकडे वळले.

रस्त्यांत एके ठिकाणीं 'पोंगूर वॉटरफॉल' अशी पाटी आढळली. थँग म्हणाले, आपण हा धबधबा पाहू या, आणि आमची मोटर जंगलांत शिरली.

पोंगूर धबधबा फारसा उंच नाहीं. पण रुंद आहे. पाण्याचे पांचसहा प्रवाह एकदम उड्या घेत असतात. खालच्या खडकाळ पात्रांत पाणी पडत होतें, शतशतः उडत होतें, पण लगेच सावध होऊन पळत होतें, पळतांना पात्रांतल्या शिळांना विळखा घालीत होतें, लव्हाळ्याच्या बेटांशीं कुजबुजत होतें आणि मग एका लहानशा डोहांत विसावत होतें. एकीकडे धबधब्याचा आवाज कानांत कसली तरी चमत्कारिक स्तब्धता निर्माण करीत होता, तर दुसरीकडे नजर धबधब्याच्या धारांबरोबर नाचणाऱ्या सूर्यकिरणांनीं बांधली जात होती. ऐकतां ऐकतां नि पाहतां पाहतां आपल्याला कांहीं तरी शांत, सौम्य, प्रसन्न असें जाणवत आहे असें वाटलें. मनांत विचार आला, घनदाट अरण्यांत जाऊन तपश्चर्या करणारे लोक अशीं शांत, प्रसन्न स्थानें सांपडल्या-मुळेंच आपल्या साधनेंत यशस्वी होत असतील. हें एखादें भारतांतलें स्थान असतें तर एकाद्या प्राचीन ऋषीमुनीच्या वास्तव्याच्या खुणाच मी शोधूं लागलों असतों. येथें मात्र तो धबधबाच प्रपाताच्या जटा धारण करून अखंड तपश्चर्या करीत असल्यासारखा वाटला.

थँग म्हणाले, या आसपासच्या मुलखांत इतके धबधबे आहेत कीं, त्यांच्या प्रपातशक्तींतून साठ लाख दिवे जाळण्याइतकी वीज निर्माण होईल. पण तूर्त तरी हे साठ लाख दिवे उजळण्याचीं प्रकाशस्वप्नें उभविण्यापलीकडे व्हिएतनामी लोकांना अधिक कांहीं करतां येईल असें वाटत नाहीं. आज त्यांना जंगल तोडून जमीन लागवडीखालीं आणण्याचें प्राथमिक कार्यच करावें लागत आहे. आम्हीं परत फिरून मुख्य रस्त्याला लागलों तसें जंगलाचें दर्शन पुनः घडूं लागलें. पण त्याचें पूर्वीचें रौद्र

स्वरूप आतां उरलें नव्हतें. दूरच्या पर्वतराजींचें निळें दर्शन आतां उदात्त सुंदर वाटूं लागलें होतें. वृक्षांच्या शिखराशिखरांवरील विविध छटांची बदलती हिरवी मोहिनी मनाला शांत समाधान देऊं लागली होती. सूर्य पश्चिम क्षितिजावर रेंगाळत होता. सायंकाळचा गारवा हवेंत दाटूं लागला होता, आणि दलातच्या जवळ जवळ येऊं लागलों तशीं त्यांत एक युरोपीय शिरशिरी येऊं लागली. युरोपचें हवामान आणि युरोपचें वातावरणच पसरलें. खरें म्हणजे येथें थोडेंसें युरोपच आहे. डोंगरावरचा बेफाट निसर्ग आतां मागें पडला. त्यांची जागा शिस्तींत उभ्या असलेल्या नक्षीदार आकारशील देवदारांनीं घेतली. निसर्गांतला रानवटपणा गेला आणि संस्कारशीलता आली. तामसी शक्ति नाहींशी झाली आणि राजस सुंदरता प्रकट झाली. देवदार वृक्षांनीं शृंगारलेलीं येथलीं पर्वतशिखरें म्हणजे यक्षकिन्नरांनीं सजविलेलीं विलास–वनेंच वाटलीं.

दलातच्या रूपानें फ्रेंचांनीं येथें एक युरोपीअन 'हिल स्टेशन' निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यांत त्यांचें कांहींच चुकलें नाहीं. युरोपीय निसर्ग होताच. युरोपीय पद्धतीचे बंगले बगीचे बांधून त्यांनीं मानवाची निसर्गाशीं एकरूपता साधली. आल्प्स-मधील शहरामध्यें आढळतें तसें शांततेचें वातावरण दलातमध्यें आढळतें. प्रत्येक व्यक्ति एक प्रकारच्या अलिप्त तृप्तींत वावरत असल्यासारखी दिसते. परस्पराच्या जीवनांत आणि व्यवहारांत घुसून गडबड माजविण्याची वृत्ति येथल्या बाजारांत सुद्धां थोडीशी संकोचलेलीच दिसली. किंबहुना फ्रेंचांच्या निर्गमनानंतर या युरोपीय अलिप्ततेचें रूपांतर एक प्रकारच्या शिलावस्थेंत झालेलें दिसलें. एक प्रकारची प्रेतकळाच आल्यासारखी भासली. कुंद कृत्रिम वातावरण आढळलें. तें बाजारांत दिसलें आणि नाईट-क्लबमध्येंहि दिसलें. ज्या हॉटेलांत उतरलों होतों तें भलें थोरलें हॉटेल फ्रेंचांच्या काळीं गजबजलेलें असे. आज त्याच्यावर ओसाडपणा उतरलेला होता. दलातच्या मध्यभागीं एक मोठा तलाव आहे. थँगच्या उद्गारांवरून लोकांना त्याचें मोठे कौतुक वाटत असावें. त्याच्यावर एक पोहण्याचा क्लब आहे आणि एक बोटिंग-क्लबहि आहे. तलावाच्या भोवतीं एक सुंदर रस्ताहि बांधलेला आहे. चारदोन मंडळी त्या रस्त्यानें फिरतांना आढळलीं. पण त्यांत आवेग नव्हता, उत्साह नव्हता. सुंदर शहराच्या मध्यभागीं असलेल्या सुंदर तलावाच्या भोवतीं जो आनंद ओसंडायला हवा

त्याचा मागमूसहि आढळला नाहीं. तलाव पाहून मला अर्थात् कॅण्डीची आठवण झाली. कॅण्डीच्या तलावाच्या भोवतीं टेकड्यांचें कडें आहे तसें येथें त्या टेकड्यावर मस्त झाडें आहेत तसे येथें शोभिवंत देवदार आहेत. पण या तलावांचें एकंदर दर्शन ओकेबोकें वाटलें. कॅण्डीच्या तलावावरील वातावरणांत धार्मिक श्रद्धा आणि ऐतिहासिक संस्कार भरून राहिल्यासारखे वाटतात, तसें अर्थात् येथें वाटणें शक्यच नव्हतें. बोलूनचालून फ्रेंचांनीं उभा केलेला तो एक उपरा देखावा. पण त्यांत जी एक सळसळ जाणवायला हवी होती तीसुद्धां नव्हती. ही सळसळ रोमन कॅथॉलिक शाळेंत भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत दिसली. वर्षांतून एकदां पर्वणीप्रमाणें येणाऱ्या या उत्सवांत उत्साह होता यांत शंकाच नाहीं. पण त्या उत्सवाचा उगम प्रदर्शन यशस्वी करण्यासाठीं झटणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या स्वाभाविक उत्सव-प्रियतेंत होता — आणि या प्रदर्शनास लोटलेल्या व्हिएतनामी ललनांच्या चैतन्यशाली सौंदर्यांत होता. हें वातावरण नैमित्तिक होतें, नित्याचें नव्हतें. दलातच्या वातावरणानें माझी जी सूक्ष्म निराशा झाली तिची जाणीव झाल्यामुळेंच कीं काय, थॉंग पुनःपुनः म्हणायचे, 'दलात हें एक परीस्थान आहे.' त्यांच्या उत्साहाचा आदर करण्यासाठीं मीहि 'हो हो' करायचा आणि चेहरा उत्साहानें उजळण्याचा प्रयत्न करायचा. पण त्यांत राम नव्हता. दलातच्या परिसरांतला एक धबधबा पाहण्यास आम्हीं गेलों तेव्हांच काय ती माझ्या आनंदप्रदर्शनास सचोटी प्राप्त झाली. हें ठिकाण म्हणजे खरोखरच छोटेंसें परीस्थान वाटलें. सभोंवतालच्या तीन चार टेकड्या एखाद्या निसर्गचित्रांतलें कलात्मक अंतर राखून उभ्या आहेत, त्यांवरचे निःस्तब्ध नक्षीदार देवदार शांत, प्रसन्नवृत्तीनें उभे आहेत, स्वच्छ सूर्यप्रकाशांत त्यांच्या पावलांशीं कवडशांची कलाबूत पसरल्यासारखी दिसत आहे, काळ्या नितळ दगडावरून धबधब्याचें हलकें कलदार पाणी घसरणीवरून खालीं येणाऱ्या मुलासारखें पडत आहे, त्याच्या लयदार आवाजांत मुलांच्या हास्यबोलांचें संगीत मिसळत आहे, खालच्या डोहांत गळ्याएवढा बुडालेला कोळी पाण्यांतून मासा काढून कांठावरच्या मुलांना दाखवीत असतांना त्यांचे डोळे त्या माशाच्या डोळ्यासारखे लकाकत आहेत, इतक्यांत एक दोन वर्षांचें दुडदुडें मूल धांवत येउन तुमच्या पायावर कोलमडत आहे, आणि मग तिच्या आईची कौतुकमय दृष्टि तुमच्या कौतुकमय दृष्टींत क्षणभर

मिसळल्यामुळें अंतरंगांत अनपेक्षित लहरी उमटत आहेत — परीस्थानांत याहून आगळा अनुभव मिळत असेल तरी त्याचा हव्यास धरण्याचें कारण नाहीं !

बाजारांत कोणालाहि भेटण्याची तयारी ठेवावी लागते. पण दलातच्या बाजारांत आदिवासी भेटतील, आणि ते इतक्या संख्येनें भेटतील असें वाटलें नव्हतें. नाक्यांनाक्यांवर आदिवासींचे थवे उभे दिसले. व्हिएतनामी लोक त्यांना आदिवासी म्हणत नाहींत, डोंगरी म्हणतात आणि दलातसारख्या डोंगराळ शहरांत त्यांची ये-जा व्हावी हें ठीकच आहे. पण तरीहि दलातच्या फॅशनेबल बाजारांत यांची रांगडी, रानटी आवक जरा विचित्रच वाटली. हे आदिवासी थेट आपल्या भिल्लकातकऱ्यांसारखे दिसतात. त्यांचा पोषाख, दागिने, केशरचना (किंवा अरचना) तशीच आहे. पुरुष लंगोटी नेसतात आणि स्त्रिया फडकें गुंडाळतात. मुलें उघडीं नागडीं वावरतात. केसांचा अवतार आणि गळ्यांतल्या मण्याचा शृंगार आपल्या ठाकरा-कातकऱ्यांच्या सारखाच. त्यांचा वर्णहि आपल्या आदिवासींच्या सारखा कळकट काळाच. (व्हिएतनामी लोक दुधाच्या साईसारखे गोरे असल्यानें हा वर्ण विशेषच जाणवला.) दलातच्या बाजारांत कांहीं आदिवासी मुलींचा फोटो घेण्याचा मीं प्रयत्न केला तेव्हां आपल्या आदिवासी मुलींप्रमाणेंच त्या लाजून पळाल्या! त्यांचा चेहरा पोलेनेशिअन आहे — म्हणजे नाक बसकें आहे, डोळे बारीक आहेत — एवढाच काय तो फरक !

दलातला जातांना पाहिलेलें एक निसर्गदृश्य येतांना विशेषच जाणवलें आणि प्रतीकात्मक वाटलें. दृश्य विलक्षण आहे. एका प्रचंड खडकावर एक भला थोरला काळा फत्तर कसाबसा उभा आहे. जरा अधुपणेंच उभा आहे. क्षणांत कोसळेल असें वाटतें. पण तसा तो शेकडों वर्षें उभा आहे आणि त्याच्या आसपास लोक निभ्रांतपणें वावरत आहेत. त्यांच्या अगदीं छायेंतच लोकांनीं झोपड्या बांधल्या आहेत आणि भोंवतालीं केळींची बाग केली आहे. आज दक्षिण व्हिएतनाममध्यें झिएम एखाद्या निश्चल खडकाप्रमाणें उभे आहे, पण त्याच्या डोक्यावरचा कारभार क्षणांत डळमळेल असें मोठमोठ्यांना वाटत आहे. मात्र त्यांच्या छायेंत लोक निभ्रांतपणें वावरत आहेत.

# नि
# म ला

* * * * * * * * * *

मनिलाच्या लुनेटा हॉटेलमधून ऐकलेला एक आवाज माझ्या चांगला लक्षांत राहिला आहे: फेरीवाल्याचा आवाज. तगालोगमध्यें तो काय ओरडत होता तें माझ्या कधींच ध्यानांत आलें नाहीं, पण तो आवाज थेट मुंबईकर फेरीवाल्याच्या आवाजासारखा होता. किंबहुना, पहिल्या दिवशीं सकाळीं या फेरीवाल्याच्या आवाजानें जागा झालों तेव्हां क्षणभर आपण मुंबईतच आहोंत असें वाटलें! फेरीवाले सर्वत्रच असतात. त्यांची ओरडण्याची पद्धति खास त्यांची असते. कमावलेली असते. प्रत्येक शहराच्या फेरीवाल्याच्या ओरडण्यांत कांहीं एक वैशिष्ट्य असतें. पण मनिलांत मुंबईचा फेरीवालाच ऐकूं आला. मनिलाला जितक्यांदा गेलों तितक्यांदा आला, आणि प्रत्येक खेपेस मला मुंबईची तीव्रतेनें आठवण झाली.

एकदां मीं हॉटेलच्या सज्जांतून दूर नजर टाकली आणि मला पलीकडे मनिला बंदरांत उभ्या असलेल्या एका सुंदर रंगदार बोटीचें दर्शन झालें. बोटीचें दर्शन मला नेहमींच ओढ लावतें. येतांजातांना बोटीनं केलेल्या प्रवासाचा हा परिणाम असेल. बोटीचें दर्शन झालें कीं माझें मन लगेच भटकायला जातें. ज्ञात मुलखाबरोबर अज्ञात मुलखाकडेहि धांव घेतें. मध्यरात्र झालेली असावी. सभोंवार काळोख दाटलेला असावा. वर आकाश आणि खालीं पाणी अशी अवस्था असावी.—विश्वाच्या अज्ञाताचा साक्षात्कारच होत आहेसें वाटतें. बोट पाण्यावर फसाचा पट्टा ओढीत जाते. पट्ट्यावरचा फेंस लाटांबरोबर विरत असतो, विरघळत असतो. मी त्याच्याकडे पाहत बसतों.

मानवाचें जीवन या फेंसाच्या पट्ट्यासारखेंच नव्हे कां ? अफाट समुद्रावरची छोटीशी विरघळती खळवळ ! पण ही बोट पाहून असले विषण्ण तात्त्विक विचार मनांत आले नाहींत.

तिच्या रूपानें आणि रंगानेंच मी मुग्ध होऊन गेलों... ती जपानी बोट होती. जपानी जीवनाच्या सर्वच अंगांना कलासक्तीचा स्पर्श झालेला असतो. या बोटीचा आकार फार गोंडस होता. तिचा मागचा वाटोळा भाग एखाद्या युवतीच्या नितंबा-सारखा आकर्षक वाटला. पण मुख्य म्हणजे तिचा रंग – भर दुपारच्या आकाशासारखा तजेलदार निळा रंग ! मनिलाच्या आकाशाशीं आणि समुद्राच्या पाण्याशीं रंगसंगतीचे बदलते प्रयोग करणारा रंग ! त्या रंगानें मी मोहून गेलों ; त्या बोटीच्या कलदार सौंदर्यानें वेडावून गेलों – आणि क्षणार्धांत बोटीला इंग्रजींत ' इट् ' ( it ) न म्हणतां ' शी ' ( she ) कां म्हणतात याचा बोध झाला.

ही सुंदर बोट बंदरांत उभी होती. मनिला बंदर हें जगांतलें एक उत्कृष्ट बंदर आहे. तिथल्या समुद्राचा विस्तार विलक्षण विशाल आहे. कॅव्हिट शहरापर्यंत पोचलेल्या किनाऱ्याच्या प्रचंड परिघामुळें मनिलाच्या उपसागराला आकार आला आहे आणि भव्यता प्राप्त झाली आहे. मनिला हॉटेलच्या मागें असलेल्या छोट्याशा बागेंत सुरू होणाऱ्या आणि लुनेटा पार्कवरील परेड ग्राउंडला बगलेंत मारून ड्युई बुलेव्हार्डबरोबर धावणाऱ्या धक्क्यामुळें त्याला मोठी प्रतिष्ठा चढली आहे. या बंदरांत उभ्या अस-लेल्या बोटींची सायंकाळच्या प्रकाशांत उजळलेली रंगीबेरंगी धुराडीं, समुद्राच्या लाटांवर अखंड हेलकावे खाणाऱ्या होड्यांच्या डोलत्या डोलकाठ्या, यांच्या मधून गर्दींत मूल धावावें तशा इकडेतिकडे पळणाऱ्या लॅंचेस्, नांगर टाकून संथ उभ्या असणाऱ्या बोटींना विलगणारे पडाव – या धक्क्यावर उभें राहून हा देखावा पाहतांना मन खरोखर हरकलें. मनिला बंदरांत अमेरिकनांनीं बुडविलेल्या जपानी नौकांचें पाण्याबाहेर आलेले अगतिक अवशेष दिसतात. त्यांच्या पार्श्वभूमीवर या जपानी मालबोटीचें दर्शन अर्थपूर्ण भासलें. दहाबारा वर्षांपूर्वीच जपानच्या नौकानयनाचे प्रतिनिधी विक्राळ रूप धारण करून येथें आले होते – आणि आज तेच प्रतिनिधी ? पुराणांतरीं मायावी राक्षस सुंदर मोहिनीचें रूप धारण करून पाश पसरीत, – त्याचीच ही आधुनिक आवृत्ति नसेल ना ?

लुनेटा पार्ककडून कॅव्हिटकडे जाणारा ड्युई बुलेव्हाड म्हणजे मनिलाचें एक राज़-विलासी वैभव आहे. मनिला जिंकणाऱ्या अमेरिकन अॅडमिरलचें नांव मिरविणारा हा राजेशाही रस्ता म्हणजे शोकिन श्रीमंतांचें आपल्या लंब्याचवड्या अमेरिकन मोटारींचा थाटमाट उधळण्याचें आवडतें ठिकाण. ज्यांच्यापाशीं मोटार नाहीं, पण हास आहे, त्यांच्यासाठीं एक वरचा मजला उघडा असलेली बस या रस्त्यावरून फेऱ्या मारते —पण फक्त सायंकाळीं. मोटारींच्या संचाराला असा काळाचा अटकाव नाहीं. दिवसभर या भव्य अवाढव्य वाहनांची अखंड चालती-हालती रांग लागलेली असते. सूर्यप्रकाशांत ही रांग—सायंकाळच्या तकाकणाऱ्या लाल, निळ्या, काळ्या, पिवळ्या, शेंदरी, हिरव्या रंगाची रांग—तळपणाऱ्या टपांची रांग—नजर बांधून ठेवते; सूर्याच्या लकाकीनें डोळ्यांच्या बाहुल्यांना त्रास होत असूनहि बांधून ठेवते! रात्रीं मात्र या रस्त्यावर दिवे नाहींत. त्यामुळें मुंबईच्या मरीन ड्राइव्हला मलबार हिलवरील राजलक्ष्मीच्या, रागानें उडवून दिलेल्या रत्नजडित कमरपट्टयाचें सौंदर्य प्राप्त होतें तसें ड्युई बुलेव्हार्डला प्राप्त होत नाहीं. पण रात्रीं मनिला हॉटेलकडील धक्क्यावरून पाहणाऱ्याला एक दिव्यांची रांग तेजाच्या स्पदनानें स्फुरण पावणाऱ्या रत्नांच्या मालिकेप्रमाणें भासते!

अमेरिकन मोटारींचें उडतें वैभव एवढेंच कांहीं ड्युई बुलेव्हार्डचें वैभव नव्हें. मनिलाच्या कांहीं शोभिवन्त इमारती या रस्त्याच्या कडेला आहेत—आणि मनिलाचीं कांहीं राजेशाही हॉटेलें या इमारतींत आहेत. दुसऱ्या महायुद्धांत आरमाराच्या तोफखान्यानें पूर्वीच्या अनेक इमारती कोसळल्या आणि उरलेल्या कांहींवर या माऱ्याच्या खुणा अद्यापहि दिसतात. जपानी आक्रमकांनीं या बुलेव्हार्डचीं मस्त झाडें तोडून त्याचा विमानतळ बनविला होता. साम्राज्यवादानें पाडलेल्या जपानी कलासक्तीच्या मुडद्याचा हा एक दुय्यम पुरावा. युद्धानंतर या राजरस्त्याच्या समुद्राकडील भागावर माड आणि दुसऱ्या कडेला पिंपळवृक्ष यांची लागवड करून त्याच्या उदात्त वैभवाचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण या नवांकुरांना निर्दयपणें झोडपणारा समुद्रावरचा खारा वारा जपान्यांचेंच अनुकरण करीत असतो!

ड्युडई बुलेव्हाडची माझी स्मृति फोर्बेस पार्कशीं निगडित आहे. एका सुदर श्रीमंत स्त्रीनें मला आपल्या क्रिसलरमधून प्रथम ड्युई बुलेव्हार्डवर हिंडविलें आणि तेथून

एक नमुनेदार वसाहत पाहायला म्हणून फोर्बेस पार्कवर नेलें. फोर्बेस पार्क ही मनिलाच्या 'सर-श्रीमतां'ची वसाहत. (रोझालिंडा म्हणाली, 'इकडे त्यांना सुरक्षित वाटतं.' गांवापासून दूर त्यांना सुरक्षित वाटतें यावरून काय तें समजावें!) १९५४ सालीं मीं जनरल रोम्युलोंना भेटायला गेलों तेव्हां या वसाहतींत फक्त चारसहा बंगले आढळले. नंतरच्या वीस महिन्यांत सारी वसाहत भरगच्च भरली. तरी मनिलाच्या 'सर-श्रीमंतां'ची संख्या संपली नाहीं. म्हणून त्यांनीं आणखी एक वसाहत वसविली आणि 'व्हिलेज सेण्ट लोरेन्झो' असें विनम्र नांव तिला दिलें! मागें महात्मा गांधींनीं पुण्याला पर्णकुटीवर उपोषण सुरू केलें, तेव्हां आम्हीं कांहीं मित्र पर्णकुटी पाहायला गेलों. संगमापलीकडच्या त्या भव्य प्रासादाला पर्णकुटी हें नांव दिलेलें पाहून एका मित्रानें आश्चर्य व्यक्त केलें. तेव्हां मीं म्हटलें, "हें नांव विनम्रतेचें द्योतक असेल." त्यावर तो उद्गारला, "विनम्रता तर खरीच, पण ओंगळ विनम्रता."

फोर्बेस पार्क म्हणजे सौंदर्याचा एक नमुना आहे यांत मात्र शंका नाहीं. उंच-सखलपणाच्या आट्यापाट्या खेळणारा भूभाग या वसाहतीसाठीं निवडण्यापासून सौंदर्यदृष्टीचा साक्षेप सुरू होतो. अर्थात यांत कॅलिफोर्नियांतील तत्सम वसाहतींचें अनुकरण आहे, तरीपण प्रत्येक बंगला वैशिष्ट्यपूर्ण आहे. कांहींत वास्तु-शिल्पाचें सौंदय आहे, तर कांहींत केवळ चकमपणा आहे – पण प्रत्येकाला कांहीं एक व्यक्तित्व आहे. कांहीं बंगल्यांतलें फर्निचर दिसलें तेंहि नमुनेदार. कधीं सुंदर तर कधीं विक्षिप्त कोन मापून तयार केलेलीं आवारेंहि आकर्षक वाटलीं. कांहींत सुंदर सुंदर फुलझाडें तर कांहींत मुलांना खेळण्यासाठीं चित्रविचित्र युक्त्या. त्यांच्या-मधून जाणाऱ्या वेड्यावाकड्या रस्त्यांवर रक्तकांचनांचीं झाडें लावलेलीं दिसलीं. त्यांच्या कोवळ्या पालवीचे सुबक आकार पाहून मला पॅरिसच्या रस्त्यांवरील झाडांची आठवण झाली. (पॅरिसच्या रस्त्यांशीं तुलना होऊं शकेल, अशा बॅंकॉकच्या राजदमन ॲव्हेन्यूवर रक्तकांचनाचींच झाडें आहेत – पण तीं किती माफक दिसतात!) जांभळ्या फुलांचीं तोरणें धारण करून उभीं असलेलीं ताम्हनीचीं झाडें सार्वजनिक उद्यानांत नुसतीं डंवरून निघालीं होतीं. श्रीमंत शौकिनांच्या या वसाहतींतील क्रीडांगणांचा आणि हिरव्या लुसलुशीत गवताच्या मैदानांचा उल्लेख नकोच.

१९५४ सालीं पाहिलेल्या रोम्युलोंच्या निवासस्थानाची स्मृति मीं जतन करून ठेवली होती. तिला उजाळा देण्याची इच्छा झाली. पण रोम्युलो अमेरिकेला होते आणि त्यांच्या बंगल्याची राखण करण्यास ठेवलेले कुत्रे आंत येऊं देण्यास तयार नव्हते. पण जी पुसट स्मृति आहे तीच किती सुखद आहे! बंगल्यांतलें महॉगनी लांकडाचें पारंपारिक नव्हें, अत्याधुनिक नव्हें, असें फर्निचर आठवतें. बाहेरच्या फुलझाडांनीं आणि लतावेलींनीं चित्रांकित झालेलें कांचेचें पार्टिशन आठवतें. रोम्युलोंचें प्रेमळ अगत्य आठवतें. (त्याच दिवशीं रात्रीं रोम्युलो गुप्तपणें अमेरिकेला प्रयाण करणार होते. साहजिकच ते गर्दीत होते. तरी त्यांनीं आमचें फक्कड आगतस्वागत केलें. नुकताच लग्न झालेला त्यांचा मुलगा बाहेरून आला तेव्हां एखाद्या लहान मुलाचें घ्यावें तसें प्रेमभरानें त्याचें त्यांनीं चुंबन घेतलें—यावरून त्यांच्या स्वागताला जिव्हाळ्याचा कसा स्पर्श झालेला असेल याची कल्पना येईल.) पण माझ्या विशेष लक्षांत राहिलं आहे तें त्यांचें क्रीडोद्यान. तेथें पोहण्याचें तळें आहे आणि मदिरापानाचा 'बार' आहे. बारची योजना किती कल्पनारम्य! तो बार म्हणजे एखादी होडीच! दोन भिंतींचा काटकोन साधून बारचा 'कौंटर' बसविलेला आहे, तो लहानशा होडीच्या एका बाजूसारखा दिसतो. होडीचें शीड आणि दुसरी बाजू मोठ्या जिवंत रंगांनीं मागच्या भिंतीवर रंगविलेली आहे! हा बार म्हणजे नुसतीच दारू पिण्याची जागा होऊं नये म्हणून कीं काय रोम्युलोंनीं त्याला म्युझियमचें किंचित्-रूप दिलें आहे. समोरच्या भिंतीवर फिलिपीन्सचीं प्राचीन आयुधें आणि कांहीं प्राचीन वाद्यें टांगलेलीं आहेत! हें क्रीडोद्यान म्हणजे शरीर आणि बुद्धि यांना विहरण्याचें उत्तम ठिकाण आहे—त्या अर्थानें मदिरेची योजना बेमालूमच वाटावी!

फोर्बेस पार्कहून परततांना वाटेंत गांवाबाहेर कारखाने आणि त्यांच्या कचेऱ्या लागल्या. गांवाबाहेर कारखाने बांधणाऱ्या कारखानदारांना भी धन्यवाद देऊं लागलों तेव्हां रोझालिंडा म्हणाली, "शहरांतले कर चुकविण्यासाठींच हे लोक कारखाने-कचेऱ्या शहराबाहेर हलवीत आहेत. शहरांत ते फक्त एक लहानशी शाखा ठेवतात. व्यापाराचें सारें काम त्या शाखाच पाहत असतात." (रोझालिंडाची श्रीमती कारखानदारींतून आलेली नव्हती, तर मृत पतीच्या विम्यांतून आलेली होती. त्यामुळें ती सत्य सांगू शकत होती.)

फिलिपिनो धनिकांच्या करचुकवेपणाबद्दल मीं खूप ऐकलं होतें. किंबहुना करचुकवेपणा हा फिलिपीन्सला जडलेला राष्ट्रीय रोग आहे असें वर्णन वाचलें होतें. परकी सरकारचे कर चुकविणें ही बहादुरी होती. जपानी आक्रमणाच्या काळांत ही बहादुरी होती. जपानी आक्रमणाच्या काळांत ही बहादुरी राष्ट्र-भक्तीची द्योतक ठरली. मात्र आतां स्वातंत्र्य आलें. पण कित्येक पिढ्यांची संवय पांचदहा वर्षांत थोडीच जाते? मनिलाच्या धनिकांनीं या देशबुडव्या युक्तीचें अगदीं शास्त्र बनविलें असावें. फिलिपिनो धनिकांच्या व्यवहारांत कसली तरी मेख असल्या-शिवाय त्या देशाच्या विपरीत आर्थिक स्थितीचा *अर्थच लागणें अशक्य* आहे. मनिलाइतकी महागाई इतर कुठें असेल असें वाटत नाहीं. साध्या बूटपॉलिशला बारा आणे ते रुपया द्यावा लागतो. केस कापून घ्यायला अडीच रुपये टिचवावे लागतात. या राक्षसी महागाईचा अर्थ कसा लावायचा? या सव्वादोन कोटी लोकसंख्येच्या देशाला युद्धोत्तर कालांत अमेरिकेनें सुमारें पंधराशें कोटी रुपये दिले आणि फिलिपीन्सच्या ऐतखाऊ धनिकांनीं आणि त्यांच्या तालावर नाचणाऱ्या राजकीय उपटसुंभांनीं ते सारे चैनींत उधळले, असे तळतळीचे उद्गार एका अमेरिकनानें मजपाशीं काढले. महा-युद्धांत वॉरसॉच्या खालोखाल मनिलावर बॉंबफेक झाली, आणि युद्धोत्तर कालांत किती नवीं घरें नि इमारती उठल्या हें पाहिलें म्हणजे या उद्गारांतली अतिशयोक्ति लगेच ध्यानांत येते. (हे उद्गार बेजबाबदार आहेत असा इशारा दुसऱ्या एका अमे-रिकनानें मला दिलाच.) तरीपण मनिलाच्या धनिकांचा ऐषआराम आणि फिलि-पीन्सच्या शेतकऱ्याचें दारिद्र्य यांचा मेळ घालायला लागलें कीं या उद्गारांत सत्याचा अर्थपूर्ण अंश असावा असें वाटूं लागतें.

मनिलाच्या गरीब लोकांच्या वस्तींत याचा कांहीं अर्थ लागतो का पाहावें, म्हणून रोझा-लिंडाला मीं अशा एखाद्या वस्तींत नेण्याविषयीं सांगितलें. तिनें मोटार लगेच तिकडे वळ-वली. मनिलाच्या दरिद्री वस्तीचें दर्शन घेण्यासाठीं फार दूर जाण्याचें कारण नाहीं. लुनेटा पार्कच्या इण्ट्रामुरसमध्यें बॉम्बनें उध्वस्त झालेल्या भागांत गरिबांच्या हव्या तितक्या झोंपड्या आहेत. या झोंपड्यांची अगदीं दाटीवाटी आहे, पण एकंदरीनें त्या व्यवस्थित आहेत. गंजलेले पत्रे, मोडके बांबू आणि फाटकींविटकीं गोणपाटें यांनीं त्या उभ्या राहिलेल्या नाहींत. लाकडें आणि फळ्या यांचा अधिक उपयोग आहे. विशेष म्हणजे प्रत्येक झोपडीला

वैशिष्ट्य आहे, व्यक्तित्व आहे. आपल्याकडील अनेक मध्यमवर्गीयांना या झोंपड्यांत राहण्यास आवडेल. या झोंपड्या पाहत असतांना आग्नेय आशियांत वारंवार आलेला अनुभव पुन्हा आला. आग्नेय आशियांतले देश भारत-पाकिस्तानसारखे दरिद्री नाहींत, आणि तेथली विषमता आपल्याइतकी जबरदस्त नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, निसर्गानेंच आग्नेय आशियाला समृद्धीचा वर दिला आहे. हवें तितकें लाकूड असल्यावर पत्रे, गोणपाटें यांचें दरिद्री सोंग हवेंच कशाला? फिलिपीन्सच्या खेड्यांत आग आणि वादळ यांनीं घरें नेहमींच बेचिराख होतात. पण तीं हां हां म्हणतां पुन्हा उभीं होतात. फक्त विंचवाच्या पाठीवरील बिऱ्हाडाप्रमाणें या घरांची रचना करण्याची काळजी घेतली म्हणजे झालें!

लुनेटा हॉटेलसमोरच लुनेटा पार्क आहे. तो अतिशय विस्तीर्ण, खरें म्हणजे अस्ताव्यस्त आहे. पोस्ट ऑफिसकडचा भाग (त्याला आतां युनायटेड नेशन्स पार्क म्हणतात) ओसाडच म्हणावा लागेल – इतका ओसाड कीं, तेथें उभारलेले अवाढव्य पुतळे केविलवाणे दिसतात. (हे पुतळे उभारायचे तर त्यांच्या आजूबाजूच्या भागाची निगा कां राखू नये हा प्रश्न विचारण्यापूर्वी अनेक सुंदर रस्त्याकांठचे फूटपाथ उकरलेले आणि धुळीनें भरलेले कां हा प्रश्न विचारावा लागेल! कदाचित् 'युनायटेड नेशन्स' या नांवांत कांहीं प्रतिकात्मक अर्थ शोधण्याचा हा प्रयत्न असेल!) पण अस्सल लुनेटा पार्क, म्हणजे रिझाल-स्मारकाकडचा भाग, व्यवस्थित आहे. तेथें गद छायेचीं प्रचंड झाडें नाहींत (तीं पलीकडेच मनिला हॉटेलसमोर आहेत), पण लहानलहान झुडपें आहेत आणि पार्कमध्यें हवा असणारा एकांत मिळण्याइतपत त्यांचा आकार आहे.

रिझाल-स्मारक म्हणजे कला, भक्ति आणि दृष्टि यांचा सुवर्णसंगम होय. फिलिपीन्सच्या इतिहासांत डॉ. होसे रिझाल यांना महात्मा गांधींचें स्थान आहे. फिलिपिनो स्वातंत्र्याच्या या उद्गात्याचें चरित्र म्हणजे सेवा, प्रेम आणि त्याग यांचा एक दैदीप्यमान पट आहे. त्यांच्या अंतिम आत्मत्यागाचा क्षण हा तर फिलिपिनो क्रांतीच्या इतिहासांतला एक अति तेजस्वी बिंदु वाटतो. त्यांच्या चारित्र्याच्या चिंतनानें असंख्य फिलिपिनो देशभक्तांचीं अंतःकरणें उदात्त बनलीं आणि फिलिपीन्सचें स्वातंत्र्य जवळ आणलें.

हें स्मारक म्हणजे एका उंच चवुतऱ्यावर उभारलेला साधा चौकोनी स्तंभ आणि त्याच्या भोंवतालच्या चार शिल्पाकृति – साध्या, सुबक, चैतन्यपूर्ण शिल्पाकृतिः समोर रिझाल यांचा उभा पुतळा ; डाव्या बाजूला मुलाला दूध पाजणारी माता ; उजव्या बाजूला अभ्यासांत गढून गेलेले दोन विद्यार्थी ; आणि मागील बाजूला एक केळीचा रोपा, केळ्यांचा घड आणि जेवणाचीं भांडीं यांचा समूह ! हें सबंध स्मारक म्हणजे मधला स्तंभ आणि सभोंवतालच्या शिल्पाकृती यांची एक चैतन्यशाली चित्राकृति आहे. रिझालवर लोकांची किती भक्ति आहे याचें प्रत्यंतर येथें येतें. मीं अनेकदां स्त्रियांना आणि मुलांना रिझालच्या पुतळ्यासमोर गुडघे टेकून प्रार्थना करतांना पाहिलें. या पुतळ्यासमोर निरनिराळ्या 'पोजेस्'चे फोटो घेण्याचा आधुनिक उद्योगहि पाहिला. एकदां पलीकडेच एका मालविक्याचें जाहिरातबाजीनें तरारलेलें भाषण ऐकलें आणि एकदोनदां तेथल्या झुडपाच्या आडोशाला . . .

रिझाल-स्मारकाच्या पलीकडेच आधुनिक मनिलाचा संस्थापक, स्पॅनिश विजेता लेगास्पी याचा पुतळा आहे. स्पॅनिश नागरिकत्व स्वीकारणारा पोर्च्युगीज नाविक फर्निनाण्ड मॅगेलान १५२१ मध्यें फिलिपीन्समध्यें उतरला. १५७२ मध्यें लेगास्पीनें मनिलाचा मुसलमान राज्यकर्ता महमद सुलेमान याचा पराभव केला, आणि पूर्वेकडील स्पॅनिश साम्राज्याच्या नव्या राजधानीची प्रस्थापना केली.

फिलिपिनो लोकांना प्राचीन संस्कृतीची फारशी देणगी नाहीं, असा एक सवंग आरोप केला जातो. हा आरोप करणें सोपें आहे, कारण स्पॅनिश आक्रमकांनीं एतद्देशीय संस्कृति मुळापासून खणून काढली. पण मनिला हें काव्यपूर्ण नांव ज्यांनीं दिलें त्यांची सांस्कृतिक दृष्टि बरीच संपन्न असावी हें जाणण्यास फार कल्पनाशक्ति लढविण्याचें कारण नाहीं. मनिला शहर पासिग नदीवर आहे. पासिगकांठच्या दलदलींत निलाद नांवाचें सुंदर गवत उगवतें. ( या 'निलाद'चा मेघदूतांतील 'निचुला'शीं कांहीं संबंध असेल काय ? ) म्हणून मनिला ( म्हणजे निलादपूर्ण ) असें नादमय नांव निघालें. फिलिपिनोंच्या स्पॅनिशपूर्व संस्कृतीवर चीन, भारत आणि अरबस्तान यांचे संस्कार होते ( तगालोगमध्यें आशेला 'आसा' लेखनाला 'कथा' आणि चम्पक वृक्षाला 'चम्पाका' म्हणतात ) आणि काव्य, कला आणि संगीत यांचा मोहर तिला आलेला होता. त्यांनीं आपलीं गीतें आणि लेख, एका लवचिक लिपींत, केळीच्या पानांवर,

वृक्षांच्या सालींवर आणि बांबूच्या कामट्यांवर लिहिले होते. पण स्पॅनिश आक्रमक येथें आले ते इंग्रज अगर डच यांच्याप्रमाणें मसाल्याच्या वासानें अगर रेशमाच्या स्पर्शानेंच केवळ मोहित होऊन आले नव्हते. फिलिपिनोंच्या आत्म्याचाहि उद्धार करण्याची दिव्य प्रेरणा त्यांना मिळालेली होती. अर्थात् फिलिपिनोंच्या संस्कृतींत त्यांना सैतानाची लीला दिसली. सैतानाची ही लीला नष्ट करून त्यांनीं पुण्य संपादिलें. लोगास्पीच्या या पुतळ्याला भिडलेलाच असा एक पाद्र्याचा पुतळा आहे. त्याच्या एका हातांत बायबल व दुसऱ्या हातांत तरवारीप्रमाणें धरलेला क्रूस आहे. एकाच मैदानांत समांतर रेषेंत असलेली रिझाल आणि लेगास्पी यांचीं हीं दोन स्मारकें म्हणजे फिलिपीन्सच्या इतिहासाचीं दोन टोंकें होत.

लेगास्पीच्या स्मारकाच्या पलीकडेच एका प्रचंड प्राचीन भिंत दिसते आणि तिच्या काटकोनावर एक भव्य पुतळा दिसतो. एके काळीं हा पुतळा मनिला बंदरांतल्या व्यापारी हालचालींवर देखरेख करी; आज तो खालच्याच मैदानावर चाललेल्या गोल्फच्या खेळावर देखरेख करतो ! पुतळा अभंग आहे, पण त्याला पायाभूत असलेल्या भिंती पडझडत आहेत ! इण्ट्रामुरसचे हे अवशेष भग्नावशेष ! स्पॅनिआर्डांनीं भक्कम भुई-कोटासमान बांधलेलें हें शहर आतां उध्वस्त झालेलें आहे ! कालानें सुरू केलेलें कार्य महायुद्धांतल्या विमानमाऱ्यानें पुरें केलें. युद्धोत्तर कालांत मनिलांत असंख्य इमारतींचीं उभारणा झाली. एर्मिता, मालाते, वगैरे भागांतल्या नव्या इमारती पाहिल्या आणि विशेषतः चर्चच्या नव्या वैभवशाली इमारतींचा वेध घेतला म्हणजे या पुनर्रचनेच्या विस्ताराची कल्पना येते. (मालाते-एर्मिता भागांत पूर्वीं अमेरिकन राहत. आतां यांच्या वास्तव्याच्या खुणा फ्लोरिडा स्ट्रीट, पेनसिल्व्हानिया स्ट्रीट, असलीं नांवें धारण करून वाहणाऱ्या रस्त्यांच्या रूपानें आहेत.) पण इण्ट्रामुरसमध्यें मात्र नवीन इमारती फारशा उठलेल्या नाहींत. सरकारची परंपराप्रियता याला कारण आहे. त्यानें एक दिवस हुकूम काढला कीं, इण्ट्रामुरसमधल्या नव्या इमारती थेट जुन्याबरहुकूमच बांधल्या पाहिजेत. अमेरिकेची नक्कल उठविण्यांत आनंद मानणाऱ्या फिलिपिनोंनीं हा हुकूम पाळलाहि नाहीं, मोडलाहि नाहीं — त्यांनीं इमारतीच बांधल्या नाहींत ! आणि एका काळीं स्पॅनिश अभिमानाचा झेंडा फडकविणाऱ्या या भागावर आज फक्त असंख्य झोंपड्या दिसतात. इण्ट्रामुरसमधल्या कॅथिड्रालची पुन्हां बांधणी सुरू झाली

आहे. ती थेट स्पॅनिश पद्धतीची होईल, पण इतरत्र नव्या इमारती होतील तेव्हां त्या आधुनिकच असतील. मनिला क्रॉनिकलची इमारत एवढी ग्वाही देईल.

लुनेटा हॉटेलमागचा आयझॅक पेराल रोड आणि माबिनी स्ट्रीट यांच्यावर हिंडणें हा माझा एक आवडता छंद होता. आपल्या मालाची कलापूर्ण मांडणी करणाऱ्या समृद्ध वैभवपूर्ण दुकानांच्या दर्शनानें नेत्रांना मिळणारा आनंद (आणि क्वचित् खिशाला होणारा उपद्रव) एवढ्यामुळेंच हे रस्ते माझ्या लक्षांत राहिलेले नाहींत. या रस्त्यांवरून हिंडतांना आपल्या कलाप्रियतेवर सुंदर संस्कार होत आहेत असें वाटलें. गृहप्रसाधनांचीं दुकानें या रस्त्यांवर आहेत आणि त्यांनीं करून ठेवलेले घराच्या अंतर्रचनेचे नमुने आपल्याला वास्तुपाठ देत असतात. फुलांच्या एका दुकानाच्या खिडकींत जपानी बागेची नमुनेदार रचना आढळली! पण याहिपेक्षां या रस्त्यावर असलेल्या आर्ट गॅलेऱ्या ' अधिक ओढ लावतात. प्रसिद्ध पाग ( Philippines Art Gallery ) ही आधुनिक चित्रकारांची संस्था माबिनी स्ट्रीटवर आहे. १९५४ सालीं या संस्थेंत जाऊन आलों तेव्हांच ध्यानांत आलें होतें कीं, या इवलाल्या राष्ट्राच्या कलाविश्वांत कसलीं तरी अर्थपूर्ण आंदोलनें होत आहेत. व्हिसेंटे मनानसाला, व्हिक्टर ओत्येझा, एर्नाण्डो ओकाम्पो, सिझर लेगास्पी, आतुरो लुझ, फनाण्डो झोबेल, अनिता मॅग्सेसाय्-हो इत्यादींच्या प्रतिभेनें उजळलेल्या या विश्वांत नव्या प्रेरणा, नव्या पद्धती आणि नवीं दर्शनें यांचा आविष्कार होत आहे. युद्धसमाप्तीनंतर आर्ट असोसिएशन अस्तित्वांत आली — आणि तिच्या उत्तेजनानें कलावंत आणि रसिक या दोघांनाहि नवे पंख फुटले. नव्या दृष्टीच्या, नव्या दमाच्या कलावंतांना निराळ्या, अधिक आटोपशीर संस्थेची गरज भासली नि ' पाग ' निघाली. तसेंच, ' आ ऽ प ' च्या ( AAP–Art Association of the Philippines ) एका प्रदर्शनांत कांहीं चित्रकारांच्या चित्रांना स्थान मिळालें नाहीं, तेव्हां त्यांनीं सरळ आपलीं चित्रें खाकोटीला मारलीं आणि मनिला हॉटेलासमोरच्या वृक्षांच्या छायेंत एक खुलें (open air) प्रदर्शन मांडलें. त्यांतल्या गोंडस गुलगुलीत चित्रांनीं, मनिलांत उतरणाऱ्या प्रवाशांचें व इतरांचें इतकें लक्ष वेधून घेतलें कीं, हें खुलें प्रदर्शन ही एक स्वतंत्र संस्थाच बनली. तिच्यांत कलेचा आविष्कार बेताचाच असला तरी संस्था जोसांत आहे! यंदा मार्चमध्यें मी गेलों तेव्हां दुसऱ्या वर्षाचें प्रदर्शन सुरू होतें.

'आऽप'चे अध्यक्ष डॉ. ग्रगोरिओ लिम यांच्या घरचा एक तास म्हणजे एक अविस्मरणीय अनुभव होता. मनिलाच्या तोंडो भागांतलं तें घर खरोखरच एक चमत्कार म्हणायचा. जुनी उपमा वापरून बोलायचें म्हणजे भांगेंत तुळस! घाण, गुंड आणि मवाली यांचा भाग म्हणून प्रसिद्ध असलेल्या तोंडोंतल्या हाणामारीच्या हकीगती वर्तमानपत्रांत नेहमीं प्रसिद्ध होत असतात. पण डॉ. लिमनीं त्याच भागांत आपला दवाखाना थाटला आहे आणि डॉक्टरांनीं पत्नीच्या साहाय्यानें त्याला मोठें झोकदार स्वरूप आणलें आहे. त्यांचा बंगला बाहेरूनच लक्ष वेधून घेतो, पण त्याच्या आंतल्या ऐश्वर्याची कांहीं कल्पना बाहेरून येत नाहीं. बंगल्याच्या आवारांत शिरल्याबरोबर प्रवेशद्वारासमोरच्या पक्षीगृहांतले रंगी-बेरंगी पक्षी तुमचें उडतें-बागडतें स्वागत करतात. या तीन मजली वाड्याचा एकेक मजला म्हणजे कलाविश्वाचें एकेक दालनच आहे. पुतळे, शिल्पाकृति, निरनिराळ्या धातूच्या कलाकृति, हस्तकौशल्याच्या वस्तु, वाद्यांचे कलात्मक प्रकार, चिनी मातीच्या बरण्या, गालिचे, चित्रें, फुलझाडें, वेली-किती म्हणून प्रकार! कांहींचा उल्लेख केलाच पाहिजे – विशेषतः तीन इंच लांबीच्या पावपौंडी इस्त्रीचा! डॉक्टरसाहेब प्रवासांत ती बरोबर नेतात, आणि तिनें कपड्यांना इस्त्री करतात. तसेंच ते नाना देशांतले धूम्रपानाचे पाईप्स! अक्षरशः अनेक आकारांचे-चर्चिलचा चेहरा, बैलाचें डोकें, व्हेल मासा, बूट, असे अनेक आकार. त्यांतले कांहीं अर्थपूर्ण आहेत. उदाहरणार्थ, डेन्मार्कमधला पाईप आपल्या हुक्क्यासारखा आहे, आणि एका अमेरिकन पाइपाचें डोकें कमोडसारखे आहे! डॉक्टरसाहेबांनीं अनेक देशांतून बाहुल्या गोळा केल्या आहेत, आणि त्यांचा आंतरराष्ट्रीय मेळावा मोठा मजेदार वाटतो. या वस्तुसंग्रहांत आशिया–अरबस्थानांतील लोकसंगीताच्या रेकॉर्डस् आहेत. त्यांच्या स्वरांनीं डॉक्टरसाहेबांच्या टेबलावरच्या खाद्यपदार्थांची गोडी वाढली. मात्र भारतांतलें लोकसंगीत एका हिंदी सिनेमांतलें मामुली द्वंद्वगीत निघालें तेव्हां मात्र ठसका लागला! डॉक्टर लिमनीं या साऱ्या वस्तु निरनिराळ्या देशांत खरेदी केल्या. आणि त्या विकत घेणें शक्य व्हावें म्हणून ते वाय. एम्. सि. ए. मध्यें राहिले आणि त्यांनीं स्वतःचे कपडे स्वतः धुतले! एकेका खोलींतली या वस्तूंची सुरुचिर रचना म्हणजेच एक कलाकृति होती! डॉक्टरसाहेबांची दृष्टीच चोखंदळ आहे. खिडक्यांच्या साध्या जाळ्यांवर त्यांनीं लावलेल्या मत्स्याकृतीपासून

त्यांच्या प्रवेशद्वारांतल्या पक्षीगृहाच्या आकारापर्यंत सर्व रचनेंत ती दिसते. चित्रकलेचे तर इतके प्रकार! वाटावें एखादें आंतरराष्ट्रीय चित्रकलाप्रदर्शनच उघडलें आहे. त्यांत गोपालकृष्णाचें एक भारतीय चित्र आहे–आणि एक सिरियन! यांतच डॉक्टर-साहेबांचीं स्वतःचीं चित्रें–कारण डॉ. लिम शस्त्रक्रियेच्या कात्रीप्रमाणेंच चित्रकलेचा कुंचला वापरण्यांत कुशल आहेत. या साऱ्यांच्या सौंदर्यांत त्यांच्या मधुर स्वभावाचा विशेष भर पडली आहे. त्यांचा कलेविषयींचा उत्साह खरोखर विलक्षणच. एखादा रसिक भेटला कीं, त्याला भरतीच येते. आपल्या एकेक खोलींतल्या कलाकृती ते स्वतः हिंडून मला दाखवूं लागले. पाहतां पाहतां एका चित्राला उद्देशून मी म्हणालों : " हा मनानसाला. " आतां, मनानसालांचीं चित्रें ओळखणें जरा कठीण असतें. ते 'मॉडर्निस्ट' आहेत एवढीच अडचण नाहीं, त्यांनीं आजवर अनेक पद्धतींनीं चित्रें रंगविलीं आहेत आणि त्यांतल्या अनेकांचे नमुने डॉक्टरांपाशीं आहेत. पण आदल्याच रात्रीं मी मगतंगूल आसा यांच्याकडे मनानसालांचा एक संग्रह पाहिला असल्यानें मला तें चित्र ओळखतां आलें. पण त्यांना त्याची विलक्षण अपूर्वाई वाटली, आणि दिसेल त्याला ती गोष्ट ते सांगत सुटले. कर्मधर्मसंयोगानें मनानसालाच तितक्यांत तेथें आले नि मग डॉ. लिमच्या उत्साहाचें काय झालें असेल याची नुसती कल्पना करा! असा गृहस्थ आर्ट असोसिएशनचा अध्यक्ष असावा हें फिलिपीन्सचें–फिलिपीन्सच्या कलाविश्वाचें — खरोखर भाग्य होय.

हा झाला मनिलाचा शृंगार. मनिलाच्या आत्म्याचें दर्शन घेण्यासाठीं शहरांत (down town) गेलें पाहिजे. पण तिकडे जाण्यापूर्वी दोन इमारतींत डोकावलें नाहीं तर मनिलाची भेट फुकटच गेली म्हणायची! प्रथम 'आय-लाय' (jai Alai) इमारत. 'आय-लाय' हा एक स्पॅनिश खेळ आहे. जगांतला सर्वांत गतिमान खेळ असें त्याचें वर्णन करायला हरकत नाहीं. भिंतीवर चेंडू आपटून तो उलट आला म्हणजे तो त्वरेनें पकडून तसाच उलट भिंतीवर आपटण्याचा खेळ आपल्याकडे मुलें, क्रिकेट अगर लगोऱ्या खेळण्यास अवश्य असलेल्या सहकाऱ्यांच्या अभावीं खेळतात, त्याचीच ही प्रचंड वेग देऊन बनवलेली फर्मास आवृत्ति! यांत चेंडू समोरच्या ३२×३२ फूट भिंतीवर हातानें मारायचा — आणि तो परत आला कीं, जमिनीवर पडण्यापूर्वी अगर एक टप्पा खाल्ल्यावर पकडायचा आणि परत भिंतीवर मारायचा — टप्पा चुकेपर्यंत

मारायचा असा हा खेळ आहे. पण येथें हात म्हणजे हाताला बांधलेली पोफळीच्या विरीसारखी अगर मोटरसायकलच्या मडगार्डसारखी वेताची परडी आणि चेंडू म्हणजे खास ब्राझीलिअन रबराचा घट्ट बनविलेला आणि ताशीं दीडशें मैल वेगानें उडणारा गोळा ! खेळाडूच्या नजरेची आणि शरीराची चपळाई कमी पडली तर हा तोफेचा गोळा प्राणच घ्यायचा ! पण असें कधीं घडल्याचें ऐकिवांत नाहीं. कारण उभ्या मनिलांत अवघ्या २७ खेळाडूंसच हा खेळ खेळण्याचा परवाना आहे, आणि 'प्रकृति फक्कड असल्याखेरीज खेळण्यास मनाई आहे' या नियमाची सक्त अंमलबजावणी होते. या खेळांत एक प्रकारचा तोचतोपणा असूनसुद्धां त्याच्या राक्षसी वेगानें नजर थरारून जाते. 'आय-लाय' इमारतींत लोकांची झुंड लोटते ती मात्र खेळाच्या निरपेक्ष ओढीनें नव्हे. मनिलाचे लोक या खेळावर असा कांहीं जुगार खेळतात कीं, महालक्ष्मीचंच वारें या इमारतींत उफाडतें !

दुसरी इमारत नॅशनल प्रेस क्लबची. पासिगच्या पुलावरून गांवांत जातांना तुमच्या नजरेंत ती भरेलच. कारण आधुनिक वास्तुशिल्पाचा ती एक नमुनाच आहे. पोलाद आणि कांच यांचा नाजुक कलामय उपयोग केल्यास परीगृहाचें स्वप्न साकार करतां येतें हें आधुनिक वास्तुशिल्पानें या इमारतीच्या रूपानें सिद्ध केलें आंहे. पासिगच्या तीरावर ही इमारत उभी झाल्यामुळें पलीकडच्या तीरावरील भव्य इमारतींना चक्क गुदामाचें रूप आल्यासारखें भासतें. या इमारतींचा नक्षा उतरविण्यासाठीं तर पत्रव्यवसायाच्या निदय धबडग्यांत धांदलणाऱ्या पत्रकारांनीं हें स्वप्नगृह उभारण्याचा छंद धरला नसेल ! (नाहीं तरी लेखनाच्या क्षेत्रांत गंभीर विद्वत्तेला गुदामाचें रूप देण्यासाठीं पत्रकारांची चतुरचपल बुद्धि धडपडत असतेच !) रात्रीं पासिगपलीकडच्या इमारतींवर निऑन-लाइट्स्नीं आपली रंगीत जादू सुरू केली आणि त्यांचीं तरल प्रतिबिंबें पासिगच्या पाण्यावर पडलीं म्हणजे प्रकाशानें फुललेली ही इमारत एकाद्या मायानगरीचाच भाग वाटतो.

या इमारतींत तुम्ही शिरा, कोणत्या तरी सभासदाचे पाहुणे म्हणून प्रवेशपुस्तकावर सही करा, म्हणजे क्लबाच्या एअर-कंडिशण्ड लाउंजमध्यें तुमचा प्रवेश होईल. तेथें तुम्ही कॉफीच्या टेबलावर चाललेला वाद ऐका, नाहीं तर मित्राशीं गप्पा मारीत टेलिव्हिजन पाहा, किंवा निव्वळ लोकांनीं दिलेल्या ग्रंथावर शहरांतलें सर्वोत्कृष्ट

ग्रंथालय म्हणून नांवाजलेल्या ग्रंथालयांत शिरा, तेथें वाचक गंभीर ग्रंथ टाळण्याचा प्रयत्न करीत आहेत ते पाहा, अथवा या पुस्तकांच्या पसाऱ्यांत बुद्धिबळांचा पट उघडून खेळत बसलेल्यांच्या चेहऱ्यांवरचे चमत्कारिक भाव पाहा, किंवा ग्रंथालयांत फार काळ न थांबतां ( कारण तेथें फार वेळ कोणीच बसत नाहीं ) बाहेर येऊन पत्रकारांचा चाललेला हास्यविनोद, गप्पागोष्टी वादविवाद किंवा वाद-संवाद ऐका, नाहीं तर तेथल्या साध्या, सुबक, अत्याधुनिक धर्तीच्या बाकावर बसून व्हिसेंटे मनानसालांनीं रंगविलेल्या भित्तिचित्रांचें निरीक्षण करा – तुम्हांला आढळून येईल कीं कुठेंहि जा, पत्रकार तो पत्रकार ! तोच उच्छृंखल उत्साह, तीच रंगेल वृत्ति, तीच बेलगाम भाषा, तेच जोरकस हावभाव, तेच परस्परांवर केलेले निसटते वार, तीच जगाला आडवें मारण्याची ( वाचिक ) हिंमत !

या परीगृहाच्या उभारणीचा इतिहास खरोखर परीकथेसारखा आहे. हा क्लब १९५२ सालीं स्थापन झाला. संस्था निर्माण झाली कीं तिला इमारतीची आस लागते. फिलिपीन्स काँग्रेसनें वीस लाख पेसो किंमतीची जागा एक पेसोला दिली. ( १ पेसो = २ रु. ६ आणे ). सरकारी फायनान्स कार्पोरेशननें तीन लाख पेसोंचें कर्ज दिलें आणि सन्मित्रांनीं व सन्नागरिकांनीं एक लाख पेसोंची देणगी दिली – आणि हां हां म्हणतां ही स्वप्नपुरी उभी झाली !

या क्लबाशीं संलग्न असलेली एक स्मृति मीं अगदीं जपून ठेवली आहे. प्रे. मॅग्सेसाय् यांच्याबरोबर विमान-अपघातांत ठार झालेले पत्रकार, मि. पाब्लो बॉटिस्टा यांचें शव नॅशनल प्रेस क्लबमध्यें ठेवलें होतें. ते 'लिवेवे' या तगालोग पत्राचे बातमीदार होते. प्रे. मॅग्सेसायच्या दैनंदिन कार्यांचा चरित्रात्मक वृत्तांत ते आपल्या पत्रांत लिहीत, आणि म्हणून ते बरेचसे मॅगसेसायच्या सहवासांत असत. मृत्यूंत देखील त्यांनीं प्रेसिडेंटचा सहवास सोडला नाहीं ! त्यांच्या शवाचें दर्शन घेण्यासाठीं मी नॅशनल प्रेस क्लबमध्यें गेलों. तेथला तो देखावा म्हणजे सौंदर्य आणि शोक यांचा असमान्य संगमच होता ! म्लान मुद्रा आणि दिव्यांची आरास ; ओढलेल्या नजरा आणि फुलांचे हार ; शोकनिदर्शक पोशाख आणि औपचारिक नमस्कार-चमत्कार ! खरोखर मृत्यु सुंदर करण्याची ख्रिश्चनांची कला अलौकिक ! बॉटिस्टांचें अंत्यदर्शन घेऊन खालीं उतरतांना माझी नॅशनल क्लबच्या रेस्टोराँ–लाउंजकडे नजर गेली, तेथली स्तब्ध

शांतता जाणवली आणि वाटलें, "पत्रकारांच्या उत्तानपणावर मात करण्यासाठीं मृत्यूला पाचारण करावें लागावें काय?"

प्रेसिडेंटचा प्राण घेणाऱ्या अपघातांतून एकच व्यक्ति वांचली. ती म्हणजे 'फिलीपीन्स हेरल्ड' चे बातमीदार माता. ते वांचलेले ऐकून एक पत्रकार म्हणाला, "You see, you cannot kill a journalist. Like a cat he has nine lives." (ध्यानांत ठेवा, पत्रकाराला मारणें शक्य नाहीं. मांजराप्रमाणें त्याला नऊ प्राण असतात.) पाब्लो बॅटिस्टांचें अंत्यदर्शन घेतांना मला हे उद्गार आठवत होते. पण इरसाल पत्रकाराला अनेक प्राण नसले तरी अनेक जीवनें असतात, हें मला पटत होतें. त्याचें जीवन एकेरी नसतें, एकपदरी नसतें. त्याला अनेक अंगें, अनेक पापुद्रे असतात. म्हणून त्याची गति अनेकमार्गी असते. त्याला नुसता क्लब पुरत नाहीं, बारहि लागतो. नुसत्या नाटकानें भागत नाहीं, तमाशाहि हवा असतो. अभिजात नृत्याबरोबर बॉल-डान्सिंगहि लागतें. नुसत्या ब्रिजनें कंटाळा येतो, रमीची गरज भासते. त्याच्या दृष्टीनें जीवन ही नुसती शर्यत नसते; जुगारहि असतो!

सोवनसिंगांनीं हें अचूक ओळखलें आणि 'लायन्स इन' नांवाचा एक 'बार' काढला. त्याचें दुसरें नांव 'न्यूजपेपरमेन्स ॲले' असें आहे. आपलें इन हें 'नॅशनल प्रेस क्लब'चें 'एक्स्टेन्शन' आहे असें ते म्हणत असतात – तिकडे जीव गुदमरला कीं पत्रकार इकडे येतात! "आमच्याकडे खरी वदळ रात्रीं बारानंतर. पत्रकारांखेरीज इतरहि लोक येतात, त्यांना आम्ही 'सिव्हिलियन' म्हणतों." (या 'सिव्हिलियन' शब्दांत किती तुच्छता आहे हें जाणण्यासाठीं तो सोवनसिंगांच्या तोंडून ऐकला पाहिजे.) इकडे पत्रकार येतात ते पिण्यासाठीं नाहीं तर ढोसण्यासाठीं; गप्पा मारण्यासाठीं नव्हे तर छाटण्यासाठीं; गंमत करण्यासाठीं नाहीं तर धिंगाणा घालण्यासाठीं; वेळ काढण्यासाठीं नाहीं तर वेळ बुडविण्यासाठीं – एकदरींनें मस्त स्वैर बनण्यासाठीं; म्हणून बाहेर जातांना ठळकपणें दिसावी अशी सोबनसिंगांनीं पाटी लावली आहे कीं – "Off the record." (पण ते तुम्हांला जरूर तर बजावतील, "No immoralities allowed!")

या 'इन'चें दर्शन हेतूबरहुकूम आहे. येथें ग्रंथालय नाहीं, गाण्याचा 'रेकार्ड-प्लेअर' आहे; मोठमोठ्या पत्रकारांचीं छायाचित्रें नाहींत, व्यंगचित्रें आहेत; भित्तिचित्रें

नाहींत, पत्रकारांना बंदिस्त करणारा प्रतीकात्मक पिंजरा आहे. 'रोलकॉल ऑफ ऑनर' असला फलक नाहीं, 'Rogue's Gallery' हा फलक आहे आणि थोरथोर तत्त्ववचनांच्या पाट्या टांगलेल्या नाहींत, तर उमरखय्यामचीं वचनें आहेत. अर्थात् उमरखय्यामच्या त्या विश्वविख्यात वचनाचा सोवनसिंगांना विसर पडेल हें कसें शक्य आहे? त्यांनीं या 'इन' मध्यें सुंदर तरुण परिचारिका ठेवल्या आहेत. तुम्हीं आंत गेल्यावरोबर त्यांतली एक तुमच्याकडे येते, सहास्य स्वागत करते आणि तुम्हांला हवें तें पेय आणून तुमच्यावरोबर गप्पागोष्टी करीत बसते. तुम्हांला दारू पाजणें, शक्य तितकी अधिक पाजणें, तुम्ही खूष झालांत तर तुमच्या खर्चानें स्वतः पिणें, हेंच तिचें कार्य असतें; कारण तिला ठराविक पगार नसतो – तर तुमच्या दारूच्या एकेक बाटलीमागें तिला कमिशन मिळतें! तुम्हांला गाफील करून शक्य तितकें अधिक प्यायला लावण्यासाठीं ती कसलाहि फाजीलपणा करीत नाहीं (करण्याची परवानगीच नाहीं), तर ती आपल्या चपलचतुर वचनांनीं तुम्हांला भारते. संभाषण-चातुर्य हेंच तिचें खरें शस्त्र असतें. क्वचित् ती नाचते, तुमच्या कानांत गुजगोष्टी करते, तुमच्या अंतरंगांत शिरून तेथला एकादा कोपरा कावीज करते – एकदरींत ती तुमची उत्तम मैत्रीण बनते!

रोझा कॉस्टिलो ही माझी अशी मैत्रीण बनली. पण तिच्या मैत्रीची जात आणि खोली मला एकदम कळली नाहीं. कारण तिचें संभाषणचातुर्य तिच्या अंतःकरणाचे सारे कोपरे एकदम उघड करणारें नव्हतें. तिची गप्पांची कला म्हणजे रंगीबेरंगी फुग्यांची कला—उथळ गोष्टींची कला. ती तिनें पूर्ण हस्तगत केली होती. चेष्टा, विनोद यांचीं आयुधें ती, सर्कशींतला वाकबगार ज्या कौशल्यानें पांचसहा चेंडू हवेंत उडवीत ठेवतो त्या कौशल्यानें वापरी.

मला ती म्हणाली : "You are a good boy, good boy! No smoke, no drink, no woman!" या चेष्टेंतला विदारक घाव इतका बेमालूम होता कीं, माझें मलाच चमत्कारिक वाटलें आणि मी तिच्या हातांतली सिग्रेट घेऊन ऐटीनें शिलगावली.

आणि त्यावर ती अशी हसली, अशी हसली कीं, मीं ती सिग्रेट तोंडांतून काढली आणि फेकून दिली!

अशी ही रोझा! पण मी फिलिपीन्स सोडण्याच्या आदल्या दिवशीं तिचा निरोप घेण्यास गेलों तेव्हां ती एकदम गंभीर झाली. बीअरच्या पेल्याकडे निश्चल पाहत आणि हातांतल्या सिग्रेटची राख राखपात्रांत उडवीत राहिली. जरा वेळानें म्हणाली : "Why don 't you take me to India ?— Your wife must be wanting a maidservant or something."

स्वतः सोबनसिंग हे गप्पांचे वस्तादच आहेत. त्यांची तल्लख बुद्धि त्यांच्या शब्दा-शब्दांतून व्यक्त होते. त्याशिवाय का व्यापारासाठीं फिलिपीन्समध्यें आलेल्या एका शिखाचा हा मुलगा फार हुशार पत्रकार म्हणून नांवाजला जातो, एका प्रसिद्ध कुटुं-बाशीं लग्नसंबंध जोडतो आणि एका विमाकंपनींत प्रमुख अधिकारी म्हणून वावरतो? हें 'इन' हा त्यांचा नुसता छंद आहे. लोक पीत असतात, हे बोलत असतात. एकदां एक अमेरिकन पत्रकार या 'इन'मध्यें शिरला. सोबनसिंग कौंटरमागें होते. सोबनसिंगांनीं त्याला प्याला भरून दिला आणि ते गप्पा मारूं लागले. गप्पा रंगल्या. नाना विषय झडले. जगाच्या राजकारणाची उलथापालथ झाली. अमेरिकन खूष झाला. म्हणाला, "You are the most intelligent bar-tender I have met." त्याला सोबनासिंग बार-टेंडर वाटले होते. सत्य कळलें तेव्हां तो इतका हसला कीं, तें हास्यच दारूपेक्षां अधिक चढलें!

'लायन्स इन'मध्यें येणारे 'सिव्हिलिअन्स' थोडेच. कांहीं लोकांना लेखक–पत्रकारांत मिरविण्याची हौस फार. त्यांच्यांत लेखन–वाचनाचा गुण फारसा नसतोच, पण लेखणी–वाणीच्या वस्तादांत मिसळून 'इन्टलेक्चुअल' म्हणून मिरविण्याची ही सोपी युक्ति त्यांना चांगली अवगत असते. असे, सुदैवानें फारसे नसलेले, लोकच येथें येतात. यांतलाच एक मला भेटला. हिंदुस्थानांतला एक लेखक आपल्याला भेटला याचाच त्याला मनस्वी आनंद! त्या आनंदाच्या भरांत त्यानें माझा हात इतक्या जोरानें दाबला कीं, 'लायन्स इन'ची माझी स्मृति त्यामुळें थोडीशी जखमी बनली आहे. तो मला म्हणाला, "I come here to meet people like you — I don't come here for courting." पण ही घमेंड फुकट होती. 'कोर्टिंग'ची तेथें सोयच नव्हती. खरें म्हणजे दारू पिऊन झिंगण्यासाठींच तो मुख्यतः येत असावा आणि म्हणून तेथल्या कांहीं मुलींचा तो फार आवडता दिसला.

'कोर्टिंग' साठीं घराबाहेर पडणारे लोक मुख्यतः 'नाइट-क्लब'मध्यें जातात— अर्थात् एका विशिष्ट प्रकारच्या नाइटक्लबमध्यें, कारण सारेच नाइट-क्लब वेश्यागृहें नसतात. पुष्कळ नाइट-क्लब्स म्हणजे संगीत आणि नृत्य यांची निरुपद्रवी करमणूक पुरविणारीं ठिकाणें असतात. हॉंगकॉंगच्या 'नाइट-क्लब्स'मध्यें तर दारू पिण्यासहि बंदी असते.

पण आम्ही ज्या नाइट-क्लबमध्यें शिरलों ती वेश्यागृहाचीच संभावित आवृत्ति दिसली. आंत शिरल्याबरोबर निघून जाणें वाईट दिसेल म्हणून आम्ही तिथें थोडा वेळ बसायचें ठरविलें.

माझ्या शेजारीं एक मुलगी येऊन बसली. नटलीथटलेली, पण पिचलेल्या शरीराची, ओढलेल्या चेहेऱ्याची. तिच्या डोळ्यांतले करुण भाव अंतःकरणाला भिडणारे होते. मला तरी तेथल्या बहुतेक मुलींचे चेहरे तसेच वाटले. साहजिक आहे. त्यांच्या साऱ्यांच्या आयुष्याची ओरड एकच-आयुष्यांत जगण्यासारखें कांहीं नाहीं, पण जगावें लागतें. आणि दुसऱ्याला आनंद देण्याचा उद्योग करीत जगावें लागतें ! त्याची त्यांना संवय झालेली असते, पण आंत कुठें तरी दुःख सलतच असतें, आणि एकादवेळेस कांहीं तरी होतें आणि चिळकांडी उडते !

इतर नाइट-क्लब्सप्रमाणें येथेंहि गिऱ्हाईक जितकी अधिक दारू पिईल तितकें या मुलींना अधिक कमिशन. पण माझ्या पोटाला दारू सोसत नाहीं, म्हणून मी फळाचा रस मागविला. तिच्या चेहेऱ्यावर निराशा उमटली. मीं तिला म्हटलें : "तूं स्वतःसाठीं हवी तितकी दारू मागव."

तिनें गोड हास्य केलें. उठली आणि माझ्यासाठीं ऑरेंज-ज्यूस आणि स्वतःसाठीं रम घेऊन आली.

तुझं नांव काय-तुमचें नांव काय, तूं कुठली-तुम्ही कुठले, येथें कशासाठीं आलांत, किती दिवस राहणार, असले मामुली प्रश्न झाल्यावर तिनें आपण नृत्य करूं या, असें सुचविलें. मला नाचतां येत नाहीं-आणि असें नाचणें आमच्या संस्कृतीशीं सुसंगत नाहीं असें मीं तिला सांगितलें. तिनें कारण विचारलें. मी तिला नृत्याचें भारतीय तत्त्वज्ञानच थोडक्यांत सांगितलें तिला तें कळलें नसावेंच, पण तिच्या चेहऱ्यावर अबोध आदराचे भाव पसरले.

जरा वेळानें तिनें आपण बाहेर फिरायला जाऊं या, असें सुचविलें. याचा अर्थ उघड होता. मीं तिला मग स्पष्ट सांगितलें कीं, मला असलें कांहीं करायचें नाहीं, आणि तूंसुद्धां केवळ पैशांच्या ओढीनें हें करायला तयार झाली आहेस – ते पैसे मी तुला देईन. तूं आपण नुसत्या गप्पा मारूं – मित्र म्हणून बोलूं.

तिच्या चेहऱ्यावर एकदम मोकळा भाव पसरला. कसल्या तरी अप्रिय कर्तव्यांतून मुक्त झाल्याचा आनंद त्यांत स्पष्ट होता. त्यानतर तिनें एखादी स्त्री पुरुषाला स्वतः-संबंधीं जें जें सांगूं शकेल तें तें मला सांगितलें. एका तरुणानें लग्नाच ं वचन देऊन फसविलें म्हणून स्वतःवर सूड म्हणून ती या धंद्यांत कशी पडली, आईबापांना पोसण्याचीहि दृष्टि यांत कशी होती, या धंद्यांत स्वार्थ, दुष्टपणा आणि वैषयिकता यांचें कसें अभद्र मिश्रण झालेलें आहे, अमेरिकन प्रेमिक कसे असतात, फिलिपिनो कसे असतात, वगैरे अनेक गोष्टी तिनें सांगितल्या. एखाद्या अडगळीच्या अंधाऱ्या खोलींत बॅटरीचा भेदक झोत फिरवीत फिरावें तसें मला वाटलें.

आपल्याला रोग झालेला आहे आणि आपल्यावरोबर संबंध ठेवणें म्हणजे रोगांत खिदपणें होय, हेंसुद्धां तिनें मला सांगितलें !

जरा वेळानें आम्ही निघालों. माझ्या मित्रांच्या 'मैत्रिणी' ताबडतोब त्यांचा निरोप घेऊन दुसरे मित्र शोधायला गेल्या. आणि ही–?

ही मला बंगल्याबाहेर आवाराच्या दरवाजापर्यंत पोंचवायला आली. तिनें अखेरीस माझ्याशीं हस्तांदोलन केलें तेव्हां तिच्या डोळ्यांत पाणी तरारलें !

त्या तिच्या नजरेंतील पाण्याची आठवण ही एका अमोल क्षणाची आठवण आहे !

ज्यांना प्रेसक्लबचें वातावरण मानवत नाहीं, 'लायन्स इन' चें चालत नाहीं आणि नाइट्-क्लबच्या (उघड) उल्लेखानें ज्यांची मर्जी बिघडते असा एक शिष्टांचा वर्ग असतो – उच्चभ्रू लेखक, वुद्रुक संपादक, पैसेवाले बुद्धिजीवि आणि संपन्न उद्योगपति यांचा वर्ग ! ते एस्कोल्टावरील 'बोटिको बोई'त जातात. सकाळीं दहा वाजतां दरवाजे उघडणाऱ्या आणि सायंकाळीं बरोबर साडेसहाला ते बंद करणाऱ्या 'बोटिको बोई'ची शिस्त त्यांना बरी वाटते. तेथल्या औषधांचें दर्शन त्यांच्या प्रकृतीस आराम देतें. तेथले दर त्यांच्या खिशाची इभ्रत मानतात आणि तेथलें वातावरण त्यांना अंतराळांत वावरल्याचें समाधान देतें ! ते बीअर पिणार नाहींत, शांपेन पितील ! सिग्रेट ओढ-

णार नाहींत, चिरूट ओढतील ! गप्पा मारणार नाहींत, चर्चा करतील ! चर्चा म्हणजे जगाची प्रकृति आणि तिला जडलेल्या व्याधि, या विषयांची ओढाताण ! मासळीचे दर, कोटाची फॅशन, हवेंतील उकाडा, तंबाकूवरचे कर, असल्या विषयांपर्यंत ते उतरूं शकत नाहींत. एस्कोल्टाच्या गर्दीनें त्यांना क्वचित् धक्काबुक्की होते. क्वचित् कपड्याची इस्त्री मोडते. कधीं श्वास लागतो. पण एस्कोल्टाची गर्दी ही वरिष्ठ वर्गाची गर्दी. अद्ययावत् अमेरिकन पोशाख केलेल्यांची गर्दी. एस्कोल्टाच्या व्यवहाराला स्थैर्य देणाऱ्या मातबर कचेऱ्यांत काम करणारांची गर्दी ! सहन केली पाहिजे !

एस्कोल्टाहून पलीकडच्या क्यापोला जायचें अगर सांताक्रूझमध्यें हिंडायचें म्हणजे खरोखर चार पायऱ्या खसकन् उतरण्यासारखें आहे. पण येथें जीवन आहे. येथें अंतःकरण आहे. येथें मनिलाच्या गरम रक्ताचें अभिसरण आहे ! येथें धांदल आहे, गडबड आहे, डोक्यांत खर्रर करणारा आवाज आहे. एकदम कांहीं तरी होतें, शेंकडों जीपन्यांचे, मोटारींचे ब्रेक्स खरखरतात, लोक थबकून मान उंचावून पाहूं लागतात आणि जीपन्यांचे ड्रायव्हर बाहेर डोकें काढून डोळे एवढाले करतात ! पुन्हां कांहीं तरी होतें, जीपनेचा जीव किंचाळतो, सायकलवाला पडलेली सायकल उचलून उभा राहतो, आणि जीपनेचा ड्रायव्हर प्रसन्नपणें हसून प्राण बचावल्याबद्दल त्याचें अभिनदन करतो. एकदम पोलिसचा हात फिरतो, शेंकडों वाहनें –मोटारी, जीपने, कलेसा– धापा टाकीत रांगेंत उभ्या राहतात ( अर्थात् एकादी जीपने मध्यें शिरतेच ! ) आणि रस्त्याच्या दोनहि बाजूंस गोळा झालेल्या माणसांच्या फलटणी, युद्धाच्या शिस्तीनें एकमेकांवर चालून जातात ! रस्ता ओलांडण्याचा हा विधि संपला म्हणजे वाहनांची रांग पुन्हां हलते. पुन्हां एकादी जीपने मध्येंच शिरून पुढें सटकण्याचा प्रयत्न करते. इतक्यांत सिनेसा सुटतो आणि एका भव्य इमारतीच्या बोगद्यांतून गोणते उपडे करावे तशीं माणसें फेकलीं जातात. मध्येंच लॉटरीचीं तिकिटें फडफडविणारीं, दैनिकाची दुपारची आवृत्ति ओरडणारीं, सिग्रेटचीं पाकिटें नाचविणारीं पोरें उपटतात – आणि लोक त्यांचा परामर्श घेतात.

अशीं हीं मनिलाचीं माणसें ! एस्कोल्टावर वावरणारे लोक त्यांना ' बाक्ये ' म्हणतात. ते ' बाक्या ' ( लाकडी चपल ) वापरत नाहींत, पण कमी प्रतीच्या लोकांबद्दल तुच्छता दर्शविण्यास हा उत्तम शब्द आहे. मला त्यांच्या बाक्याशीं कांहीं कर्तव्य

नाहीं. त्यांच्या चालण्याबोलण्यांत, नजरेंत मनिलाचें पाणी दिसतें एवढ्यावर मी खूष आहें. मी गांवांत गेलों कीं, एखाद्या कोपऱ्यावर उभा राहतों आणि मनिलाच्या माणसांकडे पाहत बसतों. मी त्यांच्या आनंदी, स्नेहाळ मुद्रांकडे पाहतों, त्यांच्या अर्धवट उमटलेल्या बदामी डोळ्यांकडे पाहतों, बुशशर्टसारख्या कापणीच्या पातळ, झिरझिरीत, नक्षीकामाची मिजास मिरवणाऱ्या पुरुषाच्या मनिला शर्ट ( बरॉंग तगालोग ) कडे पाहतों, स्त्रियांच्या नितंबांचें सारें सौंदर्य दाखविणाऱ्या झोंकदार झग्यांकडे पाहतों, मधूनच एकादी स्त्री खास फिलिपिनो झगा घालून येते तेव्हां त्याच्या फुलपांखराच्या पंखांसारख्या बाह्या पाहतों, ज्याचा फारसा कधीं उपयोग होत नसावा अशा मनगटावरच्या घड्याळाकडे पाहतो – त्यांची नजर न्याहाळतों, हास्य टिपतों, खरखरत्या स्वरांतलें इंग्रजी आणि कोमल स्वरांतलें तगालोग ऐकतों – नि वाटतें, किंचित् कां होईना, पण मनिलाच्या अंतरंगाचें दर्शन झालें !

माणसें येतात, जातात, जमतात – आणि माझ्या डोळ्यांपुढें नाना रंगांच्या आणि नाना आकारांच्या तुकड्यांचा पट उभा राहतो. हे लोक एकजिनसी, एकरंगी नाहींत. त्यांच्यांत अनेक वर्ण, अनेक वंश, अनेक ढंग आहेत. कांहींत स्पॅनिश रक्त आहे, तर कांहींत चिनी. कांहीं ताडमाड उंच, तर कांहीं खुजे. कांहींच नाक सरळ, तर कांहींचे ओठ पुढें आलेले. कांहींचे डोळे निळसर घारे, तर कांहींचे तांबूस काळे ! अनेक वंशांचे, अनेक रंगांचे, अनेक वर्णांचे लोक फिलिपीन्समध्यें जमले – आणि मूळच्या लोकांत मिसळून गेले. परिणाम : सौंदर्याचे अनेक प्रकार – आणि कुरूपपणाचेहि !

अशीं हीं मनिलाचीं माणसें. त्यांचीं वाहनें म्हणजे बस, जीपने, कलेसा. रिक्शॉ फारसे नाहींतच. बसमध्यें कण्डक्टरपेक्षां कण्डक्टरीणच आणि खाकी युनिफॉर्मातली ही बाई सरळ धांवत्या बसमधून बाहेर रेलते आणि उतारूंना पुकारते ! काळा गॉगलवाला जीपने-ड्रायव्हर आपली गाडी ठराविक ठिकाणींच थांबवतो. ऐटबाज बेफिकिरीनें तुम्हांला आंत घेतो. तुम्ही पैसे देतां तेव्हां हात मागें करतो, पण मागें बघत नाहीं. जीपने म्हणजे लष्करी जीपचा नागरिक अवतार ! युद्धानंतर अमेरिकनांनीं फेंकून दिलेल्या जीपगाड्यांना यांनीं 'बाडी' बांधली, आंत दोन बाजूबरोबर दोन फळ्या ठेवून दिल्या, दहा जीव कोंबून भरण्याची सोय केली आणि अंतर मोजण्याची भानगड न ठेवतां माणशीं चार आणे दरानें ठराविक रस्त्यावर नेण्याची सोय केली.

(इण्डोनेशिअन लोकांनीं, अमेरिकनांनीं सोडलेल्या जीपांचें नेमकं हेंच केलं, फक्त आपली मौलिक बुद्धि चालवून तिच नांव 'ओपलात' ठेवलं!) कलेसा म्हणजे आपल्या व्हिक्टोरिआ गाडीच्या पुढच्या अर्धाचा उन्नत अवतार! फक्त जिथें व्हिक्टो-रिआवाला वसतो तिथें गिन्हाईक वसतें. आंत चढतांना धांदल उडते, पण त्याची प्रतिष्ठा सांभाळण्यासाठीं डोक्यावर छत असतें आणि छताला चिनी पद्धतीचे चकचकीत अलंकार लावून दिलेले असतात! फिलिपीन्सच्या बुटक्या तट्टांनीं ओढलेले हे 'रथ' हें मनिलाचें एक ऐतिहासिक वैभव आहे. एका काळीं लादीच्या रस्त्यावरची कलेसांची टपटप म्हणजे मनिलाच्या नाडीचे ठोके असत! पण युद्ध आलें आणि त्यानें कलेसांचे घोडे पळविले! तेव्हांपासून कलेसांच्या अवनतीस सुरुवात झाली – आणि आतां कांहीं रस्त्यांनाच जखडलेली त्यांची वाहतूक आपले अखेरचे दिवस मोजीत आहे!

मनिलाच्या टॅक्स्यांचा स्वतंत्र उल्लेख केला पाहिजे. मनिलाच्या अनेक फॅशन्स-प्रमाणें तेथल्या टॅक्स्यासुद्धां अमेरिकन आहेत. तशाच मस्त आणि झोंकदार. त्यांचे ट्रेडमार्क्सहि अमेरिकन : गोल्डन सर्कल; सिल्व्हर ॲरो; डायमंड सर्व्हिस, स्टार वगैरे! प्रत्येक टॅक्सीच्या बाजूवर ठळक अक्षरांत रंगविलेलें असतें : 'पॅसेंजर्स इन्शुअर्ड'. म्हणजे प्रश्न पडतो कीं, टॅक्सीवाला तुम्हांला सरळ स्वर्गांत नेण्यासाठींच सज्ज असतो कीं काय! या टॅक्सीवाल्याशीं जरा सलगीनें गप्पा मारा, बहुधा तुम्हाला आढळून येईल कीं, तो नुसताच टॅक्सीवाला नसतो; रात्रीच्या कांहीं विश्रब्ध ठिकाणांचा एजंटहि असतो!

सांताक्रूझ चर्च आणि मनिलाची सेंट्रल बँक पाठीला पाठ लावून, फिलिपीन्सच्या आजच्या जीवनांतील वस्तुस्थितीचें यथास्थित प्रतीक म्हणून उभ्या आहेत! येथून मलाकन्यानकडे जाणें म्हणजे एका अर्थानें इतिहासांतच प्रवेश करण्यासारखें आहे. जातांना कलात्मक सज्जाच्या दुमजली स्पॅनिश लाकडी घरांचें दर्शन होतें आणि याचा इशारा मिळतो. इण्ट्रामुरस, सान्तो टॉमस आणि मलाकन्यान हीं स्पॅनिश अधिसत्तेचीं तीन ठळक लक्षणें. इण्ट्रामुरसचा अवतार विमानहल्ल्यांनीं संपुष्टांत आणला. सान्तो टॉमस युनिव्हर्सिटींत जपान्यांनीं अमेरिकन बंद्यांना ठेवलं तेव्हांच तेथें नवें वारें शिरलें आणि तिच्या भव्य आवाराला लागून आतां पेट्रोल पंप आहे! आणि ज्या मलाकन्यान-कडे परकी गव्हर्नराचा राजवाडा म्हणून लोक भयचकित मुद्रेनें पाहत त्याला 'लोक-

प्रासाद ' अशी नवी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. आतां तें प्रेसिडेंटचें निवासस्थान आहे. पण हा लोकप्रासाद लोकांना लाभलेला दिसत नाहीं. १९३५ सालीं राष्ट्राध्यक्ष-पदाचें युग अवतरल्यापासून तीन अध्यक्ष अधिकारपदावर असतांना निवर्तले आणि दोघांचे अंत्य-संस्कार येथूनच झाले. बाकी या राजवाड्याला पूर्वींचाच कसला तरी शाप असावा. धरणीकंप, वादळ, आग, पूर यांची दृष्टि त्याच्यावर फार वेळां फिरली, आणि त्याच्या व्यवस्थापकाला हललेल्या भिंती, भंगलेले खांब आणि ढळलेलीं छपरें यांचीच फार फिकीर करावी लागली. आवारांतले मस्त तालवृक्ष आणि हिरवीं मैदानें यामुळें त्याची ही अवस्था लोकांना फारशी जाणवत नाहीं, पण तो राजवाडा आपल्या शापग्रस्त अवस्थेच्या जाणिवेंतच वावरत असावा, त्याच्यावर कसली तरी उदास छाया पसरली आहे असें वाटतें. मला तरी त्याचें दर्शन कधीं प्रसन्न, प्रफुल्ल वाटलेंच नाहीं. परवां मी गेलों तेव्हां तर तो दुःखांतच बुडालेला होता. प्रेसिडेंट मॅग्सेसाय् यांच्या शवपेटीचें दर्शन घेण्यासाठीं जमलेल्या हजारों लोकांच्या वर्तनांत शोक आणि शिस्त यांचें जें असामान्य मिश्रण आढळलें त्याचीच छाप माझ्यावर अधिक बसली.

मनिलाला गल्लोगल्लीं ' युनिव्हर्सिट्या ' दिसतात. ह्यांतल्या बऱ्याच विद्येचा व्यापार करणाऱ्या पोटभरू संस्था आहेत असें एकानें सांगितलें. तरीसुद्धां दहा लाख वस्तीच्या मनिलांत इतक्या शिक्षणसंस्था असाव्यात ह्याचें थोडें आश्चर्यच वाटतें. मनिलांत शिक्षणाचा प्रसार बराच आढळला. हॉटेलांत काम करणारा वेटर अगर टॅक्सी चालवणारा ड्रायव्हर कॉलेजचें एखादें वर्ष पाहिलेला असतो. माझ्या एका भारतीय मित्रानें ह्याचें श्रेय अमेरिकेला दिलें. " ह्या लोकांना अमेरिकेनें शिकवलें. " असें तो म्हणाला. सारेच साम्राज्यवादी आपल्या वसाहतींतील कारभाराबद्दल अभिमान मिरवितात, पण अमेरिकेचा फिलिपीन्सविषयक अभिमान सार्थ आहे, अशा अर्थाचे, विख्यात इतिहासज्ञ अर्नोल्ड टॉयन्बी ह्यांनीं काढलेले उद्गार मला आठवले. यंत्रविज्ञान हा अमेरिकन शिक्षणाचा विशेष, पण मनिलांत मला आढळला तो तत्त्वज्ञानाचा प्रभाव. फिलिपिनो यंत्रविज्ञानांत साफ मागासलेले आहेत असें नव्हे. कांहीं कांहीं फिलिपिनोंचें यांत्रिक ज्ञान आश्चर्यकारक आहे. फिलिपीन्स एअर लाइन्स( ' पाल ' )च्या कारखान्यांत अमेरिकन विमानदलाचीं विमानें दुरुस्तीला जातात ह्यावरून काय तें ओळखावें. पण फिलिपीन्सच्या विद्यापीठांत मला जोर आढळला तो वाङ्मय,

इतिहास, तत्त्वज्ञान, इत्यादि विषयांचाच. येथें एक प्रसंग आठवतो. ऑक्टोबर १९५५ त रंगून येथें जॉन्स हॉपकीन्स व रंगून विद्यापीठांच्या संयुक्त प्रेरणेनें एक आग्नेय आशिया परिषद भरली होती. त्या वेळीं एका वादविवादांत रंगून विद्यापीठाचे रेक्टर डॉ. थि ऑंग ह्यांनीं, राष्ट्राच्या औद्योगिक उन्नतीसाठीं यंत्रविज्ञान जिकडेतिकडे फैलावलें पाहिजे असें प्रतिपादिलें. त्याला फिलिपीन्सचे डॉ. ऑल्फ्रडो मोरालेस ह्यांनीं उत्तर देऊन तत्त्वविज्ञानाचा असा कांहीं प्रभावी पुरस्कार केला कीं, त्यांच्या वक्तृत्वाच्या आंतरिक शक्तीनें लोक चकित झाले! आजच्या यंत्रविद्येच्या युगांतहि फिलिपीन्समध्यें वाङ्मय, इतिहास, तत्त्वज्ञान, इत्यादि तत्त्वविज्ञानात्मक विद्येचाच जोर आहे. पन्नास वर्षांच्या अमेरिकन अंमलानंतर आणि दहा वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर फिलिपीन्समध्यें स्पेनच्या कॅथॉलिक संस्कृतीचेंच वर्चस्व असल्याचें हें द्योतक आहे. एक पत्रकार मला म्हणाला, "ज्याच्यापाशीं पैसा असतो तो अमेरिकेला जातो, ज्याच्यापाशीं अधिक पैसा असतो तो स्पेनला जातो!"

सान्तो टॉमस हा फिलिपिनो शिक्षणाचा बालेकिल्ला समजला जातो, पण आधुनिक विद्येचें आगर तिकडे क्विझॉन सिटीमध्यें यू. पीं.त आहे. (यू. पी. म्हणजे युनिव्हर्सिटी ऑफ द फिलिपीन्स.) यू. पी.ची सफर हा एक अनुभव आहे. यू. पीं.त वावरतांना मला पेरादेनियाची सारखी आठवण आली. ह्या दोहोंत फार साम्य आहे. पेरादेनियाप्रमाणेंच टेकड्यांच्या उंचसखल भागावर यू. पी. वसविली आहे. पेरादेनिया-प्रमाणेंच यू. पी.च्या वास्तुशिल्पांत प्राचीन आणि अर्वाचीन ह्यांचा मिलाफ साधण्याचा प्रयत्न आहे. पण सिलोनचें 'प्राचीन' आणि फिलिपीन्सचें 'प्राचीन' ह्यांत फरक आहे. फिलिपीन्सला प्राचीन संस्कृतीची प्रेरणा रोम-अथेन्सकडून मिळते; सिलोनला अनुराधापूर-कॅंडीकडून मिळते. यू. पी.च्या भव्य स्तंभाच्या भव्य इमारतीवर ग्रीक वास्तुशिल्पाचा प्रभाव दिसतो. पेरादेनियाच्या कलासुंदर प्रवेशद्वारांत, नक्षीदार स्तंभमालिकांत आणि रक्तवर्णीय शिरांत कॅण्डीच्या वास्तुशिल्पाचा प्रभाव आढळतो.

आश्चर्य असें कीं, यू. पी.च्या रोमन कॅथॉलिक चॅपेलचें वास्तुशिल्प आधुनिक, अत्याधुनिक आहे. प्रथम वाटलें कीं, ही युनिव्हर्सिटीच्या वैज्ञानिक शाखेची प्रयोगशाळा. एकदां वाटलें कीं, ही व्यायामशाळा. डॉक्टर मोरालेस म्हणाले, हें चर्च, तेव्हां विश्वासबुद्धीची विलक्षण ओढाताण झाली. ह्या चॅपेलचें वास्तुशिल्प स्मृतीवर कायमचें

कोरलें जाईल असेंच आहे. वर्तुळाकार चवुतऱ्यावर अर्धवर्तुळाकार आच्छादन अशी ह्या वास्तुशिल्पाची मूळ कल्पना. वर्तुळाकार भिंत, तिला सभोंवतालीं प्रमाणशीर अंतरावर विस्तृत प्रवेशद्वारें, ह्या साऱ्याला सपाट छताच्या बिनखांबी व्हरांड्याचें कडें, भिंतीवर स्तनाकृति विशाल घुमट, घुमटावर मधोमध तारांचा तिकोनी सांगाडा, सांगाड्यावर क्रूस असें हें अतिशय साधें पण अतिशय असाधारण असें दर्शन आहे. पलीकडच्या प्रॉटेस्टंट चर्चच्या तुलनेनें तें अतिशयच सुंदर वाटतें. प्रॉटेस्टंट चर्चमध्येंहि प्रयोग आहे, पण वाया गेलेला प्रयोग ! या प्रयोगापोटीं एक गुदामवजा इमारत निर्माण झाली एवढेंच या अपयशाचें कारण नव्हे. वस्तुतः हें प्रॉटेस्टंट चर्च ही एका प्रख्यात चर्चची प्रतिकृति आहे, पण मूळच्याला जी विशाल प्रदेशाची पार्श्वभूमि लाभलेली आहे, (छायाचित्र घेतांना हें विशेष जाणवतें.) तशी पार्श्वभूमि असती तर त्याचें सौंदर्य फारच वाढलें असतें. ती नसूनहि तें त्शॅपेल सुंदर वाटतें. हा त्याचा अस्सल-पणाचा आणखी एक पुरावा !

त्याचें अंतर्गत दर्शनहि सुंदर आहे. मधोमध वर्तुळाकार वेदी (आल्टर) ह्याहे, आणि त्यावर क्रुसावरच्या ख्राइस्तची शिल्पमूर्ति टांगलेली आहे. सभोंवतालच्या रांगांत गुडघे टेकून भक्तजन प्रार्थना करतात. अलीकडेच मनानसालांनीं रंगविलेल्या चौदा भित्ति-चित्रांनीं या अंतर्गत सौंदर्यांत भर पडली आहे. ख्राइस्तला अटक केल्यापासून फांशीं देईपर्यंतच्या चौदा प्रसंगांच्या चित्रणामुळें येथें कला आणि इतिहास यांचा एकत्र साक्षात्कार घडतो.

शेजारींच एक सभागृह आहे. तेंही अतिशय आधुनिक. आपल्याकडे मंगल कार्या-लयें असतात ना—दोनतीन समांतर खोल्या आणि त्यांना जोडून मांडव—त्याची कल्पना करा. मांडवाच्या एका बाजूला सरळ खांब देण्याऐवजीं ते एकमेकांना नागमोडी पद्धतीनें जोडून उभे केले आहेत, आणि वर इतरत्र सरळ सपाट असणाऱ्या छताला कमानीसारख वर्तुळाकार स्वरूप दिलें आहे. हें सभागृह मला फार सुंदर वाटलें नाहीं, दर्शनीय वाटलें नाहीं; पण लक्षणीय वाटलें.

मावळत्या सूर्याच्या कोंवळ्या सोनेरी किरणांनीं उजळलेलें तें त्शॅपेल मी डोळे भरून पाहत होतों. इतक्यांत युनिव्हर्सिटीच्या बेलटॉवरमधून संगीताचे मधुर स्वर आले. बेलटॉवरमध्यें लहानमोठ्या आकारांच्या घंटा बसविलेल्या आहेत, आणि त्यांतून

सकाळ-संध्याकाळ संगीताचे स्वर निर्माण करण्यांत येत असतात. कांहीं वेळानें मी वसमधून परत आलों तेव्हां हे स्वर ऐकूं येतच होते. ह्या स्वरांत अनेक स्मृति मिसळलेल्या होत्या. त्या चॅपेलच्या स्मृति; ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंगच्या भव्य प्रवेशद्वाराच्या स्मृति; विद्यार्थि-विद्यार्थिनींच्या तरल हालचालींच्या आणि हसण्याखिदळण्याच्या स्मृति – आणि मुख्य म्हणजे अनेक स्नेहाळ व्यक्तींच्या सहवासाच्या स्मृति.

किती म्हणून व्यक्तींचा उल्लेख करूं? किती व्यक्तींचें कृतज्ञतेनें स्मरण करूं? ज्यांच्या सहवासांत मला प्रेमळ पित्याच्या सहवासांत आल्यासारखें सतत वाटलेलें आहे असे फिलिपीन्सचे आदरणीय शिक्षणशास्त्रज्ञ डीन बेनितेझ; ज्यांच्याशीं बोलतांना एखादा वाङ्मयीन सहप्रवासी फार दिवसांनीं भेटल्याचा मुक्त आनंद झालासा वाटतो असे फिलिपीन्सचे सर्वश्रेष्ठ लेखक निक वॉकिन, फिलिपीन्सची आकर्षक कल्पना ज्यांनीं प्रथम मला दिली ते दुसरे प्रसिद्ध लेखक एन्. व्ही. एम्. गॉन्सालिझ्; ज्यांच्या भेटीसाठीं मी खूप थकलेला असूनहि मला ओढून नेण्यांत आलें, त्यामुळें आलेल्या रागाचा स्फोट होऊं नये म्हणून मीं शक्य तितकें कमी बोलायचें ठरविलें, पण एकदां बोलण्यास सुरवात झाल्यावर ज्याच्या बुद्धीच्या चापल्यामुळें व संभाषणचातुर्यामुळें आपल्यावर चैतन्याचाच वर्षाव होत आहे असें वाटलें आणि गप्पागोष्टींत दोन-अडीच तास केव्हां निघून गेले तें ध्यानांतहि आलें नाहीं असे होसे लानसँग; गप्पांच्या पहिल्याच फेरींत आपली एखाद्या बौद्धिक वातचक्राशीं गांठ पडली आहे असें वाटायला लावणारे 'मनिला क्रॉनिकल' चे सॉलिओंगो; भारतीय सौजन्य आणि फिलिपिनो प्रेमळपणा यांचा संयुक्त साक्षात्कार घडविणारे इंडो-फिलिपिनो लेखक मोरलीधरम्; आपल्या विनोदबुद्धीला विद्वत्तेची तकाकी चढविणारे आलिगार क्रूझ; ज्यांच्याशीं चार शब्द बोलल्याबरोबर आपली एकाद्या वृत्तपत्रीय झंझावाताच्या स्त्रीआवृत्तीशीं गांठ पडली आहे अशी खात्री होते अशा सीता त्रिनिदाद; एखाद्या स्पिंगच्या बाहुलीप्रमाणें वाटणाऱ्या मिसेस् लिझ् आर्गिला; माता, भगिनी आणि प्रियसखी यांचें संस्कारशाली दर्शन एकदम् घडविणाऱ्या पुरा कास्ट्रेन्सें; ज्यांच्यांत वैयक्तिक आकर्षण आणि बौद्धिक चमक ह्यांचा बेमालूम मिलाफ झालेला आहे असे डॉ. ऑल्फ्रेडो मोरालेस – एक ना, अनेक!

यू. पीं. त भेटलेल्या व्यक्तींची मी आठवण करूं लागतों तेव्हां प्रथम माझ्यासमोर जोसेफिनाची ती साधीभोळी, शांत आणि समर्पित मूर्ति उभी राहते.

22609 दि:
226 नों: दि:

## मिस् जोसेफिना

मिस् जोसेफिना कॉन्स्टाण्टिनो ह्या तरुण प्राध्यापिकेच्या रूपानें मला एका ध्येयासक्त आत्म्याचेंच दर्शन झालें. युनिव्हर्सिटी ऑफ् द फिलिपीन्सच्या एका बौद्धिक संस्थेच्या सभासदांसमोर मी दोनदां बोललों. प्रत्येक वेळीं ह्या प्राध्यापिकेनें मला मोठे तळमळीचे प्रश्न विचारले. एकदोन वेळां उपप्रश्न-प्रतिप्रश्न विचारून मला मोडून काढण्याचा प्रयत्न केला. प्रथम मला वाटलें कीं, ही नुसती तल्लख बुद्धिमत्तेची अधीरता असेल. पण तिची निष्पाप, निःशंक, कांहींशी भोळी मुद्रा, तिच्या नजरेंतले आर्त भाव आणि वाणींतली निष्ठा ह्यांमुळें ह्यांत कांहीं तरी खोल अर्थ आहे अशी माझी खात्री होत गेली. अखेरीस तिनें विचारलें, " तुम्ही आपलें कार्य बुद्धिजीवी वर्गा-पुरतेंच मर्यादित कां ठेवतां ? "

" दरेकानें आपल्या कार्याचें निश्चित क्षेत्र ठरवावें हें बरें नाहीं का ? "

" पण केवळ बौद्धिक कार्यानें लोकांची सेवा होते का ? "

प्रश्न गहन होता. मी थोडा वेळ स्तब्ध झालों. नंतर म्हणालों —

" नाहीं, तसें मला वाटत नाहीं. केवळ बौद्धिक कार्याच्या मर्यादा मी जाणतों. आमच्या हिंदु तत्त्वज्ञानांत ब्रह्माची नुसती व्याख्या जाणणारा विद्वान् ब्रह्म जाणत नाहीं, असा इशारा दिलेला आहे. म्हणून गांधींना पुस्तकी ज्ञानापेक्षां लोकसेवा अधिक महत्त्वाची वाटे. आमच्या मर्यादा ओळखूनच आम्ही काम करतों – आणि आमच्या अपेक्षाहि मर्यादित आहेत. आम्ही बुद्धिजीवी वर्गामध्यें बुद्धीच्या वास्तव कार्याची जाणीव करून दिली, बुद्धीच्या स्वातंत्र्याचें महत्त्व बुद्धिजीवी लोकांना पटविलें, तरी आम्ही पुष्कळ कार्य केलें, असें आम्हांला वाटतें. "

" मग सेंट फ्रान्सिसचा माग अधिक श्रेष्ठ नाहीं का ? माझ्यासारखीनें – मीं सेंट फ्रासिन्सच्या मार्गानें जावें, नाहीं का ? "

ह्या प्रश्नानें तिच्या व्यक्तित्वावर एकदम प्रकाश पडला. तिचा निष्पाप चेहेरा आणि तिचे भेदक प्रश्न ह्यांची संगति लागली. कसल्या तरी आंतरिक समस्येनें तिचा आत्मा अस्वस्थ बनला होता आणि तिचे प्रश्न-प्रतिप्रश्न म्हणजे ह्या अस्वस्थतेचे उद्रेक होते. एकदम तिच्याबद्दल मला विलक्षण आदर आणि आपुलकी वाटू लागली. थोडा वेळ

थांबून मीं म्हटलें, " तुम्ही प्राध्यापिका आहांत. प्राध्यापिकेच कार्य व्यवस्थित पार पाडण्याच्या दृष्टीनें तुम्ही आजवर सारी तयारी केलेली असणार. तरीसुद्धां तुम्हांला तळमळीनें आणि प्रामाणिकपणानें वाटत असेल कीं, सेंट फ्रान्सिसच्या मार्गानें गेल्यानेंच तुम्हांला खरें समाधान लाभणार आहे, तर तुम्ही जरूर त्या मार्गानें जा. पण त्या मार्गानें जाण्याची शक्ति आपल्यापाशीं आहे कीं नाहीं आणि त्या मार्गानें गेल्यानेंच आपल्याला खरें समाधान लाभेल कीं नाहीं ह्याचा निर्णय तुमचा तुम्हींच केला पाहिजे. "

तिच्याबद्दल जो आदर आणि आपुलकी माझ्या मनांत एकदम दाटली त्यामुळें कदाचित् माझ्या शब्दांना कसलीतरी निराळीच शक्ति प्राप्त झाली असावी. अलीकडेच मला पाठविलेल्या एका पत्रांत तिनें लिहिलें आहे, " I am most of all grateful for that memorable evening when you very sharply but wisely silenced my inner turmoil..." ह्या सुंदर पत्रांतले आणखी उतारे देण्याचा मोह मला होतो, पण खाजगी मजकुराची अधिक अवज्ञा करण्याचा धीर मला होत नाहीं. पण तिच्या वास्तव व्यक्तित्वाची कल्पना आणून देण्यासाठीं एक गोष्ट सांगितली पाहिजे. १९४० पासून ती यू.पीं.त शिकवीत आहे. पण जपानी आले तेव्हां तिनें शिकविण्याचें कार्य करण्याचें साफ नाकारलें आणि जखमी लोकांची सुश्रूषा करण्याचें काय पत्करलें !

ध्येयासक्त अस्वस्थतेकडून भावनाशील आत्मपूजनाकडे वळणें म्हणजे डोंगराच्या शिखरावरून एखाद्या खाचरांत उतरण्यासारखें आहे असें कांहींना वाटेल, पण मला त्यांत अंतःकरणाचें तितकेंच आकर्षक सौंदय आढळलें.

हें अंतःकरणाचें सौंदर्य दिल्लींत एका परिषदेसाठीं येऊन राहिलेल्या एका फिलिपिनो प्राध्यापिकेचें आहे. तिची माझी अगदीं योगायोगानें ओळख झाली. मी तिच्या हॉटेलांत एका दुसऱ्याच फिलिपिनो स्त्रीला भेटावयाला गेलों होतों. पण नामसादृश्यामुळें हिनेंच माझें स्वागत केलें. आश्चर्य म्हणजे ती कवयित्री होती, आणि शिकवण्याच्या संवयीमुळें असेल, तिच्या शब्दांवर आणि उच्चारांवर विदग्ध संस्कार झालेले होते. एखादा वाङ्मयीन परिच्छेद वाचल्यासारख्या तिच्या समतोल आणि आकारशील बोलण्यानें मी मोहून गेलों. एका फिलिपिनो लेखकानें, पोलिसांच्या तुकडीनें घेरलेल्या

एका खुनी मवाल्याला, त्याच्याशीं विश्वासानें बोलून, अगदीं गांधीवादी पद्धतीनें पोलिसांच्या स्वाधीन होण्यास प्रवृत्त केलें, ही नुकतीच घडलेली हकीगत ती मला सांगत होती आणि मी कोणत्या तरी कलासुदर चरित्रांतला भागच ऐकत आहें असें मला वाटलें. त्यांतली वस्तुस्थिति अशी होती कीं, ती त्या हकीगतीकडे कवीच्या सर्जनशील दृष्टीनें पाहत होती आणि मूळच्या घटनेवर वाङ्मयीन संस्कार करीत होती. प्रत्येक व्यक्ति, प्रसंग अगर विचार तिच्या तोंडून अशा संस्कारित स्वरूपांतच बाहेर पडे. किंबहुना, वाङ्मयीन कल्पनाविहारांत आंदोलनें घेणाऱ्या एखाद्या पंधरा सोळा वर्षांच्या कॉलेजकन्येलाच आपण भेटत आहोंत असें ह्या चाळीस वर्षांच्या स्त्रीशीं बोलत असतांना मला वाटे.

विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती हिंदुस्थानच्या प्रेमांत पडली होती. हिंदुस्थानांतल्या वातावरणानें तिचें अंतःकरण भरून निघालें होतें. भारतीय जीवनांच्या रंग-नाद-गंधानें तिच्या अंतःकोषांत कसल्या तरी अबोध लहरी निर्माण झाल्या होत्या, आणि त्या लहरींच्या आंदोलनावर विहरतांना कसल्या तरी दिव्य साक्षात्काराचा क्षण समीप आला आहे असें तिला वाटत होतें. तो 'क्षणांत नाहींसा होणारा दिव्य भास' होता; 'प्रकाशाच्या एका कटाक्षानें विरून जाणारें स्वप्न' होतें-पण अपेक्षेच्या त्या नीलधूसर क्षितिजावर विहरतांना तिला क्षणांत कसला तरी अननुभूत आनंद होई आणि क्षणांत कसल्या तरी अनपेक्षित विफलतेनें ती अस्वस्थ बने. फिलिपीन्सला परत जातांना मला निरोपाखातर लिहिल्या पत्रांत ती लिहिते : "India has given me the moment and the circumstance to be poetic. The throes of emotions that I go through only a sensitive mind can understand. In the evening I am almost overwhelmed with consummating passion for a dearly beloved (and it's a feeling that engulfs me and leaves me beholden), but believe me I must still find the Real Beloved. Sometimes he comes to me as a Spirit and most of the time he seems real but is very elusive. If I have to stay in India for a month more and keep feeling like this, I shall soon languish in frustration-and I don't

wish to languish in luxury in a hotel. It is not in keeping with the life of poets—don't you think so?"

एकादा देश तुम्हांला आवडतो त्याचें कारण तेथलें नैसर्गिक आणि मानवनिर्मित सौंदर्य. पण एकाद्या देशाच्या प्रेमांत तुम्ही पडतां त्याला कारण मात्र तेथले लोक. फिलिपीन्सवर माझें प्रेम जडलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22609... वि:
क्रमांक ..228...... नों: दि:

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.